Baba Murli Marathi

December 2024

ब्राह्मण जन्माच्या स्मृतींद्वारे समर्थ बनून सर्वांना समर्थ बनवा

आज चोहो बाजूच्या सर्व स्नेही मुलांचे स्नेहाचे गोड-गोड आठवणीचे विभिन्न बोल, स्नेहाच्या मोत्यांच्या माळा बापदादांकडे अमृतवेळेही अगोदर पोहोचल्या आहेत. मुलांचा स्नेह बापदादांना देखील स्नेहाच्या सागरामध्ये सामावून घेतो. बापदादांनी पाहिले की प्रत्येक मुलाची स्नेहाची शक्ति अतूट आहे. ही स्नेहाची शक्ति प्रत्येक मुलाला सहजयोगी बनवत आहे. स्नेहाच्या आधारावर सर्व आकर्षणांपासून उपराम होऊन पुढे-पुढे जात आहेत. असे एकही मूल बघितलेले नाही ज्याला बापदादांद्वारे किंवा विशेष आत्म्यांद्वारे अलिप्त आणि प्रेमळ स्नेहाचा अनुभव झालेला नाही. प्रत्येक ब्राह्मण आत्म्याच्या ब्राह्मण जीवनाचा आदिकाळ स्नेहाच्या शक्तिद्वारेच झालेला आहे. ब्राह्मण जन्माची ही स्नेहाची शक्ति वरदान बनून पुढे नेत आहे. तर आजचा दिवस विशेष बाबांच्या आणि मुलांच्या स्नेहाचा दिवस आहे. प्रत्येकाने मनोमन आपल्या स्नेहाच्या मोत्यांच्या भरपूर माळा बापदादांना घातल्या. बाकीच्या सर्व शक्ति आजच्या दिवशी मर्ज आहेत परंतु स्नेहाची शक्ति इमर्ज आहे. बापदादा देखील मुलांच्या स्नेहाच्या सागरामध्ये लवलीन (एकरूप) झाले आहेत.

आजच्या दिवसाला स्मृती दिवस म्हणता. स्मृती दिवस फक्त ब्रह्माबाबांच्या स्मृतीचा दिवस नाही आहे परंतु बापदादा म्हणतात आज आणि कायमचेच हे लक्षात ठेवा की, बापदादांनी ब्राह्मण जन्म घेताच आदि पासून आत्ता पर्यंत कोण-कोणत्या स्मृती दिल्या आहेत. त्या स्मृतींच्या माळा आठवा, खूप मोठी माळा बनेल. सर्वांना सर्वात पहिली स्मृती कोणती मिळाली? पहिला धडा लक्षात आहे ना! मी कोण! या स्मृतीनेच नवीन जन्म दिला, वृत्ति, दृष्टी, स्मृतीचे परिवर्तन केले आहे. अशा स्मृती आठवताच रुहानी (आत्मिक) आनंदाची झलक डोळ्यांमध्ये, मुखामध्ये येतेच. तुम्ही स्मृतींना आठवता आणि भक्त माळेचा जप करतात. एक जरी स्मृती अमृतवेलेपासून कर्मयोगी बनण्याच्या वेळेपर्यंत सतत लक्षात जरी राहिली तरीही स्मृती समर्थ स्वरूप बनवते कारण जशी स्मृती तशीच समर्थी स्वतःच येते त्यामुळे आजच्या दिवसाला स्मृती दिवसा सोबतच समर्थ दिवसही म्हणतात. ब्रह्मा बाबा समोर येताच, बाबांची दृष्टी पडताच आत्म्यांमध्ये समर्थी येते (शक्ती येते). सर्व अनुभवी आहेत. सर्व अनुभवी आहात ना! भले साकार रूपामध्ये बघितले असेल, नाहीतर मग अव्यक्त रूपाच्या पालनेमध्ये पालना घेत अव्यक्त स्थितीचा अनुभव करता, सेकंदामध्ये हृदयातून बापदादा म्हटले आणि समर्थी स्वतःच येते; म्हणूनच हे समर्थ आत्म्यांनो, आता अन्य आत्म्यांना आपल्या समर्थीने (शक्तीद्वारे) समर्थ बनवा. उमंग आहे ना! आहे उमंग, असमर्थ असणाऱ्याला समर्थ बनवायचे आहे ना! बापदादांनी पाहिले की, चोहो बाजूंना कमजोर आत्म्यांना समर्थ बनवण्याचा उमंग चांगला आहे.

शिवरात्रीचे प्रोग्राम धुमधडाक्यात बनवत आहेत. सर्वांना उमंग आहे ना! ज्यांना उमंग आहे - बस्स, या शिवरात्रीला कमाल (चमत्कार) करणार, त्यांनी हात वर करा. असा चमत्कार ज्यामुळे गडबड-गोंधळ संपुष्टात येईल. जयजयकार होईल वाह! व्वा समर्थ आत्म्यांनो वाह! सर्व झोननी प्रोग्राम बनवला आहे ना! पंजाबने देखील बनवला आहे ना! चांगले आहे. भटकणारे आत्मे, तहानलेले आत्मे, अशांत आत्मे, तर अशा आत्म्यांना ओंजळभर तरी द्या. कितीही झाले तरी तुमचेच भाऊ-बहिणी आहेत. तर आपल्या भावांवर, आपल्या बहिणींवर दया येते ना! बघा, आजकाल आपत्तीच्या वेळी परमात्म्याची आठवण करतात परंतु शक्तींना, देवतांमध्ये देखील गणेश आहे, हनुमान आहे अशा इतरही देवतांची जास्त आठवण करतात, तर ते कोण आहेत? तुम्हीच आहात ना! तुमची रोज आठवण करतात. हाक मारत आहेत - 'हे कृपाळू, दयाळू दया करा, कृपा करा. थोडासा सुख-शांतीचा एक थेंब द्या'. तुमच्याद्वारे एका थेंबाचे तहानलेले आहेत. तर हे शक्तिंनो, हे देव तुमच्यापर्यंत दुःखी आत्म्यांचा, तहानलेल्या आत्म्यांचा आवाज पोहोचत नाही आहे का? पोहोचत आहे ना? बापदादा जेव्हा हाक ऐकतात तर शक्तींची आणि देवांची आठवण करतात. तर दादींनी चांगला प्रोग्राम बनवला आहे, बाबांना आवडला आहे. स्मृती दिवस तर सदैव आहेच परंतु तरी देखील आजच्या दिवशी स्मृती द्वारे सर्व समर्थी (सर्व शक्ती) विशेष प्राप्त केल्या आहेत, आता उद्यापासून शिवरात्रीपर्यंत बापदादा चोहो बाजूंच्या मुलांना म्हणतात की, या विशेष दिवशी हेच लक्ष्य ठेवा की जास्तीत-जास्त आत्म्यांना मनसा द्वारे, वाणी द्वारे अथवा संबंध-संपर्काद्वारे कोणत्याही विधीने संदेश रुपी

ओंजळ जरूर द्यायची आहे. आपल्या वरील तक्रारीचे ओझे तर उतरवा. मुले विचार करतात - अजून तरी विनाशाची डेट तर दिसत नाही आहे, त्यामुळे त्यांच्या तक्रारीची कधीही पूर्तता करू; परंतु नाही, जर आत्तापासून तक्रारीची पूर्तता केली नाहीत तर ही देखील तक्रार मिळेल की, 'तुम्ही या अगोदर का सांगितले नाहीत. आम्ही देखील काही तरी बनवले असते'; नंतर तर फक्त 'अहो प्रभू' म्हणतील; म्हणून त्यांना देखील काही ना काही वारशाची ओंजळ घेऊ द्या. त्यांना देखील थोडा वेळ द्या. एका थेंबाने तरी तहान भागवा, तहानलेल्यासाठी एक थेंब सुद्धा खूप महत्वाचा असतो. तर हाच प्रोग्राम आहे ना की उद्यापासून बापदादा सुद्धा हिरवा झेंडा नाही, नगाडे वाजवत आहेत की, 'त्या आत्म्यांना, हे तृप्त आत्म्यांनो, संदेश द्या, संदेश द्या'. कमीत-कमी शिवरात्रीला बाबांच्या बर्थ डे ला तोंड तरी गोड करू देत की, हां, आम्हाला संदेश मिळाला आहे. ही दिलखुश मिठाई सर्वांना ऐकवा, खायला द्या. साधारण शिवरात्री साजरी करू नका, काही कमाल (चमत्कार) करून दाखवा. उमंग आहे ना? पहिल्या लाइनला आहे? खूप धमाल माजवा. कमीत-कमी हे तरी समजू देत की, शिवरात्रीचे इतके मोठे महत्व आहे. आमच्या बाबांचा जन्म दिवस आहे, ऐकून आनंद तर साजरा करू दे. बापदादांनी पाहिले आहे की, अमृतवेलेला मेजॉरिटींची आठवण आणि ईश्वरीय प्राप्तींचा नशा खूप चांगला असतो. परंतु कर्मयोगी स्टेजमध्ये जो अमृतवेलेचा नशा आहे त्यामध्ये फरक पडतो. कारण काय आहे? कर्म करताना, 'सोल कॉन्शस' आणि 'कर्म कॉन्शस' दोन्ही असतात. याची विधी आहे कर्म करताना - 'मी आत्मा, कोणती आत्मा, ते तर जाणताच, आत्म्याचे जे वेगवेगळे स्वमान मिळालेले आहेत, अशी आत्मा करावनहार होऊन या कर्मेंद्रियांद्वारे कर्म करणारी आहे, ही कर्मेंद्रिये कर्मचारी आहेत परंतु कर्मचारींकडून कर्म करवून घेणारी मी करावनहार आहे, न्यारी (वेगळी) आहे. काय लौकीकमध्ये देखील डायरेक्टर जेव्हा आपल्या साथीदारांकडून, निमित्त सेवा करणाऱ्यांकडून सेवा करवून घेत असताना, डायरेक्शन देत असताना, ड्युटी बजावत असताना विसरून जातात का की मी डायरेक्टर आहे ते? तर स्वतःला करावनहार शक्तिशाली आत्मा आहे, असे समजून कार्य करवून घ्या. ही आत्मा आणि हे शरीर, हे शरीर करनहार आहे आणि ही आत्मा करावनहार आहे, ही स्मृती मर्ज होऊन जाते. तुम्हा सर्वांना, जुन्या मुलांना माहीत आहे की ब्रह्मा बाबांनी सुरुवातीला कोणता अभ्यास केला? एक डायरी पाहिली होती ना. संपूर्ण डायरीमध्ये एकच शब्द - मी देखील आत्मा, जशोदा देखील आत्मा, ही मुले सुद्धा आत्मा आहेत, आत्मा आहेत, आत्मा आहेत... हा फाऊंडेशनचा पक्का अभ्यास केला. तर हा पहिला धंडा - 'मी कोण?' याचा वारंवार अभ्यास हवा. चेकिंग हवी, असे नाही - 'मी तर आहेच आत्मा'. अनुभव करा की मी आत्मा करावनहार बनून कर्म करवून घेत आहे. करनहार वेगळा आहे, करावनहार वेगळा आहे. ब्रह्मा बाबांचा दुसरा अनुभव देखील ऐकला आहे की, ही कर्मेंद्रिये, कर्मचारी आहेत. तर रोज रात्रीची कचेरी ऐकली आहे ना! तर मालक बनून या कर्मेंद्रिय रूपी कर्मचारींना हालहवाल विचारला ना! तर जसा ब्रह्मा बाबांनी हा अभ्यास फाऊंडेशन खूप पक्के केले, म्हणूनच जी मुले अखेरच्या वेळी देखील सोबत होती त्यांनी काय अनुभव केला? की बाबा कार्य करत असताना सुद्धा शरीरामध्ये असूनही अशरीरी स्थितीमध्ये चालत-फिरत असल्याचा अनुभव होत राहिला. भले कर्माचा हिशोब सुद्धा चुकता करावा लागला परंतु साक्षी होऊन, ना स्वतः कर्माच्या हिशोबाच्या वश राहिले, ना इतरांना कर्माचा हिशोब चुकता होत असल्याची जाणीव होऊ दिली. तुम्हाला कळले का की ब्रह्मा बाबा अव्यक्त होत आहेत म्हणून, नाही कळले ना! तर इतके न्यारे, साक्षी, अशरीरी अर्थात कर्मातीत स्टेजचा खूप काळापासून अभ्यास केला तेव्हा अंतिम समयी सुद्धा त्याच स्वरूपाचा अनुभव झाला. हा खूप काळाचा अभ्यास कामी येतो. असा विचार करू नका की शेवटच्या क्षणी देहभान सोडून देऊ, नाही, खूप काळाचा अशरीरीपणाचा, देहापासून न्यारा करावनहार स्थितीचा अनुभव हवा. भले कोणी तरुण असेल, किंवा वृद्ध असेल, निरोगी असेल, नाहीतर आजारी असेल कोणाचाही कधीही अंतिम वेळ येऊ शकतो म्हणून खूप काळ साक्षीपणाच्या अभ्यासावर अटेंशन द्या. मग कितीही नैसर्गिक आपदा येतील परंतु ही अशरीरीपणाची स्टेज तुम्हाला सहजच अलिप्त आणि बाबांचा प्रिय बनवेल म्हणूनच बापदादा 'खूप काळ' या शब्दाला अंडरलाइन करवत आहेत. काहीही होवो, संपूर्ण दिवसभरामध्ये साक्षीपणाच्या स्टेजचा, करावनहारच्या स्टेजचा, अशरीरीपणाच्या स्टेजचा अनुभव वारंवार करा, तेव्हाच 'अंत मते फरिश्ता सो देवता' बनणे निश्चित आहे. बाप समान बनायचे असेल तर बाबा निराकार आणि फरिश्ता आहेत, ब्रह्मा बाप समान बनणे अर्थात फरिश्ता स्टेजमध्ये राहणे. जसे फरिश्ता रूप साकार रूपामध्ये पाहिले, ऐकत असताना, बोलत असताना, कार्य व्यवहार करताना अनुभव केला की बाबा शरीरामध्ये असूनही जसे काही न्यारे आहेत (अलिप्त आहेत). कार्याला सोडून अशरीरी बनणे, हे तर थोडा वेळ होऊ शकते परंतु कार्य करताना, वेळ काढून अशरीरी, पॉवरफुल स्टेजचा अनुभव करत रहा. तुम्ही सर्व फरिश्ते आहात, बाबांद्वारे या ब्राह्मण जीवनाचा आधार घेऊन संदेश देण्यासाठी साकारमध्ये कार्य करत आहात. फरिश्ता अर्थात देहामध्ये राहून देहापासून न्यारे आणि याचे उदाहरण स्वरूप

ब्रह्मा बाबांना पाहिले आहे, असंभव नाही आहे. पाहिले आहे आणि अनुभव केला आहे. जे कोणी निमित्त आहेत, भले आता विस्तार अधिक आहे परंतु जितकी ब्रह्मा बाबांची नवीन नॉलेज, नवीन जीवन, नवीन दुनिया बनविण्याची जबाबदारी होती, तितकी आता कोणाचीही नाही आहे. तर सर्वांचे लक्ष्य आहे ब्रह्मा बाप समान बनणे अर्थात फरिश्ता बनणे. शिवबाबांसमान बनणे अर्थात निराकार स्थितीमध्ये स्थित होणे. अवघड आहे का? बाबा आणि दादांवर प्रेम आहे ना! तर ज्यांच्यावर प्रेम आहे त्यांच्यासारखे बनणे, जर संकल्प देखील आहे - बाप समान बनायचेच आहे, तर काहीच अवघड नाही. फक्त वारंवार अटेंशन द्यायचे आहे. साधारण जीवन नाही. साधारण जीवन जगणारे पुष्कळ आहेत. मोठी-मोठी कार्य करणारे भरपूर आहेत. परंतु तुमच्यासारखे कार्य, तुम्हा ब्राह्मण आत्म्यांशिवाय इतर कोणीही करू शकत नाही.

तर आज स्मृतिदिनाला बापदादा 'समानतेमध्ये समीप या, समीप या, समीप या', हे वरदान देत आहेत. सर्व हदचे किनारे, भले मग संकल्प असो, किंवा बोल असो, किंवा कर्म असो, किंवा संबंध-संपर्क असो कोणताही हदचा किनारा असो, आपल्या मनाच्या नावेला या हदच्या किनाऱ्यांपासून मुक्त करा. आतापासून जीवन जगत असताना मुक्त, असा जीवनमुक्तीचा अलौकिक अनुभव खूप काळ करा. अच्छा.

चोहो बाजूच्या मुलांची पत्रे भरपूर मिळाली आहेत आणि मधुबनवाल्यांचा क्रोधमुक्तचा रिपोर्ट, समाचार देखील बापदादांपाशी पोहोचला आहे. बापदादा हिंमतीवर खुश आहेत, आणि पुढील काळासाठी सदैव मुक्त राहण्यासाठी सहनशक्तीचे कवच घालून रहा, तर कोणी कितीही प्रयत्न करेल परंतु तुम्ही सदैव सेफ रहाल.

असे सर्व दृढ संकल्पधारी, सदैव स्मृती स्वरूप आत्म्यांना, सदैव सर्व शक्तींना वेळेवर कार्यामध्ये लावणाऱ्या विशेष आत्म्यांना, सदैव सर्व आत्म्यांसाठी दयाळू असणाऱ्या आत्म्यांना, सदैव बापदादा समान बनण्याच्या संकल्पाला साकार रूपामध्ये आणणाऱ्या अशा खूप-खूप-खूप प्रिय आणि न्यारे असणाऱ्या मुलांना बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि नमस्ते.

डबल फॉरेनर्सना:- डबल फॉरेनर्सना नशा आहे. डबल नशा का आहे? कारण समजता की, जसे बाबा दूरदेशचे आहेत ना तसे आम्ही देखील आहोत, तर आम्ही देखील दूर देशातून आलो आहोत. बापदादांनी डबल विदेशी मुलांची एक विशेषता बघितली की दिव्याने दिवा लावत अनेक देशांमध्ये बापदादांच्या जागृत दीपकांची दिवाळी साजरी केली आहे. डबल विदेशींना संदेश देण्याची आवड चांगली आहे. प्रत्येक ग्रुपमध्ये बापदादांनी पाहिले ३५-४० देशांचे असतात. मुबारक असो. कायम स्वतः देखील उडत रहा आणि फरिश्ते बनून उडत-उडत संदेश देत रहा. चांगले आहे, बापदादा केवळ तुम्हा ३५ देशवाल्यांना बघत नाहीत इतरही देशवाल्यांना तुमच्या सोबत बघत आहेत. तर नंबरवन बाप समान बनणारे आहात ना! नंबर वन की नंबरवार बनणारे आहात? नंबर वन? नंबरवार नाही ना? नंबरवन बनणे अर्थात प्रत्येक वेळी विन करणारे (जिंकणारे). जे जिंकतात ते विजयी होतात. तर असे आहात ना? खूपच छान. विजयी आहात आणि सदैव विजयी राहणारे आहात. बरे, आणि सर्वांना, जिथे-जिथे जाल तिथे ही आठवण करून द्या की, सर्व डबल फॉरेनर्सना नंबर वन बनायचे आहे.

अच्छा - बापदादा सर्व मातांना गो-पालाच्या प्रिय मातांना खूप-खूप हृदयापासून प्रेमपूर्वक आठवण देत आहेत आणि पांडव भले मग ते युथ असो, किंवा प्रवृत्तीवाले असो, पांडव सदैव पांडवपतीचे सोबती राहिले आहेत, अशा सोबती पांडवांना देखील बापदादा खूप-खूप प्रेमपूर्वक आठवण देत आहेत.

दादींसोबत संवाद:- आजच्या दिवशी काय आठवते? विल पॉवर्स मिळाल्या ना! विल पॉवर्सचे वरदान आहे. खूप चांगला पार्ट बजावला आहे, याची मुबारक आहे. सर्वांच्या दुवा तुम्हाला खूप आहेत. तुम्हाला पाहूनच सगळे खुश होऊन जातात, बोला किंवा नका बोलू. तुम्हाला काही होते ना तर सगळे असे समजतात आपल्यालाच होत आहे. इतके प्रेम आहे. सर्वांचे आहे. (माझे देखील सर्वांवर खूप प्रेम आहे). प्रेम तर सर्वांवर खूप आहे, हे प्रेमच सर्वांना चालवत आहे. धारणा कमी असेल किंवा जास्त असेल, परंतु प्रेम चालवत आहे. खूप छान.

ईशू दादींसोबत संवाद:- हिने देखील हिशोब चुकता केला. काही हरकत नाही. हिचा सहज पुरुषार्थ, सहज हिशोब चुकता. सहजच झाले, झोपेतच झाले. विष्णू सारखा आराम मिळाला. अच्छा. तरीही साकार पासून आतापर्यंत यज्ञ

रक्षक बनल्या आहात. तर यज्ञ रक्षक बनण्याच्या दुवा खूप असतात.

सर्व दादी बापदादांच्या खूप-खूप समीप आहेत. समीप रत्न आहेत आणि सर्वांना दादींचे महत्व आहे. संघटन देखील चांगले आहे. तुम्हा दादींच्या संघटनेमुळे इतकी वर्षे यज्ञाचे रक्षण केले आहे आणि करत राहणार. ही एकताच सर्व सफलतेचा आधार आहे. (बाबा मध्यभागी आहेत) बाबांना मधेच ठेवले आहे, हे अटेंशन खूप चांगले दिले आहे. अच्छा. सर्व ठीक आहे.

वरदानः- सर्व संबंधांनी एका बाबांना आपला साथी बनविणारे सहज पुरुषार्थी भव

बाबा स्वतः सर्व संबंधांनी साथ निभावण्याची ऑफर करतात. जशी वेळ तशा संबंधाने बाबांसोबत रहा आणि सोबती बनवा. जिथे सदैव सोबत देखील आहे आणि सोबती देखील आहे तिथे काहीही कठीण असू शकत नाही. जेव्हा कधी स्वतःला एकटे अनुभव कराल तर त्यावेळी बाबांच्या बिंदू रूपाची आठवण करू नका, प्राप्तींची लिस्ट समोर आणा, वेगवेगळ्या वेळच्या रमणीक अनुभवाच्या गोष्टी स्मृतीमध्ये आणा, सर्व संबंधाच्या रसाचा अनुभव करा म्हणजे मग मेहनत समाप्त होईल आणि सहज पुरुषार्थी बनाल.

सुविचारः- बहूरूपी बनून मायेच्या बहूरूपांना ओळखा तर मास्टर मायापती बनाल.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - तुम्हाला आपल्या दिव्याचा सांभाळ स्वतःच करायचा आहे, वादळांपासून वाचण्यासाठी ज्ञान-योगाचे घृत जरूर पाहिजे"

प्रश्नः- कोणता पुरुषार्थ, गुप्त बाबांकडून गुप्त वारसा मिळवून देतो?

उत्तरः- अंतर्मुख अर्थात गप्प राहून बाबांची आठवण कराल तर गुप्त वारसा मिळेल. आठवणीमध्ये असताना शरीर सुटले तर खूपच चांगले, यामध्ये कोणताही त्रास नाही. आठवणी सोबतच ज्ञान-योगाची सेवा देखील करायची आहे, जर करू शकत नसाल तर कर्मणा सेवा करा. अनेकांना सुख द्याल तर आशीर्वाद मिळतील. वागणे आणि बोलणे देखील अतिशय सात्विक असले पाहिजे.

गीतः- निर्बल से लड़ाई बलवान की...

ओम् शांती. बाबांनी समजावून सांगितले आहे की, जेव्हा अशा प्रकारची गाणी ऐकता तर प्रत्येकाने स्वतःवरच विचार सागर मंथन करायचे असते. हे तर मुले जाणतात - मनुष्याचा मृत्यू होतो तेव्हा बारा दिवस दिवा पेटवून ठेवतात. तुम्ही तर मरण्याकरिता तयारी करत आहात आणि आपली ज्योत पुरुषार्थ करून स्वतःच प्रज्वलित करत आहात. पुरुषार्थ देखील माळेमध्ये येणारेच करतात. प्रजा या माळेमध्ये येत नाही. असा पुरुषार्थ केला पाहिजे जे आपण विजयी माळेमध्ये प्रथम यावे. कुठे माया मांजरीने वादळ निर्माण करून विकर्म बनवू नये ज्यामुळे दिवा विझला जाईल. आता यामध्ये ज्ञान आणि योग दोन्हीचे बळ पाहिजे. योगा सोबत ज्ञान देखील जरुरी आहे. प्रत्येकाने स्वतःच्या दिव्याचा सांभाळ करायचा आहे. शेवटपर्यंत पुरुषार्थ चालणारच आहे. शर्यत चालू आहे तर खूप जपायचे आहे की, कुठे ज्योत मंद होऊ नये, विझून जाऊ नये; आणि म्हणूनच योग आणि ज्ञानाचे घृत रोज घालावे लागते. योगबळाची ताकद नसेल तर पुरुषार्थामध्ये धाव घेऊ शकणार नाही. मागे राहतात. शाळेमध्ये जे विषय असतात, त्यामध्ये बघतात की, आपण या विषयामध्ये हुशार नाही आहोत तर त्या हिशोबाने जोराने तयारी करतात. इथे देखील असेच आहे. स्थूल सेवेचा विषय देखील खूप चांगला आहे. अनेकांचे आशीर्वाद मिळतात. काही मुले ज्ञानाची सेवा करतात. दिवसेंदिवस सेवेमध्ये वृद्धी होत जाईल. एखाद्या श्रीमंताची सहा-आठ देखील दुकाने असतात. सर्वच दुकाने काही एकसारखी चालत नाहीत. कोणामध्ये कमी ग्राहक, कोणामध्ये जास्त असतात. तुमचा असा देखील एक दिवस येणार आहे अशी वेळ येणार आहे जेव्हा रात्रीची सुद्धा फुरसत मिळणार नाही. सर्वांना माहिती होईल की ज्ञानसागर बाबा आलेले आहेत - अविनाशी ज्ञान रत्नांनी झोळी भरत आहेत; मग पुष्कळ मुले येतील, काही विचारू नका. जसे एकमेकांना सांगतात ना की, इथे ही वस्तू खूप चांगली स्वस्त मिळते. तुम्ही मुले देखील जाणता हे राज योगाचे शिक्षण अतिशय सोपे आहे. सर्वांना या ज्ञान रत्नांविषयी माहिती होईल तर येत राहतील. तुम्ही ही ज्ञान आणि योगाची सेवा करता. जे ही ज्ञान-योगाची सेवा करू शकत नाहीत तर मग कर्मणा सेवेचे देखील मार्क्स आहेत. सर्वांचे आशीर्वाद मिळतील. एक-दोघांना सुख द्यायचे असते. ही तर खूपच स्वस्त खाण आहे. ही अविनाशी हिरे-माणकांची खाण आहे. आठ रत्नांची माळा बनवतात ना. पूजा देखील करतात परंतु कोणालाच माहित नाही आहे की, ही माळा कोणाची बनलेली आहे.

तुम्ही मुले जाणता की, कसे आपणच पूज्य सो पुजारी बनतो. हे अतिशय वंडरफुल नॉलेज आहे जे दुनियेमध्ये कोणीही जाणत नाहीत. आता तुम्हा लकी स्टार्स मुलांनाच हा निश्चय आहे की आपण स्वर्गाचे मालक होतो, आता नरकाचे मालक बनलो आहोत; स्वर्गाचे मालक असणार तेव्हा पुनर्जन्म देखील तिथेच घेणार. आता पुन्हा आम्ही स्वर्गाचे मालक बनत आहोत. तुम्हा ब्राह्मणांनाच या संगमयुगाची माहिती आहे. दुसऱ्या बाजूला सारी दुनिया आहे कलियुगामध्ये. युग तर वेगवेगळे आहे ना. सतयुगामध्ये असाल तेव्हा पुनर्जन्म सतयुगामध्येच घ्याल. आता तुम्ही संगमयुगावर आहात. तुमच्या पैकी जर कोणी शरीर सोडले तर संस्कारानुसार पुन्हा इथेच येऊन जन्म घेतील. तुम्ही ब्राह्मण आहात संगमयुगातील. ते शूद्र आहेत कलियुगातील. हे नॉलेज देखील तुम्हाला या संगमावरच मिळते. तुम्ही बी. के. ज्ञानगंगा प्रॅक्टिकल मध्ये आता संगमयुगामध्ये आहात. आता तुम्हाला रेस करायची आहे. दुकान सांभाळायचे आहे. ज्ञान-योगाची धारणा नसेल तर दुकान सांभाळू शकणार नाही. सेवेचा

मोबदला तर बाबा देणारच आहेत. यज्ञ रचला जातो तेव्हा तऱ्हे-तऱ्हेचे ब्राह्मण लोक येतात. मग कोणाला जास्त दक्षिणा मिळते, कोणाला कमी मिळते. आता या परमपिता परमात्म्याने रुद्र ज्ञान यज्ञ रचला आहे. आपण आहोत ब्राह्मण. आपला धंदाच आहे मनुष्याला देवता बनविणे. असा यज्ञ आणखी कोणता असत नाही, जिथे कोणी म्हणतील की, आम्ही या यज्ञाद्वारे मनुष्यापासून देवता बनत आहोत. आता याला रुद्र ज्ञान यज्ञ अथवा पाठशाळा देखील म्हटले जाते. ज्ञान आणि योगाने प्रत्येक मुलगा देवी-देवता पद प्राप्त करू शकतो. बाबा माहिती सुद्धा देतात - तुम्ही परमधामवरून बाबांसोबत आला आहात. तुम्ही म्हणणार - 'आम्ही परमधाम निवासी आहोत'. यावेळी बाबांच्या मतावर आम्ही स्वर्गाची स्थापना करत आहोत. जे स्थापना करतील तेच जरूर मालक बनतील. तुम्ही जाणता या दुनियेमध्ये आपण मोस्ट लकीएस्ट (सर्वात जास्त भाग्यवान), ज्ञान सूर्य, ज्ञान चंद्रमा आणि ज्ञान सितारे आहोत. बनविणारे आहेत - ज्ञानसागर. ते सूर्य, चंद्र, तारे तर स्थूलमध्ये आहेत ना. त्यांच्यासोबत आपली तुलना आहे. तर आपण देखील मग ज्ञान सूर्य, ज्ञान चंद्रमा, ज्ञान सितारे होणार. आपल्याला असे बनविणारे आहेत - ज्ञानाचे सागर. नाव तर पडणार ना. ज्ञान सूर्य अथवा ज्ञानसागराची आपण मुले आहोत. ते काही इथले रहिवासी नाही आहेत. बाबा म्हणतात - 'मी येतो तुम्हाला आप समान बनवितो'. ज्ञान सूर्य, ज्ञान सितारे तुम्हाला इथेच बनायचे आहे. तुम्ही जाणता बरोबर आपण भविष्यामध्ये पुन्हा इथेच स्वर्गाचे मालक बनणार. सर्व काही पुरुषार्थावर अवलंबून आहे. आपण मायेवर विजय प्राप्त करणारे योद्धे आहोत. ते लोक मग मनाला वश करण्यासाठी किती हठयोग इत्यादी करतात. तुम्ही तर हठयोग इत्यादी करू शकणार नाही. बाबा म्हणतात - 'तुम्हाला कोणतीही तसदी घ्यायची नाहीये, फक्त एवढेच सांगतो - तुम्हाला माझ्याजवळ यायचे आहे म्हणून माझी आठवण करा. मी तुम्हा मुलांना घेऊन जाण्यासाठी आलो आहे'. असे दुसरा कोणताही मनुष्य म्हणू शकणार नाही. भले स्वतःला ईश्वर म्हणतील परंतु स्वतःला गाईड म्हणू शकणार नाहीत. बाबा म्हणतात - 'मुख्य पंडा काळांचाही काळ मी आहे'. एक सत्यवान-सावित्रीची कहाणी आहे ना! तिचे दैहिक प्रेम असल्यामुळे दुःखी होत होती. तुम्हाला तर आनंद होतो. मी तुमच्या आत्म्याला घेऊन जाणार, तुम्ही कधी दुःखी होणार नाही. जाणता आपले बाबा आले आहेत स्वीट होममध्ये घेऊन जाण्याकरिता. ज्याला मुक्तिधाम, निर्वाणधाम म्हटले जाते. असे म्हणतात - 'मी सर्व काळांचाही काळ आहे'. तो काळ तर एका आत्म्याला घेऊन जातो, मी तर किती मोठा काळ आहे. ५००० वर्षांपूर्वी देखील मी गाईड बनून सर्वांना घेऊन गेलो होतो. साजण सजणींना परत घेऊन जातात तर त्यांची आठवण करावी लागेल.

तुम्ही जाणता आता आपण शिकत आहोत मग पुन्हा इथे येणार. अगोदर स्वीट होममध्ये जाणार मग नंतर खाली येणार. तुम्ही मुले स्वर्गाचे तारे आहात. आधी नरकाचे होता. 'तारे', मुलांना म्हटले जाते. लकी सितारे नंबरवार पुरुषार्थानुसार आहेत. तुम्हाला आजोबांची मालमत्ता मिळते. खाण खूप जबरदस्त आहे आणि ही खाण एकदाच बाहेर येते. त्या खाणी तर भरपूर आहेत ना. बाहेर येतच राहतात. कोणी बसून शोधेल तर पुष्कळ आहेत. ही तर एकदाच आणि एकच खाण मिळते - अविनाशी ज्ञान रत्नांची. ती पुस्तके (शास्त्रे) तर पुष्कळ आहेत. परंतु त्यांना रत्न म्हणणार नाही. बाबांना ज्ञानाचा सागर म्हटले जाते. अविनाशी ज्ञान रत्नांची निराकारी खाण आहे. या रत्नांनी आपण झोळी भरत राहतो. तुम्हा मुलांना आनंद झाला पाहिजे. प्रत्येकाला अभिमान देखील असतो. दुकानात जेव्हा धंदा जास्त होतो तर प्रसिद्धी देखील होते. इथे प्रजा देखील बनवत आहात तर वारसदार देखील बनवत आहात. इथून रत्नांची झोळी भरून मग जाऊन दान द्यायचे आहे. परमपिता परमात्माच ज्ञान सागर आहेत जे ज्ञान रत्नांनी झोळी भरतात. बाकी तो काही समुद्र नाही ज्यातून दाखवतात की रत्नांच्या थाळ्या भरून देवतांना देतात. त्या सागरातून काही रत्न मिळत नाहीत. ही ज्ञान रत्नांची गोष्ट आहे. ड्रामा अनुसार मग तुम्हाला रत्नांच्या खाणी देखील मिळतात. तिथे अमाप हिरे-माणके असतील, ज्यांची मग भक्तिमार्गामध्ये मंदिरे इत्यादी बनवतील. भूकंप वगैरे झाल्यामुळे मग सर्व आत गाडले जाते. तिथे महाल वगैरे तर खूप बनतात, एकच तर नाही. इथे देखील राजांची एकमेकांशी खूप स्पर्धा होते. तुम्ही मुले जाणता - हुबेहूब कल्पा पूर्वीप्रमाणे घर बांधले होते पुन्हा तसेच बांधणार. तिथे तर अगदी सहज रीतीने घरे इत्यादी बनत असतील. सायन्स खूप मदत करते. परंतु तिथे 'सायन्स' हा शब्द असणार नाही. सायन्सला हिंदीमध्ये विज्ञान म्हणतात. आजकाल तर 'विज्ञान भवन' असे देखील नाव ठेवले आहे. 'विज्ञान' शब्द ज्ञानाला देखील लागू होतो. ज्ञान आणि योगाला विज्ञान म्हणणार. ज्ञानाद्वारे रत्न मिळतात, योगाद्वारे आपण एव्हर हेल्दी बनतो. हे ज्ञान आणि योगाचे नॉलेज आहे ज्याद्वारे मग वैकुंठातील मोठ-मोठे भवन बनतील. आपण आता या सर्व नॉलेजला जाणतो. तुम्ही जाणता आपण भारताला स्वर्ग बनवत आहोत. तुमचे या देहाशी काहीही ममत्व नाही आहे. आपण आत्मे या शरीराला सोडून स्वर्गामध्ये

जाऊन नवीन शरीर घेणार. तिथे देखील समजतात एक जुने शरीर सोडून जाऊन नवीन घेणार. तिथे कोणतेही दुःख अथवा शोक होत नाही. नवीन शरीर घेतले तर चांगलेच आहे. आपल्याला बाबा असे बनवत आहेत, जसे कल्पापूर्वी देखील बनलो होतो. आपण मनुष्यापासून देवता बनत आहोत. बरोबर कल्पापूर्वी देखील अनेक धर्म होते. गीतेमध्ये यातले काहीच नाही आहे. गायले जाते - आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना ब्रह्माद्वारे. अनेक धर्मांचा विनाश कसा होतो, ते तर तुम्ही समजावून सांगू शकता. आता स्थापना होत आहे. बाबा आलेच होते तेव्हा, जेव्हा देवी-देवता धर्म लोप झाला होता. मग परंपरा कशी चालली असेल. या खूप सोप्या गोष्टी आहेत. विनाश कशाचा झाला? अनेक धर्मांचा. तर आता अनेक धर्म आहेत ना. यावेळेस अंत आहे, सर्व ज्ञान बुद्धीमध्ये राहिले पाहिजे. असे तर नाही, शिवबाबाच समजावून सांगतात; हे बाबा (ब्रह्मा बाबा) काहीच सांगत नाहीत काय. यांचा देखील पार्ट आहे, ब्रह्माचे देखील श्रीमत गायले गेले आहे. श्रीकृष्णासाठी तर श्रीमत म्हणत नाहीत. तिथे तर सर्व 'श्री' आहेत, त्यांना कोणाच्या मताची (सल्ल्याची) आवश्यकताच नाही. इथे ब्रह्माचे देखील मत मिळते. तिथे तर यथा राजा-राणी तथा प्रजा - सर्वांचेच श्रेष्ठ मत आहे. जरूर कोणी दिले असेल. देवता आहेत श्रीमतवाले. श्रीमताद्वारेच स्वर्ग बनतो, आसुरी मतामुळे नरक बनला आहे. श्रीमत आहे शिवाचे. या सर्व गोष्टी समजून घेण्यासाठी सोप्या आहेत. ही सर्व दुकाने शिवबाबांची आहेत. आपण मुले चालविणारी आहोत. जे दुकान चांगले चालवतात, त्यांचे नाव होते. हुबेहूब जसे दुकानदारीमध्ये होते. परंतु हा व्यापार कोणी विरळाच करेल. व्यापार तर सर्वांना करायचा आहे. छोटी मुले देखील ज्ञान आणि योगाचा व्यापार करू शकतात. शांतीधाम आणि सुखधाम - बस्स, बुद्धीमध्ये त्यांचीच आठवण करायची आहे. ते लोक राम-राम म्हणतात. इथे गप्प बसून आठवण करायची आहे, काहीच बोलायचे नाही. शिवपुरी, विष्णुपुरी खूप सोपी गोष्ट आहे. स्वीट होम, स्वीट राजधानी लक्षात आहे. ते (साधू-संत) देतात स्थूल मंत्र, हा आहे सूक्ष्म मंत्र. अति सूक्ष्म आठवण आहे. केवळ याची आठवण केल्याने आपण स्वर्गाचे मालक बनतो. जप इत्यादी देखील काहीच नाही फक्त आठवण करायची आहे. काहीच आवाज करावा लागत नाही. गुप्त बाबांकडून गुप्त वारसा आपण गप्प राहून, अंतर्मुख होऊन प्राप्त करतो. याच आठवणीमध्ये असताना शरीर सुटले तर खूप चांगले आहे. काहीच त्रास नाही, ज्यांना आठवण टिकत नाही त्यांनी आपला अभ्यास करावा. सर्वांना सांगा - 'बाबांनी सांगितले आहे - माझी आठवण करा तर अंत मति सो गती. आठवणीनेच विकर्म विनाश होतील आणि मी स्वर्गामध्ये पाठवेन'. शिवबाबांसोबत बुद्धी योग लावणे खूप सोपे आहे. पथ्य देखील सर्व इथेच करायचे आहे. सतोप्रधान बनत आहोत तर सर्व काही सात्विक असले पाहिजे - वागणे सात्विक, बोलणे सात्विक. हे आहे स्वतः सोबत बोलणे. जोडीदाराशी प्रेमाने बोलायचे आहे. गाण्यामध्ये देखील आहे ना - 'पियू-पियू बोल सदा अनमोल...'

तुम्ही आहात रूप-बसंत (ज्ञान स्वरूप होऊन ज्ञानाची वर्षा करणारे). आत्मा रूप बनते. ज्ञानाचा सागर बाबा आहेत तर जरूर येऊन ज्ञानच ऐकवतील. बाबा म्हणतात - 'मी एकदाच येऊन शरीर धारण करतो'. ही काही कमी जादूगिरी नाहीये! बाबा देखील रूप-बसंत आहेत. परंतु निराकार तर बोलू शकत नाहीत म्हणून शरीर घेतले आहे. परंतु ते पुनर्जन्मामध्ये येत नाहीत. आत्मे तर पुनर्जन्मा मध्ये येतात.

तुम्ही मुले बाबांवर बलीहार जाता तर बाबा म्हणतात - मग आता मोह ठेवायचा नाही. काहीही आपले समजायचे नाही. मोह काढून टाकण्यासाठीच बाबा युक्ती रचतात. पावला-पावलावर बाबांना विचारावे लागते. माया अशी आहे जी थप्पड मारते. पूर्ण बॉक्सिंग आहे, बरेचजण तर फटका खाऊन मग उभे राहतात. लिहिता देखील - 'बाबा, मायेने थप्पड मारले, तोंड काळे केले'. जणूकाही चौथ्या मजल्यावरून खाली पडला. क्रोध केला तर तिसऱ्या मजल्यावरून पडला. या नीट समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. आता बघा, मुले टेपची (मुरलीच्या कॅसेटची) देखील मागणी करत राहतात. बाबा, टेप पाठवून द्या. आम्ही ॲक्युरेट मुरली ऐकतो. हा देखील प्रबंध करण्यात येत आहे. खूप जण ऐकतील तर अनेकांची कवाडे (बुद्धीचे दरवाजे) उघडतील. खूप जणांचे कल्याण होईल. कोणी मनुष्य कॉलेज काढतात तर त्यांना दुसऱ्या जन्मामध्ये जास्त शिक्षण मिळते. बाबा देखील म्हणतात - टेप रेकॉर्डर खरेदी करा म्हणजे अनेकांचे कल्याण होईल. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) सतोप्रधान बनण्यासाठी अतिशय कडक पथ्य पाळून चालायचे आहे. आपले खाणे-पिणे, बोलणे-चालणे सर्व सात्विक ठेवायचे आहे. बाप समान रूप-बसंत बनायचे आहे.
2. २) अविनाशी ज्ञानरत्नांच्या निराकारी खाणीमधून आपली झोळी भरून अपार आनंदामध्ये रहायचे आहे आणि इतरांना देखील या रत्नांचे दान द्यायचे आहे.

वरदान:- नष्टोमोहा बनून दुःख अशांतीच्या नामोनिशाणालाही समाप्त करणारे स्मृती स्वरूप भव

जे सदैव एकाच स्मृतीमध्ये राहतात, त्यांची स्थिती एकरस होते. एकरस स्थितीचा अर्थ आहे एकाच सोबत सर्व नाती, सर्व प्राप्तींच्या रसाचा अनुभव करणे. जे बाबांना सर्व नात्यांनी आपले बनवून स्मृती स्वरूप राहतात ते सहजच नष्टोमोहा बनतात. जे नष्टोमोहा आहेत त्यांना कधी कमावण्याची, धन सांभाळण्याची, कोणाच्या आजारपणामध्ये... दुःखाची लहर येऊ शकत नाही. नष्टोमोहा अर्थात दुःख अशांतीचे नामोनिशाण नसावे. सदैव निश्चिंत.

बोधवाक्य:- क्षमाशील ते आहेत जे दयाळू बनून सर्वांना आशीर्वाद देत राहतील.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - आठवणीच्या यात्रेमध्ये निष्काळजी बनू नका, आठवणी द्वारेच आत्मा पावन बनेल, बाबा आले आहेत सर्व आत्म्यांची सेवा करून त्यांना शुद्ध बनविण्याकरिता"

प्रश्नः- कोणती स्मृती कायमची राहीली तर खाणे-पिणे शुद्ध होईल?

उत्तरः- जर स्मृती राहील की, आपण बाबांकडे आलो आहोत सचखंड मध्ये जाण्यासाठी किंवा मनुष्या पासून देवता बनण्यासाठी तर खाणे-पिणे शुद्ध होईल कारण देवता कधी अशुद्ध पदार्थ खात नाहीत. जेव्हा आपण सत्य बाबांकडे आलो आहोत सचखंड, पावन दुनियेचा मालक बनण्यासाठी तर पतित (अशुद्ध) बनू शकत नाही.

ओम् शांती. रुहानी (आत्मिक) बाबा रुहानी मुलांना विचारत आहेत - 'मुलांनो, तुम्ही जेव्हा इथे बसता तेव्हा कोणाची आठवण करता?' आपल्या बेहदच्या बाबांची. ते कुठे आहेत? त्यांना बोलावले जाते ना - 'हे पतित-पावन!' आजकाल संन्यासी देखील म्हणत राहतात - 'पतित-पावन सिताराम' अर्थात पतितांना पावन बनविणारे राम या. हे तर मुले समजतात पावन दुनिया सतयुगाला, पतित दुनिया कलियुगाला म्हटले जाते. आता तुम्ही कुठे बसले आहात? कलियुगाच्या अंतामध्ये म्हणून बोलावतात बाबा येऊन आम्हाला पावन बनवा. आपण कोण आहोत? आत्मा. आत्म्यालाच पवित्र बनायचे आहे. आत्मा पवित्र बनते तर शरीर देखील पवित्र मिळते. आत्मा पतित बनल्याने शरीर देखील पतित मिळते. हे शरीर तर मातीचा पुतळा आहे. आत्मा तर अविनाशी आहे. आत्मा या कर्मेंद्रियांद्वारे म्हणते, बोलावते - 'आम्ही खूप पतित बनलो आहोत, आम्हाला येऊन पावन बनवा'. बाबा पावन बनवतात. ५ विकार रुपी रावण पतित बनवतो. बाबांनी आता स्मृती दिली आहे - आपण पावन होतो मग असे ८४ जन्म घेत-घेत आता अंतिम जन्मामध्ये आहोत. हे जे मनुष्य सृष्टी रुपी झाड आहे, बाबा म्हणतात - 'मी याचे बीज रूप आहे, मला बोलावतात - हे परमपिता परमात्मा, हे गॉड फादर, आम्हाला मुक्त करा'. प्रत्येक जण स्वतःसाठी म्हणतात - मला सोडवा देखील आणि पंडा बनून घरी शांतीधामला घेऊन जा. संन्याशी इत्यादी देखील म्हणतात, शाश्वत शांती कशी मिळेल? आता शांतीधाम तर आहे घर. जिथून आत्मे पार्ट बजावण्यासाठी येतात. तिथे तर फक्त आत्मेच आहेत शरीरे नाहीत. आत्मे नंगे अर्थात बिना शरीराचे राहतात. नंगेचा अर्थ असा नाही की कपडे घातल्या शिवाय राहणे. नाही, शरीरा शिवाय आत्मे नंगे (अशरीरी) राहतात. बाबा म्हणतात - 'मुलांनो, तुम्ही आत्मे तिथे मूलवतनमध्ये बिना शरीराचे राहता, त्याला निराकारी दुनिया म्हटले जाते.

मुलांना शिडीच्या चित्रावर समजावून सांगितले गेले आहे की, कसे आपण शिडी उतरत आलो आहोत. सर्व मिळून जास्तीतजास्त ८४ जन्म लागले आहेत. मग कोणी एक जन्म सुद्धा घेतात. आत्मे वरून येतच राहतात. आता बाबा म्हणतात - 'मी आलो आहे पावन बनविण्याकरिता'. शिवबाबा ब्रह्मा द्वारे तुम्हाला शिकवतात. शिवबाबा आहेत आत्म्यांचे पिता आणि ब्रह्माला आदि देव म्हटले जाते. या दादामध्ये (ब्रह्मा बाबांमध्ये) बाबा कसे येतात, हे तुम्ही मुलेच जाणता. मला बोलावतात देखील - 'हे पतित-पावन या'. आत्म्यांनी या शरीराद्वारे बोलावले आहे. मुख्य आत्मा आहे ना. हे आहेच दुःखधाम. इथे कलियुगामध्ये बघा बसल्या-बसल्या अचानक मृत्यू होतो, तिथे असे कोणी आजारीच पडत नाहीत. नावच आहे स्वर्ग. किती सुंदर नाव आहे. म्हटल्यानेच मन खुश होते. ख्रिश्चन देखील म्हणतात क्राईस्टच्या ३ हजार वर्षांपूर्वी पॅराडाईज होता. इथे भारतवासींना तर काहीच माहिती नाही आहे कारण त्यांनी खूप सुख पाहिले आहे तर खूप दुःखही बघत आहेत. तमोप्रधान बनले आहेत. ८४ जन्म देखील यांचे आहेत. अर्ध्या कल्पानंतर मग इतर धर्माचे येतात. आता तुम्ही समजता अर्धा कल्प देवी-देवता होते तर तेव्हा दुसरा कोणताही धर्म नव्हता. नंतर मग त्रेतामध्ये जेव्हा राम राज्य आले तेव्हा देखील इस्लामी-बौद्धी नव्हते. मनुष्य तर एकदम घोर अंधारामध्ये आहेत. म्हणतात दुनियेचा कालावधी लाखो वर्ष आहे, म्हणून मनुष्य गोंधळतात की कलियुग अजून छोटा बच्चा आहे. तुम्ही आता समजता कलियुग पूर्ण होऊन आता सतयुग येईल म्हणून तुम्ही आले आहेत बाबांकडून स्वर्गाचा वारसा घेण्याकरिता. तुम्ही सर्व स्वर्गवासी होता. बाबा येतातच स्वर्ग स्थापन करण्यासाठी. तुम्हीच स्वर्गामध्ये येता, बाकी सर्व घरी शांतिधाममध्ये निघून जातात. ते आहे स्वीट

होम, आत्मे तिथे निवास करतात. मग इथे येऊन पार्टधारी बनतात. बिना शरीराची तर आत्मा बोलूही शकणार नाही. तिथे शरीर नसल्याकारणाने आत्मे शांती मध्ये राहतात. मग अर्धाकल्प आहे देवी-देवता, सूर्यवंशी-चंद्रवंशी. नंतर मग द्वापर कलियुगामध्ये असतात मनुष्य. देवतांचे राज्य होते मग आता ते कुठे गेले? कोणालाच माहित नाही. हे नॉलेज आता तुम्हाला बाबांकडून मिळते. दुसऱ्या कोणत्या मनुष्यामध्ये हे नॉलेज असत नाही. बाबाच येऊन मनुष्यांना हे नॉलेज देतात, ज्याद्वारेच मनुष्यापासून देवता बनतात. तुम्ही इथे आलेच आहात मुळी मनुष्या पासून देवता बनण्याकरिता. देवतांचे खाणे-पिणे अशुद्ध असत नाही, ते कधी विडी इत्यादी पित नाहीत. इथल्या पतित मनुष्यांची तर गोष्टच विचारू नका - काय-काय खात असतात! आता बाबा समजावून सांगत आहेत - 'हा भारत अगोदर सचखंड होता. जरूर सत्य बाबांनी स्थापन केला असेल. बाबांनाच ट्रूथ म्हटले जाते. बाबाच म्हणतात - मीच या भारताला सचखंड बनवितो. तुम्ही सच्चे देवता कसे बनू शकता, ते देखील तुम्हाला शिकवतो. भरपूर मुले इथे येतात त्यासाठी म्हणून ही घरे इत्यादी बनवावी लागतात. शेवट पर्यंत बनत राहतील, भरपूर बनतील. घरे खरेदी सुद्धा करतात. शिवबाबा ब्रह्मा द्वारे कार्य करतात. ब्रह्मा झाले काळे कारण हा अनेक जन्मांतील अंतिम जन्म आहे ना. हा मग गोरा बनेल. कृष्णाचे देखील चित्र गोरे आणि काळे आहे ना. म्युझियममध्ये मोठी-मोठी खूप चांगली चित्रे आहेत, ज्याच्यावर तुम्ही कोणालाही चांगल्या प्रकारे समजावून सांगू शकता. इथे बाबा म्युझियम बनवत नाहीत, याला म्हटले जाते टॉवर ऑफ सायलेन्स. तुम्ही जाणता आपण शांतीधाम आपल्या घरी जातो. आपण तिथले रहिवासी आहोत मग इथे येऊन शरीर घेऊन पार्ट बजावतो. मुलांना सर्व प्रथम हा निश्चय झाला पाहिजे की, हे कोणी साधु-संत शिकवत नाही आहेत. हे दादा तर सिंधचे राहणारे होते; परंतु यांच्यामध्ये जे प्रवेश करून बोलतात - ते आहेत ज्ञानाचे सागर. त्यांना कोणी जाणतही नाहीत. म्हणतात देखील गॉड फादर. परंतु म्हणतात त्यांना नाव-रूपच नाही आहे. ते निराकार आहेत. त्यांचा कोणता आकार नाही. आणि मग म्हणतात ते सर्वव्यापी आहेत. अरे परमात्मा कुठे आहे? म्हणतील - 'ते सर्वव्यापी आहेत, सर्वांमध्ये आहेत'. अरे, प्रत्येकामध्ये आत्मा बसली आहे, सर्व भाऊ-भाऊ आहेत ना, मग घटा-घटा मध्ये परमात्मा कुठून आला? असे म्हणता येणार नाही की, प्रत्येकामध्ये परमात्मा देखील आहे आणि आत्मा देखील आहे. परमात्मा बाबांना बोलवतात - 'बाबा, येऊन आम्हा पतितांना पावन बनवा'. तुम्ही मला बोलावता हा धंदा, ही सेवा करण्यासाठी. आम्हा सर्वांना येऊन शुद्ध बनवा. पतित दुनियेमध्येच मला निमंत्रण देता, म्हणता - 'बाबा, आम्ही पतित आहोत'. बाबा तर पावन दुनिया बघत सुद्धा नाहीत. पतित दुनियेमध्येच तुमची सेवा करण्यासाठी आले आहेत. आता हे रावण राज्य नष्ट होईल. बाकी तुम्ही जे राजयोग शिकता ते जाऊन राजांचेही राजा बनता. तुम्हाला अगणित वेळा शिकवले आहे आणि ५ हजार वर्षानंतर तुम्हालाच शिकवतील. सतयुग-त्रेताची राजधानी आता स्थापन होत आहे. पहिले आहे ब्राह्मण कुळ. प्रजापिता ब्रह्मा गायले जातात ना. ज्यांना एडम आदि देव म्हणतात. हे कोणालाच माहिती नाही. असे बरेच आहेत जे इथे येऊन ऐकून मग मायेच्या अधीन होतात. पुण्य आत्मा बनता-बनता पाप आत्मा बनतात. माया खूप शक्तिशाली आहे. सर्वांना पाप-आत्मा बनवते. इथे एकही पवित्र-आत्मा, पुण्य-आत्मा नाही आहे. पवित्र आत्मे देवी-देवताच होते, जेव्हा सर्व पतित बनतात तेव्हा बाबांना बोलावतात. आता हे आहे रावण राज्य पतित दुनिया, याला म्हटले जाते काट्यांचे जंगल. सतयुगाला म्हटले जाते गार्डन ऑफ फ्लॉवर्स (फुलांचा बगीचा). मुगल गार्डनमध्ये किती फर्स्टक्लास सुंदर-सुंदर फुले असतात. अकची (धोतऱ्याची) फुले देखील मिळतील परंतु त्याचा अर्थ कोणालाच समजत नाही, शिवावर धोतऱ्याचे फूल का वाहतात? हे देखील बाबा बसून समजावून सांगतात. मी जेव्हा शिकवतो तर त्यांच्यामध्ये कोणी फर्स्टक्लास मोगरा, कोणी रतन ज्योत, कोणी धोतरा असे देखील आहेत. नंबरवार तर आहेत ना. तर याला म्हटलेच जाते दुःख धाम, मृत्यूलोक. सतयुग आहे अमरलोक. या गोष्टी कोणत्या शास्त्रांमध्ये नाही आहेत. शास्त्र तर या दादाने (ब्रह्मा बाबांनी) वाचली आहेत, बाबा काही शास्त्र तर शिकवणार नाहीत. बाबा तर स्वतः सद्गती दाता आहेत. फारफार तर गीतेचा संदर्भ देतात. सर्वशास्त्रमई शिरोमणी गीता भगवंताने गायली आहे परंतु भगवान कोणाला म्हटले जाते, हेच भारतवासींना माहित नाही. बाबा म्हणतात - 'मी निष्काम सेवा करतो, तुम्हाला विश्वाचे मालक बनवतो, मी बनत नाही. स्वर्गामध्ये तुम्ही माझी आठवण करत नाही'. 'दुःख में सिमरण सब करे, सुख में करे न कोय...' याला दुःख आणि सुखाचा खेळ म्हटले जाते. स्वर्गामध्ये दुसरा कोणताही धर्म असतच नाही. सर्व येतातच नंतर. तुम्ही जाणता आता या जुन्या दुनियेचा विनाश होणार, नैसर्गिक आपत्ती, वादळे जोरदारपणे येतील. सर्वकाही नष्ट होईल.

तर बाबा आता येऊन अडाण्या पासून बुद्धिवान बनवतात. बाबांनी किती धन दौलत दिली होती, सर्व गेले कुठे?

आता किती दिवाळखोर बनले आहेत. भारत जो सोन्याची चिडिया होता तो आता काय बनला आहे? आता पुन्हा पतित-पावन बाबा आले आहेत राजयोग शिकवत आहेत. तो आहे हठयोग, हा आहे राजयोग. हा राजयोग दोघांसाठीही आहे, तो हठयोग केवळ पुरुषच शिकतात. आता बाबा म्हणतात पुरुषार्थ करा, विश्वाचे मालक बनून दाखवा. आता या जुन्या दुनियेचा विनाश तर होणारच आहे, थोडा वेळ बाकी आहे, ही लढाई अंतिम लढाई आहे. ही लढाई सुरू होईल तर थांबू शकणार नाही. ही लढाई सुरूच तेव्हा होईल जेव्हा तुम्ही कर्मातीत अवस्थेला प्राप्त कराल आणि स्वर्गामध्ये जाण्यासाठी लायक बनाल. बाबा तरीही म्हणतात या आठवणीच्या यात्रेमध्ये निष्काळजी बनू नका, यामध्येच माया विघ्न आणते. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. २) कर्मातीत अवस्थेला प्राप्त करण्यासाठी किंवा स्वर्गामध्ये उच्च पदाचा अधिकार प्राप्त करण्यासाठी आठवणीच्या यात्रेमध्ये तत्पर राहायचे आहे, निष्काळजी बनायचे नाही.

वरदान:- आपल्या मस्तकावर नेहमी बाबांच्या आशीर्वादांचा हात अनुभव करणारे मास्टर विघ्न-विनाशक भव गणेशाला विघ्न विनाशक म्हटले जाते. विघ्न विनाशक तेच बनतात ज्यांच्यामध्ये सर्व शक्ती आहेत. सर्व शक्तींना वेळे नुसार कार्यामध्ये लावाल तर विघ्न थांबू शकत नाही. कितीही रूपामध्ये माया येईल परंतु तुम्ही नॉलेजफुल बना. नॉलेजफुल आत्मा कधी मायेकडून हार खाऊ शकत नाही. जेव्हा मस्तकावर बापदादांच्या आशीर्वादांचा हात आहे तर विजयाचा तिलक लागलेलाच आहे. परमात्म्याचा हात आणि साथ विघ्न विनाशक बनवतो.

बोधवाक्य:- स्वतःमध्ये गुणांना धारण करून इतरांना गुणदान करणारे गुणमूर्त आहेत.

||| ओम शांती |||

" गोड मुलांनो - सर्व काही आठवणीवर अवलंबून आहे, आठवणीनेच तुम्ही गोड बनाल, या आठवणीमध्येच मायेचे युद्ध चालते "

प्रश्न:- या ड्रामामध्ये असे कोणते रहस्य खूप विचार करण्याजोगे आहे? ज्याला तुम्ही मुलेच जाणता?

उत्तर:- तुम्ही जाणता की ड्रामामध्ये एक पार्ट दोन वेळा बजावला जाऊ शकत नाही. साऱ्या दुनियेमध्ये जो काही पार्ट बजावला जातो तो एकमेकांपेक्षा नवीन असतो. तुम्ही विचार करता की सतयुगापासून आतापर्यंतचे दिवस कसे बदलत जातात. सर्व ॲक्टिव्हिटी (गतिविधी) बदलून जाते. आत्म्यामध्ये ५००० वर्षांच्या ॲक्टिव्हिटीचे (घडामोडींचे) रेकॉर्ड भरलेले आहे, जे कधीही बदलू शकत नाही. ही छोटीशी गोष्ट तुम्हा मुलांव्यतिरिक्त इतर कोणाच्याही बुद्धीमध्ये येऊ शकत नाही.

ओम् शांती. रूहानी बाबा रूहानी मुलांना विचारतात - 'गोड-गोड मुलांनो, तुम्ही आपला भविष्यातील पुरुषोत्तम चेहरा, पुरुषोत्तम पोशाख पाहता का? हे पुरुषोत्तम संगमयुग आहे ना. तुम्ही अनुभव करता की, आम्ही पुन्हा नवी दुनिया सतयुगामध्ये यांच्या वंशावळीमध्ये जाणार, ज्याला सुखधाम म्हटले जाते. तिथल्यासाठीच तुम्ही आता पुरुषोत्तम बनत आहात. बसल्या-बसल्या हा विचार आला पाहिजे. विद्यार्थी जेव्हा शिक्षण घेत असतात तेव्हा त्यांच्या बुद्धीमध्ये हे जरूर असते - उद्या आम्ही हे बनणार. तसेच तुम्ही देखील जेव्हा इथे बसता तेव्हा देखील जाणता की आम्ही विष्णूच्या डिनायस्टीमध्ये जाणार. तुमची बुद्धी आता अलौकिक आहे. दुसऱ्या कोणत्याही मनुष्याच्या बुद्धीमध्ये या गोष्टी उत्पन्न होत नसतील. हा काही साधारण सत्संग नाही आहे. इथे बसले आहात, समजता सत बाबा, ज्यांना 'शिव' म्हणतात आम्ही त्यांच्या सोबत बसलो आहोत. शिवबाबाच रचयिता आहेत, तेच या रचनेच्या आदि-मध्य-अंताला जाणतात. तेच हे नॉलेज देतात. जणूकाही कालचीच गोष्ट ऐकवत आहेत. इथे बसले आहात, हे तरी लक्षात असेल ना - आम्ही आलो आहोत रिज्युवनेट (पुनर्जीवित) होण्याकरिता अर्थात हे शरीर बदलून दैवी शरीर घेण्याकरिता. आत्मा म्हणते आमचे हे तमोप्रधान जुने शरीर आहे. याला बदलून असे शरीर घ्यायचे आहे. किती सोपे एम ऑब्जेक्ट आहे. शिकवणारा शिक्षक जरूर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा हुशार असेल ना. शिकवतात, सत्कर्म देखील शिकवतात. आता तुम्ही समजता - आम्हाला सर्वश्रेष्ठ भगवान शिकवत आहेत तर जरूर देवी-देवताच बनवतील. हे शिक्षण आहेच मुळी नवीन दुनियेसाठी. इतर कुणालाही नव्या दुनियेबद्दल थोडेसुद्धा माहित नाही आहे. हे लक्ष्मी-नारायण नवीन दुनियेचे मालक होते. देवी-देवता देखील नंबरवार तर असतील ना. सगळेच काही एकसारखे असू देखील शकणार नाहीत कारण राजधानी आहे ना. तुमचे असे विचार चालत राहिले पाहिजेत. आपण आत्मे आता पतिता पासून पावन बनण्यासाठी पावन पित्याची आठवण करतो. आत्मा आठवण करते आपल्या गोड बाबांची. बाबा स्वतः म्हणतात - 'तुम्ही माझी आठवण कराल तर पावन सतोप्रधान बनाल'. सर्व काही आठवणीच्या यात्रेवर अवलंबून आहे. बाबा जरूर विचारतील - 'मुलांनो, किती वेळ माझी आठवण करता?' आठवणीच्या यात्रेमध्येच मायेचे युद्ध चालते. तुम्ही याला युद्ध देखील समजता. ही यात्रा नाही परंतु जसे काही युद्ध चालू आहे, यामध्येच खूप खबरदार रहायचे आहे. नॉलेजमध्ये मायेची वादळे वगैरेचा काही प्रश्नच नाही. मुले म्हणतात देखील - 'बाबा, आम्ही तुमची आठवण करतो, परंतु मायेचे एकच वादळ खाली पाडून घालते.' एक नंबरचे वादळ आहे - देह-अभिमानाचे. नंतर आहे काम, क्रोध, लोभ, मोहाचे वादळ. मुले म्हणतात - 'बाबा, आम्ही आठवणीमध्ये राहण्याचा खूप प्रयत्न करतो, कोणतेही विघ्न येऊ नये परंतु तरीदेखील वादळे येतात. आज क्रोधाचे, कधी लोभाचे वादळ आले. बाबा, आज आमची अवस्था खूप चांगली राहिली, पूर्ण दिवसभरामध्ये कोणतेही वादळ आले नाही. खूप आनंद झाला. बाबांची अतिशय प्रेमाने आठवण केली. प्रेमाचे अश्रू देखील येत राहिले. बाबांच्या आठवणीनेच खूप गोड बनाल.

हे देखील समजतात की, आम्ही मायेकडून हार खात-खात कुठवर येऊन पोहोचलो आहोत. हे कोणी समजतात थोडेच. मनुष्य तर लाखो वर्षे म्हणतात किंवा परंपरा म्हणतात. तुम्ही म्हणाल आम्ही आता पुन्हा असे मनुष्यापासून देवता बनत आहोत. हे नॉलेज बाबाच येऊन देतात. विचित्र बाबाच विचित्र नॉलेज देतात. 'विचित्र', निराकाराला म्हटले जाते. निराकार हे नॉलेज कसे देतात. बाबा स्वतः समजावून सांगतात की, मी कसा या

शरीरामध्ये येतो. तरीही मनुष्य गोंधळतात. या एकाच शरीरामध्ये कसे काय येतील! परंतु ड्रामामध्ये हेच तन (ब्रह्माबाबांचेच शरीर) निमित्त बनते. जराही बदल होऊ शकत नाही. या गोष्टी तुम्हीच समजून घेऊन मग इतरांनाही समजावून सांगता. आत्माच शिकते. आत्माच शिकते आणि शिकवते. आत्मा अतिशय मौल्यवान आहे. आत्मा अविनाशी आहे, फक्त शरीर नष्ट होते. आपण आत्मे आपल्या परमपिता परमात्म्याकडून रचता आणि रचनेच्या आदि-मध्य-अंताचे ८४ जन्मांचे नॉलेज घेत आहोत. नॉलेज कोण घेत आहेत? आपण आत्मे. तुम्ही आत्म्यांनीच नॉलेजफुल बाबांकडून मूलवतन, सूक्ष्म वतनला जाणले आहे. मनुष्यांना तर आपण स्वतःला आत्मा समजायचे आहे हेच माहीत नाही आहे. मनुष्य तर स्वतःला शरीर समजून उलटे लटकून पडले आहेत. गायन आहे - आत्मा सत् चित् आनंद स्वरूप आहे. परमात्म्याची सर्वात जास्त महिमा आहे. एका बाबांची किती महिमा आहे. तेच दुःखहर्ता, सुखकर्ता आहेत. मच्छर इत्यादींची काही इतकी महिमा करणार नाही की ते दुःखहर्ता, सुखकर्ता, ज्ञानाचा सागर आहेत. नाही, ही आहे बाबांची महिमा. तुम्ही मुले देखील मास्टर दुःख हर्ता, सुखकर्ता आहात. तुम्हा मुलांना देखील हे नॉलेज नव्हते, जणू बालबुद्धी होता. छोट्या मुलांमध्ये नॉलेज नसते आणि कोणता अवगुणही नसतो, म्हणून त्याला महात्मा म्हटले जाते कारण पवित्र आहे. जितके लहान मूल तितके नंबर वन फूल. बिलकुल जशी कर्मातीत अवस्था आहे. कर्म-अकर्म-विकर्म कशालाच जाणत नाहीत, म्हणून ते फूल आहेत. सर्वांना आकर्षित करतात. जसे एक बाबा सर्वांना आकर्षित करतात. बाबा आलेच आहेत सर्वांना आकर्षित करून सुगंधित फूल बनविण्यासाठी. बरेचजण तर काटे ते काटेच राहतात. ५ विकारांच्या वशिभूत होणाऱ्यांना काटा म्हटले जाते. पहिल्या नंबरचा काटा आहे - देह-अभिमानाचा, ज्यातून इतर काट्यांचा जन्म होतो. काट्यांचे जंगल खूप दुःख देते. विविध प्रकारचे काटे जंगलामध्ये असतात ना म्हणून याला दुःखधाम म्हटले जाते. नवीन दुनियेमध्ये काटे असत नाहीत म्हणून त्याला सुखधाम म्हटले जाते. शिवबाबा फुलांची बाग तयार करतात आणि रावण काट्यांचे जंगल बनवतो म्हणून रावणाला काटेरी झुडपांनी जाळतात आणि बाबांवर फुले वाहतात. या गोष्टींना बाबा जाणतात आणि मुले जाणतात इतर कोणीही जाणत नाहीत.

तुम्ही मुले जाणता - ड्रामामध्ये एक पार्ट दोन वेळा बजावला जाऊ शकत नाही. बुद्धीमध्ये आहे दुनियेमध्ये जो पार्ट बजावला जातो तो एकमेकांपेक्षा नवीन असतो. तुम्ही विचार करा सतयुगापासून आत्तापर्यंत कसे दिवस बदलत जातात संपूर्ण ॲक्टिव्हिटीच (सर्व घडामोडीच) बदलून जातात. ५००० वर्षांच्या ॲक्टिव्हिटीचे (घडामोडींचे) रेकॉर्ड आत्म्यामध्ये भरलेले आहे. ते कधीही बदलू शकत नाही. प्रत्येक आत्म्यामध्ये आपापला पार्ट भरलेला आहे. ही छोटीशी गोष्ट देखील कोणाच्या बुद्धीमध्ये येऊ शकत नाही. या ड्रामाच्या भूत, वर्तमान आणि भविष्याला तुम्ही जाणता. ही शाळा आहे ना. पवित्र बनून बाबांची आठवण करण्याचा अभ्यास बाबा शिकवतात. या गोष्टींचा कधी विचार केला होता की बाबा येऊन असे पतिता पासून पावन बनविण्याचे शिक्षण देतील! या शिक्षणानेच आपण विश्वाचे मालक बनू! भक्ती मार्गाची पुस्तकेच वेगळी आहेत, त्याला काही शिक्षण म्हटले जात नाही. ज्ञाना विना सद्गती होईल तरी कशी? पित्या विना ज्ञान तरी कुठून येईल ज्याने सद्गती होईल. सद्गतीमध्ये जेव्हा तुम्ही असाल तेव्हा भक्ती कराल का? नाही, तिथे आहेच अपार सुख, मग भक्ती कशासाठी करायची? हे ज्ञान आत्ताच तुम्हाला मिळते. संपूर्ण ज्ञान आत्म्यामध्ये असते. आत्म्याचा कोणता धर्म असत नाही. आत्मा जेव्हा शरीर धारण करते तेव्हा मग म्हणतात - अमका या या धर्माचा आहे. आत्म्याचा धर्म कोणता आहे? एक तर आत्मा बिंदू प्रमाणे आहे आणि शांत स्वरूप आहे, शांतीधाम मध्ये राहते.

आता बाबा समजावून सांगत आहेत - सर्व मुलांचा बाबांवर हक्क आहे. अशी बरीच मुले आहेत जी दुसऱ्या इतर धर्मांमध्ये कन्व्हर्ट झाली आहेत. ती मग निघून आपल्या खऱ्या धर्मामध्ये येतील. जे देवी-देवता धर्म सोडून दुसऱ्या धर्मामध्ये गेले आहेत ती सर्व पाने परत आपल्या जागेवर येतील. तुम्हाला सुरुवातीला तर बाबांचा परिचय द्यायचा आहे. या गोष्टींमध्येच सर्वजण गोंधळून गेले आहेत. तुम्ही मुले समजता आता आपल्याला कोण शिकवत आहेत? बेहदचे बाबा. श्रीकृष्ण तर देहधारी आहे, यांना (ब्रह्मा बाबांना) देखील दादा म्हणणार. तुम्ही सर्व भाऊ-भाऊ आहात ना. नंतर मग आहे पदावरती. भावाचे शरीर कसे आहे, बहिणीचे शरीर कसे आहे. आत्मा तर एक छोटा तारा आहे. एवढे सर्व नॉलेज एका छोट्याशा ताऱ्यामध्ये आहे. तारा शरीरा शिवाय बोलू देखील शकत नाही. ताऱ्याला पार्ट बजावण्यासाठी इतके अनेक ऑर्गन्स (कर्मेंद्रिये) मिळाले आहेत. तुम्हा तारांची दुनियाच वेगळी आहे. आत्मा इथे येऊन मग शरीर धारण करते. शरीर लहान-मोठे होते. आत्माच आपल्या पित्याची आठवण करते. ते देखील जोपर्यंत शरीरामध्ये आहे. घरी (परमधाम मध्ये) आत्मा बाबांची आठवण करेल? नाही. तिथे

काहीच समजून येत नाही की आपण कुठे आहोत! आत्मा आणि परमात्मा दोन्ही जेव्हा शरीरामध्ये असतात तेव्हा आत्म्यांचे आणि परमात्म्याचे मिलन म्हटले जाते. गायन देखील आहे - 'आत्मा और परमात्मा अलग रहे बहुकाल...' किती काळ वेगळे राहिलात? आठवते का - किती काळ वेगळे राहिलात ते? सेकंद-सेकंद पास होत ५ हजार वर्षे निघून गेली. पुन्हा एक नंबर पासून सुरू करायचे आहे, अचूक हिशोब आहे. आता तुम्हाला कोणी विचारले की याने (श्रीकृष्णाने) केव्हा जन्म घेतला होता? तर तुम्ही अचूक सांगू शकता. श्रीकृष्णचं पहिला जन्म घेतो. शिवबाबांची तर मिनिटे, सेकंद काहीही काढू शकत नाही. श्रीकृष्णाची तिथी तारीख, मिनिट, सेकंद काढू शकता. मानवी घड्याळामध्ये फरक पडू शकतो. शिवबाबांच्या अवतरणामध्ये तर बिलकुल फरक पडू शकत नाही. कळतही नाही की कधी आले? असेही नाही की, साक्षात्कार झाला तेव्हा आले, नाही. अंदाज लावू शकत नाही. मिनिटे, सेकंदाचा हिशोब सांगू शकत नाहीत. त्यांचे अवतरण देखील अलौकिक आहे, ते येतातच बेहदच्या रात्रीच्या वेळी. बाकी इतरही जे अवतार इत्यादी होतात, त्यांच्याविषयी समजून येते. आत्मा शरीरामध्ये प्रवेश करते. लहान वस्त्र (शरीर) धारण करते. मग हळू-हळू मोठे होते. शरीरासोबत आत्मा बाहेर येते. या सर्व गोष्टींचे विचार सागर मंथन करून मग इतरांनाही समजावून सांगायचे असते. किती खंडीभर मनुष्य आहेत, एक दुसऱ्याशी मेळ खाऊ शकत नाही; किती मोठा मंडप आहे. जणूकाही मोठा हॉल आहे, ज्यामध्ये बेहदचे नाटक चालू आहे.

तुम्ही मुले इथे येता नरापासून नारायण बनण्यासाठी. बाबा जी नवीन सृष्टी रचतात त्यामध्ये उच्च पद घेण्यासाठी. बाकी ही जी जुनी दुनिया आहे ती तर विनाश होणार आहे. बाबांद्वारे नवीन दुनियेची स्थापना होत आहे. बाबांना मग पालना देखील करायची आहे. तर जरूर जेव्हा हे शरीर सोडतील तेव्हा मग सतयुगामध्ये नवीन शरीर घेऊन पालना करतील. तत्पूर्वी या जुन्या दुनियेचा विनाशही होणार आहे. भंभोरला (जुन्या दुनियेला) आग लागेल. मागे हा भारतच राहील बाकी तर नष्ट होऊन जातील. भारतातही फार थोडे वाचतील. तुम्ही आता मेहनत करत आहात की विनाशा नंतर मग शिक्षा भोगावी लागू नये. जर विकर्म विनाश झाली नाहीत तर मग सजा देखील खाल आणि पद सुद्धा मिळणार नाही. तुम्हाला जेव्हा कोणी विचारतात की, तुम्ही कोणाकडे जाता? तर बोला, शिव बाबांकडे, जे ब्रह्माच्या तनामध्ये आलेले आहेत. हे ब्रह्मा काही शिव नाही आहेत. जितके बाबांना ओळखाल तितके तुम्ही बाबांवर प्रेमही कराल. बाबा म्हणतात - 'मुलांनो, तुम्ही इतर कोणावरही प्रेम करू नका, बाकीच्यांवरील प्रेम तोडून टाकून एका सोबत जोडा. जसे आशिक-माशुक असतात ना. हे देखील असेच आहे. १०८ खरे आशिक बनतात, त्यातही ८ खरेखुरे बनतात. ८ ची देखील माळा असते ना. ९ रत्न गायले गेले आहेत. ८ मणी, ९ वे बाबा. मुख्य आहेत ८ देवता, नंतर मग त्रेताच्या अंतापर्यंत १६,१०८ राजकुमार-राजकुमारींचे कुटुंब बनते. बाबा तर तळहातावर स्वर्ग दाखवतात. तुम्हा मुलांना नशा आहे की आपण तर सृष्टीचे मालक बनतो. बाबांसोबत असा सौदा करायचा आहे. म्हणतात - कोणी विरळाच व्यापारी हा सौदा करेल. असा कोणी व्यापारी आहे थोडाच. तर मुलांनो अशा उत्साहामध्ये रहा की, आम्ही चाललो बाबांकडे. वरचे बाबा. दुनियेला माहित नाही आहे, ते म्हणतील की ते तर शेवटी येतात. आता तोच कलियुगाचा अंत आहे. तोच गीता, महाभारताचा काळ आहे, तेच यादव जे मुसळ (मिसाईल) काढत आहेत. तेच कौरवांचे राज्य आणि तेच तुम्ही पांडव उभे आहात. तुम्ही मुले आता घर बसल्या आपली कमाई करत आहात. ईश्वर घरबसल्या आलेले आहेत म्हणून बाबा म्हणतात की, 'आपली कमाई करून घ्या'. हाच हिऱ्यासमान जन्म अमूल्य गायलेला आहे. आता याला कवडीच्या बदल्यात गमावायचे नाहीये. आता तुम्ही या साऱ्या दुनियेला रामराज्य बनवता. तुम्हाला शिवाकडून शक्ती मिळत आहे. बाकी आजकाल अनेकांचा अकाली मृत्यू देखील होतो. बाबा बुद्धीचे कुलूप उघडतात आणि माया बुद्धीचे कुलूप बंद करते. आता तुम्हा मातांनाच ज्ञानाचा कलश मिळाला आहे. अबलांना बळ देणारे ते (शिवबाबा) आहेत. हेच ज्ञान अमृत आहे. शास्त्रांच्या ज्ञानाला काही अमृत म्हटले जात नाही. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) एका बाबांच्या आकर्षणामध्ये राहून सुगंधित फूल बनायचे आहे. आपल्या गोड बाबांची आठवण करून देह-अभिमानाचे काटे जाळून टाकायचे आहेत.
2. २) या हिरेतुल्य जन्मामध्ये अविनाशी कमाई जमा करायची आहे, कवड्यांच्या बदल्यात याला गमावायचे

नाही आहे. एका बाबांवर खरे प्रेम करायचे आहे, एकाच्या संगती मध्ये रहायचे आहे.

वरदान:- ब्राह्मण जीवनामध्ये कायम खुशीचा खुराक खाणारे आणि खुशी वाटणारे खुशनसीब भव

या दुनियेमध्ये तुम्हा ब्राह्मणांसारखे खुशनसीब (भाग्यशाली) कोणीही असू शकत नाही कारण या जीवनामध्येच तुम्हा सर्वांना बापदादांचे दिल तख्त (हृदय सिंहासन) मिळते. कायम खुशीचा खुराक खाता आणि खुशी वाटता. यावेळी निश्चिंत बादशहा आहात. असे निश्चिंत जीवन साऱ्याकल्पामध्ये अजून कोणत्याही युगामध्ये नाही. सतयुगामध्ये निश्चिंत असाल परंतु तिथे ज्ञान नसेल, आता तुम्हाला ज्ञान आहे म्हणून मनापासून निघते - 'माझ्यासारखा भाग्यवान दुसरा कोणी नाही'.

बोधवाक्य:- संगम युगातील स्वराज्य अधिकारीच भविष्यातील विश्वराज्य अधिकारी बनतात.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - तुम्हाला जे काही ज्ञान मिळते, त्यावर विचार सागर मंथन करा. ज्ञानाचे मंथन केल्यानेच अमृत निघेल"

प्रश्न:- २१ जन्मांसाठी मालामाल (गर्भश्रीमंत) बनण्याचे साधन कोणते आहे?

उत्तर:- ज्ञान रत्ने. जितके तुम्ही या पुरुषोत्तम संगमयुगावर ज्ञान रत्ने धारण करता तितके जास्त श्रीमंत बनता. आत्ताची ज्ञान रत्ने तिथे (सतयुगामध्ये) हिरे-माणके बनतात. जेव्हा आत्मा ज्ञान रत्ने धारण करते, मुखातून ज्ञान रत्नेच काढते, रत्नच ऐकते आणि ऐकवते तेव्हा त्यांच्या हर्षित चेहऱ्याद्वारे बाबांचे नाव प्रसिद्ध होईल. आसुरी गुण निघून जातील तेव्हाच श्रीमंत बनाल.

ओम् शांती. बाबा मुलांना ज्ञान आणि भक्ती विषयी समजावून सांगत आहेत. हे तर मुले समजतात की सतयुगामध्ये भक्ती नसते. सतयुगामध्ये ज्ञान देखील मिळत नाही. श्रीकृष्ण ना भक्ती करत, ना ज्ञानाची मुरली वाजवत. मुरली अर्थात ज्ञान देणे. गायन देखील आहे ना - 'मुरलीमध्ये जादू आहे'. तर जरूर कोणती जादू असेल ना. फक्त मुरली वाजवणे ही सामान्य गोष्ट आहे. फकीर लोक देखील मुरली वाजवतात. या (बाबांच्या) मुरलीमध्ये तर ज्ञानाची जादू आहे. अज्ञानाला जादू म्हणणार नाही. मनुष्य समजतात की श्रीकृष्ण मुरली वाजवत असे; त्याची खूप महिमा करतात. बाबा म्हणतात - 'श्रीकृष्ण तर देवता होता. मनुष्यापासून देवता, देवता पासून मनुष्य हे घडतच राहते'. दैवी सृष्टी सुद्धा असते तर मनुष्य सृष्टी सुद्धा असते. या ज्ञानाद्वारेच मनुष्यापासून देवता बनतात. जेव्हा सतयुग आहे तेव्हा हा ज्ञानाचा वारसा आहे. सतयुगामध्ये भक्ती नसते. देवता जेव्हा मनुष्य बनतात तेव्हा भक्ती सुरु होते. मनुष्यांना विकारी, देवतांना निर्विकारी म्हटले जाते. देवतांच्या सृष्टीला पवित्र दुनिया म्हटले जाते. आता तुम्ही मनुष्यापासून देवता बनत आहात. देवतांमध्ये मग हे ज्ञान असणार नाही. देवता सद्गतीमध्ये आहेत, ज्ञान पाहिजे दुर्गती वाल्यांना. या ज्ञानातूनच दैवी गुण येतात. ज्ञानाची धारणा असणाऱ्यांची चलन (वर्तन) देवताई असते. कमी धारणा असणाऱ्यांचे वर्तन मिक्स असते. आसुरी वर्तन तर म्हणणार नाही. धारणा नसेल तर माझी मुले कसे म्हणणार. मुले जर बाबांना ओळखत नाहीत तर बाबा देखील मुलांना कसे ओळखणार. किती वाईट-वाईट शिव्या बाबांना देतात. भगवंताला शिवी देणे किती वाईट आहे. मग ते जेव्हा ब्राह्मण बनतात तेव्हा शिवी देणे बंद होते. तर या ज्ञानाचे विचार सागर मंथन केले पाहिजे. विद्यार्थी विचार सागर मंथन करून ज्ञानामध्ये प्रगती करतात. तुम्हाला हे ज्ञान मिळत आहे, त्यावर आपले विचार सागर मंथन केल्याने अमृत निघेल. विचार सागर मंथन होत नसेल तर मग कोणते मंथन होणार? आसुरी विचारांचे मंथन, ज्यातून फक्त कचराच बाहेर पडतो. आता तुम्ही ईश्वरीय स्टुडंट आहात. जाणता मनुष्यापासून देवता बनण्याचे शिक्षण बाबा शिकवत आहेत. देवता तर शिकवणार नाहीत. देवतांना कधी ज्ञानाचा सागर म्हटले जात नाही. एक बाबाच ज्ञानाचा सागर आहेत. तर स्वतःला विचारले पाहिजे - माझ्यामध्ये सर्व दैवी गुण आहेत का? जर आसुरी गुण असतील तर ते काढून टाकले पाहिजेत तेव्हाच देवता बनाल.

आता तुम्ही आहात पुरुषोत्तम संगमयुगावर. पुरुषोत्तम बनत आहात तर वातावरण देखील खूप चांगले असले पाहिजे. घाणेरड्या गोष्टी मुखातून काढता कामा नये. नाहीतर म्हटले जाईल खालच्या दर्जाचा आहे. वातावरणावरून लगेच समजून येते. मुखावाटे दुःख देणारेच बोल बाहेर पडतात. तुम्हा मुलांना बाबांचे नाव प्रसिद्ध करायचे आहे. चेहरा सदैव हर्षित राहिला पाहिजे. मुखातून सदैव रत्नेच निघाली पाहिजेत. हे लक्ष्मी-नारायण किती हर्षितमुख आहेत, यांच्या आत्म्यांनी ज्ञान रत्ने धारण केली होती. मुखावाटे ज्ञान रत्नेच बोलली जात होती. रत्नच ऐकत होते आणि ऐकवत होते. किती आनंद वाटायला हवा. आता तुम्ही जी ज्ञान रत्न ग्रहण करता ती मग खरोखरची हिरे-माणके बनतात. ९ रत्नांची माळा काही कोणत्या हिरे-माणकांची नाहीये, या चैतन्य रत्नांची माळा आहे. मग मनुष्य त्यांना (स्थूल हिऱ्यांना) रत्न समजून त्याच्या अंगठ्या इत्यादी घालतात. ज्ञान रत्नांची माळा या पुरुषोत्तम संगमयुगावरच बनते. ही रत्नेच २१ जन्मांसाठी गर्भश्रीमंत बनवितात, ज्याला कोणीही लुटू शकत नाही. इथे घालाल तर लगेच कोणीतरी लुटेल. तर स्वतःला अतिशय बुद्धिवान बनवायचे आहे. आसुरी गुणांना काढून टाकायचे आहे. आसुरी गुण असलेल्यांचा चेहराच असा होऊन जातो. क्रोधामुळे तर

तांब्यासारखे लाल होतात. काम विकारवाले तर काळ्या तोंडाचे बनतात. श्रीकृष्णाला देखील काळे दाखवतात ना. विकारांमुळेच गोऱ्या पासून काळा बनला. तुम्हा मुलांनी प्रत्येक गोष्टीवर विचार सागर मंथन केले पाहिजे. हे शिक्षण आहे अथाह धन प्राप्त करण्यासाठी. तुम्ही मुलांनी ऐकलेले आहे, 'क्वीन व्हिक्टोरियाचा वजीर आधी खूप गरीब होता. दिव्याच्या प्रकाशा खाली अभ्यास करायचा'. परंतु ते शिक्षण काही रत्ने थोडीच आहेत. शिक्षण घेऊन चांगले पद प्राप्त करतात. म्हणजेच शिक्षण कामी आले, पैसा नाही. शिक्षणच धन आहे. ते आहे हदचे धन, हे आहे बेहदचे धन. आता तुम्ही समजता, बाबा आम्हाला शिकवून विश्वाचा मालक बनवतात. तिथे (सतयुगामध्ये) काही धन कमावण्याकरिता शिकणार नाहीत. तिथे तर आताच्या पुरुषार्था नुसार अथाह धन मिळते. धन अविनाशी बनते. देवतांकडे भरपूर धन होते आणि जेव्हा वाम मार्ग, रावण राज्यामध्ये येतात तेव्हा देखील किती धन होते. कितीतरी मंदिरे बांधली. नंतर मग मुसलमानांनी ती लुटली. किती श्रीमंत होते. आजकालच्या शिक्षणाने इतके श्रीमंत बनू शकत नाही. तर या शिक्षणाने बघा मनुष्य काय बनतात! गरिबापासून श्रीमंत. आता भारत पहा किती गरीब आहे! ज्या काही प्रसिद्ध श्रीमंत व्यक्ती आहेत, त्यांना तर फुरसतच नाही. आपल्या धनाचा, पोझिशनचा किती अहंकार असतो. या शिक्षणामध्ये अहंकार इत्यादी नष्ट झाला पाहिजे. 'मी आत्मा आहे, आत्म्याकडे धन-दौलत, हिरे-माणके इत्यादी काहीही नाही'.

बाबा म्हणतात - 'गोड मुलांनो, देहासहित देहाचे सर्व संबंध सोडा'. आत्मा शरीर सोडते तेव्हा मग श्रीमंती इत्यादी सर्व नष्ट होते. मग पुन्हा जेव्हा नव्याने शिकतील, धन कमावतील तेव्हाच श्रीमंत बनतील किंवा खूप दान-पुण्य केले असेल तर श्रीमंताच्या घरी जन्म घेतील. मग म्हणतात - 'हे पूर्व जन्मातील कर्मांचे फळ आहे'. ज्ञानदान केले असेल किंवा कॉलेज, धर्मशाळा इत्यादी बांधली असेल, तर त्याचे फळ मिळते परंतु अल्पकाळासाठी. हे दान-पुण्य इत्यादी इथे देखील केले जाते. सतयुगामध्ये केले जात नाही. सतयुगामध्ये चांगलीच कर्मे होतात कारण आताचा वारसा मिळाला आहे. तिथे कोणतेही कर्म विकर्म बनत नाही कारण रावणच नाहीये. विकारामध्ये गेल्यानेच विकारी कर्म होतात. विकारामुळे विकर्म बनतात. स्वर्गामध्ये कोणतेही विकर्म होत नाही. सर्व काही कर्मांवर अवलंबून आहे. हा माया रावण अवगुणी बनवतो. बाबा येऊन सर्वगुणसंपन्न बनवतात. राम वंशी आणि रावण वंशींचे युद्ध चालते. तुम्ही रामाची मुले आहात, किती चांगली-चांगली मुले मायेकडून पराभूत होतात. बाबा नाव सांगत नाहीत, तरीही आशा ठेवतात. अगदी नीच ते नीच असणाऱ्यांचा उद्धार करावा लागतो. बाबांना संपूर्ण विश्वाचा उद्धार करायचा आहे. रावणाच्या राज्यामध्ये सर्वांचेच अधःपतन झाले आहे. बाबा तर वाचण्याच्या आणि वाचविण्याच्या युक्त्या दररोज समजावून सांगत असतात तरीसुद्धा कोसळतात त्यामुळे नीच ते नीच बनतात. ते मग इतके चढू शकत नाहीत. तो नीचपणा आतल्या आत खात राहील. जसे म्हणता - 'अन्तकाल जो...' त्यांच्या बुद्धीमध्ये ते नीचपणाचेच कृत्य आठवत राहील.

तर बाबा बसून मुलांना समजावून सांगत आहेत - कल्प-कल्प तुम्हीच हे ऐकता, सृष्टीचे चक्र कसे फिरते, पशू तर समजून घेणार नाहीत. तुम्हीच ऐकता आणि समजता. मनुष्य तर मनुष्यच आहेत, या लक्ष्मी-नारायणाला देखील नाक-कान इत्यादी सर्व आहे तरी देखील मनुष्य आहेत ना. परंतु दैवी गुण आहेत म्हणून त्यांना 'देवता' म्हटले जाते. हे असे देवता कसे बनतात आणि पुन्हा कसे कोसळतात (अधोगती होते), या चक्राविषयी तुम्हालाच माहिती आहे. जे ज्ञानाचे विचार सागर मंथन करत राहतील, त्यांनाच धारणा होईल. जे विचार सागर मंथन करत नाहीत त्यांना बुद्धू म्हणणार. मुरली चालवणाऱ्याचे विचार सागर मंथन चालत राहील की, या टॉपिकवर हे-हे समजावून सांगायचे आहे. आशा केली जाते, आता समजणार नाहीत परंतु पुढे जाऊन जरूर समजतील. आशा बाळगली जाते अर्थात सेवेची आवड आहे, थकायचे नाही. भले कोणी प्रगती करुन मग अधम (नीच) बनला आहे, आणि असा जर कोणी आला तर प्रेमाने बसवाल ना की निघून जा म्हणून सांगाल! चौकशी करायला हवी - 'इतके दिवस कुठे होता? का आला नाही?' तर सांगतील ना - मायेकडून हार पत्करली. समजतात सुद्धा ज्ञान खूप चांगले आहे. लक्षात तर राहते ना. भक्तीमध्ये तर हार-जीत होण्याचा प्रश्नच नाही. हे ज्ञान आहे, हे धारण करायचे आहे. तुम्ही जोपर्यंत ब्राह्मण बनत नाहीत तोपर्यंत देवता बनू शकत नाही. ख्रिश्चन, बौद्धी, पारसी इत्यादींमध्ये ब्राह्मण थोडेच असतात? ब्राह्मणाची मुले ब्राह्मण असतात. या गोष्टी आता तुम्हाला समजत आहेत. तुम्ही जाणता 'अल्फ'ची (बाबांची) आठवण करायची आहे. 'अल्फ'ची आठवण केल्यानेच 'बे' बादशाही मिळते. जेव्हा कोणी भेटेल तर सांगा - 'अल्फ अल्लाह'ची आठवण करा. 'अल्फ'लाच श्रेष्ठ म्हटले जाते. बोटाने 'अल्फ'कडे (बाबांच्या दिशेने) इशारा करतात. 'अल्फ'चा अर्थ एकदम सरळ आहे. 'अल्फ'ला एक देखील म्हटले जाते. ईश्वर एकच आहे,

बाकी सर्व आहेत त्यांची मुले. बाबांना 'अल्फ' म्हटले जाते. बाबा ज्ञान सुद्धा देतात, आणि आपली मुले देखील बनवतात. तर मग तुम्हा मुलांनी किती आनंदात राहिले पाहिजे. बाबा आमची किती सेवा करतात, आम्हाला विश्वाचा मालक बनवतात. आणि मग स्वतः मात्र त्या पवित्र दुनियेमध्ये (सतयुगामध्ये) येत सुद्धा नाहीत. पावन दुनियेमध्ये त्यांना कोणी बोलावत देखील नाहीत, पतित दुनियेमध्येच बोलावतात. ते (बाबा) पावन दुनियेमध्ये येऊन काय करणार. त्यांचे नावच आहे पतित-पावन. तर जुन्या दुनियेला पावन दुनिया बनविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. बाबांचे नावच आहे - 'शिव'. मुलांना म्हटले जाते - 'शाळीग्राम'. दोघांचीही पूजा होते. परंतु पूजा करणाऱ्याला काहीही माहित नाही आहे, बस्स फक्त पूजेचा एक रिवाज बनवून ठेवला आहे. देवींचे देखील हिऱ्या-मोत्यांचे फर्स्टक्लास महाल इत्यादी बनवतात, पूजा करतात. ते (शिवबाबांचे) तर मातीचे लिंग बनवले आणि तोडून टाकले. बनवण्यासाठी काही मेहनत घ्यावी लागत नाही. देवींना बनविण्यासाठी मेहनत करावी लागते, त्यांच्या (शिवबाबांच्या) पूजेसाठी मेहनत करावी लागत नाही. फुकटात मिळतो. दगड पाण्यामध्ये घासून-घासून गोल बनतो. पूर्ण अंडाकृती बनवतात. म्हणतात देखील आत्मा अंड्याप्रमाणे आहे, जी ब्रह्म तत्वामध्ये राहते, म्हणूनच त्याला 'ब्रह्मांड' म्हणतात. तुम्ही ब्रह्मांडाचे आणि विश्वाचे देखील मालक बनता.

तर सर्वप्रथम एका बाबांविषयी स्पष्ट करून सांगायचे आहे. शिवची, सर्वजण 'बाबा' असे म्हणून आठवण करतात. दुसरे म्हणजे ब्रह्माला देखील 'बाबा' म्हणतात. प्रजा-पिता आहेत तर साऱ्या प्रजेचे पिता झाले ना. ग्रेट-ग्रेट ग्रँड फादर. हे सर्व ज्ञान आता तुम्हा मुलांनाच आहे. 'प्रजापिता ब्रह्मा', असे म्हणतात तर पुष्कळजण परंतु यथार्थ रित्या कोणीही जाणत नाहीत. ब्रह्मा कोणाचा मुलगा आहे? तुम्ही म्हणाल परमपिता परमात्म्याचा. शिवबाबांनी यांना दत्तक घेतले आहे तर हे शरीरधारी झाले ना. सर्व आत्मे ईश्वराची मुले आहेत. परंतु जेव्हा शरीर मिळते तेव्हा प्रजापिता ब्रह्माला दत्तक घेतले असे म्हणतात. तसे दत्तक नाही. काय सर्व आत्म्यांना परमपिता परमात्म्याने दत्तक घेतले आहे का? नाही, तुम्हाला दत्तक घेतले आहे. आता तुम्ही ब्रह्माकुमार-कुमारी आहात. शिवबाबा तुम्हाला दत्तक घेत नाहीत. सर्व आत्मे अनादि अविनाशी आहेत. सर्व आत्म्यांना आपापले स्वतःचे शरीर, आपापला पार्ट मिळालेला आहे, जो बजावायचाच आहे. तोच पार्ट अनादि अविनाशी असून परंपरेने चालत येतो. त्याचा आदि अंत सांगू शकत नाही अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) आपली श्रीमंती, पोझिशन इत्यादीचा अहंकार नष्ट करायचा आहे. अविनाशी ज्ञान धनाने स्वतःला श्रीमंत बनवायचे आहे. सेवेमध्ये कधीही थकायचे नाही.
2. २) वातावरण चांगले ठेवण्यासाठी मुखातून सदैव रत्नेच काढायची आहेत, दुःख देणारे बोल निघणार नाहीत याची काळजी घ्यायची आहे. हर्षितमुख रहायचे आहे.

वरदान:- कोणत्याही प्रकारच्या वातावरणामध्ये मन-बुद्धीला सेकंदामध्ये एकाग्र करणारे सर्वशक्ती संपन्न भव

बापदादांनी सर्व मुलांना सर्व शक्ती वारशामध्ये दिल्या आहेत. आठवणीच्या शक्तीचा अर्थ आहे - मन-बुद्धीला जिथे लावू इच्छिता तिथे लागेल. कोणत्याही प्रकारच्या वातावरणामध्ये आपल्या मन-बुद्धीला सेकंदामध्ये एकाग्र करा. परिस्थिती प्रतिकूल असो, वातावरण तमोगुणी असो, माया आपले बनविण्याच्या प्रयत्नात असेल तरी देखील सेकंदामध्ये एकाग्र व्हा - अशी कंट्रोलिंग पॉवर असेल तेव्हाच म्हणणार सर्वशक्ती संपन्न.

बोधवाक्य:- विश्वकल्याणाची जबाबदारी आणि पवित्रतेचा लाईटचा ताज घालणारेच डबल ताजधारी बनतात.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - तुम्ही आत्ता पुरुषोत्तम संगमयुगात आहात, तुम्हाला इथे राहून नव्या दुनियेची आठवण करायची आहे आणि आत्म्याला पावन बनवायचे आहे"

प्रश्न:- बाबांनी तुम्हाला अशी कोणती समज दिली आहे ज्यामुळे तुमच्या बुद्धीचे कुलूप उघडले आहे?

उत्तर:- बाबांनी या बेहद अनादि ड्रामा विषयी अशी समज दिली आहे, ज्यामुळे बुद्धीला जे गोदरेजचे कुलूप लागले होते ते उघडले. पत्थर बुद्धी पासून पारस बुद्धी बनलो. बाबांनी समज दिली आहे की या ड्रामामध्ये प्रत्येक ॲक्टरचा आपापला अनादि पार्ट आहे, ज्याने कल्पापूर्वी जेवढा अभ्यास केला आहे, तेवढाच आता देखील करतील. पुरुषार्थ करून आपला वारसा घेतील.

ओम् शांती. रूहानी मुलांप्रती बाबा बसून शिकवत आहेत. जेव्हापासून पिता बनले आहेत तेव्हापासूनच टिचर देखील आहेत, आणि तेव्हापासूनच मग सद्गुरूच्या रूपामध्ये शिकवण देत आहेत. हे तर मुलांना समजतेच आहे की, जर ते पिता, टिचर, सद्गुरू आहेत म्हणजे लहान मूल तर नाही आहेत ना. सर्वश्रेष्ठ, मोठ्यात मोठे आहेत. बाबा जाणतात ही सर्व माझी मुले आहेत. ड्रामा प्लॅन अनुसार बोलावले देखील आहे की, येऊन आम्हाला पावन दुनियेमध्ये घेऊन चला. परंतु समजत काहीच नाहीत. आता तुम्ही समजता पावन दुनिया सतयुगाला, पतित दुनिया कलियुगाला म्हटले जाते. म्हणतात देखील - येऊन आम्हाला रावणाच्या जेलमधून मुक्त करून दुःखातून सोडवून आपल्या शांतीधाम-सुखधाम मध्ये घेऊन चला. दोन्ही नावे चांगली आहेत. मुक्ती-जीवनमुक्ती अथवा शांतीधाम-सुखधाम. तुम्हा मुलांव्यतिरिक्त इतर कोणाच्याही बुद्धीमध्ये नाही आहे की, शांतीधाम कुठे, सुखधाम कुठे असते? एकदमच अज्ञानी आहेत. तुमचे एम ऑब्जेक्टच समजदार (ज्ञानी) बनणे हे आहे. अज्ञानी असणाऱ्यांसाठी एम ऑब्जेक्ट हेच असते की, असे ज्ञानी बनायचे आहे. सर्वांना शिकवायचे आहे - मनुष्यापासून देवता बनणे हे आहे एम ऑब्जेक्ट. ही आहेच मनुष्यांची सृष्टी, ती आहे देवतांची सृष्टी. सतयुगामध्ये आहे देवतांची सृष्टी, तर नक्कीच मनुष्यांची सृष्टी कलियुगामध्ये असेल. आता मनुष्यापासून देवता बनायचे असेल तर जरूर पुरुषोत्तम संगमयुगसुद्धा असेल. ते आहेत देवता, हे आहेत मनुष्य. देवता आहेत बुद्धिमान. बाबांनीच असे बुद्धिवान बनवले आहे. जे बाबा विश्वाचे मालक आहेत, भले ते बनत नाहीत, परंतु गायन तर होते ना. बेहदचे बाबा, बेहदचे सुख देणारे आहेत. बेहदचे सुख असतेच नवीन दुनियेमध्ये आणि बेहदचे दुःख असते जुन्या दुनियेमध्ये. देवतांची चित्रेसुद्धा तुमच्या समोर आहेत. त्यांचे गायन देखील आहे. आजकाल तर ५ भुतांना (पंचमहाभूत तत्वांना) देखील पूजत राहतात.

आता बाबा तुम्हाला समजावून सांगतात - तुम्ही आहात पुरुषोत्तम संगमयुगावर. तुमच्यामध्ये देखील नंबरवार पुरुषार्थानुसार जाणतात - आमचा एक पाय स्वर्गामध्ये, एक पाय नरकामध्ये आहे. राहतो तर इथेच आहोत परंतु बुद्धी नवीन दुनियेमध्ये आहे आणि जे नव्या दुनियेमध्ये घेऊन जातात त्यांची आठवण करायची आहे. बाबांच्या आठवणीनेच तुम्ही पवित्र बनता. हे शिवबाबा बसून समजावून सांगतात. शिवजयंती साजरी तर जरूर करतात, परंतु शिवबाबा केव्हा आले, येऊन काय केले, हे काहीच माहित नाही आहे. शिवरात्री साजरी करतात आणि श्रीकृष्णाची जयंती साजरी करतात, जे काही श्रीकृष्णासाठी म्हणतात ते शिवबाबांसाठी तर म्हणणार नाही म्हणून मग त्यांची शिवरात्री म्हणतात. अर्थ काहीच समजत नाहीत. तुम्हा मुलांना तर अर्थ समजावून सांगितला जातो. अथाह दुःख आहे कलियुगाच्या अंताला, मग अथाह सुख असते सतयुगामध्ये. हे ज्ञान तुम्हा मुलांना आत्ता मिळाले आहे. तुम्ही आदि-मध्य-अंताला जाणता. जे कल्पापूर्वी शिकले आहेत तेच आता शिकतील, ज्यांनी जो पुरुषार्थ केला असेल तोच करु लागतील आणि तसेच पदही प्राप्त करतील. तुमच्या बुद्धीमध्ये संपूर्ण चक्र आहे. तुम्हीच सर्वश्रेष्ठ पद प्राप्त करता आणि मग तुम्ही उतरता देखील तसेच. बाबांनी समजावून सांगितले आहे - हे जे काही मनुष्यांचे आत्मे आहेत, माळा आहे ना, ती सर्व नंबरवार येते. प्रत्येक ॲक्टरला आपापला पार्ट मिळालेला आहे - कोणत्या वेळी कोणाला कोणता पार्ट बजावायचा आहे. हा अनादि पूर्व नियोजित ड्रामा आहे, जो बाबा बसून समजावून सांगतात. आता बाबा जे तुम्हाला समजावून सांगतात ते आपल्या भावांना समजावून सांगायचे आहे.

तुमच्या बुद्धीमध्ये आहे की दर ५ हजार वर्षांनंतर बाबा येऊन आपल्याला समजावून सांगतात, आम्ही मग भावांना समजावून सांगतो. भाऊ-भाऊ हे नाते आत्म्याशी संबंधित आहे. बाबा म्हणतात या वेळी तुम्ही स्वतःला अशरीरी आत्मा समजा. आत्म्यालाच आपल्या बाबांची आठवण करायची आहे - पावन बनण्याकरिता. आत्मा पवित्र बनते तर मग शरीर देखील पवित्र मिळते. आत्मा अपवित्र तर दागिना देखील अपवित्र. नंबरवार तर असतातच. एकाची फीचर्स, ॲक्टिव्हीटी दुसऱ्याशी मेळ खाऊ शकत नाहीत. नंबरवार सर्वजण आपापला पार्ट बजावतात, फरक पडू शकत नाही. नाटकामध्ये तीच दृश्ये बघाल जी काल (आधी) बघितली होती. तीच रिपीट होतील ना. हे मग बेहदचे अजूनच मोठे काम आहे. काल तुम्हाला समजावून सांगितले होते. तुम्ही राज्य घेतले आणि मग राज्य गमावले. आज पुन्हा राज्य मिळविण्यासाठी समजून घेत आहात. आज भारत जुना नरक आहे, उद्या नवा स्वर्ग होईल. तुमच्या बुद्धीमध्ये आहे - आता आपण नवीन दुनियेमध्ये जात आहोत. श्रीमताचे पालन करून श्रेष्ठ बनत आहोत. श्रेष्ठ जरूर श्रेष्ठ सृष्टीवर राहतील. हे लक्ष्मी-नारायण श्रेष्ठ आहेत तर श्रेष्ठ स्वर्गामध्ये राहतात. जे भ्रष्ट आहेत ते नरकामध्ये राहतात. हे रहस्य तुम्हाला आता समजते आहे. जेव्हा या बेहदच्या ड्रामाला कोणी व्यवस्थित समजून घेईल तेव्हा बुद्धीत बसेल. शिवरात्री देखील साजरी करतात परंतु जाणत काहीच नाहीत. तर तुम्हा मुलांना आता रिफ्रेश (ताजेतवाने) करावे लागते. तुम्ही मग इतरांना देखील ताजेतवाने करता. आता तुम्हाला ज्ञान मिळत आहे मग सद्गती मिळेल. बाबा म्हणतात - 'मी स्वर्गामध्ये येत नाही, माझा पार्टच पतित दुनियेला पावन बनवण्याचा आहे. तिथे तर तुमच्याकडे कुबेराचा खजिना असतो. इथे तर गरीब आहात म्हणून बाबांना बोलवता - येऊन बेहदचा वारसा द्या. कल्प-कल्प बेहदचा वारसा मिळतो आणि मग गरीब सुद्धा होता. चित्रांवरून समजावून सांगा तेव्हा समजू शकतील. पहिल्या नंबरचे लक्ष्मी-नारायण मग ८४ जन्म घेत मनुष्य बनले. हे ज्ञान आता तुम्हा मुलांना मिळाले आहे. तुम्ही जाणता आजपासून ५ हजार वर्षांपूर्वी आदि सनातन देवी-देवता धर्म होता, ज्याला वैकुंठ, स्वर्ग, दैवी दुनिया देखील म्हणतात. आत्ता तर म्हणणार नाही. आता तर आसुरी दुनिया आहे. आसुरी दुनियेचा अंत, दैवी दुनियेची सुरुवात यांचा आत्ता संगम आहे. या गोष्टी आता तुम्हाला समजतात, बाकी कोणाच्या तोंडून ऐकू शकणार नाही. बाबा येऊन यांचे मुख (ब्रह्मा मुख) घेतात. कोणाचे मुख घेणार, समजतच नाहीत. बाबांचे आरोहण कोणावर होईल? जशी तुमची आत्मा या शरीरावर आरूढ आहे ना! शिवबाबांना आपले स्वतःचे वाहन तर नाही आहे, पण त्यांना मुख तर जरूर पाहिजे. नाहीतर मग राजयोग शिकवणार कसे? प्रेरणेद्वारे तर शिकणार नाहीत. तर या सर्व गोष्टी हृदयामध्ये टिपून ठेवायच्या आहेत. परमात्म्याच्या बुद्धीमध्ये देखील सर्व नॉलेज आहे ना. तुमच्याही बुद्धीमध्ये हे पक्के झाले पाहिजे. हे नॉलेज बुद्धीने धारण करायचे आहे. म्हटले देखील जाते - तुमची बुद्धी ठीक आहे ना? बुद्धी आत्म्यामध्ये असते. आत्माच बुद्धीने समजत आहे. तुमची पत्थर बुद्धी कोणी बनवली? आता समजता रावणाने आमच्या बुद्धीची काय अवस्था केली आहे! काल तुम्ही ड्रामाला जाणत नव्हता, बुद्धीला एकदम गॉडरेजचे (गोदरेजचे) कुलूप लागले होते. 'गॉड' शब्द तर येतो ना. बाबा जी बुद्धी देतात ती बदलून पत्थर बुद्धी बनते. मग बाबा येऊन कुलूप उघडतात. सतयुगामध्ये आहेच पारस बुद्धी. बाबा येऊन सर्वांचे कल्याण करतात. नंबरवार सर्वांच्या बुद्धीची कवाडे उघडतात. मग एकामागोमाग एक येत राहतात. वरती तर कोणी राहू शकत नाही. पतित तिथे राहू शकत नाहीत. बाबा पावन बनवून पावन दुनियेमध्ये घेऊन जातात. तिथे सर्व पावन आत्मे राहतात. ती आहे निराकारी सृष्टी.

तुम्हा मुलांना आता सर्व कळले आहे म्हणून आपले घर देखील जणू खूप जवळ आलेले दिसते. तुमचे घरावर खूप प्रेम आहे. तुमच्यासारखे प्रेम तर कोणाचेच नाही. तुमच्यामध्ये देखील नंबरवार आहेत, ज्यांचे बाबांवर प्रेम आहे, त्यांचे घरावर देखील प्रेम आहे. अतिप्रिय मुले असतात ना. तुम्ही समजता इथे जे चांगल्या प्रकारे पुरुषार्थ करून अतिप्रिय बनतील तेच उच्च पद प्राप्त करतील. हे काही लहान किंवा मोठ्या शरीरावर अवलंबून नाही आहे. ज्ञान आणि योगामध्ये जे मस्त (हरवलेले) असतात, ते मोठे आहेत. कित्येक छोटी-छोटी मुले देखील ज्ञान-योगामध्ये हुषार असतात तर मग मोठ्यांना शिकवतात. अन्यथा नियम तर आहे की, मोठे छोट्यांना शिकवतात. आजकाल तर (मिडगेड) खूप छोटे देखील शिक्षक बनतात. तसे तर सर्व आत्मे खूप छोटे आहेत. आत्मा बिंदू आहे, त्याचे काय वजन करणार? तारा आहे. मनुष्य लोक तारा नाव ऐकल्यावर वरती बघतील. तुम्ही तारा नाव ऐकून स्वतःला बघता. धरतीवरचे तारे तुम्ही आहात. ते आकाशातले जे जड (स्थूल) आहेत, तुम्ही चैतन्य आहात. त्यांच्यामध्ये तर काहीच फेरबदल होत नाही, तुम्ही ८४ जन्म घेता, किती मोठा पार्ट बजावता. पार्ट बजावता-बजावता तेज कमी होते, बॅटरी डिस्चार्ज होते. मग बाबा येऊन वेगवेगळ्या प्रकारे समजावून सांगतात कारण तुमची आत्मा विझलेली

आहे. जी शक्ती भरलेली होती ती संपली आहे. आता पुन्हा बाबांकडून तुम्ही शक्ती भरता. तुम्ही आपली बॅटरी चार्ज करत आहात. यामध्ये माया खूप विघ्ने आणते बॅटरी चार्ज करू देत नाही. तुम्ही चैतन्य बॅटऱ्या आहात. जाणता बाबांसोबत योग लावल्याने आपण सतोप्रधान बनणार. आता तमोप्रधान बनलो आहोत. त्या हदच्या शिक्षणामध्ये आणि या बेहदच्या शिक्षणामध्ये खूप फरक आहे. कसे नंबरवार सर्व आत्मे वरती जातात आणि मग आपापल्या वेळी पार्ट बजावण्यासाठी यायचे आहे. सर्वांना आपापला अविनाशी पार्ट मिळालेला आहे. तुम्ही हा ८४ चा पार्ट किती वेळा बजावला असेल! तुमची बॅटरी किती वेळा चार्ज आणि डिस्चार्ज झाली आहे! जर जाणता की आपली बॅटरी डिस्चार्ज आहे तर मग चार्ज करण्यासाठी उशीर का करायचा? परंतु माया बॅटरी चार्ज करू देत नाही. तुम्हाला माया बॅटरी चार्ज करण्याचे विसरायला लावते. वारंवार बॅटरी डिस्चार्ज करून टाकते. बाबांची आठवण करण्याचा प्रयत्न करता परंतु करू शकत नाही. तुमच्यापैकी जे बॅटरी चार्ज करून सतोप्रधान अवस्थेच्या जवळ येतात, त्यांच्याकडून देखील माया चूक घडवून बॅटरी डिस्चार्ज करून टाकते. हे शेवटपर्यंत होत राहील. मग जेव्हा युद्धाचा शेवट होईल तेव्हा सर्व नष्ट होतात, मग ज्यांची जितकी बॅटरी चार्ज झालेली असेल त्यानुसार पद प्राप्त करतील. सर्व आत्मे बाबांची संतान आहेत, बाबाच येऊन सर्वांची बॅटरी चार्ज करवतात. कसा अद्भुत खेळ बनलेला आहे. बाबांसोबत योग लावण्यापासून घडोघडी दूर होतात तर किती नुकसान होते. असा योग तुटू नये यासाठी पुरुषार्थ करून घेतला जातो. पुरुषार्थ करता-करता जेव्हा समाप्ती होते तेव्हा मग नंबरवार पुरुषार्थानुसार तुमचा पार्ट पूर्ण होतो. जसा कल्प-कल्प होतो. आत्म्यांची माळा बनत राहते. तुम्ही मुले जाणता रुद्राक्षाची माळा आहे, विष्णूची देखील माळा आहे. पहिल्या क्रमांकावर तर त्यांचीच माळा ठेवणार ना, बाबा दैवी दुनिया रचतात ना. जशी रुद्र माळा आहे, तशी रूंड माळा आहे. ब्राह्मणांची माळा आत्ता बनू शकणार नाही, अदली-बदली होत राहील. जेव्हा रूद्र माळा बनेल तेव्हा फायनल होतील. या ब्राह्मणांची देखील माळा आहे परंतु या वेळी बनू शकत नाही. वास्तविक सर्व प्रजापिता ब्रह्माची मुले आहेत. शिवबाबांच्या मुलांची देखील माळा आहे, विष्णूची देखील माळा म्हणू. तुम्ही ब्राह्मण बनता तर मग ब्रह्माची आणि शिवची देखील माळा पाहिजे. हे सर्व ज्ञान तुमच्या बुद्धीमध्ये नंबरवार आहे. ऐकतात तर सगळे परंतु त्या वेळी कोणाच्या कानातून निघून जाते, ऐकतच नाहीत. कोणी तर अभ्यासच करत नाहीत, त्यांना माहीतच नाही - भगवान शिकविण्यासाठी आलेले आहेत. शिकतच नाहीत, हे शिक्षण तर किती आनंदाने शिकले पाहिजे. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) आठवणीच्या यात्रेद्वारे आत्मारूपी बॅटरी चार्ज करून सतोप्रधान अवस्थेपर्यंत पोहोचायचे आहे. अशी कोणतीही चूक करायची नाही, ज्यामुळे बॅटरी डिस्चार्ज होईल.
2. २) मुरब्बी (अतिप्रिय) मुलगा बनण्याकरिता बाबांसोबतच घरावर सुद्धा प्रेम करायचे आहे. ज्ञान आणि योगामध्ये मस्त बनायचे आहे. बाबा जे समजावून सांगतात ते आपल्या भावांना देखील समजावून सांगायचे आहे.

वरदान:- एका बाबांनाच आपला संसार बनवून सदैव एकाच्याच आकर्षणामध्ये राहणारे कर्मबंधन मुक्त भव

सदैव याच अनुभवामध्ये रहा की, 'एक बाबा दुसरा न कोई', बस्स, एक बाबाच संसार आहेत इतर कोणतेही आकर्षण नाही, कोणतेही कर्मबंधन नाही. स्वतःच्या कोणत्या कमजोर संस्काराचे देखील बंधन नसावे. जे कोणावर 'माझे'पणाचा अधिकार बाळगतात त्यांना राग अथवा अभिमान येतो - हे देखील कर्मबंधन आहे, परंतु जेव्हा बाबाच माझा संसार आहेत, ही आठवण राहते तेव्हा सर्व 'माझे-माझे' एका बाबांमध्ये सामावून जाते आणि कर्मबंधनांमधून सहजपणे मुक्त होतात.

बोधवाक्य:- महान आत्मा ती आहे, जिची दृष्टी आणि वृत्ती बेहदची आहे.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - सर्व काही कर्मांवर अवलंबून आहे, नेहमी यावर लक्ष ठेवा की मायेच्या वशीभूत होऊन कोणतेही उलटे कर्म होऊ नये ज्याची सजा भोगावी लागेल"

प्रश्न:- बाबांच्या नजरेमध्ये सर्वात जास्त बुद्धिवान कोण आहेत?

उत्तर:- ज्यांच्यामध्ये पवित्रतेची धारणा आहे तेच बुद्धिवान आहेत आणि जे पतित आहेत ते बुद्धिहीन आहेत. लक्ष्मी-नारायणाला सर्वात जास्त बुद्धिवान म्हणणार. तुम्ही मुले आता बुद्धिवान बनत आहात. पवित्रताच सर्वात मुख्य आहे म्हणून बाबा सावध करतात - 'मुलांनो, या डोळ्यांनी धोका देऊ नये, यासाठी यांची काळजी घ्या'. या जुन्या दुनियेला बघत असताना देखील पाहू नका. नवीन दुनिया स्वर्गाची आठवण करा.

ओम् शांती. गोड-गोड सिकीलधी मुले (खूप-खूप वर्षांनी भेटलेली मुले) हे तर समजतात या जुन्या दुनियेमध्ये आता आपण थोड्या दिवसांचे यात्रेकरू आहोत. दुनियेतील मनुष्य समजतात की अजून ४० हजार वर्षे इथे रहायचे आहे. तुम्हा मुलांना तर निश्चय आहे ना. या गोष्टी विसरू नका. इथे बसलेले आहात तरी देखील तुम्हा मुलांना आतून आनंदाने भरून आले पाहिजे. या डोळ्यांनी जे काही पाहता सर्वकाही नष्ट होणार आहे. आत्मा तर अविनाशी आहे. आपण आत्म्यांनी ८४ जन्म घेतले आहेत. आता बाबा आले आहेत घरी घेऊन जाण्याकरिता. जुनी दुनिया जेव्हा पूर्ण होते तेव्हा बाबा नवीन दुनिया बनविण्यासाठी येतात. नवी सो जुनी, जुनी सो नवी दुनिया कशी होते हे तुमच्या बुद्धीमध्ये आहे. आपण अनेक वेळा चक्र फिरलो आहोत. आता चक्र पूर्ण होते. नवीन दुनियेमध्ये आपण देवता फार थोडे असतो. मनुष्य असणार नाहीत. बाकी सर्व काही कर्मांवर अवलंबून आहे. मनुष्य उलटे कर्म करतात तर ते नक्कीच आतल्याआत खात राहते; म्हणून बाबा विचारतात की या जन्मामध्ये अशी कोणती पापे तर केली नाहीत ना? हे आहे पतित घाणेरडे रावण राज्य. ही अंध:कारमय दुनिया आहे. आता बाबा तुम्हा मुलांना वारसा देत आहेत. आता तुम्ही भक्ती करत नाही. भक्तीच्या अंधारामध्ये धक्के खाऊन आलेले आहात. आता बाबांचा हात मिळाला आहे. बाबांचा सहारा नसल्यामुळे तुम्ही विषय वैतरणी नदीमध्ये गटांगळ्या खात होता. अर्धा कल्प आहेच भक्ती, ज्ञान मिळाल्यामुळे तुम्ही सतयुगी नवीन दुनियेमध्ये निघून जाता. आता तर हे आहे पुरुषोत्तम संगमयुग, जेव्हा तुम्ही घाणेरडे पतितापासून गुल-गुल, काट्यांपासून फूल बनत आहात. हे असे कोण बनवतात? बेहदचे बाबा. लौकिक पित्याला तर बेहदचे बाबा म्हणणार नाही. तुम्ही ब्रह्मा आणि विष्णूच्या देखील ऑक्युपेशनला जाणले आहे. तर तुम्हाला किती शुद्ध नशा असला पाहिजे. मूल वतन, सूक्ष्म वतन, स्थूल वतन... हे सर्व संगमावरच होते. बाबा बसून आता तुम्हा मुलांना समजावून सांगत आहेत - जुन्या आणि नवीन दुनियेचे हे संगमयुग आहे. बोलावतात देखील की, 'पतितांना पावन बनविण्यासाठी या'. बाबांचा देखील या संगमावरच पार्ट चालतो. क्रियेटर, डायरेक्टर आहेत ना! तर जरूर त्यांची काही ॲक्टिव्हिटी (क्रियाकलाप) असेल ना. सर्वजण जाणतात की, त्यांना मनुष्य म्हटले जात नाही, त्यांना तर स्वतःचे शरीरच नाही. बाकी सर्वांना मनुष्य अथवा देवता म्हणणार. शिवबाबांना ना देवता म्हणणार, ना मनुष्य म्हणणार. हे तर टेंपररी शरीर लोनवर घेतलेले आहे. गर्भातून थोडेच जन्मले आहेत. बाबा स्वतः म्हणतात - 'मुलांनो, शरीराशिवाय मी राजयोग कसा शिकवणार. भले मनुष्यमात्र मला म्हणतात की दगड-धोंड्यामध्ये परमात्मा आहे परंतु आता तुम्ही मुले जाणता की मी कसा येतो'. आता तुम्ही राजयोग शिकत आहात. कोणता मनुष्य काही शिकवू शकत नाही. देवता तर राजयोग शिकू शकत नाहीत. इथे या पुरुषोत्तम संगमयुगावर राजयोग शिकून देवता बनतात.

आता तुम्हा मुलांना अपार आनंद झाला पाहिजे - आता आपण ८४ चे चक्र पूर्ण केले आहे. बाबा कल्प-कल्प येतात, बाबा स्वतः म्हणतात - हा अनेक जन्मांतील अखेरचा जन्म आहे. श्रीकृष्ण तर सतयुगाचा प्रिन्स होता तोच परत ८४ चे चक्र फिरतो. शिवबाबा काही ८४ च्या चक्रामध्ये येणार नाहीत. श्रीकृष्णाची आत्माच सुंदर पासून श्याम बनते, या गोष्टी कोणालाही माहिती नाहीत. तुमच्यामध्ये देखील नंबरवारच जाणतात. माया खूप बलवान आहे. कोणालाही सोडत नाही. बाबा सर्व काही जाणतात. माया ग्राह (माया मगर) एकदम खाऊनच टाकते. हे बाबांना

चांगलेच माहीत आहे. असे समजू नका की, बाबा काही अंतर्यामी आहेत. नाही, बाबा सर्वांच्या ॲक्टिव्हिटीला (वर्तणुकीला) जाणतात. समाचार तर येतात ना. माया एकदम कच्चाच पोटात घालते. अशा खूप गोष्टी तुम्हा मुलांना समजतही नाहीत. बाबांना तर सर्व समजते. तर मग मनुष्य समजतात की, परमात्मा अंतर्यामी आहे. बाबा म्हणतात मी अंतर्यामी नाही. प्रत्येकाच्या वर्तनावरून समजून तर येते ना. खूपच घाणेरडे वर्तन करतात म्हणून बाबा वारंवार मुलांना सावध करतात. मायेपासून सावध रहायचे आहे. मग भले बाबा समजावून सांगतात तरी देखील बुद्धीमध्ये शिरतच नाही, काम महाशत्रू आहे, कळणार देखील नाही की, आपण कधी विकारामध्ये गेलो, असे देखील होते; म्हणून बाबा म्हणतात कोणतीही चूक इत्यादी झाली असेल तर स्पष्टपणे सांगा, लपवू नका. नाहीतर १०० पटीने पाप होईल. ते आतल्याआत खात राहील. वृद्धी होत राहील. एकदम खालीच कोसळाल. मुलांनी बाबांसोबत अतिशय प्रामाणिक रहायचे आहे नाहीतर खूप मोठा तोटा होईल. ही तर रावणाची दुनिया आहे. रावणाच्या दुनियेची आठवण आपण का करावी. आपल्याला तर नवीन दुनियेमध्ये जायचे आहे. बाबा नवीन घरे इत्यादी बांधतात तर मुले समजतात की, आमच्यासाठी नवीन घर बनत आहे. आनंद होतो. ही तर बेहदची गोष्ट आहे. आमच्यासाठी नवीन दुनिया स्वर्ग बनत आहे. आता आपण नवीन दुनियेमध्ये जाणार आहोत मग जितकी बाबांची आठवण कराल तितके गुलगुल बनाल. आपण विकारांच्या वश होऊन काटे बनलो आहोत. तुम्ही मुले जाणता - जे आता येत नाही आहेत ते मायेच्या वश झाले आहेत. बाबांचे राहिलेले नाहीत. ट्रेटर (द्रोही) बनले आहेत. जुन्या शत्रूकडे निघून गेले आहेत. बऱ्याच जणांना अशाप्रकारे माया गिळून टाकते. पूर्णत: संपून जातात. खूप चांगले-चांगले आहेत जे असे सांगून जातात की, 'आम्ही असे करणार, हे करणार. आम्ही तर यज्ञासाठी प्राण देखील द्यायला तयार आहोत'. आज ते राहिलेले नाहीत. तुमचे युद्ध आहेच मुळी माये सोबत. दुनियेमध्ये हे कोणीही जाणत नाहीत की, माये सोबत कसे युद्ध होते. शास्त्रांमध्ये मग दाखवले आहे देवतांचे आणि असुरांचे युद्ध झाले. आणि मग कौरवांचे आणि पांडवांचे युद्ध झाले. कोणालाही विचारा की या दोन गोष्टी शास्त्रांमध्ये कशा काय आहेत? देवता तर अहिंसक असतात. ते असतातच मुळी सतयुगामध्ये. ते मग काय कलियुगामध्ये युद्ध करण्यासाठी येतील. कौरव आणि पांडव याचा देखील अर्थ समजत नाहीत. शास्त्रांमध्ये जे लिहिले आहे तेच वाचून ऐकवत राहतात. बाबांनी (ब्रह्मा बाबांनी) तर पूर्ण गीता वाचलेली आहे. जेव्हा हे ज्ञान मिळाले तेव्हा विचार सुरु झाला की गीतेमध्ये या युद्ध इत्यादीच्या गोष्टी कशा काय लिहिल्या आहेत? श्रीकृष्ण काही गीतेचा भगवान नाही आहे. यांच्यामध्ये (ब्रह्मा तनामध्ये) बाबा बसले होते तर यांच्याद्वारे त्या भक्तिमार्गाच्या गीतेपासून मुक्त केले. आता बाबांद्वारे किती ज्ञानाचा प्रकाश मिळाला आहे. आत्म्यालाच कळते तेव्हाच तर बाबा म्हणतात - 'स्वतःला आत्मा समजा, बेहदच्या बाबांची आठवण करा'. भक्तीमध्ये तुम्ही आठवण करत होता, म्हणत होता - 'तुम्ही याल तेव्हा बलिहार जाऊ'. परंतु ते कसे येतील, कसे बलिहार जाणार, हे काही थोडेच समजत होते.

आता तुम्ही मुले समजता जसे बाबा आहेत तसे आपण आत्मे देखील आहोत. बाबांचा आहे अलौकिक जन्म, तुम्हा मुलांना किती सुंदर रित्या शिकवतात. तुम्ही स्वतः म्हणता - 'हे तर तेच आमचे बाबा आहेत. जे कल्प-कल्प आमचे पिता बनतात. आपण सर्व त्यांना 'बाबा-बाबा' म्हणतो'. बाबा देखील मुलांनो-मुलांनो म्हणतात, तेच टीचर रूपामध्ये राजयोग शिकवतात. तुम्हाला विश्वाचा मालक बनवतात. तर अशा बाबांचे बनून मग त्याच टीचर कडून शिक्षण देखील घेतले पाहिजे. ऐकूनच प्रफुल्लित झाले पाहिजे. जर छी-छी बनलात (विकारी बनलात) तर तो आनंद होणारही नाही. भले कितीही डोके आपटले, मग ते काही आपले भाऊबंद नाहीत. इथे मनुष्यांची किती आडनावे असतात. त्या सर्व आहेत हदच्या गोष्टी. तुमचे आडनाव बघा किती मोठे आहे. मोठ्यात मोठा ग्रेट-ग्रेट ग्रँड फादर ब्रह्मा. त्यांना कोणीही ओळखत नाही. शिवबाबांना तर सर्वव्यापी म्हटले आहे. ब्रह्मा विषयी देखील कोणाला माहिती नाही आहे. चित्र देखील आहे - ब्रह्मा, विष्णू, शंकर. मग ब्रह्माला सूक्ष्म वतनमध्ये घेऊन गेले आहेत. बायोग्राफी (चरित्र) काहीच जाणत नाहीत. सूक्ष्म वतनमध्ये मग ब्रह्मा कोठून आला? तिथे कसे दत्तक घेतील. बाबांनी समजावून सांगितले आहे - हा (ब्रह्मा तन) माझा रथ आहे. अनेक जन्मांच्या शेवटच्या जन्मामध्ये अंताला मी यांच्यामध्ये प्रवेश केला आहे. हे पुरुषोत्तम संगमयुग गीतेचा एपिसोड आहे, ज्यामध्ये पवित्रता मुख्य आहे. पतिता पासून पावन कसे बनायचे आहे, हे कोणालाच माहीत नाही आहे. साधू-संत इत्यादी कधीही असे म्हणणार नाहीत की, 'देहासहित देहाच्या सर्व संबंधांना विसरून एका मज पित्याची आठवण करा तर मायेची पाप कर्म भस्म होतील'. ते (दुनियावाले) तर बाबांनाच जाणत नाहीत. गीतेमध्ये बाबांनी म्हटले आहे - 'या साधू इत्यादींचा देखील उद्धार मी येऊन करतो'.

बाबा समजावून सांगत आहेत - सुरुवातीपासून आत्तापर्यंत जे काही आत्मे पार्ट बजावत आहेत - सर्वांचा हा अंतिम जन्म आहे. यांचा (ब्रह्मा बाबांचा) देखील हा अंतिम जन्म आहे. हेच मग ब्रह्मा बनले आहेत. लहानपणी खेड्यातील मुलगा होता. सुरुवातीपासून शेवटपर्यंत ८४ जन्म यानेच पूर्ण केले आहेत. आता तुम्हा मुलांच्या बुद्धीचे कुलूप उघडले आहे. आता तुम्ही बुद्धिवान बनता. पूर्वी बुद्धिहीन होता. हे लक्ष्मी-नारायण आहेत - बुद्धिवान. बुद्धिहीन पतितांना म्हटले जाते. मुख्य आहे पवित्रता. लिहितात देखील – 'मायेने आम्हाला पाडून घातले (पतन केले). दृष्टी विकारी बनली'. बाबा तर घडोघडी सावध करत राहतात - 'मुलांनो, मायेकडून कधीही हार खायची नाही. आता घरी जायचे आहे. स्वतःला आत्मा समजून बाबांची आठवण करा. ही जुनी दुनिया नष्ट झाली की झाली'. आपण पावन बनतो तर आपल्याला पावन दुनिया देखील पाहिजे ना! तुम्हा मुलांनाच पतितापासून पावन बनायचे आहे. बाबा काही योग लावणार नाहीत. बाबा पतित थोडेच बनतात जे योग लावतील. बाबा तर म्हणतात, 'मी तुमच्या सेवेमध्ये उपस्थित आहे'. तुम्हीच मागणी केली आहे की येऊन आम्हा पतितांना पावन बनवा. तुमच्याच सांगण्यावरून मी आलो आहे. तुम्हाला खूप सोपा रस्ता सांगतो फक्त मनमनाभव. भगवानुवाच आहे ना. फक्त श्रीकृष्णाचे नाव दिल्याने बाबांना सर्वजण विसरून गेले आहेत. फर्स्ट आहेत बाबा, सेकंड आहे श्रीकृष्ण. ते (शिवबाबा) परमधामाचे मालक, तो (श्रीकृष्ण) आहे वैकुंठाचा मालक. सूक्ष्म वतनमध्ये तर काहीच नसते. सर्वांमध्ये नंबर वन आहे - श्रीकृष्ण, ज्याच्यावर सर्वजण प्रेम करतात. बाकीचे तर सर्व मागाहून येतात. स्वर्गामध्ये तर सर्वजण जाऊ सुद्धा शकत नाहीत.

तर तुम्हा गोड-गोड मुलांना अत्यानंद झाला पाहिजे. बाबांकडे अशी बरीच मुले येतात जी कधीच पवित्र राहत नाहीत. बाबा समजावून सांगतात - 'विकारामध्ये जाता तर मग बाबांकडे येता कशाला?' म्हणतात - "काय करू, राहू शकत नाही. परंतु इथे येतो कदाचित कधीतरी तीर लागेल (मनाला भिडेल). तुमच्याशिवाय आमची सद्गती कोण करणार म्हणून येऊन बसतो. माया किती बलवान आहे. निश्चय देखील आहे - बाबा आपल्याला पतिता पासून पावन गुल-गुल (फूल) बनवत आहेत. परंतु काय करू, तरी देखील खरे बोलल्याने कधीतरी सुधरेन. मला हा निश्चय आहे की तुमच्याकडूनच मला सुधारायचे आहे." बाबांना अशा मुलांची दया येते तरीही पुन्हा असेच होणार. नथिंग न्यू. बाबा तर दररोज श्रीमत देतात. कोणी अमलात आणतात देखील, यामध्ये बाबा काय करू शकतात. बाबा म्हणतील कदाचित यांचा पार्टच असा आहे. सगळेच काही राजा-राणी बनत नाहीत. राजधानी स्थापन होत आहे. राजधानीमध्ये सर्व पाहिजेत. तरी देखील बाबा म्हणतात - 'मुलांनो, हिम्मत सोडू नका. पुढे जाऊ शकता'. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. २) कायम शुद्ध नशा रहावा की बेहदचे बाबा आम्हाला पतित विकारी पासून गुल गुल, काट्यांपासून फूल बनवत आहेत. आता आपल्याला बाबांचा हात मिळाला आहे, ज्याच्या आधारे आपण विषय वैतरणी नदी पार करणार आहोत.

वरदान:- पॉवरफुल ब्रेक द्वारे सेकंदामध्ये निगेटिव्हला पॉझिटिव्ह मध्ये परिवर्तन करणारे स्व परिवर्तक भव

जेव्हा निगेटिव्ह किंवा व्यर्थ संकल्प चालतात, तर त्याची गती खूप फास्ट असते. फास्ट गतीच्या वेळी पॉवरफुल ब्रेक लावून परिवर्तन करण्याचा अभ्यास पाहिजे. तसेही जेव्हा घाट चढतात तर आधी ब्रेक चेक करतात. तुम्ही तुमची उच्च स्थिती बनविण्यासाठी संकल्पांना सेकंदामध्ये ब्रेक लावण्याचा अभ्यास वाढवा. जेव्हा आपले संकल्प किंवा संस्कार एका सेकंदामध्ये निगेटिव्ह पासून पॉझिटिव्हमध्ये परिवर्तन कराल तेव्हा स्व परिवर्तना द्वारे विश्व परिवर्तनाचे कार्य संपन्न होईल.

बोधवाक्य:- स्वयं प्रति आणि सर्व आत्म्यां प्रति श्रेष्ठ परिवर्तनाच्या शक्तीला कार्यामध्ये आणणारेच खरे कर्मयोगी आहेत.

||| ओम शांती |||

"वर्तमान समयी आपले दयाळू आणि दाता स्वरूप प्रत्यक्ष करा"

आज वरदाता बाबा आपल्या ज्ञान दाता, शक्ती दाता, गुण दाता, परमात्म संदेश वाहक मुलांना पाहत आहेत. प्रत्येकजण मास्टर दाता बनून आत्म्यांना बाबांच्या समीप आणण्यासाठी मनापासून प्रयत्न करत आहेत. विश्वामध्ये अनेक प्रकारचे आत्मे आहेत, काही आत्म्यांना ज्ञान अमृत पाहिजे, बाकी आत्म्यांना शक्ती हव्या आहेत, गुण हवे आहेत, तुम्हा मुलांपाशी सर्व खजिने अखंड आहेत. प्रत्येक आत्म्याची कामना पूर्ण करणारे आहात. दिवसेंदिवस समाप्तीचा वेळ समीप येत असल्या कारणाने आता आत्मे कोणतातरी नवीन आधार शोधत आहेत. तर तुम्ही आत्मे नवीन आधार देण्याच्या निमित्त बनलेले आहात. बापदादा मुलांच्या उमंग-उत्साहाला पाहून आनंदित होतात. एका बाजूला गरज आहे आणि दुसऱ्या बाजूला उमंग-उत्साह आहे. गरजेच्या वेळी एका थेंबाचे देखील खूप महत्व असते. तर यावेळी तुम्ही दिलेल्या ओंजळीचे, संदेशाचे देखील खूप महत्व आहे.

वर्तमान समय तुम्हा सर्व मुलांचे दयाळू आणि दाता स्वरूप प्रत्यक्ष होण्याचा वेळ आहे. तुम्हा ब्राह्मण आत्म्याच्या अनादि स्वरूपामध्ये देखील 'दाता'पणाचे संस्कार भरलेले आहेत म्हणूनच कल्प वृक्षाच्या चित्रामध्ये तुम्हाला वृक्षाच्या मुळाशी दाखवले आहे कारण मुळाद्वारेच संपूर्ण वृक्षाला सर्व काही मिळते. तुमचे आदि स्वरूप - देवता रूप, त्याचा अर्थच आहे - 'देव ता' अर्थात देणारा. तुमचे मध्यकालचे स्वरूप - पूज्य रूपातील चित्र आहे; तर मध्यकाळामध्ये देखील पूज्य रूपामध्ये तुम्ही वरदान देणारे, दुवा देणारे, आशीर्वाद देणारे दात्याचे रूप आहात. तर तुम्हा आत्म्यांचे विशेष स्वरूपच 'दाता'पणाचे आहे. तर आता देखील परमात्म संदेशवाहक बनून विश्वामध्ये बाबांच्या प्रत्यक्षतेचा संदेश पसरवत आहात. तर प्रत्येक ब्राह्मण मुलाने चेक करावे की अनादि, आदि 'दाता'पणाचे संस्कार प्रत्येकाच्या जीवनामध्ये सदैव इमर्ज रूपामध्ये असतात का? 'दाता'पणाचे संस्कार असणाऱ्या आत्म्यांची निशाणी आहे - ते कधीही हा संकल्पसुद्धा करणार नाहीत की, 'कोणी देईल तेव्हा देऊ, कोणी करेल तेव्हा करू', नाही. निरंतर खुला भांडार आहे. तर बापदादा चोहो बाजूच्या मुलांचे 'दाता'पणाचे संस्कार बघत होते. काय पाहिले असेल? नंबरवार तर आहेतच ना! कधीही असा संकल्प करू नका - असे झाले तर मी देखील असे करेन. 'दाता'पणाचे संस्कार असणाऱ्यांना सर्व बाजूने सहयोग आपोआप प्राप्त होतो. ना केवळ आत्म्यांद्वारे परंतु प्रकृती देखील समयानुसार सहयोगी बनते. हा सूक्ष्म हिशोब आहे की, जो सदैव दाता बनतो, त्या पुण्याचे फळ वेळेवर सहयोग, वेळेवर सफलता त्या आत्म्याला सहजच प्राप्त होते म्हणून 'दाता'पणाचे संस्कार सदैव इमर्ज रूपामध्ये ठेवा. पुण्याचे खाते एकाचे १० पटीने फळ देते. तर पूर्ण दिवसभरामध्ये नोट करा - संकल्पाद्वारे, वाणीद्वारे, संबंध-संपर्काद्वारे पुण्य आत्मा बनून पुण्याचे खाते किती जमा केले? मनसा सेवा देखील पुण्याचे खाते जमा करते. वाणीद्वारे एखाद्या कमजोर आत्म्याला आनंदी करणे, चिंताग्रस्त असणाऱ्याला स्वमानाच्या स्मृतीमध्ये आणणे, निराश आत्म्याला आपल्या वाणीद्वारे उमंग-उत्साहामध्ये आणणे, संबंध-संपर्काने आत्म्याला आपल्या श्रेष्ठ संगाचा रंग अनुभव करविणे, या विधीने पुण्याचे खाते जमा करू शकता. या जन्मामध्ये इतके पुण्य जमा करता जे अर्धे कल्प पुण्याचे फळ खाता आणि अर्धे कल्प तुमची जड चित्रे (मुर्त्या) पापी आत्म्यांना वायुमंडळाद्वारे पापांपासून मुक्त करतात. पतित-पावनी बनता. तर बापदादा प्रत्येक मुलाचे जमा झालेले पुण्याचे खाते बघत असतात.

बापदादा मुलांचा वर्तमान समयातील सेवेचा उमंग-उत्साह पाहून खुश होत आहेत. मेजॉरिटी मुलांमध्ये सेवेचा उमंग चांगला आहे. सर्व आपापल्या वतीने सेवेचा प्लॅन प्रॅक्टिकलमधे आणत आहेत. यासाठी बापदादा अंतःकरणापासून मुबारक देत आहेत. चांगले करत आहात आणि चांगले करत रहाल. सर्वात चांगली गोष्ट ही आहे - सर्वांचा संकल्प आणि वेळ बिझी झाला आहे. प्रत्येकाचे हे लक्ष्य आहे की, चोहो बाजूच्या सेवेने आता तक्रारींची पूर्तता करायची आहे.

ब्राह्मणांच्या दृढ संकल्पामध्ये खूप शक्ती आहे. जर ब्राह्मण दृढ संकल्प करतील तर काय होऊ शकणार नाही! सर्वकाही होईल फक्त योगाला ज्वाला स्वरूप बनवा. योग ज्वाला स्वरूप बनला तर ज्वालेच्या मागे आत्मे

आपोआपच येतील कारण ज्वाला (प्रकाश) मिळाल्याने त्यांना मार्ग दिसू लागेल. आता योग तर लावत आहात परंतु योग, 'ज्वाला रूप' होणे आवश्यक आहे. सेवेचा उमंग-उत्साह चांगला वाढत आहे परंतु योगामध्ये 'ज्वाला रूप', याला आता अंडरलाईन करायची आहे. तुमच्या दृष्टीमध्ये अशी झलक यावी ज्यामुळे तुमच्या दृष्टीनेच ते कोणत्या ना कोणत्या अनुभूतीचा अनुभव करतील.

फॉरेनवाल्यांनी ही जी सेवा केली होती - 'कॉल ऑफ टाइम' वाल्यांची, त्याची विधी बापदादांना आवडली की छोट्याशा संघटनला समीप आणले. असे प्रत्येक झोन, प्रत्येक सेंटर वेगवेगळी सेवा तर करत आहेत परंतु कोणीतरी सर्व वर्गांचे (सर्व क्षेत्रातील लोकांचे) संघटन बनवा. बापदादांनी सांगितले होते की, विखुरलेली सेवा खूप आहे, परंतु विखुरलेल्या सेवेमधून काही समीप येणाऱ्या योग्य आत्म्यांचे संघटन तयार करा आणि वेळोवेळी त्या संघटनला समीप आणत रहा तसेच त्यांच्यामध्ये सेवेचा उमंग वाढवा. बापदादा पाहतात की असे आत्मे आहेत परंतु अजून ती शक्तिशाली पालना, संघटीत रूपामध्ये मिळत नाही आहे. वेगवेगळी यथाशक्ती पालना मिळत आहे, संघटनमध्ये एकमेकांना पाहून देखील उमंग येतो. 'हे असे करू शकतात, मी देखील करू शकतो, मी देखील करेन', तर उमंग येतो. बापदादा आता सेवेचे प्रत्यक्ष संघटित रूप पाहू इच्छितात. मेहनत चांगली करत आहात, प्रत्येकजण आपल्या वर्गाची (प्रभागाची), स्थानाची, झोनची, सेंटरची सेवा चांगली करत आहात, बापदादा खुश होतात. आता त्यातले काही बाबांसमोर आणा. प्रवृत्तीवाल्यांचा सुद्धा उमंग बापदादांपाशी पोहोचतो आणि डबल फॉरेनर्सचा देखील डबल कार्य करत असताना सेवेमध्ये, स्वतःच्या पुरुषार्थामध्ये उमंग चांगला आहे, हे पाहून देखील बाप-दादा खुश आहेत.

विदेशातील ब्राह्मण आत्मे वर्तमान वायुमंडळाला पाहून घाबरत तर नाही आहात ना? 'उद्या काय होईल, उद्या काय होईल...', असा तर विचार करत नाही ना? उद्या चांगलेच होणार आहे. चांगले आहे आणि चांगलेच होणार आहे. जितकी दुनियेमध्ये हलचल (भयग्रस्त स्थिती) निर्माण होईल तितकीच तुम्हा ब्राह्मण आत्म्यांची स्टेज (स्थिती) अचल असेल. असे आहे ना? डबल विदेशी भयग्रस्त आहात की अचल आहात? अचल आहात? भयग्रस्त तर नाही आहात ना! जे अचल आहेत त्यांनी हात वर करा. अचल आहात? उद्या काही झाले तर? तरीही अचल आहात ना! काय होणार, काहीही होणार नाही. तुम्हा ब्राह्मणांवर परमात्म छत्रछाया आहे. जसे वॉटरप्रूफ असते कितीही पाणी असेल परंतु वॉटरप्रूफ द्वारे वॉटरप्रूफ होतात. असेच कितीही भयग्रस्त परिस्थिती असेल परंतु ब्राह्मण आत्मे परमात्म छत्रछायेखाली कायम प्रूफ (सुरक्षित) आहेत. बेफिक्र बादशाह (निश्चिंत बादशहा) आहात ना! की थोडी-थोडी काळजी वाटते, काय होईल? नाही. निश्चिंत. स्वराज्य अधिकारी बनून, निश्चिंत बादशहा बनून, अचल-अडोलच्या सीट वर सेट रहा. सीट वरून खाली उतरू नका. अपसेट होणे अर्थात सीट वर सेट नाही आहात त्यामुळे अपसेट आहात. जे सीट वर सेट आहेत ते स्वप्नामध्ये देखील अपसेट होऊ शकत नाहीत.

माता काय समजता? सीट वर सेट व्हायला, बसायला येते ना? अवस्था डगमग तर होत नाही ना! बापदादा कंबाइंड आहेत, जर सर्वशक्तिवान तुमच्या सोबत कंबाइंड आहेत (एकत्र आहेत) तर तुम्हाला कसली भीती आहे! जर स्वतःला एकटे समजलात तर डगमगाल. कंबाइंड (एकत्र) रहाल तर मग कितीही खळबळ माजू दे परंतु तुम्ही अचल रहाल. बरोबर आहे मातांनो? ठीक आहे ना, कंबाइंड आहात ना! एकट्या तर नाही आहात ना? बाबांची जबाबदारी आहे, जर तुम्ही सीट वर सेट असाल तर बाबांची जबाबदारी आहे, अपसेट असाल तर तुमची जबाबदारी आहे.

आत्म्यांना संदेशाद्वारे ओंजळ देत रहाल तर दाता स्वरूपामध्ये स्थित रहाल, तर 'दाता'पणाच्या पुण्याचे फळ - शक्ती मिळत राहील. चालता-फिरता स्वतःला मी आत्मा करावनहार आहे आणि ही कर्मेंद्रिये करनहार कर्मचारी आहेत, हा आत्मा असल्याच्या स्मृतीचा अनुभव सदैव इमर्ज रूपामध्ये असावा; असे नाही की, मी तर आहेच आत्मा. नाही, स्मृतीमध्ये इमर्ज असावे. मर्ज रूपामध्ये राहते परंतु इमर्ज रूपामध्ये राहील्याने तो नशा, आनंद आणि कंट्रोलिंग पॉवर राहते. मजा देखील वाटते, का! साक्षी होऊन कर्म करता. तर वारंवार चेक करा की, करावनहार होऊन कर्म करवून घेत आहे का? ज्याप्रमाणे राजा आपल्या कर्मचाऱ्यांना ऑर्डरमध्ये ठेवतो, ऑर्डरने करवून घेतात, तसे 'आत्मा करावनहार आहे' या स्वरूपाची स्मृती राहिली तर सर्व कर्मेंद्रिये ऑर्डरमध्ये राहतील. मायेच्या ऑर्डरमध्ये राहणार नाहीत, तुमच्या ऑर्डरमध्ये राहतील. नाहीतर माया बघते की करावनहार आत्मा निष्काळजी झाली आहे तर माया ऑर्डर करू लागते. कधी संकल्प शक्ती, कधी मुखाची शक्ती मायेच्या

ऑर्डरप्रमाणे चालू लागते म्हणून सदैव प्रत्येक कर्मेंद्रियाला आपल्या ऑर्डर प्रमाणे चालवा. असे म्हणणार नाही - 'करायचे तर नव्हते, परंतु झाले'. जे करू इच्छिता तेच होईल. आत्तापासून राज्य अधिकारी बनण्याचे संस्कार भराल तेव्हाच तिथे देखील राज्य चालवाल. स्वराज्य अधिकारीच्या सीटवरून कधीही खाली येऊ नका. जर कर्मेंद्रिये ऑर्डरमध्ये राहिली तर प्रत्येक शक्ती देखील तुमच्या ऑर्डरमध्ये राहील. ज्या शक्तीची ज्यावेळी आवश्यकता आहे त्यावेळी ती शक्ती 'जी हाजिर' म्हणत उपस्थित व्हावी. असे नाही, काम पूर्ण झाले आणि तुम्ही ऑर्डर करा सहनशक्ती ये; काम पूर्ण झाल्यावर येईल. प्रत्येक शक्ती तुमच्या आदेशानुसार उपस्थित होईल कारण ही प्रत्येक शक्ती ईश्वरीय देणगी आहे. तर ईश्वरीय देणगी तुमची वस्तू झाली. तर आपल्या वस्तूला कसेही युज करा, कधीही युज करा, तर अशाप्रकारे या सर्व शक्ती तुमच्या ऑर्डरप्रमाणे राहतील, सर्व कर्मेंद्रिये तुमच्या ऑर्डरनुसार राहतील, यालाच म्हटले जाते - स्वराज्य अधिकारी, मास्टर सर्वशक्तिवान. पांडव असे आहेत का? मास्टर सर्वशक्तिवान देखील आहेत आणि स्वराज्य अधिकारी देखील आहेत. असे म्हणू नका की तोंडातून निघून गेले, कोणी ऑर्डर दिली जे निघून गेले! बघायची इच्छा नव्हती, परंतु बघितले. करायची इच्छा नव्हती, परंतु केले. हे कोणाच्या ऑर्डरनुसार होते? याला 'अधिकारी' म्हणणार की 'अधीन' म्हणणार? तर अधिकारी बना, अधीन नाही. अच्छा.

बापदादा म्हणतात - जसे आत्ता मधुबनमध्ये तुम्ही सर्वजण खूप आनंदी आहात, तसेच सदैव खुश-आबाद (आनंदी आणि समाधानी) रहा. रुहे गुलाब (सुगंधी गुलाब) आहात. बघा, चोहो बाजूला बघा सर्व सुगंधी गुलाब, फुललेले गुलाब आहेत. कोमेजलेले नाहीत, फुललेले गुलाब आहेत. तर सदैव असेच आनंदी आणि प्रसन्न चेहऱ्याने रहा. जर कोणी तुमच्या चेहऱ्याकडे पाहिले तर त्यांनी तुम्हाला विचारावे की, 'तुम्हाला असे काय मिळाले आहे, खूप खुश आहात!' प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून बाबांचा परिचय मिळावा. जशी चित्रे परिचय देतात तसे तुमच्या चेहऱ्याने बाबांचा परिचय द्यावा की, 'बाबा मिळाले आहेत'. अच्छा.

सगळे ठीक आहात? विदेशवाले देखील पोहोचले आहेत. चांगले वाटते ना इथे? (मोहिनी बहेन, न्यूयॉर्क) चला, हादरवून टाकणाऱ्या गोष्टी ऐकण्यापासून तरी वाचलात. चांगले केलेत, सर्व एकत्र पोहोचले आहात, खूप चांगले केलेत. अच्छा - डबल फॉरेनर्स, डबल नशा आहे ना! म्हणा - 'इतका नशा आहे की मन म्हणते - असे जर कोणी आहेत तर ते आम्ही डबल विदेशी आहोत'. डबल नशा आहे, स्वराज्य अधिकारी सो विश्व अधिकारी. डबल नशा आहे ना! बापदादांना देखील चांगले वाटते. जर कोणत्याही ग्रुपमध्ये डबल विदेशी नसले तर चांगले वाटत नाही. साऱ्या विश्वाचे पिता आहेत ना तर विश्वातील सर्व पाहिजेत ना! सर्व पाहिजेत. माता नसतील तरी देखील रौनक (शोभा) नाही. पांडव नसले तरी देखील शोभा कमी होते. बघा ज्या सेंटरवर कोणी पांडव नसतील फक्त माता असतील तर चांगले वाटेल! आणि फक्त पांडव असतील, शक्ती नसतील, तरी देखील सेवा केंद्र सजलेले वाटत नाही. दोन्ही पाहिजेत. मुले देखील पाहिजेत. मुले म्हणतात, आमचे नाव का नाही घेतले. मुलांची देखील शोभा आहे.

अच्छा, आत्ता एका सेकंदामध्ये निराकारी आत्मा बनून निराकार बाबांच्या आठवणीमध्ये लीन व्हा. (ड्रिल)

चोहो बाजूंचे सर्व स्वराज्य अधिकारी, सदैव साक्षीपणाच्या सीटवर सेट राहणारे अचल अडोल आत्मे, सदैव 'दाता'पणाच्या स्मृतीने सर्वांना ज्ञान, शक्ती, गुण देणाऱ्या दयाळू आत्म्यांना, सदैव आपल्या चेहऱ्याद्वारे बाबांचे चित्र दाखविणाऱ्या श्रेष्ठ आत्म्यांना, सदैव आनंदी आणि प्रसन्न राहणाऱ्या सुगंधी गुलाब असणाऱ्या, आत्मिक गुलाब असणाऱ्या मुलांना बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि नमस्ते.

दादींसोबत संवाद:- (सेवे सोबतच सर्वत्र १०८ तासांचे योगाचे प्रोग्राम देखील खूप चांगले चालू आहेत) या योग ज्वाळेमधूनच विनाश ज्वाळा फोर्समध्ये येईल. आता बघा प्रोग्राम बनवतात आणि मग विचारात पडतात. योगाद्वारे विकर्म विनाश होतील, पाप कर्माचे ओझे भस्म होईल, सेवेद्वारे पुण्याचे खाते जमा होईल. तर पुण्याचे खाते जमा करत आहात परंतु मागील ज्या काही संस्कारांचे ओझे आहे, ते योग ज्वाळेमुळे भस्म होईल. साधारण योगाने नाही. आत्ता काय आहे, योग तर लावता परंतु पाप भस्म होतील असे ज्वाळारूप नाही आहे म्हणून थोडा वेळ निघून जातो मग पुन्हा डोके वर काढतो; म्हणून रावणाला बघा, मारतात, जाळतात आणि मग हाडे देखील पाण्यामध्ये टाकतात. पूर्णतः भस्म व्हावा, मागील संस्कार, कमजोर संस्कार पूर्णपणे भस्म व्हावेत, परंतु भस्म

झालेले नाहीत. मरतात परंतु भस्म होत नाहीत, मेल्यानंतर पुन्हा जिवंत होतात. संस्कार परिवर्तनाने संसार परिवर्तन होणार. आत्ता संस्कारांची लीला चालू आहे. संस्कार मधून-मधून इमर्ज होतात. नामोनिशाणही नष्ट व्हावे, संस्कार परिवर्तन व्हावे - ही आहे विशेष अंडरलाईन करण्याची गोष्ट. संस्कार परिवर्तन नसल्याने व्यर्थ संकल्प देखील आहेत. व्यर्थ वेळ देखील आहे, व्यर्थ नुकसान देखील आहे. होणार तर आहेच. संस्कार मिलनाची महा-रास गायलेली आहे. आता रास होते, महारास झालेली नाही. (महारास का होत नाही आहे?) अंडरलाईन नाही आहे, दृढता नाही आहे. विभिन्न प्रकारचा निष्काळजीपणा आहे. अच्छा!

वरदानः- कर्मयोगी बनून प्रत्येक संकल्प, बोल आणि कर्म श्रेष्ठ बनविणारे निरंतर योगी भव

कर्मयोगी आत्म्याचे प्रत्येक कर्म योगयुक्त, युक्तियुक्त असेल. जर कोणतेही कर्म युक्तियुक्त होत नसेल तर समजा योगयुक्त नाही आहे. जर साधारण अथवा व्यर्थ कर्म होत असेल तर निरंतर योगी म्हटले जाणार नाही. कर्मयोगी अर्थात प्रत्येक सेकंद, प्रत्येक संकल्प, प्रत्येक बोल सदैव श्रेष्ठ असावेत. श्रेष्ठ कर्माची निशाणी आहे - स्वतः देखील संतुष्ट आणि दुसरेही संतुष्ट. अशी आत्माच निरंतर योगी बनते.

सुविचारः- स्वयं प्रिय, लोक प्रिय आणि प्रभू प्रिय आत्माच वरदानी मूर्त आहे.

||| ओम शांती |||

09.12.2024 प्रभात:मुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - विनाशा पूर्वी सर्वांना बाबांचा परिचय द्यायचा आहे, धारणा करून मग इतरांनाही समजावून सांगा तेव्हाच उच्च पद मिळू शकेल"

प्रश्न:- राजयोगी विद्यार्थ्यांना बाबांचे कोते डायरेक्शन आहे?

उत्तर:- तुम्हाला डायरेक्शन आहे की एका बाबांचे बनून मग इतरांवर मन जडवायचे नाही. प्रतिज्ञा करून मग पुन्हा पतित बनायचे नाही. तुम्ही असे संपूर्ण पावन बना जेणेकरून बाबांची आणि टीचरची आठवण स्वतः निरंतर राहील. एका बाबांवरच प्रेम करा, त्यांचीच आठवण करा तर तुम्हाला खूप ताकद मिळत राहील.

ओम् शांती. रूहानी बाबा बसून समजावून सांगतात. समजावून तेव्हा सांगतात जेव्हा हे शरीर आहे. सन्मुखच समजावून सांगायचे असते. जे सन्मुख सांगितले जाते ते मग लिखित स्वरूपामध्ये सर्वांकडे जाते. तुम्ही इथे येता सन्मुख ऐकण्यासाठी. बेहदचे बाबा आत्म्यांना ऐकवतात. आत्माच ऐकते. सर्व काही आत्माच या शरीराद्वारे करते त्यामुळे सर्वप्रथम स्वतःला आत्मा जरूर समजायचे आहे. गायन आहे 'आत्मायें-परमात्मा अलग रहे बहुकाल'... सर्वात आधी बाबांपासून वेगळे होऊन इथे पार्ट बजावण्यासाठी कोण येतात? तुम्हाला विचारतील किती काळ तुम्ही बाबांपासून वेगळे राहिले आहात? तर तुम्ही म्हणाल ५ हजार वर्षे. पूर्ण हिशोब आहे ना. हे तर तुम्हा मुलांना माहित आहे कसे नंबरवार येतात. बाबा जे वर होते ते देखील आता खाली आले आहेत - तुम्हा सर्वांची बॅटरी चार्ज करण्यासाठी. आता बाबांची आठवण करायची आहे. आता तर बाबा सन्मुख आहेत ना. भक्तिमार्गामध्ये तर बाबांच्या ऑक्युपेशन विषयी (जीवन चरित्रा विषयी) माहितीच नाही आहे. नाव, रूप, देश, काळाला जाणतच नाहीत. तुम्हाला तर नाव, रूप, देश, काळाबद्दल सर्व माहित आहे. जाणता या रथाद्वारे बाबा आम्हाला सर्व रहस्ये समजावून सांगतात. रचता आणि रचनेच्या आदि, मध्य, अंताचे रहस्य सांगितले आहे. हे किती सूक्ष्म आहे. या मनुष्य सृष्टी रुपी झाडाचे बीज रूप बाबाच आहेत. ते इथे येतात जरूर. नवी दुनिया स्थापन करणे त्यांचेच काम आहे. असे नाही की तिथे बसून स्थापना करतात. तुम्ही मुले जाणता - बाबा या तनाद्वारे आम्हाला सन्मुख समजावून सांगत आहेत. हे देखील बाबांचे प्रेम करणे झाले ना. इतर कोणालाही त्यांच्या बायोग्राफी बद्दल माहित नाही आहे. गीता आहे आदि सनातन देवी-देवता धर्माचे शास्त्र. हे देखील तुम्ही जाणता - या ज्ञानानंतर आहे विनाश. विनाश जरूर होणार आहे. इतर जे काही धर्मस्थापक येतात, त्यांच्या येण्याने विनाश होत नाही. विनाशाचा काळच हा आहे, म्हणून तुम्हाला जे ज्ञान मिळते ते मग नष्ट होते. तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये या सर्व गोष्टी आहेत. तुम्ही रचता आणि रचनेला जाणले आहे. आहेत दोन्ही अनादि जे चालत येतात. बाबांचा पार्टच आहे संगमावर येण्याचा. भक्ती अर्धा कल्प चालते, ज्ञान चालत नाही. ज्ञानाचा वारसा अर्ध्या कल्पासाठी मिळतो. ज्ञान तर एकदाच फक्त संगमावर मिळते. हा क्लास तुमचा एकदाच चालतो. या गोष्टी व्यवस्थित समजून घेऊन मग इतरांना समजावून सांगायच्या देखील आहेत. पदाचा सारा आधार आहे सर्विस करण्यावर. तुम्ही जाणता पुरुषार्थ करून आता नव्या दुनियेमध्ये जायचे आहे. धारणा करणे आणि दुसऱ्यांना समजावून सांगणे - यावरच तुमचे पद आहे. विनाश होण्याच्या आधी सर्वांना बाबांचा परिचय द्यायचा आणि रचनेच्या आदि, मध्य, अंताचा परिचय द्यायचा आहे. तुम्ही देखील बाबांची आठवण करता की जन्म-जन्मांतरीची पापे नष्ट व्हावी. जोपर्यंत बाबा शिकवत आहेत तोपर्यंत आठवण जरूर करायची आहे. शिकवणाऱ्या सोबत योग तर राहील ना. शिक्षक शिकवतात तर त्यांच्यासोबत योग असतो. 'योग' असल्याशिवाय शिकणार कसे? 'योग' अर्थात शिकविणाऱ्याची आठवण. हे बाबा देखील आहेत, टीचर देखील आहेत, सद्गुरु देखील आहेत. तीनही स्वरूपामध्ये पूर्ण आठवण करावी लागते. हे सद्गुरु तुम्हाला एकदाच मिळतात. ज्ञानाने सद्गती मिळाली, बस्स मग गुरुची प्रथाच संपुष्टात येते. पिता, टीचरची प्रथा चालू राहते, गुरुची प्रथा संपुष्टात येते. सद्गती मिळाली ना. निर्वाणधामामध्ये तुम्ही प्रॅक्टिकलमध्ये जाता मग आपल्या वेळेवर पार्ट बजावण्यासाठी याल. मुक्ती-जीवनमुक्ती दोन्ही तुम्हाला मिळते. मुक्ती देखील जरूर मिळते. थोड्या वेळासाठी घरी जाऊन रहाल. इथे तर शरीराद्वारे पार्ट बजावावा लागतो. मागाहून सर्व पार्टधारी येतील. नाटक जेव्हा पूर्ण होते तेव्हा सर्व ॲक्टर्स स्टेजवर येतात. आत्ता देखील सर्व ॲक्टर्स

स्टेजवर येऊन एकत्रित झाले आहे. किती घनघोर युद्ध आहे. सतयुग इत्यादी मध्ये इतके भयंकर युद्ध नव्हते. आता तर किती अशांती आहे. तर आता जसे बाबांना सृष्टी चक्राचे नॉलेज आहे तसे मुलांना देखील नॉलेज आहे. बीजाला नॉलेज आहे ना - आपले झाड कसे वृद्धिंगत होऊन मग नष्ट होते. आता तुम्ही बसले आहात नव्या दुनियेचे कलम लावण्याकरिता अथवा आदि सनातन देवी-देवता धर्माचे कलम लावण्याकरिता. तुम्हाला माहित आहे या लक्ष्मी-नारायणाने राज्य कसे मिळवले? तुम्ही जाणता आपण आता नव्या दुनियेचे राजकुमार बनणार. त्या दुनियेमध्ये राहणारे सर्व आपल्याला मालकच म्हणतील ना. जसे आत्ता देखील सर्वजण म्हणतात भारत आमचा देश आहे. तुम्ही समजता आता आम्ही संगमावर उभे आहोत, शिवालयात जाणार आहोत. बस्स, आता गेलो की गेलो. आम्ही जाऊन शिवालयाचे मालक बनणार. तुमचे एम ऑब्जेक्टच हे आहे. यथा राजा राणी तथा प्रजा, सर्व शिवालयाचे मालक बनतात. बाकी राजधानीमध्ये पदे तर विविध असतातच तिथे मंत्री तर कोणी असतही नाही. मंत्री तेव्हा असतात जेव्हा पतित बनतात. लक्ष्मी-नारायण अथवा राम-सीता यांचे मंत्री असे ऐकलेही नसेल कारण ते स्वतः सतोप्रधान पावन बुद्धीवाले आहेत. मग जेव्हा पतित बनतात तेव्हा राजा-राणी एक मंत्री ठेवतात सल्ला घेण्याकरिता. आता तर बघा कितीतरी मंत्री आहेत.

तुम्ही मुले जाणता हा अतिशय मजेशीर खेळ आहे. खेळ नेहमी मजेदारच असतो. सुख देखील असते, दुःख देखील असते. या बेहदच्या खेळाला तुम्ही मुलेच जाणता. यामध्ये हाय-हाय करून रडणे इत्यादीचा तर प्रश्नच नाही. गातात देखील - 'बीती सो बीती देखो...', 'बनी-बनाई बन रही'. हे नाटक तुमच्या बुद्धीमध्ये आहे. आम्ही यातील ॲक्टर्स आहोत. आमच्या ८४ जन्मांचा पार्ट ॲक्युरेट अविनाशी आहे. ज्यांनी ज्या जन्मामध्ये जी ॲक्ट करत आले आहेत तिच करत राहतील. आज पासून ५ हजार वर्षांपूर्वी देखील तुम्हाला हेच सांगितले होते की, 'स्वतःला आत्मा समजा'. गीतेमध्ये देखील हे शब्द आहेत. तुम्ही जाणता खरोखर आदि सनातन देवी-देवता धर्म जेव्हा स्थापन झाला होता तेव्हा बाबांनी सांगितले होते - 'देहाचे सर्व धर्म सोडून स्वतःला आत्मा समजा आणि बाबांची आठवण करा'. मनमनाभवचा अर्थ तर बाबांनी चांगल्या रीतीने समजावून सांगितला आहे. भाषा देखील हीच आहे. इथे बघा किती अनेक भाषा आहेत. भाषांवरून देखील किती वितंडवाद होतात. भाषेविना तर काम होऊ शकत नाही. अशा काही भाषा शिकून येतात जी मातृभाषाच नष्ट होते. जे जास्त भाषा शिकतात त्यांना बक्षीस मिळते. जितके धर्म, तितक्या भाषा असतील. तिथे तर तुम्ही जाणता आपलीच राजाई असेल. भाषा देखील एकच असेल. इथे तर शंभर मैलावर एक भाषा आहे. तिथे तर एकच भाषा असते. या सर्व गोष्टी बाबा बसून समजावून सांगतात तर त्या बाबांचीच आठवण करत रहा. शिवबाबा समजावतात ब्रह्मा द्वारे. रथ तर जरूर पाहिजे ना. शिवबाबा आमचे पिता आहेत. बाबा म्हणतात - 'माझी तर बेहदची मुले आहेत'. बाबा यांच्याद्वारे शिकवतात ना. टीचरची कधी गळाभेट थोडीच घेतात. बाबा तर तुम्हाला शिकविण्यासाठी आले आहेत. राजयोग शिकवतात तर टीचर झाले ना. तुम्ही विद्यार्थी आहात. विद्यार्थी कधी टीचरची गळाभेट घेतात का? एका बाबांचे बनून मग इतरांमध्ये मन गुंतवायचे नाही.

बाबा म्हणतात, मी तुम्हाला राजयोग शिकविण्यासाठी आलो आहे. तुम्ही शरीरधारी, मी अशरीरी वर राहणारा. म्हणता - बाबा, पावन बनविण्यासाठी या, म्हणजे तुम्ही पतित आहात ना. मग माझी गळाभेट कशी घेऊ शकता? प्रतिज्ञा करून मग पुन्हा पतित बनता. जेव्हा पूर्णतः पावन बनाल, तेव्हा मग आठवणीमध्ये देखील रहाल, टीचरची आणि गुरुची आठवण करत रहाल. आता तर छी-छी बनून (विकारी बनून) खाली पडतात, तर मग अजूनच १०० पटीने दंड भोगावा लागतो. हे (ब्रह्मा बाबा) तर मध्ये दलालाच्या रूपामध्ये भेटले आहेत, त्यांची (शिवबाबांची) आठवण करायची आहे. ब्रह्मा बाबा म्हणतात - 'मी देखील त्यांचा मुरब्बी बच्चा (अतिप्रिय मुलगा) आहे. मग मी कुठे गळाभेट घेऊ शकतो! तुम्ही तरीदेखील या शरीराद्वारे भेटता तरी. मी त्यांची गळाभेट कशी घेऊ?' बाबा तर म्हणतात - 'मुलांनो, तुम्ही एका बाबांचीच आठवण करा, प्रेम करा. आठवणीने शक्ती खूप मिळते'. बाबा सर्व शक्तिमान आहेत. बाबांकडूनच तुम्हाला इतकी शक्ती मिळते. तुम्ही किती शक्तिशाली बनता. तुमच्या राजधानीवर कोणीही विजय मिळवू शकत नाही. रावण राज्यच नष्ट होते. दुःख देणारा कोणी राहतच नाही. त्याला सुखधाम म्हटले जाते. रावण साऱ्या विश्वामध्ये सर्वांना दुःख देणारा आहे. पशु देखील दुःखी होतात. तिथे तर पशु-प्राणी देखील आपसात प्रेमाने राहतात. इथे तर प्रेमच नाहीये.

तुम्ही मुले जाणता हा ड्रामा कसा फिरतो. याच्या आदि-मध्य-अंताचे रहस्य बाबाच समजावून सांगतात. कोणी

उत्तम रित्या शिकतात, कोणी कमी शिकतात. शिकतात तर सर्वच ना. संपूर्ण दुनिया सुद्धा शिकेल अर्थात बाबांची आठवण करेल. बाबांची आठवण करणे - हा देखील एक अभ्यासच आहे ना. त्या पित्याची सर्वजण आठवण करतात. ते सर्वांचे सद्गती दाता, सर्वांना सुख देणारे आहेत. म्हणतात देखील - येऊन पावन बनवा तर जरूर पतित आहेत. ते तर येतातच मुळी विकारींना निर्विकारी बनविण्याकरिता. बोलावतात देखील की, हे अल्लाह, येऊन आम्हाला पावन बनवा. त्यांचा हाच धंदा आहे, म्हणून बोलावतात.

तुमची भाषा देखील अचूक असली पाहिजे. ते लोक म्हणतात अल्लाह, ते म्हणतात गॉड. गॉड फादर देखील म्हणतात. मागाहून येणाऱ्यांची बुद्धी तरीही चांगली असते. इतके दुःख भोगत नाहीत. तर आता तुम्ही सन्मुख बसले आहात, काय करत आहात? बाबांना या भृकुटीमध्ये बघता. बाबा मग तुमच्या भृकुटीमध्ये बघतात. ज्यांच्यामध्ये मी प्रवेश करतो, त्यांना पाहू शकतो का? ते तर बाजूला बसले आहेत, ही नीट समजून घेण्याची गोष्ट आहे. मी आमच्या बाजूला बसलेलो आहे. हे देखील समजतात, माझ्या बाजूला बसले आहेत. तुम्ही म्हणाल आम्ही समोर दोघांना बघतो. बाबा आणि दादा दोन्ही आत्म्यांना बघता. तुमच्यामध्ये ज्ञान आहे - बापदादा कोणाला म्हणतात? आत्मा समोर बसली आहे. भक्तिमार्गामध्ये तर डोळे बंद करून बसतात आणि ऐकतात. शिक्षण कधी असे थोडेच असते. टीचरकडे बघावे तर लागेल ना. हे तर पिता देखील आहेत, टीचर देखील आहेत तर समोर बघायचे असते. समोर बसले आहात आणि डोळे बंद असतील, डुलक्या काढत रहाल, तर अशाप्रकारे काही शिक्षण घेतले जात नाही. विद्यार्थी टीचरला जरूर बघत राहील. नाहीतर टीचर म्हणतील हे तर डुलक्या काढत राहतात. हे भांग पिऊन आले आहेत काय? तुमच्या बुद्धीमध्ये आहे बाबा या तनामध्ये आहेत. मी बाबांना पाहतो. बाबा म्हणतात हा क्लास काही साधारण क्लास नाही आहे - जिथे कोणी डोळे बंद करून बसेल. शाळेमध्ये कधी डोळे बंद करून बसतात का? बाकीच्या सत्संगांना शाळा म्हटले जात नाही. भले बसून गीता ऐकवतात परंतु त्याला शाळा म्हटले जात नाही. ते काही पिता थोडेच आहेत ज्यांना तुम्ही बघाल. काही-काही शिवाचे भक्त असतात तर ते शिवाचीच आठवण करत असतात आणि कानाने कथा ऐकत राहतात. शिवाची भक्ती करणाऱ्यांना शिवाचीच आठवण करावी लागेल. कोणत्याही सत्संगामध्ये प्रश्नोत्तरे इत्यादी काही असत नाही. इथे अशी प्रश्नोत्तरे केली जातात. इथे तुमची कमाई पुष्कळ आहे. कमाई करताना कधी जांभई येऊ शकत नाही. धन मिळते ना तर आनंद होतो. जांभई हे दुःखाचे चिन्ह आहे. आजारी असेल किंवा दिवाळे निघाले असेल तर जांभई येत राहील. पैसे मिळत राहतील तर कधी जांभई येणार नाही. बाबा व्यापारी देखील आहेत. रात्रीच्या आगबोटी येत असत तर रात्री जागावे लागत असे. कधी कोणी मुस्लिम राजकुमारी अथवा बादशहाची पत्नी रात्रीची आली तर फक्त महिलांसाठी दुकाने उघडी ठेवतात. बाबा देखील म्हणतात - प्रदर्शनी इत्यादीमध्ये महिलांकरिता एखादा विशिष्ट दिवस ठेवा तर खूपजण येतील. पर्देनशीन (बुरख्यात राहणाऱ्या) देखील येतील. सुना पदराच्या बुरख्यात असतात. गाडीला देखील पडदा असतो. इथे तर आत्म्याची गोष्ट आहे. ज्ञान मिळाले तर पडदा सुद्धा उघडेल. सतयुगामध्ये पडदा इत्यादी असत नाही. हे तर प्रवृत्ती मार्गाचे ज्ञान आहे ना. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) हा खेळ खूप मजेशीर बनलेला आहे, यामध्ये सुख आणि दुःखाचा पार्ट नोंदलेलाच आहे त्यामुळे हाय-हाय करून रडण्याची गरज नाही. बुद्धीमध्ये रहावे बनी-बनाई बन रही, होऊन गेलेल्याचे चिंतन करायचे नाही.
2. २) हा कॉमन क्लास नाही आहे, इथे डोळे बंद करून बसायचे नाही. समोर टीचरला बघायचे आहे. जांभया काढायच्या नाहीत. जांभई हे दुःखाचे लक्षण आहे.

वरदान:- संतुष्टतेची तीन सर्टिफिकेट घेऊन आपल्या योगी जीवनाचा प्रभाव टाकणारे सहज योगी भव

संतुष्टता योगी जीवनाचे विशेष लक्ष्य आहे, जे कायम संतुष्ट राहतात आणि सर्वांना संतुष्ट करतात त्यांच्या योगी जीवनाचा प्रभाव दुसऱ्यांवर आपोआप पडतो. जसे सायन्सच्या साधनांचा वायुमंडळावर प्रभाव पडतो, तसे सहजयोगी जीवनाचा देखील प्रभाव असतो. योगी जीवनाची तीन सर्टिफिकेट आहेत एक - स्वतःवर संतुष्ट, दुसरे - बाबा संतुष्ट आणि तिसरे - लौकिक, अलौकिक परिवार संतुष्ट.

बोधवाक्यः- स्वराज्याचा तिलक, विश्व कल्याणाचा ताज आणि स्थितीच्या तख्तावर विराजमान राहणारेच राजयोगी आहेत.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - तुमच्यासाठी ही गाण्याची टेप संजीवनी बुटी आहे, ही गाणी वाजविल्याने उदासीनता निघून जाईल"

प्रश्न:- अवस्था बिघडण्याचे कारण काय आहे? कोणत्या युक्तीने अवस्था खूप चांगली राहू शकते?

उत्तर:- १. ज्ञानाचा डान्स करत नाहीत, झरमुई झगमुईमध्ये (व्यर्थ गोष्टींमध्ये) आपला वेळ वाया घालवतात म्हणून अवस्था बिघडते. २. दुसऱ्यांना दुःख दिले तरी देखील त्याचा प्रभाव अवस्थेवर येतो. अवस्था चांगली तेव्हा राहील जेव्हा गोड होऊन चालाल. आठवणीवर पूर्ण अटेंशन असेल. रात्री झोपण्यापूर्वी कमीत-कमी अर्धा तास आठवणीमध्ये बसा मग सकाळी उठून आठवण कराल तर अवस्था चांगली राहील .

गीत:- कौन आया मेरे मन के द्वारे...

ओम् शांती. या गाण्यांच्या टेप देखील बाबांनी मुलांसाठी बनविल्या आहेत. याचा अर्थ देखील मुलां व्यतिरिक्त कोणी जाणू शकत नाही. बाबांनी अनेकदा समजावून सांगितले आहे की, अशा चांगल्या-चांगल्या गाण्यांच्या टेप घरी असल्या पाहिजेत म्हणजे मग कधी उदासवाणे वाटते तेव्हा या गाण्याची टेप लावल्याने लगेच बुद्धीमध्ये अर्थ येईल आणि उदासी निघून जाईल. या गाण्यांच्या टेप देखील संजीवनी बुटी आहेत. बाबा डायरेक्शन तर देतात परंतु कोणी अमलात आणेल तेव्हा ना. आता या गाण्यामध्ये हे कोण म्हणत आहे की, 'हमारे तुम्हारे सबके दिल में कौन आया है!' जे येऊन ज्ञान डान्स करतात. म्हणतात - गोपिका कृष्णाला नृत्य करायला लावत होत्या, असे तर काहीच नाही. आता बाबा म्हणतात - 'माझ्या शाळीग्राम मुलांनो', सर्वांनाच म्हणतात ना. शाळा अर्थात शाळा, जिथे शिकवले जाते, हे देखील स्कूल आहे. तुम्ही मुले जाणता आपल्या हृदयामध्ये कोणाची आठवण येते! दुसऱ्या कोणत्याही मनुष्यमात्राच्या बुद्धीमध्ये या गोष्टी नसतात. ही एकच वेळ आहे जेव्हा की तुम्हा मुलांना त्यांची आठवण येते बाकी कोणीही त्यांची आठवण करत नाहीत. बाबा म्हणतात तुम्ही रोज माझी आठवण करा तर खूप चांगली धारणा होईल. मी जसे डायरेक्शन देतो तशी तुम्ही आठवण करत नाही. माया तुम्हाला आठवण करू देत नाही. तुम्ही माझ्या मतानुसार फार कमी चालता आणि बरेचसे मायेच्या मतानुसार चालता. अनेकदा सांगितले आहे - रात्रीचे जेव्हा झोपता तर अर्धा तास बाबांच्या आठवणीमध्ये बसले पाहिजे. भले पती-पत्नी आहेत, एकत्र बसा नाहीतर वेग-वेगळे बसा. बुद्धीमध्ये एका बाबांची आठवण असावी. परंतु कोणी विरळेच आठवण करतात. माया विसरायला लावते. आदेशानुसार चालला नाहीत तर पद कसे प्राप्त करू शकाल. बाबांची खूप आठवण करायची आहे. शिवबाबा तुम्हीच आत्म्यांचे पिता आहात. सर्वांना तुमच्याकडूनच वारसा मिळणार आहे. जे पुरुषार्थ करत नाहीत त्यांना देखील वारसा मिळेल, ब्रह्मांडाचे मालक तर सर्व बनतील. सर्व आत्मे ड्रामा अनुसार निर्वाण धाममध्ये येतील. भले काहीही जरी केले नाही तरीही. अर्धा कल्प भले भक्ती करतात परंतु जोपर्यंत मी गाईड बनून येत नाही तोपर्यंत परत कोणीही जाऊ शकत नाही. कोणी रस्ताच पाहिलेला नाही आहे. जर पाहिला असेल तर त्यांच्या मागे सर्व मच्छरांप्रमाणे जातील. मूलवतन काय आहे - हे देखील कोणीही जाणत नाही. तुम्ही जाणता हा पूर्व नियोजित ड्रामा आहे. यालाच रिपीट करायचे आहे. आता दिवसाचे तर कर्मयोगी बनून धंद्यामध्ये लागायचे आहे. जेवण बनविणे इत्यादी सर्व कर्म करायची आहेत, वास्तविक कर्म संन्यास म्हणणे देखील चुकीचे आहे. कर्मा शिवाय तर कोणी राहू शकत नाही. 'कर्म संन्याशी' असे चुकीचे नाव ठेवले आहे. तर दिवसाचे भले धंदा इत्यादी करा, रात्रीला आणि पहाटेला चांगल्या रीतीने बाबांची आठवण करा. ज्याला आता आपले बनवले आहे त्याची आठवण कराल तर मदत देखील मिळेल, नाहीतर मिळणार नाही. श्रीमंतांना तर बाबांचे बनण्यामध्ये हृदय विदीर्ण होते; तर मग पद सुद्धा मिळणार नाही. ही आठवण करणे तर अतिशय सोपे आहे. ते आपले पिता, टीचर, गुरु आहेत. आपल्याला संपूर्ण रहस्य सांगितले आहे - हा जगाचा इतिहास-भूगोल कसा रिपीट होतो. बाबांची आठवण करायची आहे आणि मग स्वदर्शन चक्र फिरवायचे आहे. सर्वांना परत घेऊन जाणारे तर बाबाच आहेत. अशा विचारांमध्ये राहिले पाहिजे. रात्रीचे झोपताना देखील हे नॉलेज डोक्यात फिरत राहिले पाहिजे. सकाळी उठल्यानंतर देखील हेच नॉलेज आठवत रहावे. आपण ब्राह्मण सो देवता मग क्षत्रिय, वैश्य, शूद्र बनणार. नंतर मग बाबा येतील आणि आपण शूद्रा पासून ब्राह्मण बनणार. बाबा त्रिमूर्ती, त्रिकालदर्शी, त्रिनेत्री देखील आहेत.

आमची बुद्धी उघडतात. ज्ञानाचा तिसरा नेत्र देखील मिळतो. असा पिता तर कोणी असूही शकत नाही. बाबा रचना रचतात तर माता देखील झाले. जगत अंबेला निमित्त बनवतात. बाबा या शरीरामध्ये येऊन ब्रह्मा रूपामध्ये खेळतात-बागडतात देखील. फिरायला देखील जातात. आपण बाबांची आठवण तर करतो ना! तुम्ही जाणता यांच्या रथामध्ये येतात. तुम्ही म्हणाल - आमच्या सोबत बापदादा खेळतात. खेळत असताना देखील बाबा (ब्रह्मा बाबा) आठवण करण्याचा पुरुषार्थ करतात. बाबा म्हणतात - मी यांच्याद्वारे खेळत आहे. चैतन्य तर आहे ना. तर असे विचार ठेवले पाहिजेत. अशा बाबांवर अर्पितही व्हायचे आहे. भक्तिमार्गामध्ये तुम्ही गात आले आहात - 'वारी जाऊ...' आता बाबा म्हणतात - 'मला हा एक जन्म तुमचा वारसदार बनवा तर मी २१ जन्मांसाठी राज्यभाग्य देईन'. आता हा आदेश दिला तर त्या डायरेक्शन प्रमाणे चालायचे आहे. ते देखील जसे पाहतील तसे डायरेक्शन देतील. डायरेक्शन प्रमाणे चालल्याने मोह नष्ट होईल, परंतु घाबरतात. बाबा म्हणतात - तुम्ही स्वतःला अर्पित करत नाही तर मी वारसा कसा देणार. तुमचे पैसे कोणी घेऊन थोडेच जातात. म्हणतील, ठीक आहे तुमचे पैसे आहेत, लिटरेचरमध्ये लावा. ट्रस्टी आहेत ना. बाबा मत देत राहतील. बाबांचे सर्व काही मुलांकरिता आहे. मुलांकडून काही घेत नाहीत. युक्तीने समजावून सांगतात फक्त मोह नष्ट व्हावा. मोह देखील अतिशय कट्टर आहे. (माकडाचे उदाहरण आहे) बाबा म्हणतात तुम्ही माकडासारखा त्यांच्यामध्ये मोह का ठेवता. मग घरोघरी मंदिरे कशी बनतील. मी तुम्हाला मर्कटासारख्या वृत्तीपासून सोडवून मंदिर लायक बनवतो. तुम्ही या कचरापट्टीमध्ये मोह का ठेवता. बाबा केवळ मत देतील - कसे सांभाळायचे ते. तरी देखील बुद्धीमध्ये येत नाही. हे संपूर्ण बुद्धीचे काम आहे.

अमृतवेलेला बाबांशी कसे बोलायचे त्यासाठी देखील बाबा सल्ला देतात. बाबा, तुम्ही बेहदचे पिता, टीचर आहात. तुम्हीच बेहदच्या दुनियेचा इतिहास-भूगोल सांगू शकता. लक्ष्मी-नारायणाच्या ८४ जन्मांची कहाणी दुनियेमध्ये कोणीही जाणत नाहीत. जगत अंबेला माता-माता असे देखील म्हणतात. ती कोण आहे? सतयुगामध्ये तर असू शकत नाही. तिथले महाराणी-महाराजा तर लक्ष्मी-नारायण आहेत. त्यांना आपली संतान आहे जी तख्तावर बसेल. आपण त्यांची मुले कशी काय बनणार जी तख्तावर बसू. आता आपण जाणतो ही जगदंबा ब्राह्मणी आहे, ब्रह्माची मुलगी सरस्वती. मनुष्य थोडेच हे रहस्य जाणतात. रात्रीचे बाबांच्या आठवणीमध्ये बसण्याचा नियम ठेवा तर खूप चांगले आहे. नियम बनवाल तर तुमचा आनंदाचा पारा चढलेला राहील; म्हणजे मग जास्त कोणता त्रास होणार नाही. म्हणतील एका बाबांची मुले आपण भाऊ-बहीणी आहोत. मग वाईट दृष्टी ठेवणे म्हणजे क्रिमिनल एसाल्ट (विकारांचे आक्रमण) ठरेल. नशा देखील सतो, रजो, तमोगुणी असतो ना. तमोगुणी नशा चढला तर मरून जाल. हा तर नियम बनवा - थोडातरी वेळ बाबांची आठवण करून बाबांच्या सेवेवर जा. म्हणजे मग मायेची वादळे येणार नाहीत. तो नशा दिवसभर राहील आणि अवस्था देखील खूप रिफाईन (चांगली) राहील. योगामध्ये देखील लाईन क्लिअर होईल. अशा प्रकारची गाणी देखील खूप चांगली आहेत, गाणी ऐकत रहाल तर नाचणे सुरू कराल, रिफ्रेश व्हाल. दोन, चार, पाच गाणी खूप चांगली आहेत. गरीब देखील बाबांच्या या सेवेमध्ये लागतील तर त्यांना महाल मिळू शकतात. शिवबाबांच्या भंडाऱ्यातून सर्व काही मिळते. सेवाभावी असणाऱ्याला बाबा का नाही देणार. शिवबाबांच्या भंडाऱ्यातून सर्व काही मिळू शकते. सेवायोग्य असणाऱ्यांना बाबा का नाही देणार. शिवबाबांचा भंडारा भरपूरच आहे.

(गीत) हा आहे ज्ञान डान्स. बाबा येऊन गोप-गोपिकांना ज्ञान डान्स करायला लावतात. कुठेही बसा परंतु बाबांची आठवण करत रहा तर अवस्था खूप चांगली राहील. ज्याप्रमाणे बाबा ज्ञान आणि योगाच्या नशेमध्ये राहतात तुम्हा मुलांना देखील शिकवतात. तर तो आनंदाचा नशा राहील. नाही तर झरमुई-झगमुईमध्ये (व्यर्थ गोष्टींमध्ये) राहिल्याने मग अवस्थाच बिघडून जाते. पहाटे उठणे तर खूप चांगले आहे. बाबांच्या आठवणीमध्ये बसून बाबांशी गोड-गोड गोष्टी करायला हव्या. भाषण करणाऱ्यांना तर विचार सागर मंथन करावे लागेल. आज या-या पॉईंट्सवर समजावून सांगायचे, असे समजावून सांगायचे. बाबांना बरीच मुले विचारतात - 'आम्ही नोकरी सोडावी का?' परंतु बाबा म्हणतात पहिले सेवेचा पुरावा तर द्या. बाबांनी आठवणीची युक्ती खूप चांगली सांगितली आहे. परंतु कोटींमधून कोणीच निघतील ज्यांना अशी सवय लागेल. कोणाला मुश्किलीने आठवण राहते. तुम्हा कुमारींचे नाव तर प्रसिद्ध आहे. सर्वजण कुमारीच्या पाया पडतात. तुम्ही २१ जन्मांकरिता भारताला स्वराज्य मिळवून देता. तुमचे यादगार (स्मृती रूपातील) मंदिर देखील आहे. ब्रह्माकुमार-कुमारींचे नाव देखील प्रसिद्ध झालेले आहे ना. कुमारी ती जी २१ कुळाचा उद्धार करेल. तर त्याचा अर्थ देखील समजून घ्यावा लागेल. तुम्ही मुले जाणता हे ५

हजार वर्षांचे रीळ आहे, जे काही होऊन गेले तो ड्रामा. चूक झाली ड्रामा. मग भविष्यासाठी आपले रजिस्टर ठीक केले पाहिजे. पुन्हा रजिस्टर खराब होऊ नये. भरपूर मेहनत आहे तेव्हा इतके उच्च पद मिळेल. बाबांचे बनलात तर मग बाबा वारसा सुद्धा देतील. सावत्र असणाऱ्याला थोडाच वारसा देतील. मदत देणे तर कर्तव्य आहे. जे समजूतदार आहेत ते प्रत्येक गोष्टीमध्ये मदत करतात. बाबा पहा किती मदत करतात. हिम्मते मर्दा मददे खुदा. मायेवर विजय प्राप्त करण्यासाठी देखील ताकद पाहिजे. एका रूहानी बाबांचीच आठवण करायची आहे, इतर संग सोडून एक संग जोडायचा आहे. बाबा आहेत ज्ञानाचे सागर. ते म्हणतात मी यांच्यामध्ये प्रवेश करतो, बोलतो. अजून तर कोणी असे म्हणू शकणार नाहीत की, 'मी पिता, टीचर, गुरु आहे. ब्रह्मा, विष्णू, शंकराला रचणारा आहे'. या गोष्टींना आता तुम्ही मुलेच समजू शकता. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) जुन्या कचरापट्टीमध्ये मोह ठेवायचा नाही, बाबांच्या डायरेक्शनवर चालून आपला मोह नष्ट करायचा आहे. ट्रस्टी बनून रहायचे आहे.
2. २) या अंतिम जन्मामध्ये भगवंताला आपला वारसदार बनवून त्यांच्यावर अर्पित व्हायचे आहे, तेव्हा २१ जन्मांचे राज्यभाग्य मिळेल. बाबांची आठवण करून सेवा करायची आहे, नशेमध्ये रहायचे आहे, रजिस्टर कधीही खराब होऊ नये याकडे लक्ष द्यायचे आहे.

वरदान:- प्रत्यक्ष फळाद्वारे अतिंद्रीय सुखाची अनुभूती करणारे नि:स्वार्थ सेवाधारी भव

सतयुगामध्ये कर्माचे फळ मिळेल परंतु इथे बाबांचे बनल्याने प्रत्यक्ष फळ वारशाच्या रूपामध्ये मिळते. सेवा केली आणि सेवा करण्यासोबतच खुशी मिळाली. जे आठवणीमध्ये राहून, नि:स्वार्थ भावाने सेवा करतात त्यांना सेवेचे प्रत्यक्ष फळ अवश्य मिळते. प्रत्यक्ष फळच ताजे फळ आहे जे एव्हरहेल्दी (निरोगी) बनवते. योगयुक्त, यथार्थ सेवेचे फळ आहे - खुशी, अतिंद्रिय सुख आणि डबल लाईटची अनुभूती.

बोधवाक्य:- विशेष आत्मा ती आहे जी आपल्या वागणुकीद्वारे रूहानी रॉयल्टीची झलक आणि फलकचा (आत्मिक संपन्नतेचे तेज आणि नशेचा) अनुभव करवेल.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - बाबांचे मदतगार बनून या आयरन एजड् (कलियुगी) पर्वताला गोल्डन एजड् (सतयुगी) बनवायचे आहे, पुरूषार्थ करून नव्या दुनियेसाठी फर्स्टक्लास सीट रिझर्व्ह करायची आहे"

प्रश्न:- बाबांचे कर्तव्य कोणते आहे? कोणते कर्तव्य पूर्ण करण्यासाठी संगमयुगामध्ये बाबांना यावे लागते?

उत्तर:- आजारी आणि दुःखी मुलांना सुखी बनविणे, मायेच्या सापळ्यातून सोडवून भरभरून सुख देणे - हे बाबांचे कर्तव्य आहे, जे संगमयुगामध्येच बाबा पूर्ण करतात. बाबा म्हणतात - मी आलो आहे तुम्हा सर्वांचे रोग नष्ट करण्यासाठी, सर्वांवर कृपा करण्यासाठी. आता पुरूषार्थ करून २१ जन्मांकरिता आपले भाग्य श्रेष्ठ बनवा.

गीत:- भोलेनाथ से निराला...

ओम् शांती. भोलानाथ शिव भगवानुवाच - ब्रह्मा मुखकमला द्वारे बाबा म्हणतात - 'हे व्हरायटी विविध धर्मांचे मनुष्य सृष्टीरुपी झाड आहे ना. या कल्पवृक्षाचे अथवा सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे रहस्य मुलांना समजावून सांगत आहे'. गीतेमध्ये देखील यांची महिमा आहे. शिवबाबांचा जन्म इथे आहे, बाबा म्हणतात - 'मी आलो आहे भारतामध्ये'. मनुष्य हे जाणत नाहीत की शिवबाबा केव्हा आले होते? कारण गीतेमध्ये श्रीकृष्णाचे नाव घातले आहे. द्वापरयुगाची तर गोष्टच नाही. बाबा समजावून सांगत आहेत - 'मुलांनो, ५ हजार वर्षांपूर्वी देखील मी येऊन हे ज्ञान दिले होते'. या झाडावरून सर्वांना माहित होते. झाड व्यवस्थितपणे बघा. सतयुगामध्ये बरोबर देवी-देवतांचे राज्य होते, त्रेतायुगामध्ये राम-सीतेचे आहे. बाबा आदि-मध्य-अंताचे रहस्य सांगतात. मुले विचारतात - 'आम्ही मायेच्या सापळ्यात केव्हा अडकलो?' बाबा म्हणतात - द्वापर पासून. नंतर मग नंबरवार दुसरे धर्म येतात. मग हिशोब केल्यावर समजू शकता की आपण पुन्हा या दुनियेमध्ये केव्हा येऊ. शिवबाबा म्हणतात - 'मी ५ हजार वर्षांनंतर संगमावर माझे कर्तव्य पूर्ण करण्यासाठी आलो आहे. सर्व जे काही मनुष्यमात्र आहेत, सगळे दुःखी आहेत, त्यातूनही विशेष भारतवासी दुःखी आहेत. ड्रामा अनुसार भारतालाच मी सुखी बनवितो'. वडिलांचे कर्तव्य असते मुले आजारी पडली तर त्यांना औषध-पाणी करणे. हा खूप मोठा आजार आहे. सर्व रोगांचे मूळ हे ५ विकार आहेत. मुले विचारतात हे केव्हापासून सुरू झाले? द्वापर पासून. रावणा बद्दल समजावून सांगायचे आहे. रावण काही दिसून येत नाही. बुद्धीद्वारे समजते. बाबांना देखील बुद्धीद्वारे जाणून घेतले जाते. आत्मा मन-बुद्धी सहित आहे. आत्मा जाणते की परमात्मा आपले पिता आहेत. सुख-दुःखा मध्ये, कर्माच्या प्रभावामध्ये आत्मा येते. जेव्हा शरीर असते तेव्हा आत्म्याला दुःख होते. असे म्हणत नाहीत की, 'मज परमात्म्याला दुःखी करू नका'. बाबा देखील समजावून सांगतात की, 'माझा देखील पार्ट आहे, कल्प-कल्प संगमावर येऊन मी पार्ट बजावतो. ज्या मुलांना मी सुखामध्ये पाठवले होते, ते दुःखी बनले आहेत त्यामुळे मग ड्रामा अनुसार मला यावे लागते'. बाकी कूर्मावतार-मत्स्यावतार अशा काही गोष्टी नाही आहेत. म्हणतात परशुरामाने परशूने क्षत्रियांचा वध केला. या सर्व आहेत दंतकथा. तर आता बाबा समजावून सांगत आहेत - 'माझी आठवण करा'.

हे आहेत जगत अंबा आणि जगत पिता. माता-पिता देश असे म्हणतात ना. भारतवासी आठवण देखील करतात - 'तुम्ही मात-पिता... तुम्हारी कृपा से सुख घनेरे' तर खरोखर ते सुख मिळत आहे; परंतु जे इतका पुरुषार्थ करतील. जसे चित्रपट बघायला जातात तर फर्स्ट क्लासचे रिझर्वेशन करतात ना. बाबा देखील म्हणतात पाहिजे तर सूर्यवंशीमध्ये, पाहिजे तर चंद्रवंशीमध्ये तिकीट रिझर्व्ह करा, जितका जे पुरुषार्थ करतील तितके चांगले पद मिळवू शकतात. तर सर्व रोग नष्ट करण्यासाठी बाबा आलेले आहेत. रावणाने सर्वांना खूप दुःख दिले आहे. कोणीही मनुष्य मनुष्याची सद्गती करू शकत नाही. हा तर आहेच कलियुगाचा शेवट. गुरू लोक शरीर सोडतात आणि पुन्हा इथेच पुनर्जन्म घेतात, तर ते मग दुसऱ्यांची सद्गती कशी करणार? इतके सगळे गुरू मिळून सृष्टीला पावन बनवतील काय? 'गोवर्धन पर्वत' असे म्हणतात ना. या माता आयरन-एजड् पर्वताला गोल्डन-एज बनवतात. गोवर्धन पर्वताची मग पूजा देखील करतात, ती आहे तत्वाची पूजा. संन्यासी देखील ब्रह्म किंवा

तत्त्वाची आठवण करतात. समजतात तोच परमात्मा आहे, ब्रह्म भगवान आहे. बाबा म्हणतात - 'हा तर भ्रम आहे. ब्रह्मांडामध्ये तर आत्मे अंड्याप्रमाणे राहतात, निराकारी झाड देखील दाखवले गेले आहे. प्रत्येकाचा आपापला सेक्शन (विभाग) आहे. या झाडाचे फाउंडेशन (पाया) आहे - भारताचे सूर्यवंशी-चंद्रवंशी घराणे. मग वाढ होते. मुख्य आहेत ४ धर्म'. तर मग हिशोब केला पाहिजे कोण-कोणते धर्म केव्हा येतात? जसे गुरूनानक ५०० वर्षांपूर्वी आले. असे तर नाही की शीख लोक ८४ जन्मांचा पार्ट बजावतात. बाबा म्हणतात ८४ जन्म फक्त तुम्हा ऑलराऊंडर ब्राह्मणांचे आहेत. बाबांनी समजावून सांगितले आहे की, तुमचाच ऑलराऊंड पार्ट आहे. ब्राह्मण, देवता, क्षत्रिय, वैश्य, शूद्र तुम्ही बनता. जे प्रथम देवी-देवता बनतात तेच चक्र पूर्ण करतात.

बाबा म्हणतात - 'तुम्ही वेद-शास्त्र खूप ऐकली आहेत. आता हे ऐका आणि निर्णय करा की शास्त्रे बरोबर आहेत की गुरू लोक बरोबर आहेत की बाबा जे सांगतात ते सत्य आहे?' बाबांना म्हणतातच ट्रूथ. मी सत्य सांगतो ज्यामुळे सतयुग बनते आणि द्वापर पासून तुम्ही असत्यच ऐकत आले आहात त्यामुळेच तर नरक बनला आहे.

बाबा म्हणतात - मी तुमचा गुलाम आहे, भक्तीमार्गामध्ये तुम्ही गात आला आहात - 'मैं गुलाम, मैं गुलाम तेरा...' आत्ता मी तुम्हा मुलांच्या सेवेकरिता आलो आहे. बाबांचे 'निराकारी', 'निरहंकारी' असे गायन केले जाते. तर बाबा म्हणतात - तुम्हा मुलांना कायमचे सुखी बनविणे माझे कर्तव्य आहे. गाण्यामध्ये देखील आहे - 'अगम-निगम का भेद खोले...' बाकी डमरू इत्यादी वाजवण्याचा काहीच संबंध नाहीये. हा तर आदि-मध्य-अंताचा सर्व समाचार ऐकवतात. बाबा म्हणतात तुम्ही सर्व मुले ॲक्टर्स आहात, मी यावेळी करन-करावनहार (कर्ता-करविता) आहे. मी यांच्याद्वारे (ब्रह्माद्वारे) स्थापना करवून घेतो. बाकी गीतेमध्ये जे काही लिहिले आहे, तसे तर काहीच नाही आहे. आत्ता तर प्रॅक्टिकलमध्ये (प्रत्यक्षातील) गोष्ट आहे ना. मुलांना हे सहज ज्ञान आणि सहजयोग शिकवतो, योग लावून घेतो. म्हटले आहे ना - 'योग लावून घेणारे, झोळी भरणारे, रोगांचा नाश करणारे...' गीतेचा देखील पूर्ण अर्थ समजावून सांगतात. योग शिकवतो आणि शिकवून देखील घेतो. मुले योग शिकून मग इतरांना शिकवतात ना. म्हणतात - 'योग से हमारी ज्योत जगाने वाले...' अशी गाणी जरी कोणी घरी बसून ऐकली तरी देखील सर्व ज्ञानच बुद्धीमध्ये घोळू लागेल. बाबांच्या आठवणीने वारशाचा देखील नशा चढेल. फक्त परमात्मा किंवा भगवान म्हटल्याने तोंड गोड होत नाही. बाबा म्हणजेच वारसा.

आता तुम्ही मुले बाबांकडून आदि-मध्य-अंताचे ज्ञान ऐकून मग इतरांना ऐकवता, यालाच शंखध्वनी म्हटले जाते. तुमच्या हातामध्ये पुस्तक वगैरे काहीच नाहीये. मुलांनी फक्त धारणा करायची असते. तुम्ही आहात खरे रूहानी ब्राह्मण, रूहानी बाबांची मुले. सच्च्या गीतेमुळे भारत स्वर्ग बनतो. त्या तर बसून फक्त कहाण्या रचल्या आहेत. तुम्ही सर्वजण पार्वती आहात, तुम्हाला ही अमरकथा ऐकवत आहे. तुम्ही सर्व द्रौपदी आहात. तिथे कोणी विवस्त्र होत नाही. तर म्हणतात - 'मग मुले कशी जन्माला येतील?' अरे, तिथे आहेतच निर्विकारी तर विकाराची गोष्ट कशी असू शकते? तुम्ही समजू शकणार नाही की योगबलाने मुले कशी जन्म घेतील! तुम्ही वाद घालाल. परंतु या तर शास्त्रीय गोष्टी आहेत ना. ती आहेच संपूर्ण निर्विकारी दुनिया. ही आहे विकारी दुनिया. मी जाणतो ड्रामा अनुसार माया पुन्हा तुम्हाला दुःखी करेल. मी कल्प-कल्प माझे कर्तव्य पालन करण्याकरिता येतो. मी जाणतो कल्पा पूर्वीचे सिकीलधेच (खूप-खूप वर्षानंतर भेटलेली लाडकी मुलेच) येऊन आपला वारसा घेतील. लक्षणे देखील दाखवतात. ही तीच महाभारत लढाई आहे. तुम्हाला पुन्हा देवी-देवता अथवा स्वर्गाचे मालक बनण्याचा पुरुषार्थ करायचा आहे. यामध्ये स्थूल युद्धाची काही गोष्टच नाही. ना काही असुर आणि देवतांचे युद्ध झाले आहे. तिथे (स्वर्गामध्ये) तर मायाच अस्तित्वात नाही जे युद्ध करतील. अर्धा कल्प ना कोणते युद्ध, ना कोणती रोगराई, ना दुःख-अशांती. अरे, तिथे तर कायम सुख, आनंद, वसंत ऋतू असतो. हॉस्पिटल्स नसतात, बाकी शाळेत शिकायचे तर असतेच. आता तुम्ही प्रत्येक जण इथून वारसा घेऊन जाता. मनुष्य शिक्षणामुळे आपल्या पायावर उभे राहतात. याच्यावर एक गोष्ट देखील आहे - 'कोणी विचारले तू कोणाचे खातेस? तर म्हणाली माझ्या नशिबाचे खाते'. ते असते हदचे नशीब. आता तुम्ही आपले बेहदचे नशीब बनवत आहात. तुम्ही असे नशीब बनवता ज्यामुळे २१ जन्म मग आपलेच राज्य भाग्य उपभोगता. हा आहे बेहदच्या सुखाचा वारसा, आता तुम्ही या विरोधाभासाला चांगल्या प्रकारे जाणता, भारत किती सुखी होता. आता काय हालत झाली आहे! ज्यांनी कल्पापूर्वी राज्य भाग्य घेतले होते तेच आता घेतील. असेही नाही की जे ड्रामामध्ये असेल ते मिळेल, मग तर उपाशी मराल. हे ड्रामाचे रहस्य पूर्ण समजून घ्यायचे आहे. शास्त्रांमध्ये तर कोणी किती आयुर्मान, कोणी किती लिहिले आहे. अनेकानेक

मत-मतांतरे आहेत. कोणी मग म्हणतात आम्ही तर कायम सुखीच आहोत. अरे, तुम्ही कधी आजारी पडत नाही का? ते तर म्हणतात रोग इत्यादी तर शरीराला होतात, आत्मा निर्लेप आहे. अरे, दुखापत इत्यादि होते तेव्हा दुःख आत्म्याला होते ना - या नीट समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. ही शाळा आहे, एकच टीचर शिकवतात. नॉलेज एकच आहे. नरापासून नारायण बनण्याचे एम ऑब्जेक्ट एकच आहे. जे नापास होतील ते चंद्रवंशीमध्ये निघून जातील. जेव्हा देवता होते तेव्हा क्षत्रिय नव्हते, जेव्हा क्षत्रिय होते तेव्हा वैश्य नव्हते, जेव्हा वैश्य होते तेव्हा शूद्र नव्हते. या सर्व समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. मातांकरिता देखील अगदी सोपे आहे. एकच परीक्षा आहे. असे देखील समजू नका की उशिरा आलेले कसे शिकतील. परंतु आता तर नवीन आलेले वेगाने पुढे जात आहेत. प्रत्यक्षात आहेत. बाकी माया-रावणाचे कोणतेही रूप नाहीये, म्हणतील यांच्यामध्ये काम विकाराचे भूत आहे. बाकी रावणाचा काही पुतळा किंवा शरीर असे काही नाही आहे.

अच्छा, सर्व गोष्टींचे सॅक्रीन आहे - 'मनमनाभव'. म्हणतात - 'माझी आठवण करा तर या योग अग्नीद्वारे विकर्म विनाश होतील'. बाबा गाईड बनून येतात. बाबा म्हणतात - 'मुलांनो, मी तर तुम्हा मुलांना सन्मुख शिकवत आहे'. कल्प-कल्प माझे कर्तव्य पालन करतो'. पारलौकिक बाबा म्हणतात - मी तुम्हा मुलांच्या मदतीने माझे कर्तव्य पार पाडण्याकरिता आलो आहे. मदत द्याल तेव्हाच तर तुम्ही देखील पद मिळवाल. मी किती महान पिता आहे. किती मोठा यज्ञ रचला आहे. ब्रह्माची मुखवंशावली तुम्ही सर्व ब्राह्मण-ब्राह्मणी भाऊ-बहीणी आहात. जेव्हा भाऊ-बहीण बनाल तेव्हा पती-पत्नीची दृष्टी बदलेल. बाबा म्हणतात या ब्राह्मण कुळाला कलंकित करायचे नाही, पवित्र राहण्याच्या युक्त्या आहेत. मनुष्य म्हणतात असे कसे होईल? एकत्र रहातील आणि आग लागणार नाही असे होऊ शकत नाही! बाबा म्हणतात - 'मध्ये ज्ञान-तलवार असल्यावर कधीही आग लागू शकत नाही, परंतु हे तेव्हाच होईल जेव्हा दोघेही मनमनाभव राहतील, शिवबाबांची आठवण करत राहतील, स्वतःला ब्राह्मण समजतील'. मनुष्य तर या गोष्टींना समजू न शकल्यामुळे गोंधळ माजवतात, अशा शिव्या देखील खाव्या लागतात. श्रीकृष्णाला थोड्याच कोणी शिव्या देऊ शकेल? श्रीकृष्ण असा आला तर परदेश इत्यादीवरुन एकदम विमानाने धाव घेतील, गर्दी होईल. भारतात माहीत नाही काय होईल.

अच्छा, आज भोग आहे - हे आहे माहेर आणि ते आहे सासर. संगमयुगावर भेट होते. कोणी-कोणी याला जादू समजतात. बाबांनी समजावून सांगितले आहे की हा साक्षात्कार काय आहे. भक्तीमार्गामध्ये साक्षात्कार कसे होतात, याबाबतीत संशय बुद्धी व्हायचे नाही. हा रिवाज आहे. शिवबाबांचा भंडारा आहे तर त्यांची आठवण करून भोग लावला पाहिजे. योगामध्ये राहणे तर चांगलेच आहे. बाबांची आठवण राहील. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) स्वतःला ब्रह्मा मुखवंशावली समजून पक्का पवित्र ब्राह्मण बनायचे आहे. कधी आपल्या या ब्राह्मण कुळाला कलंकित करायचे नाही.
2. २) बाप समान निराकारी, निरहंकारी बनून आपले कर्तव्य-पालन पूर्ण करायचे आहे. रूहानी सेवेमध्ये तत्पर रहायचे आहे.

वरदान:- स्नेहाच्या शक्तीने मायेच्या शक्तीला नष्ट करणारे संपूर्ण ज्ञानी भव

स्नेहामध्ये बुडून जाणे हेच संपूर्ण ज्ञान आहे. स्नेह ब्राह्मण जन्माचे वरदान आहे. संगमयुगावर स्नेहाचा सागर स्नेहाच्या हिरे-मोत्यांच्या थाळ्या भरभरून देत आहेत, तर स्नेहामध्ये संपन्न बना. स्नेहाच्या शक्तीने परिस्थिती रूपी पहाड परिवर्तन होऊन पाण्यासारखा हलका बनेल. मायेचे कसेही विक्राळ रूप किंवा रॉयल रूप समोर आले तर सेकंदामध्ये स्नेहाच्या सागरामध्ये बुडून जा तर स्नेहाच्या शक्तीद्वारे मायेची शक्ती नष्ट होईल.

बोधवाक्य:- तन-मन-धन, मन-वाणी आणि कर्माने बाबांच्या कर्तव्यामध्ये सदैव सहयोगी असणारेच योगी आहेत.

||| ओम शांती |||

12.12.2024 प्रभात:मुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - हे शिक्षण जे बाबा शिकवत आहेत, यामध्ये भरपूर कमाई आहे, त्यामुळे व्यवस्थित अभ्यास करत रहा, कधीही लिंक तुटू नये"

प्रश्न:- जे विनाशकाले विपरीत बुद्धी आहेत, त्यांना तुमच्या कोणत्या गोष्टीसाठी हसू येते?

उत्तर:- तुम्ही जेव्हा म्हणता की, 'आता विनाश काळ जवळ आला आहे'; तेव्हा त्यांना हसू येते. तुम्ही जाणता बाबा इथे काही बसून तर राहणार नाहीत, बाबांची ड्युटी आहे पावन बनविणे. जेव्हा पावन बनाल तेव्हा ही जुनी दुनिया नष्ट होईल, नवीन येईल. ही लढाई आहेच विनाशाकरिता. तुम्ही देवता बनता तर या कलियुगी घाणेरड्या (विकारी) सृष्टीवर येऊ शकत नाही.

ओम् शांती. रुहानी (आत्मिक) बाबा बसून रुहानी मुलांना समजावून सांगत आहेत. मुले समजतात आम्ही खूप बेसमज (अडाणी) बनलो होतो. माया रावणाने अडाणी बनवले होते. मुले हे देखील समजतात की, बाबांना जरूर यायचेच आहे, तर नवीन सृष्टी स्थापन होणार आहे. त्रिमूर्तीचे चित्र देखील आहे - ब्रह्मा द्वारा स्थापना, विष्णू द्वारे पालना, शंकर द्वारे विनाश कारण करनकरावनहार तर बाबा आहेत ना. एकच आहेत जे करतात आणि करवून घेतात. पहिले कोणाचे नाव येईल? जे करतात आणि नंतर ज्यांच्या द्वारे करवून घेतात. करनकरावनहार म्हटले जाते ना. ब्रह्मा द्वारे नवीन दुनियेची स्थापना करतात. हे देखील मुले जाणतात आमची जी नवीन दुनिया आहे, जी आपण स्थापन करत आहोत, याचे नावच आहे देवी-देवतांची दुनिया. सतयुगामध्येच देवी-देवता असतात. आणखी कोणाला देवी-देवता म्हटले जात नाही. तिथे मनुष्य नसतात. आहेच एक देवी-देवता धर्म, दुसरा कोणता धर्मच नाही. आता तुम्हा मुलांच्या लक्षात आले आहे की खरोखर आपण देवी-देवता होतो, निशाण्या देखील आहेत. इस्लामी, बौद्धी, ख्रिश्चन इत्यादी सर्वांची आपली-आपली निशाणी आहे. आपले जेव्हा राज्य होते तेव्हा इतर कोणीही नव्हते. आता मग बाकीचे सर्व धर्म आहेत, आपला देवता धर्म नाही आहे. गीतेमध्ये खूप छान-छान शब्द आहेत परंतु कोणी समजू शकत नाहीत. बाबा म्हणतात - 'विनाश काले विपरीत बुद्धी आणि विनाश काले प्रीत बुद्धी'. विनाश तर या वेळीच होणार आहे. बाबा येतात देखील संगमावर, जेव्हा परिवर्तन होते. बाबा तुम्हा मुलांना त्याच्या बदल्यामध्ये सर्व काही नवीन देतात. ते सोनार देखील आहेत, धोबी देखील आहेत, मोठे व्यापारी देखील आहेत. विरळाच कोणी बाबांसोबत व्यापार करेल. या व्यापारामध्ये तर प्रचंड फायदा आहे. शिक्षणामध्ये फायदा खूप असतो. महिमा देखील केली जाते की, शिक्षण कमाई आहे, ती देखील जन्म-जन्मांतरीसाठी कमाई आहे. तर असे शिक्षण चांगल्या रीतीने शिकले पाहिजे ना आणि मी शिकवतो देखील खूप सहज. फक्त एक आठवडा समजून घेऊन नंतर भले कुठेही जा, तुमच्याकडे अभ्यास येत राहील अर्थात मुरली मिळत राहील त्यामुळे मग कधीही लिंक तुटणार नाही. ही आहे आत्म्यांची परमात्म्या सोबत लिंक. गीतेमध्ये देखील हे शब्द आहेत - 'विनाश काले विप्रीत बुद्धि विनशन्ती, प्रीत बुद्धि विजयन्ती.' तुम्ही जाणता यावेळी मनुष्य एकमेकांना मारत-ओरबाडत राहतात. यांच्या सारखा क्रोध अथवा विकार इतर कोणामध्ये असत नाही. हे देखील गायन आहे की, द्रौपदीने धावा केला. बाबांनी सांगितले आहे - तुम्ही सर्व द्रौपदी आहात. भगवानुवाच, बाबा म्हणतात - 'मुलांनो, आता विकारामध्ये जाऊ नका. मी तुम्हाला स्वर्गामध्ये घेऊन जातो, तुम्ही फक्त मज पित्याची आठवण करा.' आता विनाशाचा काळ आहे ना, कोणाचेच ऐकत नाहीत, भांडतच राहतात. त्यांना किती सांगतात की, शांत रहा, परंतु शांतच होत नाहीत. आपली मुले इत्यादींना सोडून युद्धाच्या मैदानामध्ये जातात. कितीतरी मनुष्य मरतच राहतात. माणसाची काहीच किंमत राहिलेली नाहीये. जर किंमत असेल, महिमा असेल तर या देवी-देवतांची. आता तुम्ही हे बनण्याचा पुरुषार्थ करत आहात. तुमची महिमा वास्तवामध्ये या देवतांपेक्षा देखील जास्त आहे. आता तुम्हाला बाबा शिकवत आहेत. किती उच्च शिक्षण आहे. शिकणारे अनेक जन्मांच्या अंताला एकदमच तमोप्रधान आहेत. मी तर सदैव सतोप्रधानच आहे.

बाबा म्हणतात - 'मी तुम्हा मुलांचा ओबीडीयंट सर्व्हंट (आज्ञाधारक सेवक) बनून आलो आहे'. विचार करा आपण किती घाणेरडे (विकारी) बनलो आहोत. बाबाच आम्हाला 'वाह-वाह' बनवतात. स्वयं भगवान मनुष्यांना शिकवून

किती श्रेष्ठ बनवतात. बाबा स्वतः सांगतात - 'मी अनेक जन्मांच्या शेवटी तुम्हा सर्वांना तमोप्रधाना पासून सतोप्रधान बनविण्यासाठी आलो आहे. आता तुम्हाला शिकवत आहे. बाबा म्हणतात मी तुम्हाला स्वर्गवासी बनवले मग तुम्ही नरकवासी कसे बनलात, कोणी बनवले? गायन देखील आहे - 'विनाश काले विप्रीत बुद्धि विनशन्ती। प्रीत बुद्धि विजयन्ती'. मग जितके म्हणून प्रीत-बुद्धी रहाल अर्थात खूप आठवण कराल, तितका तुमचाच फायदा आहे. युद्धाचे मैदान आहे ना. कोणीही हे जाणत नाहीत की, गीतेमध्ये कोणते युद्ध सांगितले आहे. त्यांनी तर कौरव आणि पांडवांचे युद्ध दाखवले आहे. कौरव संप्रदाय, पांडव संप्रदाय देखील आहे परंतु युद्ध काही कोणते नाही आहे. पांडव त्यांना म्हटले जाते - जे बाबांना जाणतात. बाबांशी प्रीत बुद्धी आहेत. कौरव त्यांना म्हटले जाते - जे बाबांशी विपरीत बुद्धी आहेत. शब्द तर खूप चांगले-चांगले समजण्यालायक आहेत.

आता आहे संगमयुग. तुम्ही मुले जाणता नवीन दुनियेची स्थापना होत आहे. बुद्धीने काम घ्यायचे आहे. आता दुनिया किती मोठी आहे. सतयुगामध्ये किती थोडे मनुष्य असणार. झाड छोटे असणार ना. तेच झाड मग मोठे होते. मनुष्य सृष्टी रुपी हे उलटे झाड कसे आहे, हे देखील कोणी समजत नाहीत. याला कल्पवृक्ष म्हटले जाते. वृक्षाचे ज्ञान देखील असायला हवे ना? इतर (स्थूल) वृक्षांचे नॉलेज तर अतिशय सोपे आहे, लगेच सांगतील. या वृक्षाचे नॉलेज देखील सोपे आहे परंतु हा आहे मानवी वृक्ष. मनुष्यांना तर आपल्या वृक्षा विषयी माहीतसुद्धा नाही आहे. म्हणतात देखील - 'गॉड इज क्रियेटर'; तर जरूर चैतन्य आहेत ना. बाबा सत् आहेत, चैतन्य आहेत, ज्ञानाचा सागर आहेत. त्यांच्यामध्ये कोणते ज्ञान आहे, हे देखील कोणालाच समजत नाही. बाबाच बीजरूप, चैतन्य आहेत. त्यांच्याद्वारेच संपूर्ण रचना रचली जाते. तर बाबा बसून समजावून सांगत आहेत, मनुष्यांना आपल्या झाडा विषयी माहिती नाही, इतर झाडांना तर चांगल्या रीतीने जाणतात. झाडाचे बीज जर चैतन्य असते तर सांगितले असते ना परंतु ते तर आहे जड. तर आता तुम्ही मुलेच रचता आणि रचनेच्या रहस्याला जाणता. हे सत् आहेत, चैतन्य आहेत, ज्ञानाचा सागर आहेत. चैतन्यमध्ये तर बातचीत करू शकतात ना. मनुष्याचे शरीर सर्वात श्रेष्ठ अमूल्य असल्याचे गायले गेले आहे. याचे मूल्य (महत्व) कथन करू शकत नाही. बाबा येऊन आत्म्यांना समजावून सांगतात.

तुम्ही रूप देखील आहात, बसंत देखील आहात. बाबा आहेत ज्ञानाचा सागर. त्यांच्याकडून तुम्हाला रत्ने मिळतात. ही ज्ञान रत्ने आहेत, ज्या रत्नांमुळे ती रत्ने देखील तुम्हाला पुष्कळ मिळतात. लक्ष्मी-नारायणाकडे पहा किती रत्ने आहेत. हिऱ्या-माणकांच्या महालामध्ये राहतात. नावच आहे स्वर्ग, ज्याचे तुम्ही मालक बनणार आहात. एखाद्या गरीबाला अचानक मोठी लॉटरी लागली तर वेडे होतात ना. बाबा देखील म्हणतात तुम्हाला विश्वाची बादशाही मिळते तर माया किती विरोध करते. तुम्हाला पुढे जाऊन माहिती होईल की माया किती चांगल्या-चांगल्या मुलांना देखील गिळून टाकते. एकदम खाऊनच टाकते. तुम्ही सापाला पाहिले आहे - बेडकाला कसे पकडतो, जसे हत्तीला मगर गिळून टाकते. साप बेडकाला एकदम सगळाच्या सगळा गिळून टाकतो. माया देखील अशीच आहे, मुलांना जिवंतपणी पकडून एकदम संपवून टाकते जे पुन्हा कधी बाबांचे नाव सुद्धा घेत नाहीत. तुमच्यामध्ये योगबळाची ताकत खूप कमी आहे. सर्व काही योगबळावर अवलंबून आहे. जसा साप बेडकाला गिळून टाकतो, तुम्ही मुले देखील संपूर्ण बादशाहीला गिळून टाकता. संपूर्ण विश्वाची बादशाही तुम्ही सेकंदामध्ये घेणार. बाबा किती सोपी युक्ती सांगतात. कोणतेही हत्यार इत्यादी नाही. बाबा ज्ञान-योगाची अस्त्र-शस्त्रे देतात. त्यांनी मग स्थूल शस्त्रे इत्यादी दिली आहेत.

तुम्ही मुले यावेळी म्हणता - आम्ही कोणापासून कोण बनलो होतो! जे हवे ते म्हणा, आम्ही असे होतो जरूर. होतो तर मनुष्यच परंतु गुण आणि अवगुण तर असतात ना. देवतांमध्ये दैवीगुण आहेत म्हणून त्यांची महिमा गातात - 'आप सर्वगुण संपन्न... हम निर्गुण हारे में कोई गुण नाही'. यावेळी संपूर्ण दुनियाच निर्गुण आहे अर्थात एकही देवताई गुण नाही आहे. गुण शिकविणारे जे बाबा आहेत, त्यांनाच जाणत नाहीत म्हणून म्हटले जाते - 'विनाश काले विपरीत बुद्धी'. आता विनाश तर होणारच आहे संगमयुगावर. जेव्हा की जुनी दुनिया नष्ट होते आणि नवीन दुनिया स्थापन होते. याला म्हटले जाते विनाशाचा काळ. हा आहे अंतिम विनाश नंतर मग अर्धा कल्प कोणतेही युद्ध इत्यादी होतच नाही, मनुष्यांना काहीच माहिती नाही आहे. विनाश काले विपरीत बुद्धी आहेत तर जरूर जुन्या दुनियेचा विनाश होणार ना. या जुन्या दुनियेमध्ये किती आपदा येतात. मरतच राहतात. बाबा यावेळची हालत सांगत आहेत. फरक तर खूप आहे ना. आज भारताची ही हालत आहे, उद्या भारत काय असेल? आज इथे

आहात, उद्या तुम्ही कुठे असणार? तुम्ही जाणता नवीन दुनिया सुरुवातीला किती छोटी होती. तिथे तर महालांमध्ये किती हिरे-माणके इत्यादी असतात. भक्ती मार्गामध्ये देखील तुमचे मंदिर काही कमी थोडेच असते... फक्त एकच काही सोमनाथाचे मंदिर थोडेच असणार. एकाने कोणी बनवले तर त्यांना पाहून बाकीचे सुद्धा बनवणार. एका सोमनाथ मंदिरातूनच किती लुटून नेले आहे. आणि मग बसून आपले यादगार (स्मृतिस्थळ) बनवले आहे. तर भिंतीमध्ये जे दगड इत्यादी लावतात, या दगडांची कितीशी किंमत असणार? इतक्या छोट्याशा हिऱ्याची देखील किती किंमत आहे. बाबा (ब्रह्मा बाबा) हिऱ्यांचे व्यापारी होते, एक रत्तीचा हिरा असायचा, ९० रुपया रत्ती. आता तर त्याची किंमत हजारो रुपये आहे. मिळत देखील नाहीत. किंमत खूप वाढली आहे. यावेळी परदेशामध्ये खूप धन आहे, परंतु सतयुगासमोर हे काहीच नाही.

आता बाबा म्हणतात - विनाश काले विपरीत बुद्धी आहेत. तुम्ही म्हणता, 'विनाश जवळ आलेला आहे', तर लोक हसतात. बाबा म्हणतात - 'मी किती वेळ बसून राहणार, मला काही इथे मजा वाटते का? मी काही ना सुखी होत, ना दुःखी होत. माझी ड्युटी आहे पावन बनविण्याची. तुम्ही हे होता, आता असे बनले आहात, पुन्हा तुम्हाला असे श्रेष्ठ बनवतो'. तुम्ही जाणता - पुन्हा आपण ते देवी-देवता बनणार आहोत. आता तुम्हाला ही समज आली आहे, आम्ही या दैवी घराण्याचे सदस्य होतो. राजाई होती. मग अशी आपली राजाई गमावली. त्यानंतर अजून बाकीचे येऊ लागले. आता हे चक्र पूर्ण झाले आहे. आता तुम्ही समजता लाखो वर्षांची तर गोष्टच नाही. हे युद्ध आहेच विनाशासाठी, त्या बाजूला (विदेशामध्ये) तर अगदी सहज मरणार आहेत, काहीच त्रास होणार नाही. हॉस्पिटल इत्यादी काहीही राहणार नाहीत. कोण बसून सेवा करेल आणि रडेल. तिथे (सतयुगामध्ये) तर ही पद्धतच नाही. त्यांचा मृत्यू सहजच होतो. इथे (भारतात) तर दुःखी होऊन मरतात कारण तुम्हाला सुख खूप मिळाले आहे तर दुःख सुद्धा तुम्हाला बघायचे आहे. रक्ताची नदी इथेच वाहणार आहे. ते समजतात हे युद्ध नंतर शांत होईल परंतु असे शांत काही होणारच नाही. 'मिरुआ मौत मलूका शिकार' (प्राण्याचा जीव जातो आणि शिकाऱ्याला शिकार मिळते). तुम्ही देवता बनता, मग कलियुगी घाणेरड्या (विकारी) सृष्टीवर तर तुम्ही येऊ शकत नाही. गीतेमध्ये देखील आहे - भगवानुवाच, विनाश देखील बघा, स्थापना बघा. साक्षात्कार झाला ना! असे सर्व साक्षात्कार शेवटी होणार - अमुक-अमुक हे बनले; मग त्यावेळी रडाल, खूप पश्चाताप कराल, सजा खाल, नशिबाला दोष देत रहाल. परंतु करू काय शकणार? ही तर २१ जन्मांची लॉटरी आहे. आठवण तर येते ना. साक्षात्कारा शिवाय कोणालाही सजा मिळू शकत नाही. ट्रिब्युनल बसते ना. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) आपल्यामध्ये ज्ञान धारण करून रूप-बसंत बनायचे आहे. ज्ञान रत्नांनी विश्वाच्या बादशाहीची लॉटरी घ्यायची आहे.
2. २) या विनाश काळामध्ये बाबांसोबत प्रीत ठेवून एकाच्याच आठवणीमध्ये रहायचे आहे. असे कोणतेही कर्म करायचे नाही ज्यामुळे अंत समयी पश्चाताप करावा लागेल किंवा नशीबाला दोष द्यावा लागेल.

वरदान:- सदैव स्नेही बनून उडत्या कलेचे वरदान प्राप्त करणारे निश्चित विजयी, निश्चिंत भव

स्नेही मुलांना बापदादांद्वारे उडत्या कलेचे वरदान मिळते. उडत्या कलेद्वारे सेकंदामध्ये बापदादांकडे पोहोचा तर कोणत्याही रूपामध्ये आलेली माया तुम्हाला स्पर्श सुद्धा करू शकणार नाही. परमात्म छत्रछायेच्या आत मायेची सावली देखील येऊ शकत नाही. स्नेह, मेहनतीला मनोरंजनामध्ये परिवर्तन करतो. स्नेह प्रत्येक कर्मामध्ये निश्चित विजयी स्थितीचा अनुभव करवतो, स्नेही मुले प्रत्येक वेळी निश्चिंत राहतात.

बोधवाक्य:- 'नथिंग न्यू'च्या स्मृतीद्वारे नेहमी अचल रहा तर आनंदाने नाचत रहाल.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - आपले लक्ष्य (एम ऑब्जेक्ट) आणि लक्ष्य-दाता बाबांची आठवण करा तर दैवी गुण येतील, कोणाला दुःख देणे, निंदा करणे, ही सर्व आसुरी लक्षणे आहेत"

प्रश्नः- बाबांचे तुम्हा मुलांवर खूप उत्कट प्रेम आहे, त्याची निशाणी काय आहे?

उत्तरः- बाबांकडून जी गोड-गोड शिकवण मिळते, ही शिकवण देणे हीच त्यांच्या उत्कट प्रेमाची निशाणी आहे. बाबांची पहिली शिकवण आहे - 'गोड मुलांनो, श्रीमत सोडून इतर कोणतेही उलटे-सुलटे काम करायचे नाही. २. तुम्ही विद्यार्थी आहात तुम्ही कधीही कायदा आपल्या हातामध्ये घ्यायचा नाही. तुम्ही आपल्या मुखातून सदैव रत्न काढा, दगड नाही.

ओम् शांती. बाबा बसून मुलांना समजावून सांगत आहेत. आता यांना (लक्ष्मी-नारायणाला) तर चांगल्या रीतीने पाहता. हे आहे एम ऑब्जेक्ट अर्थात तुम्ही या घराण्याचे होता. किती रात्रं-दिवसाचा फरक आहे म्हणूनच वारंवार यांना पहायचे आहे; मला असे बनायचे आहे. यांची महिमा तर चांगल्या रीतीने जाणता. हे (लक्ष्मी-नारायणाचा फोटो) पॉकेटमध्ये ठेवल्यानेच आनंद होईल. मनामध्ये जो संदेह राहतो, तो राहता कामा नये, याला देह-अभिमान म्हटले जाते. देही-अभिमानी बनून या लक्ष्मी-नारायणाला पहाल तर समजेल की आपण असे बनत आहोत, तर जरूर यांना पाहावे लागेल. बाबा समजावून सांगत आहेत तुम्हाला असे बनायचे आहे. मध्याजी भव, यांना पहा, आठवा. दृष्टांतामध्ये सांगतात ना - त्याला वाटले मी म्हैस आहे तर तो स्वतःला म्हैसच समजू लागला. तुम्ही जाणता हे (लक्ष्मी-नारायण बनणे) आपले एम ऑब्जेक्ट आहे. असे बनायचे आहे. कसे बनणार? बाबांच्या आठवणीने. प्रत्येकाने स्वतःला विचारा - खरोखरच मी यांना पाहून बाबांची आठवण करतोय का? हे तर समजता की, बाबा आम्हाला देवता बनवतात. जितके शक्य होईल तेवढी आठवण केली पाहिजे. हे तर बाबा म्हणतात की निरंतर आठवण राहू शकत नाही. परंतु पुरुषार्थ करायचा आहे. भले गृहस्थ व्यवहारातील काम करताना यांची (लक्ष्मी-नारायणाची) आठवण कराल तर नक्कीच बाबांची आठवण येईल. बाबांची आठवण कराल तर यांची जरूर आठवण येईल. आपल्याला असे बनायचे आहे. संपूर्ण दिवस हाच ध्यास लागून रहावा. म्हणजे मग कधीही एकमेकांची निंदा करणार नाही. हा असा आहे, अमका असा आहे... जे या गोष्टींच्या मागे लागतात ते कधीही उच्च पद प्राप्त करू शकणार नाहीत. तसेच राहून जातात. किती सोपे करून सांगितले जाते. यांची (लक्ष्मी-नारायण) आठवण करा, बाबांची आठवण करा म्हणजे तुम्ही नक्कीच असे बनाल. इथे तर तुम्ही समोर बसला आहात, सर्वांच्या घरी हे लक्ष्मी-नारायणाचे चित्र जरूर असले पाहिजे. किती अचूक चित्र आहे. यांची आठवण कराल तर बाबांची आठवण येईल. संपूर्ण दिवस इतर गोष्टीं ऐवजी हेच ऐकवत रहा. 'अमका असा आहे, हे आहे...' कोणाची निंदा करणे - याला द्विधा मनःस्थिती म्हटले जाते. तुम्हाला आपली दैवी बुद्धी बनवायची आहे. कोणाला दुःख देणे, निंदा करणे, चंचलपणा करणे - असा स्वभाव असता कामा नये. यामध्ये तर अर्धा कल्प राहिले आहात. आता तुम्हा मुलांना किती गोड शिकवण मिळत आहे, यापेक्षा उच्च प्रेम दुसरे कुठलेच नाही. श्रीमताला सोडून इतर कोणतेही उलटे-सुलटे काम करता कामा नये. बाबा ध्यानामध्ये जाणाऱ्यांसाठी देखील डायरेक्शन देतात - 'फक्त भोग लावून या'. बाबा असे तर सांगत नाहीत की, वैकुंठामध्ये जा, रासक्रीडा इत्यादी करा. दुसऱ्या ठिकाणी गेलात तर समजा की मायेची प्रवेशता झाली. मायेचे पहिल्या नंबरचे कर्तव्य आहे पतित बनविणे. नियमबाह्य वर्तनाने खूप नुकसान होते. जर स्वतःला सावरले नाहीत, तर असे होऊ शकते की खूप कडक सजा भोगावी लागेल. बाबा, बाबा आहेत तसेच धर्मराज सुद्धा आहेत. त्यांच्याकडे बेहदचा हिशोब असतो. रावणाच्या जेलमध्ये किती वर्षे शिक्षा भोगावी लागली आहे. या दुनियेमध्ये किती अपार दुःख आहे. आता बाबा म्हणतात बाकी सर्व गोष्टी विसरून एका बाबांची आठवण करा बाकी सर्व शंका मनातून काढून टाका. विकारामध्ये कोण घेऊन जातात? मायेची भुते. तुमचे एम ऑब्जेक्ट आहेच मुळी हे. राजयोग आहे ना. बाबांची आठवण केल्यानेच हा वारसा मिळेल. तर मग या धंद्याला लागले पाहिजे. सर्व कचरा (विकार) आतून काढून टाकले पाहिजेत. मायेने देखील कळस गाठला आहे. परंतु तिला उडवून लावत रहा. जितके शक्य आहे तितके आठवणीच्या यात्रेमध्ये रहायचे आहे. सध्या तरी निरंतर आठवण राहू शकत नाही. शेवटी निरंतर अवस्थेपर्यंत

याल तेव्हाच उच्च पद प्राप्त कराल. जर द्विधा मनःस्थिती आहे, घाणेरडे विचार आहेत, तर उच्च पद मिळू शकणार नाही. मायेच्या आहारी गेल्यानेच हार खातात.

बाबा समजावून सांगत आहेत - 'मुलांनो, खराब काम करून पराभूत होऊ नका. निंदा इत्यादी करता त्यामुळे तुमची अतिशय वाईट गती झाली आहे. आता सद्गती होत आहे तर वाईट कर्म करु नका. बाबा बघतात की, मायेने अगदी गळ्यापर्यंत गिळंकृत केले आहे. कळत देखील नाही. स्वतःला समजतात की आपण खूप चांगल्या प्रकारे पुढे जात आहोत, परंतु नाही. बाबा समजावून सांगत आहेत - मनसा, वाचा, कर्मणा मुखावाटे रत्नेच निघाली पाहिजेत. वाईट गोष्टी बोलणे दगडा समान आहे. आता तुम्ही दगडापासून पारस बनत आहात तर मुखातून कधीही दगड (वाईट शब्द) निघता कामा नयेत. बाबांना समजावून सांगावे लागते. बाबांचा अधिकार आहे मुलांना समजावून सांगणे. असे तर नाही, भाऊ भावाला सावधान करतील. टीचरचे काम आहे शिकवण देणे. त्या काहीही सांगू शकतात. विद्यार्थ्यांनी कायदा हातात घ्यायचा नाही. तुम्ही विद्यार्थी आहात ना. बाबा समजावून सांगू शकतात, बाकी मुलांना तर बाबांचे डायरेक्शन आहे - एका बाबांची आठवण करा. तुमचे नशीब आता उघडले आहे. श्रीमतावर चालला नाही तर तुमचे भाग्य बिघडून जाईल मग खूप पश्चाताप करावा लागेल. बाबांच्या श्रीमतावर न चालल्याने एक तर सजा भोगाव्या लागतील, आणि दुसरे पद सुद्धा भ्रष्ट होईल. जन्म-जन्मांतर, कल्प-कल्पांतराची बाजी (डाव) आहे. बाबा येऊन शिकवत आहेत तर बुद्धीमध्ये रहायला हवे - बाबा आमचे टीचर आहेत, ज्यांच्याकडून हे नवीन ज्ञान मिळत आहे की, स्वतःला आत्मा समजा. 'आत्म्यांचे आणि परमात्म्याचे मिलन' असे म्हटले जाते. ५००० वर्षानंतर पुन्हा भेटणार, यामध्ये जितका वारसा घेऊ इच्छिता तेवढा घेऊ शकता. नाहीतर पुष्कळ पश्चाताप होईल, रडाल. सर्व साक्षात्कार होतील. शाळेमध्ये मुले ट्रान्सफर होतात (पुढे जातात) तर मागे राहिलेल्यांना सर्वजण पाहतात. इथे देखील ट्रान्सफर होतात. तुम्ही जाणता इथून शरीर सोडून मग सतयुगामध्ये जाऊन राजकुमारांच्या कॉलेजमध्ये भाषा शिकणार. तेथील (सतयुगामधील) भाषा तर सर्वांनाच शिकावी लागते, मातृभाषा. बऱ्याचजणांना संपूर्ण ज्ञान नाही आहे आणि नियमित अभ्यास सुद्धा करत नाहीत. एक-दोन वेळेला क्लास चुकवला तर मग क्लासला दांडी मारण्याची सवय लागून जाते. मायेच्या गुलामांची संगत आहे ना. शिवबाबांचे भक्त थोडेच आहेत. बाकी सर्व आहेत मायेचे गुलाम. तुम्ही शिवबाबांचे भक्त बनता तर माया सहन करू शकत नाही, त्यामुळे अतिशय सावध राहिले पाहिजे. घाणेरड्या (विकारी) लोकांपासून खूप जपून रहायचे आहे. हंस आणि बगळे आहेत ना. बाबांनी रात्री सुद्धा शिकवले आहे - दिवसभर कोणाची ना कोणाची निंदा करणे, परचिंतन करणे, याला काही दैवी गुण म्हटले जात नाही. देवता अशी कामे करत नाहीत. बाबा म्हणतात - 'बाबा आणि वारशाची आठवण करा'; तरी देखील निंदा करत राहतात. निंदा तर जन्म-जन्मांतर करत आले आहात. द्विधा मनःस्थिती तर असतेच. हे देखील आतल्या आत द्वंद आहे. फुकटचा आपला खून करतात. अनेकांचे नुकसान करतात. अमका असा आहे, यामध्ये तुमचे काय जाते. सर्वांचे मदतगार एक बाबा आहेत. आता तर श्रीमतावर चालायचे आहे. मनुष्य मत एकदम घाणेरडे (विकारी) बनवते. एकमेकांची निंदा करत राहतात. निंदा करणे हे आहे मायेचे भूत. ही आहेच पतित दुनिया. तुम्ही समजता की आता आपण पतितापासून पावन बनत आहोत. तर हे सर्व अवगुण आहेत. समजावले जाते - आजपासून आपला कान पकडायला पाहिजे की कधीही असे काम करणार नाही. जर काहीही असे पाहता तर बाबांना कळवले पाहिजे. तुमचे काय जाते! तुम्ही एकमेकांची निंदा का करता! बाबा सर्व काही ऐकतात ना. बाबांनी कानांचे आणि डोळ्यांचे लोन घेतले आहे ना. बाबा देखील पाहतात त्याच बरोबर हे दादा (ब्रह्माबाबा) सुद्धा पाहतात. काही-काही जणांचे वर्तन, वातावरण तर एकदम बेकायदेशीर असते. ज्याला वडील नसतात त्याला अनाथ म्हटले जाते. ते आपल्या पित्याला सुद्धा जाणत नाहीत, आठवण सुद्धा करत नाहीत. सुधारण्याऐवजी आणखीनच बिघडतात, त्यामुळे आपलेच पद गमावून बसतात. जर तुम्ही श्रीमतावर चालत नसाल तर अनाथ आहात. माता-पित्याच्या श्रीमतावर चालत नाहीत. 'त्वमेव माताश्च पिता... बन्धू' इत्यादी सर्व बनतात.

परंतु ग्रेट-ग्रेट ग्रँड फादरच (ब्रह्मा बाबाच) नसतील तर मग आई कुठून असणार, एवढे सुद्धा डोके नाही. माया एकदम डोकेच फिरवून टाकते. बेहदच्या बाबांची आज्ञा मानत नाहीत तर सजा भोगावी लागते. जरा सुद्धा सद्गती होत नाही. बाबा बघतात तर म्हणतील ना - यांची किती वाईट गती होईल. ही तर तगर, रुईची फुले आहेत. ज्यांना कोणीही पसंत करत नाही. तर सुधारायला हवे ना. नाहीतर पद-भ्रष्ट व्हाल. जन्म-जन्मांतरासाठी नुकसान होईल. परंतु देह-अभिमानी असणाऱ्यांच्या बुद्धीमध्ये जातच नाही. आत्म-अभिमानी मुलेच बाबांवर प्रेम

करू शकतात. बलिहार जाणे (आत्मसमर्पण करणे) काही मावशीचे घर नाहीये. मोठ-मोठ्या व्यक्ती काही आत्मसमर्पण करू शकत नाहीत. त्यांना आत्मसमर्पण याचा अर्थ सुद्धा समजत नाही. हृदय विदीर्ण होते. बरेच जण असे बंधनमुक्त सुद्धा आहेत. मुले इत्यादी कोणीही नाही. म्हणतात - 'बाबा, तुम्हीच आमचे सर्व काही आहात.' असे फक्त तोंडाने बोलतात परंतु खरे नाहीये. बाबांशी देखील खोटे बोलतात. समर्पित झालात तर आपला मोह काढून टाकला पाहिजे. आता तर शेवट आहे त्यामुळे श्रीमतावर चालावे लागेल. संपत्ती इत्यादी पासून मोह काढून टाकला पाहिजे. बरेच जण असे बंधन मुक्त आहेत. शिवबाबांना आपले बनवले आहे, दत्तक घेतात ना. हे आमचे पिता, टीचर, सद्गुरु आहेत. आम्ही त्यांना आपले बनवतो, त्यांची सर्व संपत्ती घेण्याकरिता. जे संतान बनले आहेत ते घराण्यामध्ये जरूर येतात. परंतु त्यामध्ये मग पदे किती आहेत. किती दास-दासी आहेत. एकमेकांवर हुकूमत गाजवतात. दासींमध्ये देखील नंबरवार बनतात. राज घराण्यामध्ये बाहेरचे दास-दासी तर येणार नाहीत. जे बाबांचे बनले आहेत, त्यांनाच बनायचे आहे. अशीपण काही मुले आहेत ज्यांना एका पैशाची सुद्धा अक्कल नाहीये.

बाबा असे तर म्हणत नाहीत की मम्माची आठवण करा किंवा माझ्या रथाची (ब्रह्मा बाबांची) आठवण करा. बाबा म्हणतात - 'मामेकम् (मज एकाची) आठवण करा. देहाचे सर्व संबंध सोडून स्वतःला आत्मा समजा'. बाबा समजावून सांगत आहेत की प्रीत ठेवायची आहे तर एकाशीच ठेवा तेव्हाच बेडा (जीवनरुपी नाव) पार होईल. बाबांच्या डायरेक्शन प्रमाणे चाला. मोहोजीत राजाची एक कथा सुद्धा आहे ना! पहिल्या नंबरवर आहेत मुले, मुलगा तर संपत्तीचा मालक बनेल. पत्नी तर हाफ पार्टनर (अर्धांगिनी) आहे, मुलगा तर संपूर्ण मालक बनतो. तर बुद्धी त्या दिशेने जाते, बाबांना संपूर्ण मालक बनवाल तर हे सर्व काही तुम्हाला देतील. देण्या-घेण्याची गोष्टच नाही. ही तर समजून घेण्याची गोष्ट आहे. भले तुम्ही ऐकता परंतु दुसऱ्या दिवशी सर्व काही विसरायला होते. लक्षात राहील तर इतरांना सुद्धा समजावून सांगू शकाल. बाबांची आठवण केल्यानेच तुम्ही स्वर्गाचे मालक बनाल. हे तर खूप सोपे आहे, फक्त बोलत रहा; सर्वांना एम ऑब्जेक्ट सांगत रहा. विशाल बुद्धी असणारे तर लगेच समजून जातील. शेवटी ही चित्रे इत्यादीच कामी येतील. या चित्रांमध्येच सर्व ज्ञान भरलेले आहे. लक्ष्मी-नारायण आणि राधे-कृष्ण यांचा आपसात काय संबंध आहे? हे कोणीही जाणत नाहीत. लक्ष्मी-नारायण तर जरूर अगोदर राजकुमार असतील. 'बेगर टू प्रिन्स' आहे ना! 'बेगर टू किंग' असे म्हटले जात नाही. राजकुमारच नंतर राजा बनतात. हे तर खूप सोपे आहे परंतु माया कोणालाही पकडते, कोणाची निंदा करणे, दोषारोप करणे, ही तर पुष्कळ जणांची सवय आहे. दुसरे तर काही कामच नाही. बाबांची कधी आठवण करणार नाहीत. एकमेकांची निंदा करण्याचाच उद्योग करतात. हा आहे मायेचा धडा. बाबांचा धडा तर एकदम सरळ आहे. शेवटी-शेवटी हे संन्यासी इत्यादी जागे होतील, म्हणतील की, 'ज्ञान आहे तर ते या बी. के. कडेच आहे'. कुमार-कुमारी तर पवित्र असतात. प्रजापिता ब्रह्माची मुले आहेत. आम्हाला कोणतेही वाईट (विकारी) विचार सुद्धा येता कामा नयेत. पुष्कळ जणांना अजूनही वाईट (विकारी) विचार येतात, मग याची सजा देखील खूप कडक आहे. बाबा समजावून तर खूप सांगतात. जर तुमचे कुठलेही खराब वर्तन दिसले, तर इथे (मधुबनला) राहू शकणार नाही. तू लायक नाही आहेस म्हणून थोडी सजा सुद्धा द्यावी लागते. बाबांना फसवतोस. तू बाबांची आठवण करू शकणार नाहीस. संपूर्ण अवस्था कोलमडून जाते. अवस्था कोलमडून जाणे हीच सजा आहे. श्रीमतावर न चालल्यामुळे आपले पद भ्रष्ट करतात. बाबांच्या डायरेक्शनवर न चालल्याने अजूनच भुताची प्रवेशता होते. बाबांना तर कधी-कधी विचार येतो, की कुठे खूप कडक सजा आत्ताच सुरू होऊ नये. सजा देखील खूप गुप्त असतात ना. कुठे तीव्र वेदना होऊ नयेत. खूप कोसळतात (अधोगती होते), सजा भोगतात. बाबा तर सर्व इशाऱ्यांद्वारे सांगत असतात. आपल्याच नशिबाला नाट लावतात (अडथळा निर्माण करतात), म्हणून बाबा सतर्क करत राहतात, आता चुका करण्याची वेळ नाही आहे, स्वतःला सुधारा. अंतिम घडी येण्यासाठी वेळ उरलेला नाहीये. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) कोणतेही नियमबाह्य, श्रीमताविरुद्ध वर्तन करायचे नाही. स्वतःच स्वतःला सुधारायचे आहे. घाणेरड्या (विकारी) लोकांपासून स्वतःला सांभाळायचे आहे.
2. २) बंधनमुक्त असाल तर संपूर्ण आत्मसमर्पण करायचे आहे. आपला मोह काढून टाकायचा आहे. कधीही

कोणाची निंदा किंवा परचिंतन करायचे नाही. घाणेरड्या (विकारी) विचारांपासून स्वतःला दूर ठेवायचे आहे.

वरदान:- समर्थ स्थितीचा स्विच ऑन करून व्यर्थच्या अंध:काराला समाप्त करणारे अव्यक्त फरिश्ता भव

जसे स्थूल दिव्याचा स्विच ऑन केल्याने काळोख नाहीसा होतो. असाच 'समर्थ स्थिती' हा स्विच आहे. या स्विचला ऑन करा तर व्यर्थचा काळोख नाहीसा होईल. एक-एक व्यर्थ संकल्प नष्ट करण्याच्या मेहनती पासून मुक्त व्हाल. जेव्हा स्थिती समर्थ होईल तर महादानी-वरदानी बनाल कारण 'दाता'चा अर्थच आहे समर्थ असणे. जो समर्थ आहे तोच देऊ शकतो आणि जिथे समर्थ आहे तिथे व्यर्थ नष्ट होते. तर हेच अव्यक्त फरिश्त्यांचे श्रेष्ठ कार्य आहे.

बोधवाक्य:- सत्यतेच्या आधारावर सर्व आत्म्यांचे अंत:करणापासूनचे आशीर्वाद प्राप्त करणारेच भाग्यवान आत्मा आहेत.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - तुमच्याजवळ 'मनमनाभव' आणि 'मध्याजीभव'चे तीक्ष्ण बाण आहेत, याच बाणांनी तुम्ही मायेवर विजय प्राप्त करू शकता"

प्रश्न:- मुलांना बाबांची मदत कोणत्या आधारावर मिळते? मुले बाबांचे आभार कोणत्या रूपामध्ये मानतात?

उत्तर:- जी मुले जितकी बाबांची प्रेमाने आठवण करतात तितकी बाबांची मदत मिळते. प्रेमाने बोला. आपले कनेक्शन चांगले ठेवा, श्रीमतावर चालत रहा तर बाबा मदत करत राहतील. मुले बाबांचे आभार मानतात, 'बाबा, तुम्ही परमधाम वरून येऊन आम्हाला पतितापासून पावन बनविता, तुमच्याकडून आम्हाला किती सुख मिळते'. प्रेमाने अश्रू देखील येतात.

ओम् शांती. मुलांना सर्वात प्रिय असतात आई आणि वडील. आणि मग आई वडिलांना मुले जास्त प्रिय वाटतात. आता बाबा, ज्यांना 'त्वमेव माताश्च पिता' म्हणतात. लौकिक माता-पित्याला काही कोणी असे म्हणू शकत नाही. ही महिमा आहे जरूर, परंतु कोणाची आहे - हे मात्र कोणीही जाणत नाहीत. जर जाणत असेल तर तिथे जावे आणि अजूनही बऱ्याच जणांना घेऊन जावे. परंतु ड्रामाची भावीच अशी आहे. जेव्हा ड्रामा पूर्ण होतो तेव्हाच येतात. पूर्वी थिएटरमध्ये नाटके व्हायची, जेव्हा नाटक पूर्ण होत असे तेव्हा मग सर्व ॲक्टर्स स्टेजवर येऊन उभे राहत असत. हे देखील बेहदचे मोठे नाटक आहे. हे देखील मुलांच्या बुद्धीमध्ये सर्व आले पाहिजे - सतयुग, त्रेता, द्वापर, कलियुग. हे साऱ्या सृष्टीचे चक्र आहे. असे नाही मूलवतन, सूक्ष्मवतन मध्ये चक्र फिरते. सृष्टीचे चक्र इथेच फिरते.

गायले देखील जाते - 'इक ओंकार सतनाम...' ही महिमा कोणाची आहे? भले ग्रंथामधून देखील शीख लोक महिमा करतात. गुरुनानक उवाच... आता 'एक ओंकार' ही महिमा तर त्या एका निराकार परमात्म्याचीच आहे परंतु हे लोक परमात्म्याच्या महिमेला विसरून गुरुनानकांची महिमा करू लागतात. सद्गुरु देखील नानक यांनाच समजतात. वास्तविक साऱ्या सृष्टीवर जी काही महिमा आहे ती त्या एकाचीच आहे इतर कोणाचीच महिमा नाही आहे. आता बघा ब्रह्मामध्ये जर बाबांची प्रवेशता झाली नसती तर हे कवडी तुल्य आहेत. आता तुम्ही परमपिता परमात्म्याद्वारे कवडी तुल्य पासून हिरे तुल्य बनता. आता आहे पतित दुनिया, ब्रह्माची रात्र. पतित दुनियेमध्ये जेव्हा बाबा येतात आणि जे त्यांना ओळखतात ते त्यांच्यावर कुर्बान जातात. आजच्या दुनियेमध्ये मुले देखील आंधळी बनतात. देवता किती चांगले होते, ते आता पुनर्जन्म घेत-घेत तमोप्रधान बनले आहेत. संन्यासी देखील आधी खूप चांगले होते, पवित्र होते. भारताला मदत देत होते. भारतामध्ये जर पवित्रता नसेल तर काम चितेवर जळून जातील. सतयुगामध्ये काम कटारी असत नाही. या कलियुगामध्ये सर्वजण काम-चितेच्या काट्यांवर बसले आहेत. सतयुगामध्ये तर असे म्हणणार नाही. तिथे हे विष असतच नाही. म्हणतात ना - 'अमृत छोड़ विष काहे को खाए'. विकारीलाच पतित म्हटले जाते. आजकाल तर मनुष्य बघा दहा-बारा मुले जन्माला घालतात. काही कायदाच राहिलेला नाही. सतयुगामध्ये जेव्हा मूल जन्माला येते तेव्हा आधीच साक्षात्कार होतो. शरीर सोडण्यापूर्वी देखील साक्षात्कार होतो की आपण हे शरीर सोडून जाऊन लहान बाळ बनणार. आणि एकच मुलगा असतो, जास्ती नाहीत. कायद्यानुसार चालते. वृद्धी तर होणार आहे जरूर. परंतु तिथे विकार असत नाही. खूप जण विचारतात तिथे मग जन्म कसे घेतात? बोलले पाहिजे - 'तिथे योग बलाने सर्व काम होते'. योगबलानेच आम्ही सृष्टीची राजाई घेतो. बाहूबळाने सृष्टीची राजाई मिळू शकत नाही.

बाबांनी समजावून सांगितले आहे - 'जर ख्रिश्चन लोक आपसामध्ये मिळाले तर साऱ्या सृष्टीचे राज्य घेऊ शकतात परंतु आपसामध्ये एकी करणार नाहीत, कायदा असे म्हणत नाही; म्हणून दोन बोके आपसात भांडतात आणि लोणी तुम्हा मुलांना मिळते. श्रीकृष्णाच्या मुखामध्ये लोणी दाखवले आहे. हे सृष्टी रुपी लोणी आहे.

बेहदचे बाबा म्हणतात - हे योगबलाचे युद्ध शास्त्रांमध्ये गायले गेले आहे, बाहूबळाचे नाही. त्यांनी मग

शास्त्रांमध्ये हिंसक युद्ध दाखवले आहे. त्याच्याशी आपला काहीच संबंध नाही. पांडव-कौरवांचे काही युद्ध नाहीये. हे अनेक धर्म ५००० वर्षांपूर्वी देखील होते, जे आपसामध्ये युद्ध करून नष्ट झाले. पांडवांनी देवी-देवता धर्माची स्थापना केली. हे आहे योगबळ, ज्यामुळे सृष्टीचे राज्य मिळते. मायाजीत-जगतजीत बनतात. सतयुगामध्ये माया रावण असत नाही. तिथे असा थोडाच रावणाचा पुतळा बनवून जाळतील. कसे-कसे पुतळे बनवतात. असा कोणताही दैत्य अथवा असूर असत नाही. हे देखील समजत नाहीत की, ५ विकार स्त्रीचे आहेत आणि ५ विकार पुरुषाचे आहेत. त्यांची मिळून दहा डोकी असलेला रावण बनवतात. जसे विष्णूला देखील ४ भुजा देतात. मनुष्य तर ही साधी गोष्ट सुद्धा समजत नाहीत. भला मोठा रावण बनवून जाळतात. मोस्ट बिलवेड मुलांना आता बेहदचे बाबा समजावून सांगत आहेत. बाबांना मुले नेहमीच नंबरवार प्रिय वाटतात. कोणी तर मोस्ट बिलवेड (अतिप्रिय) देखील आहेत तर कोणी कमी प्रिय आहेत. जितका सिकीलधा (खूप वर्षांनी भेटलेला) मुलगा असेल तितके जास्त प्रेम असेल. इथे देखील जे सेवेवर तत्पर राहतात, दयाळू असतात, ते प्रिय वाटतात. भक्तिमार्गामध्ये दया मागतात ना! 'परमेश्वरा दया करा'. 'मर्सी ऑन मी (माझ्यावर दया करा)'. परंतु ड्रामाला कोणीही जाणत नाहीत. जेव्हा अति तमोप्रधान बनतात तेव्हाच बाबांचा येण्याचा प्रोग्राम आहे. असे नाही की, ईश्वर जे हवे ते करू शकतात किंवा जेव्हा वाटेल तेव्हा येऊ शकतात. जर अशी शक्ती असली असती तर इतक्या शिव्या का मिळाल्या असत्या? वनवास का भोगावा लागला असता? या गोष्टी खूप गुप्त आहेत. श्रीकृष्णाला तर शिवी मिळू शकत नाही. म्हणतात - भगवान असे करू शकत नाही! परंतु विनाश तर होणारच आहे मग वाचवण्याची तर गोष्टच नाही. सर्वांना परत घेऊन जायचे आहे. स्थापना-विनाश करवितात तर जरूर भगवान असेल ना. परमपिता परमात्मा स्थापना करतात, कशाची? मुख्य गोष्ट तुम्ही हीच विचारा की, 'गीतेचे भगवान कोण आहेत?' सारी दुनिया यामध्येच गोंधळून गेली आहे. त्यांनी तर मनुष्याचे नाव घातले आहे. आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना तर भगवंताव्यतिरिक्त इतर कोणीही करू शकत नाही. मग तुम्ही कसे म्हणू शकता की श्रीकृष्ण गीतेचे भगवान आहेत? विनाश आणि स्थापना करणे कोणाचे काम आहे? गीतेच्या भगवंताला विसरल्याने गीतेचेच खंडन केले आहे. ही मोठ्यात मोठी चूक आहे. दुसरे मग जगन्नाथपुरी मध्ये देवतांची खूप घाणेरडी चित्रे बनवली आहेत. घाणेरडी चित्रे ठेवण्यासाठी गव्हर्मेंटची मनाई आहे. तर यावर समजावून सांगितले पाहिजे. या मंदिरांसाठी कोणाच्याही बुद्धीमध्ये या गोष्टी येत नाहीत. या गोष्टी बाबाच बसून समजावून सांगतात.

बघा, मुली किती प्रतिज्ञा पत्र देखील लिहितात. रक्ताने सुद्धा लिहितात. एक कहाणी देखील आहे ना - श्रीकृष्णाचे रक्त निघाले तर द्रौपदीने आपला पदर फाडून त्याला बांधला. हे प्रेम आहे ना. तुमचे प्रेम आहे शिवबाबांवर. यांचे (ब्रह्मा बाबांचे) रक्त निघू शकते, यांना दुःख होऊ शकते परंतु शिवबाबांना कधी दुःख होऊ शकत नाही कारण त्यांना स्वतःचे शरीरच नाही आहे. श्रीकृष्णाला जर काही लागले तर दुःख होईल ना. तर त्यांना मग परमात्मा कसे म्हणू शकता. बाबा म्हणतात - 'मी तर सुख-दुःखापासून न्यारा आहे. हां, मुलांना येऊन कायमचे सुखी बनवितो'. 'सदा शिव' गायले जाते. सदा शिव, सुख देणारे म्हणतात - 'माझी गोड-गोड सिकीलधी मुले जी सपूत (लायक) आहेत, ज्ञान धारण करून पवित्र राहतात, खरी योगी आणि ज्ञानी असतात, ती मला प्रिय वाटतात. लौकिक पित्याकडे देखील कोणी चांगली, कोणी वाईट मुले असतात. कोणी मग कुळाला कलंक लावणारे निघतात. खूप घाणेरडे (विकारी) बनतात. इथे देखील असेच आहे. 'आश्चर्यवत् बच्चा बनन्ती, सुनन्ती, कथन्ती फिर फारकती देवन्ती...' म्हणूनच निश्चय पत्र लिहून घेतले जाते. जेणेकरून तसे काही झाल्यास ते लिहिलेले समोर ठेवले जाईल. रक्ताने देखील लिहून देतात. रक्ताने लिहून प्रतिज्ञा करतात. आज-काल तर शपथ देखील घेतात. परंतु ती आहे खोटी शपथ. ईश्वराला हाजिर-नाजिर आहेत असे मानणे अर्थात हा देखील ईश्वर आहे, मी देखील ईश्वर शपथ घेतो. बाबा म्हणतात - आता तुम्ही प्रॅक्टिकलमध्ये हाजिर-नाजिर असल्याचे जाणता (ईश्वर उपस्थित आहेत आणि साऱ्या घटना पहात देखील आहेत) हे जाणता. बाबा या नेत्ररूपी खिडक्यांद्वारे बघतात. हे शरीर परक्याचे आहे. लोनवर घेतले आहे. बाबा भाडेकरू आहेत. घराला उपयोगात आणले जाते ना. तर बाबा म्हणतात, 'मी या तनाला उपयोगात आणतो'. बाबा या खिडक्यांद्वारे बघतात. हाजिर-नाजिर आहेत (उपस्थित आहेत आणि साऱ्या घटना पहात देखील आहेत). आत्मा जरूर कर्मेंद्रियांद्वारेच काम करेल ना. मी आलो आहे तर जरूर ऐकवणार ना. ऑर्गन्सचा (शरीराचा) वापर करतात तर जरूर भाडे देखील द्यावे लागेल.

तुम्ही मुले यावेळी नरकाला स्वर्ग बनविणारे आहात. तुम्ही प्रकाश देणारे, जागृत करणारे आहात. बाकीचे तर

सगळे कुंभकर्णाच्या निद्रेमध्ये झोपलेले आहेत. तुम्ही माता सर्वांना जागे करता, स्वर्गाचे मालक बनवता. यामध्ये मातांची संख्या जास्त आहे, म्हणून 'वंदे मातरम्' म्हटले जाते. भीष्म पितामह इत्यादींना देखील तुम्हीच बाण मारले होते. मनमनाभव-मध्याजीभवचा बाण किती सोपा आहे. याच बाणांनी तुम्ही मायेवर विजय प्राप्त करता. तुम्हाला एका बाबांच्याच आठवणीमध्ये, एकाच्याच श्रीमतावर चालायचे आहे. बाबा तुम्हाला अशी श्रेष्ठ कर्म शिकवतात, ज्यामुळे २१ जन्म कधी कर्म कुटण्याची (पश्चाताप करण्याची) गरजच पडणार नाही. तुम्ही एव्हरहेल्दी-एव्हरवेल्दी (सदा निरोगी आणि सदा संपन्न) बनता. अनेकदा तुम्ही स्वर्गाचे मालक बनले आहात. राज्य घेतले आणि मग गमावले आहे. तुम्ही ब्राह्मण कुलभूषणच हिरो-हिरॉईनचा पार्ट बजावता. ड्रामामध्ये सर्वात श्रेष्ठ पार्ट तुम्हा मुलांचा आहे. तर असे श्रेष्ठ बनविणाऱ्या बाबांवर खूप प्रेम पाहिजे. बाबा, तुम्ही कमाल करता. ना ध्यानी, ना मनी, आम्हाला थोडेच माहित होते, हम सो नारायण होतो. बाबा म्हणतात - 'तुम्ही सो नारायण अथवा सो लक्ष्मी देवी-देवता होता मग पुनर्जन्म घेत-घेत असूर बनले आहात. आता पुन्हा पुरुषार्थ करून वारसा मिळवा'. जितका जे पुरुषार्थ करतात, साक्षात्कार होत राहतो.

राजयोग एका बाबांनीच शिकवला होता. खरा-खरा सहज राजयोग तर तुम्ही आता शिकवू शकता. तुमचे कर्तव्य आहे - सर्वांना बाबांचा परिचय देणे. सर्व अनाथ बनले आहेत. या गोष्टी देखील कल्पा पूर्वीचेच कोटींमधून कोणीच समजतील. बाबांनी समजावून सांगितले आहे, साऱ्या दुनियेमध्ये महामूर्ख बघायचा असेल तर इथे बघा. बाबा ज्यांच्याकडून २१ जन्मांचा वारसा मिळतो, त्यांना देखील फारकती देतात (विभक्त होतात). याची देखील ड्रामामध्ये नोंद आहे. आता तुम्ही स्वतः ईश्वराची संतान आहात. मग देवता, क्षत्रिय, वैश्य, शुद्राची संतान बनणार. आता आसूरी संतानापासून ईश्वरीय संतान बनले आहात. बाबा परमधाम वरून येऊन पतिता पासून पावन बनवतात तर किती आभार मानले पाहिजेत. भक्ती मार्गामध्ये देखील आभार मानत राहतात. दुःखामध्ये थोडेच आभार मानतील. आता तुम्हाला किती सुख मिळते तर खूप प्रेम असले पाहिजे. आपण बाबांसोबत प्रेमाने बोललो तर का नाही ऐकणार. कनेक्शन आहे ना. पहाटे उठून बाबांसोबत गप्पा मारल्या पाहिजेत. बाबा (ब्रह्मा बाबा) स्वतःचा अनुभव सांगत राहतात - 'मी खूप आठवण करतो. बाबांच्या आठवणीमध्ये अश्रू देखील येतात. मी काय होतो, बाबांनी काय बनवले आहे - तत्वम्. तुम्ही देखील तेच बनता'. योगमध्ये राहणाऱ्यांना बाबा मदत देखील देतात. आपणहून डोळे उघडतील. पलंग हलेल. बाबा खूप जणांना उठवतात. बेहदचे बाबा किती दया करतात. तुम्ही इथे का आले आहात? म्हणता - 'बाबा, भविष्यामध्ये श्री नारायणाला वरण्याचे शिक्षण घेण्यासाठी आलो आहोत अथवा लक्ष्मीला वरण्यासाठी ही परीक्षा देत आहोत'. किती वंडरफुल स्कूल आहे. किती वंडरफुल गोष्टी आहेत. मोठ्यात मोठी युनिव्हर्सिटी आहे. परंतु 'गॉडली युनिव्हर्सिटी' असे नाव ठेवायला देत नाहीत. एक दिवस जरूर मानतील. येत राहतील. म्हणतील खरोखर किती मोठी युनिव्हर्सिटी आहे. बाबा तर आपल्या डोळ्यांच्या पापण्यांवर बसून तुम्हाला शिकवतात. म्हणतात - तुम्हाला स्वर्गामध्ये पोहोचवणार. तर अशा बाबांसोबत किती गोष्टी केल्या पाहिजेत. मग बाबा खूप मदत करतील. ज्यांचे गळे बंद आहेत (जे इतरांना ज्ञान सांगू शकत नाहीत), त्यांचे कुलूप उघडतील. रात्री बसून आठवण केल्याने खूप आनंद होईल. बाबा (ब्रह्मा बाबा) स्वतःचा अनुभव सांगतात - 'मी बाबांसोबत अमृतवेलेला कशा गप्पा मारतो'.

बाबा मुलांना समजावून सांगतात सावध रहा. कुळाला कलंकीत करायचे नाही. ५ विकारांचे दान देऊन परत घ्यायचे नाही. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) बाबांचे प्रिय बनण्यासाठी दयाळू बनून सेवेवर तत्पर रहायचे आहे. सपूत (लायक), आज्ञाधारक बनून खरा योगी आणि ज्ञानी बनायचे आहे.
2. २) अमृतवेलेला उठून बाबांसोबत खूप गोड-गोड गोष्टी करायच्या आहेत, बाबांचे आभार मानायचे आहेत. बाबांच्या मदतीचा अनुभव करण्यासाठी मोस्ट बिलवेड बाबांची अतिशय प्रेमाने आठवण करायची आहे.

वरदान:- सदैव उमंग-उत्साहामध्ये राहून मनामध्ये आनंदाची गाणी गाणारे अविनाशी भाग्यशाली भव

तुम्ही भाग्यशाली मुलेच अविनाशी विधीद्वारे अविनाशी सिद्धी प्राप्त करता. तुमच्या मनामध्ये सदैव 'वाह-वाह'ची आनंदाची गाणी वाजत राहतात. वाह बाबा! वाह भाग्य! वाह गोड परिवार! वाह श्रेष्ठ संगमाचा सुंदर वेळ! प्रत्येक कर्म वाह-वाह आहे म्हणून तुम्ही अविनाशी भाग्यशाली आहात. तुमच्या मनामध्ये कधी 'व्हाय', 'आय' ('का', 'मी') असे शब्द येऊ शकत नाहीत. 'व्हाय' ऐवजी 'वाह-वाह' आणि 'आय' च्या ऐवजी 'बाबा-बाबा' हेच शब्द येतात.

बोधवाक्य:- जो संकल्प करता त्याला अविनाशी गव्हर्मेंटचा स्टॅम्प लावा तर खंबीर रहाल.

||| ओम शांती |||

"सेवेबरोबरच आता संपन्न बनण्याचा प्लॅन बनवा, कर्मातीत बनण्याची धुन लावा"

आज शिव बाबा आपल्या शाळीग्राम मुलांसोबत आपली आणि मुलांच्या अवतरणाची जयंती साजरी करण्यासाठी आले आहेत. ही अवतरणाची जयंती किती वंडरफुल आहे, जी बाबा मुलांना आणि मुले बाबांना पद्मापदम वेळा मुबारक देत आहेत. चोहो बाजूंची मुले आनंदामध्ये नाचत आहेत - 'वाह बाबा, वाह आम्ही शाळीग्राम आत्मे! वाह! वाह!' चे गाणे गात आहेत. या आपल्या जन्म दिवसाची यादगार (आठवण) द्वापरपासून आत्तापर्यंत भक्त देखील साजरे करत राहतात. भक्त देखील भावनेमध्ये कमी नाहीत. परंतु भगत आहेत, मुले नाहीत. ते दरवर्षी साजरे करतात आणि तुम्ही साऱ्या कल्पामध्ये एकदाच अवतरणाचे महत्व साजरे करता. ते दरवर्षी व्रत ठेवतात, व्रत ठेवतात देखील आणि व्रत घेतात देखील. तुम्ही एकदाच व्रत घेता, तुमचीच कॉपी केली आहे परंतु तुमचे महत्व आणि त्यांच्या यादगारचे (आठवणीचे) महत्व यामध्ये अंतर आहे. ते देखील पवित्रतेचे व्रत घेतात परंतु दरवर्षी एका दिवसासाठी व्रत घेतात. तुम्ही देखील सर्वांनी जन्म घेताच एकदाच पवित्रतेचे व्रत घेतले आहे ना! घेतले आहे कि घ्यायचे आहे? घेतले आहे. तुम्ही एकदा घेतले आहे, ते वर्षानुवर्षे घेतात. सर्वांनी घेतले आहे का? फक्त ब्रह्मचर्य नाही, संपूर्ण पवित्रतेचे व्रत घेतले आहे. पांडव, संपूर्ण पवित्रतेचे व्रत घेतले आहे का? कि फक्त ब्रह्मचर्या मध्येच ठीक आहे! ब्रह्मचर्य तर फाउंडेशन आहे परंतु फक्त ब्रह्मचर्य नाही सोबत आणखी चार देखील आहेत. चारही गोष्टींचे व्रत घेतले आहे कि फक्त एकाचे घेतले आहे? चेक करा. क्रोध करायची तरी सुट आहे ना? सुट नाही आहे? थोडा-थोडा तरी क्रोध करावा लागतो ना? नाही करावा लागत? बोला पांडव, क्रोध करावा लागत नाही का? करावा तर लागतो! चला, बापदादांनी पाहिले की क्रोध आणि सर्व साथीदार जे आहेत, महाभूताचा तर त्याग केला आहे परंतु जसे मातांना, प्रवृत्ति वाल्यांना मोठ्या मुलांवर इतके प्रेम नसते, मोह नसतो परंतु नातवंडांवर खूप असतो. छोटी-छोटी मुले खूप गोड वाटतात. तर बापदादांनी बघितले की मुलांना देखील ही ५ विकारांची जी महाभूते आहेत, महारूप त्यांच्यावरील प्रेम तर कमी झाले आहे परंतु या विकारांचे जे बालबच्चे आहेत ना, छोटे-छोटे अंश मात्र, वंश मात्र, त्यांच्यावर अजूनही थोडे-थोडे प्रेम आहे. आहे प्रेम! कधी-कधी प्रेम तर होतेच. होते का? मातांनो? डबल फॉरेनर्स, क्रोध येत नाही का? बरीच मुले मोठ्या चतुराईच्या गोष्टी करतात, ऐकवू काय म्हणतात? ऐकवू का? जर ऐकवले तर आज सोडावे लागेल. तयार आहात? तयार आहात, सोडणार? कि फक्त फाईलमध्ये कागद जमा करणार? जसे दरवर्षी करता ना, प्रतिज्ञेच्या फाईल्स बाबांकडे खूप-खूप मोठ्या झाल्या आहेत, तर अजूनही असे तर नाही की, प्रतिज्ञेचा अजून एक कागद फाईल मध्ये ॲड कराल, असे तर नाही ना! फायनल कराल कि फाईल मध्ये टाकाल? काय कराल? बोला, टीचर्स काय करणार? फायनल? हात वर करा. असाच वायदा करू नका. बापदादा मग थोडेसे रूप धारण करतील (धर्मराजाचे रूप धारण करतील). ठीक आहे. डबल फॉरेनर्स - करणार फायनल? जे फायनल करतील त्यांनी हात वर करा. टी. व्ही. मध्ये फोटो काढा. छोटा त्रेतायुगी हात नाही, मोठा हात वर करा. अच्छा, ठीक आहे.

ऐका, बाबांच्या आणि मुलांच्या काय गोष्टी होतात? बापदादा हसत राहतात. बाबा म्हणतात - 'क्रोध का केलास?' तर म्हणतात - 'मी नाही केला, परंतु क्रोध करायला लावला गेला. केला नाही, माझ्याकडून करवला गेला.' आता बाबा काय म्हणणार? मग काय म्हणतात, तुम्ही जरी असता ना तर तुम्हाला देखील आला असता. गोड-गोड गोष्टी करतात ना! मग म्हणतात निराकार ऐवजी साकार शरीर घेऊन बघा. आता सांगा अशा गोड मुलांना बाबा काय सांगणार! बाबांना तरी देखील दयाळु बनावेच लागते. म्हणतात अच्छा, आता माफ करत आहे परंतु पुन्हा कधी क्रोध करायचा नाही. परंतु उत्तरे तर खूप छान-छान देतात.

तर पवित्रता तुम्हा ब्राह्मणांचा सर्वात मोठ्यात मोठा शृंगार आहे, म्हणून तुमच्या चित्रांचा किती शृंगार करतात. हे पवित्रतेचे यादगार (प्रतीक) शृंगार आहे. पवित्रता, संपूर्ण पवित्रता, कामचलाऊ पवित्रता नाही. संपूर्ण पवित्रता तुम्हा ब्राह्मण जीवनाची सर्वात मोठ्यात मोठी प्रॉपर्टी आहे, रॉयल्टी आहे, पर्सनॅलिटी आहे. म्हणूनच तर भक्त लोक देखील एक दिवस पवित्रतेचे व्रत ठेवतात. ही तुमची कॉपी केली आहे. दुसरे व्रत घेतात - खाण्या-पिण्याचे. खाण्या-पिण्याचे व्रत देखील आवश्यक आहे. कशासाठी? तुम्ही ब्राह्मणांनी देखील खाण्या-पिण्याचे पक्के व्रत

घेतले आहे ना! जेव्हा मधुबन येण्यासाठी सर्वांकडून फॉर्म भरून घेता, तेव्हा हे देखील फॉर्ममध्ये भरून घेता ना - 'खाणे-पिणे शुद्ध आहे?' भरून घेता ना! तर खाण्या-पिण्याचे व्रत पक्के आहे? पक्के आहे कि कधी-कधी कच्चे होते? डबल विदेशींचे तर डबल पक्के असेल ना! डबल विदेशींचे तर डबल पक्के आहे ना कि कधी थकून जाता तर म्हणता अच्छा आज थोडेसे खाऊया. थोडे ढिले करता, नाही. खाण्या-पिण्याचे पक्के आहे, म्हणून भक्त लोक देखील खाण्या-पिण्याचे व्रत घेतात. तिसरे व्रत घेतात जागरणाचे - रात्री जागतात ना! तर तुम्ही ब्राह्मण देखील अज्ञान निद्रेमधून जागण्याचे व्रत घेता. मधे-मधे अज्ञानरुपी झोप तर नाही येत ना! भक्त लोक तुम्हाला कॉपी करत आहेत, तर तुम्ही पक्के आहात म्हणून तर कॉपी करत आहेत. कधीही अज्ञान अर्थात दुर्बलतेची, निष्काळजीपणाची, आळशीपणाची झोप येऊ नये. कि थोडी-थोडी डुलकी आली तरी काही हरकत नाही? डुलकी काढता का? असे अमृतवेलेला देखील बरेचजण डुलक्या काढतात. परंतु हा विचार करा की, आमच्या यादगारमध्ये (स्मृतीरूपामध्ये) भक्त लोक काय-काय कॉपी करत आहेत! ते इतके पक्के राहतात, काहीही होऊ दे, परंतु व्रत तोडत नाहीत. आजच्या दिवशी भक्त लोक व्रत ठेवणार खाण्या-पिण्याचे देखील आणि तुम्ही आज काय करणार? पिकनिक करणार? ते व्रत ठेवणार आणि तुम्ही पिकनिक करणार, केक कापणार ना! पिकनिक करणार कारण तुम्ही जन्मापासूनच व्रत घेतले आहे म्हणून आजच्या दिवशी पिकनिक करणार.

बापदादांना आता मुलांकडून काय पाहिजे आहे? माहित तर आहे. संकल्प खूप चांगले करता, इतके चांगले संकल्प करता जे ऐकून-ऐकून खुश होतात. संकल्प करता परंतु नंतर काय होते? संकल्प कमजोर का होतात? जर इच्छा देखील आहे कारण बाबांवर प्रेम खूप आहे, बाबा देखील जाणतात की बापदादांवर सर्व मुलांचे हृदयापासून प्रेम आहे आणि प्रेमामध्ये सगळे बोट वर करतात की, १०० टक्केच तर काय परंतु १०० टक्क्या पेक्षाही जास्त प्रेम आहे आणि बाबा देखील मानतात प्रेमामध्ये सगळेच उत्तीर्ण आहेत. परंतु काय आहे? 'परंतु' आहे कि नाही? 'परंतु' येते कि नाही येत? पांडव, मधून-मधून 'परंतु' येते का? 'नाही' म्हणत नाही आहेत, म्हणजे 'होय' आहे. बापदादांनी मेजॉरिटी मुलांची एक गोष्ट नोट केली आहे, प्रतिज्ञा कमजोर होण्याचे एकच कारण आहे, एकच शब्द आहे. विचार करा, तो एक शब्द कोणता आहे? टीचर्स बोला, तो एक शब्द कोणता आहे? पांडव बोला, तो एक शब्द कोणता आहे? लक्षात तर आला आहे ना! तो एक शब्द आहे - "मी". अभिमानाच्या रूपामध्ये देखील "मी" येतो आणि कमजोर करण्यामध्ये देखील "मी" येतो. 'मी' जे बोलले, 'मी' जे केले, 'मी' जे वाटते, तेच राइट आहे. तसेच व्हायला हवे. हा अभिमानाचा "मी". "मी" जेव्हा पूर्ण होत नाही ना तेव्हा मन निराश सुद्धा होते - 'मी करू शकत नाही, चालू शकत नाही, खूप कठीण आहे'. एक बॉडी-कॉन्शसवाला (देह-अभिमानवाला) "मी" बदलावा; "मी" स्वमान देखील आठवण करून देतो आणि "मी" देह-अभिमानामध्ये देखील घेऊन येतो. "मी" मनाला दुःखी सुद्धा करतो आणि "मी" मनाला आनंदीत देखील करतो आणि अभिमानाचे लक्षण जाणता का काय असते? कधीही कोणामध्येही जर बॉडी-कॉन्शसचा अभिमान अंश मात्र जरी असेल तर त्याची निशाणी काय असेल? तो आपला अपमान सहन करू शकणार नाही. अभिमान अपमान सहन करू देणार नाही. जरा देखील कोणी म्हटले ना की, हे बरोबर नाही, थोडे निर्माण बना, तर अपमान वाटेल, हे अभिमानाचे लक्षण आहे.

बापदादा वतनमध्ये हसत होते - ही मुले शिवरात्रीला जिकडे-तिकडे भाषणे करतात ना, आता खूप भाषणे करत आहात ना. त्यामध्ये म्हणतात, बापदादांना मुलांचा एक पॉईंट आठवला. तर त्यामध्ये म्हणतात की, शिवरात्रीला बकऱ्याचा बळी दिला जातो - तो बकरा में-में खूप करतो ना, तर असे शिवरात्रीला या "मी" "मी" चा बळी द्या. तर बाबा ऐकून-ऐकून हसत होते. तर या "मी" चा तुम्ही देखील बळी द्या. सरेंडर करू शकता? करू शकता ना? पांडव करू शकता का? डबल फॉरेनर्स करू शकता का? संपूर्ण सरेंडर का फक्त सरेंडर? संपूर्ण सरेंडर. आज बापदादा झेंडा फडकवताना अशीच प्रतिज्ञा करून घेणार नाहीत. आज प्रतिज्ञा करा आणि फाईल मध्ये कागद जमा करावा लागेल, अशी प्रतिज्ञा करून घेणार नाहीत. काय विचार करता, दादी आज देखील अशीच प्रतिज्ञा करवून घ्यायची का? फायनल करणार कि फाईल मध्ये जमा करणार? बोला, (फायनल करा) हिंमत आहे? हिंमत आहे ना? ऐकण्यामध्ये मग्न झाले आहेत, हात वर करत नाहीत. उद्या तर काही होणार नाही! नाही ना! उद्या माया फेरी मारायला येईल. मायेचे देखील तुमच्यावर प्रेम आहे ना कारण आजकाल तर सर्वजण धुमधडाक्यात सेवेचे प्लॅन बनवत आहात ना. जेव्हा सेवा जोमाने करत आहात तर सेवा जोमाने करणे म्हणजेच संपूर्ण समाप्तीच्या वेळेला समीप आणणे आहे. असे समजू नका भाषण करून आलो परंतु समयाला समीप आणत आहात. सेवा चांगली करत आहात. बापदादा खुश आहेत. परंतु बापदादा बघत आहेत की, वेळ जवळ येत आहे, घेऊन येत आहात तुम्ही,

असेच लाख-दीड लाख एकत्र नाही केलात, हे समयाला समीप आणले आहे. आता गुजरातने केले, मुंबई करेल, बाकीचे देखील करत आहेत. चला लाख नाही तर किमान ५० हजार तरी, परंतु संदेश देत आहात तर संदेशा सोबतच संपन्नतेची देखील तयारी आहे? तयारी आहे का? विनाशाला बोलावत आहात म्हणजे तयारी आहे? दादीने प्रश्न केला होता की, 'आता कोणता असा प्लॅन बनवू ज्यामुळे लवकरात-लवकर प्रत्यक्षता होईल?' तर बापदादा म्हणत आहेत - 'प्रत्यक्षता तर सेकंदाची गोष्ट आहे परंतु प्रत्यक्षतेच्या अगोदर बापदादा विचारत आहेत स्थापना करणारे एव्हररेडी आहेत? पडदा उघडू? का कोणी कानाचा शृंगार करत असेल, कोणी मस्तकाचा? तयार आहात? होणार, कधी होणार? डेट सांगा. जशी आता डेट फिक्स केली ना! या महिन्यामध्ये संदेश द्यायचा आहे, असे सर्व एव्हररेडी, कमीतकमी १६००० तर एव्हररेडी असावेत, ९ लाख सोडा, त्याला देखील सोडा. १६ हजार तरी तयार व्हावेत? आहेत तयार? टाळी वाजवू? असेच 'होय' म्हणायचे नाही. एव्हररेडी व्हा तर बापदादा टच करेल, टाळी वाजवेल, प्रकृती आपले काम सुरू करेल. सायन्स वाले आपले काम सुरु करतील. उशीर कशाला, सर्व रेडी आहेत. १६ हजार तयार आहेत? आहेत तयार? होतील. (तुम्हाला जास्ती माहिती आहे) हे उत्तर तर सुटका करून घेणारे आहे. १६ हजाराचा रिपोर्ट आला पाहिजे - एव्हररेडी, संपूर्ण पवित्रतेने संपन्न झाले. बापदादांना टाळी वाजवायला काही वेळ लागत नाही. डेट सांगा. (तुम्ही डेट द्या) सर्वांना विचारा. पहा, होणार तर आहेच परंतु जे ऐकवले एक "मी" शब्दाचे संपूर्ण परिवर्तन, तेव्हाच बाबांसोबत जाणार. नाहीतर मागे-मागे चालावे लागेल. बाप-दादा म्हणून आता अजून गेट उघडत नाहीत कारण सोबत जायचे आहे.

ब्रह्मा बाबा सर्व मुलांना विचारत आहेत की, गेट उघडण्याची तारीख सांगा. गेट उघडायचे आहेत ना! यायचे आहे ना! आज साजरे करणे अर्थात बनणे. फक्त केक कट करायचा नाही परंतु 'मी'ला नष्ट करायचे. विचार करत आहात कि विचार केलेला आहे? कारण की बापदादांपाशी अमृतवेलेला सर्वांचे खूप व्हरायटी संकल्प पोहोचतात. तर आपसामध्ये विचार-विमर्श करा आणि बाबांना डेट सांगा. जोपर्यंत डेट फिक्स करत नाही ना, तोपर्यंत कोणतेही कार्य होत नाही. पहिल्यांदा महारथी आपसामध्ये डेट फिक्स करा मग सर्वजण फॉलो करतील. फॉलो करणारे तयार आहेत आणि तुमच्या हिंमतीमुळे आणखी बळ मिळेल. जसे बघा आत्ता उमंग-उल्हास दिला तर तयार झाले ना! असा संपन्न बनण्याचा प्लॅन बनवा. ध्यास घ्या (धुन लावा) की, कर्मातीत बनायचेच आहे. काहीही होवो, बनायचेच आहे, करायचेच आहे, व्हायचेच आहे. सायन्सवाल्यांचा देखील आवाज, विनाश करणाऱ्यांचा सुद्धा आवाज बाबांच्या कानापर्यंत येतो, ते देखील म्हणतात - 'थांबवता कशाकरिता, थांबवता कशाकरिता...' ॲडव्हान्स पार्टी देखील म्हणते डेट फिक्स करा, डेट फिक्स करा. ब्रह्मा बाबा देखील म्हणतात डेट फिक्स करा. तर ही मिटिंग करा. बापदादांना आता इतके दुःख पहावत नाही आहे. पहिल्यांदा तर तुम्हा शक्तींना, देवता रूप पांडवांना दया आली पाहिजे. किती धावा करत आहेत. आता तुमच्या कानांमध्ये हाका मारण्याचा आवाज घुमला पाहिजे. 'समय की पुकार' कार्यक्रम करता ना! आता भक्तांची हाक देखील ऐका, दुःखी असणाऱ्यांची हाक देखील ऐका. सेवेमध्ये नंबर चांगला आहे, हे तर बापदादा सुद्धा सर्टिफिकेट देतात, उमंग-उत्साह चांगला आहे, गुजरातने पहिला नंबर लावला, तर पहिल्या नंबरसाठी मुबारक आहे. आता थोडीशी हाक सुद्धा ऐका तर खरी, बिचारे खूप हाका मारत आहेत, अंतःकरणापासून बोलावत आहेत, तळमळत आहेत. विज्ञानवाले देखील खूप ओरडत आहेत - 'कधी करायचे, कधी करायचे, कधी करायचे', अशी हाक मारत आहेत. आज भले केक कापा, परंतु उद्यापासून हाक ऐका. स्वहेज (उत्सव) तर संगमयुगातील साजरे करायचे आहेत. एका बाजूला साजरे करायचे दुसऱ्या बाजूला आत्म्यांना तयार करायचे. अच्छा. तर काय ऐकलेत?

तुमचे एक गाणे आहे - 'दुःखियों पर कुछ रहम करो'. तुमच्या शिवाय कोणीही दया करू शकत नाहीत म्हणून आता समयानुसार दयेचे मास्टर सागर बना. स्वतःवर देखील दया, अन्य आत्म्यांप्रति देखील दया. आता आपले हेच स्वरूप लाईट हाऊस बनून विविध लाईट्सची किरणे द्या. साऱ्या विश्वातील अप्राप्त आत्म्यांना प्राप्तीच्या ओंजळीची किरणे द्या. अच्छा.

सर्व साक्षात् बाप मूर्त श्रेष्ठ आत्म्यांना, सदैव उमंग-उत्साहामध्ये राहणाऱ्या बाबांच्या समीप आत्म्यांना, सदैव सर्व पावले बाप समान करणाऱ्या मुलांना, चोहो बाजूंच्या ब्राह्मण जन्मातील मुबारक पात्र मुलांना, सदैव एकाग्रतेच्या शक्ति संपन्न आत्म्यांना बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि पद्मा-पदम वेळा जन्म मुबारक असो, मुबारक असो, मुबारक असो आणि नमस्ते.

प्रिय अव्यक्त बापदादांनी आपल्या हातांनी शिव ध्वज फडकवला आणि सर्वांचे अभिनंदन केले:-

आजच्या दिवशी सर्वांनी आपल्या जन्म दिवसाची मुबारक दिली आणि घेतली आणि झेंडा देखील फडकवला. परंतु आता तो दिवस लवकर आणायचा आहे जो विश्वाच्या ग्लोबवर सर्व आत्मे उभे राहून तुम्हा सर्वांच्या चेहऱ्यामध्ये बाबांचा झेंडा पाहतील. कपड्याचा झेंडा तर निमित्त मात्र आहे परंतु प्रत्येक मुलाचा चेहरा बाबांचे चित्र दाखवू दे. असा झेंडा फडकवायचा आहे. तो दिवस देखील खूप-खूप-खूप लवकर आणायचा आहे, येणार आहे, येणार आहे. ओम् शांति.

वरदान:- हदच्या रॉयल इच्छां पासून मुक्त राहून सेवा करणारे नि:स्वार्थ सेवाधारी भव

जसे ब्रह्मा बाबांनी कर्मांच्या बंधनांपासून मुक्त, न्यारे बनण्याचा पुरावा दिला. सेवेच्या आणि स्नेहाच्या व्यतिरिक्त इतर कोणतेही बंधन नाही. सेवेमध्ये ज्या हदच्या रॉयल इच्छा असतात त्या देखील कर्मांच्या हिशोबाच्या बंधनामध्ये बांधतात, खरे सेवाधारी या हिशोबा पासून देखील मुक्त राहतात. जसे देहाचे बंधन, देहाच्या संबंधाचे बंधन आहे, तसे सेवेमध्ये स्वार्थ - हे देखील बंधन आहे. या बंधनापासून अथवा रॉयल हिशोबा पासून देखील मुक्त निःस्वार्थ सेवाधारी बना.

सुविचार:- वायद्यांना फाईलमध्ये ठेवू नका, फायनल बनून दाखवा.

||| ओम शांती |||

सूचना:- आज महिन्याचा तिसरा रविवार आंतरराष्ट्रीय योग दिवस आहे, सर्व ब्रह्मा वत्स संगठीत रूपामध्ये सायंकाळी ६.३० ते ७.३० वाजे पर्यंत विशेष मूलवतनच्या गहन शांतीचा अनुभव करा. मन-बुद्धीला एकाग्र करून ज्वाला स्वरूपामध्ये स्थित व्हा, संपन्नता आणि संपूर्णतेचा अनुभव करा.

16.12.2024 प्रभात:मुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - हे पावन बनण्याचे शिक्षण बाकी सर्व शिक्षणापेक्षा सोपे आहे, हे शिक्षण लहान, तरुण, वृद्ध सर्वजण शिकू शकतात, फक्त ८४ जन्मांना जाणून घ्यायचे आहे"

प्रश्न:- प्रत्येक लहान अथवा मोठ्यांना कोणती एक प्रॅक्टिस नक्कीच केली पाहिजे?

उत्तर:- प्रत्येकाने मुरली चालविण्याची प्रॅक्टिस जरूर केली पाहिजे कारण तुम्ही मुरलीधराची मुले आहात. जर मुरली चालवत नसाल तर उच्च पद प्राप्त करू शकणार नाही. कोणाला ऐकवत रहाल तर मुख उघडेल (ज्ञान ऐकवण्याचा आत्मविश्वास येईल). तुम्हा प्रत्येकाला बाप समान टीचर जरूर बनायचे आहे. जे शिकता ते शिकवायचे आहे. लहान मुलांना देखील हे शिक्षण शिकण्याचा अधिकार आहे. ते देखील बेहदच्या बाबांचा वारसा घेण्यासाठी पात्र आहेत.

ओम् शांती. आता येत आहे शिवबाबांची जयंती. त्यावर कशा पद्धतीने समजावून सांगितले पाहिजे? बाबांनी तुम्हाला समजावून सांगितले आहे तसे तुम्हाला मग इतरांना समजावून सांगायचे आहे. असे तर नाही, बाबा जसे तुम्हाला शिकवतात तसे बाकी सर्वांना पण बाबांनीच शिकवायचे आहे. शिवबाबांनी तुम्हाला शिकवले आहे, जाणता या शरीराद्वारे शिकवले आहे. बरोबर आम्ही शिवबाबांची जयंती साजरी करतो. आम्ही नाव देखील शिवाचे घेतो, ते तर आहेतच निराकार. त्यांना शिव म्हटले जाते. ते लोक म्हणतात - 'शिव तर जन्म-मरण रहित आहेत'. त्यांची मग जयंती कशी असेल? हे तर तुम्ही जाणता कसे नंबरवार साजरी करत येतात. साजरी करतच राहतील. तर त्यांना समजावून सांगावे लागेल. बाबा येऊन, या तनाचा आधार घेतात. मुख तर जरूर हवे, म्हणून गोमुखाचीच महिमा आहे. हे रहस्य जरा अवघड आहे. शिवबाबांच्या ऑक्युपेशनला (कार्यप्रणालीला) समजून घ्यायचे आहे. आमचे बेहदचे बाबा आलेले आहेत, त्यांच्याकडूनच आम्हाला बेहदचा वारसा मिळतो. बरोबर भारताला बेहदचा वारसा होता इतर कोणालाच नसतो. भारतालाच सचखंड म्हटले जाते आणि बाबांना देखील ट्रूथ (सत्य) म्हटले जाते. तर या गोष्टी समजावून सांगाव्या लागतात. कोणाला मग इतक्या लगेच समजत नाही आणि काहींना तर लगेच समजते. हा योग आणि शिक्षण दोन्ही बुद्धीतून निसटून जाणाऱ्या गोष्टी आहेत. त्यातही योग जास्त निसटतो. नॉलेज तर बुद्धीमध्ये राहतेच बाकी आठवणच क्षणो-क्षणी विसरतात. नॉलेज तर तुमच्या बुद्धीमध्ये आहेच की, आपण कसे ८४ जन्म घेतो, ज्यांना हे नॉलेज आहे तेच बुद्धीद्वारे समजू शकतात की, जे पहिल्या नंबरमध्ये येतात तेच ८४ जन्म घेतील. पहिले उच्च ते उच्च लक्ष्मी-नारायणाला म्हणणार. नरापासून नारायण बनण्याची कथा देखील प्रसिद्ध आहे. पौर्णिमेच्या दिवशी अनेक ठिकाणी सत्यनारायणाच्या कथेचे पारायण चालते. आता तुम्ही जाणता - आपण खरोखरच बाबांद्वारे नरापासून नारायण बनण्याचे शिक्षण शिकत आहोत. हे आहे पावन बनवण्याचे शिक्षण, आणि आहे देखील इतर सर्व शिक्षणापेक्षा अगदी सोपे. ८४ जन्मांच्या चक्राला जाणून घ्यायचे आहे शिवाय हे शिक्षण मग सर्वांसाठी एकच आहे. वृद्ध, लहान, तरुण जे कोणी असेल सर्वांसाठी एकच शिक्षण आहे. लहान मुलांना देखील अधिकार आहे. जर आई-वडील छोट्यांना थोडे-थोडे शिकवत राहिल्यास, वेळ तर भरपूर आहे. मुलांना देखील हे शिकवले जाते की, शिवबाबांची आठवण करा. आत्मा आणि शरीर दोघांचे पिता वेगवेगळे आहेत. आत्मा संतान निराकारी आहे तर पिता देखील निराकारी आहेत. हे देखील तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये आहे ते निराकार शिवबाबा आपले पिता आहेत, किती सूक्ष्म आहेत. हे चांगल्या प्रकारे लक्षात ठेवायचे आहे. विसरता कामा नये. आपण आत्मा देखील बिंदू प्रमाणे सूक्ष्म आहोत. असे नाही, वरती (परमधाममध्ये) गेलो तर मोठी दिसेल, खाली छोटी होईल. नाही, ती तर आहे बिंदू. वर जाल तर तुम्हाला दिसूनही येणार नाही. बिंदू आहे ना. बिंदू कशी काय दिसून येणार. या गोष्टींवर मुलांनी चांगल्या प्रकारे विचारही करायचा आहे. मी आत्मा वरून (परमधामवरून) आले आहे, शरीराद्वारे पार्ट बजावण्याकरिता. आत्मा लहान-मोठी होत नाही. अवयव आधी लहान, नंतर मोठे होतात.

आता जसे तुम्हाला समजले आहे तसे मग इतरांना समजावून सांगायचे आहे. हे तर नक्की आहे नंबरवार ज्याने जितका अभ्यास केला आहे तेवढेच शिकवतात; सर्वांना टीचर देखील जरूर बनायचे आहे, इतरांना

शिकविण्याकरिता. बाबांमध्ये तर नॉलेज आहे, ते अति सूक्ष्म परम-आत्मा आहेत, कायम परमधामामध्ये राहतात. इथे एकदाच संगमावर येतात. बाबांना बोलावतात देखील तेव्हाच जेव्हा अतिशय दुःखी होतात. म्हणतात - 'येऊन आम्हाला सुखी बनवा'. मुले आता जाणतात आम्ही बोलावत राहतो - 'बाबा, येऊन आम्हाला पतित दुनियेमधून नव्या सतयुगी सुखी पावन दुनियेमध्ये घेऊन चला किंवा तिथे जाण्याचा रस्ता सांगा'. ते देखील जेव्हा स्वतः येतील तेव्हाच तर रस्ता सांगतील. ते येणार तेव्हाच जेव्हा दुनियेला बदलायचे असेल. या अतिशय सोप्या गोष्टी आहेत, नोटडाऊन करून ठेवायचे आहे. बाबांनी आज हे समजावून सांगितले आहे, आम्ही देखील असे समजावून सांगतो. अशी प्रॅक्टिस करता-करता तुमचे मुख उघडेल (ज्ञान चांगले समजावून सांगू लागाल). तुम्ही मुरलीधराची मुले आहात, तुम्हाला जरूर मुरलीधर बनायचे आहे. जेव्हा इतरांचे कल्याण कराल तेव्हाच तर नवीन दुनियेमध्ये उच्च पद मिळवाल. ते शिक्षण (लौकिक शिक्षण) तर आहे इथल्यासाठी. हे आहे भविष्य नवीन दुनियेकरिता. तिथे तर कायम सुखच सुख आहे. तिथे ५ विकार त्रास देणारे असतच नाहीत. इथे रावणराज्य अर्थात परक्या राज्यामध्ये आपण आहोत. तुम्हीच आधी आपल्या राज्यामध्ये होता. तुम्ही म्हणाल - नवीन दुनिया, आणि मग भारतालाच जुनी दुनिया म्हटले जाते. गायन देखील आहे - 'नव्या दुनियेमध्ये भारत...' असे म्हणणार नाही की, नव्या दुनियेमध्ये इस्लामी, बौद्धी. नाही. आता तुमच्या बुद्धीमध्ये आहे की, बाबा येऊन आम्हा मुलांना जागृत करतात. ड्रामामध्ये पार्टच त्यांचा असा आहे. भारतालाच येऊन स्वर्ग बनवतात. भारतच पहिला देश आहे. भारतच पहिला देश आहे ज्याला स्वर्ग म्हटले जाते. भारताचे आयुर्मान देखील लिमिटेड (सीमित) आहे. लाखो वर्षे म्हणणे हे तर अनलिमिटेड होते. लाखो वर्षांची कोणती गोष्ट आठवूच शकणार नाही. भारत नवा होता, आता जुना भारत असेच म्हणणार. नवीन दुनिया भारतच असेल. तुम्ही जाणता - आपण आता नवीन दुनियेचे मालक बनत आहोत. बाबांनी मत दिले आहे - 'माझी आठवण करा तर तुमची आत्मा नवीन पावन बनेल मग शरीर देखील नवीन मिळेल. आत्मा आणि शरीर दोन्ही सतोप्रधान बनतात. तुम्हाला राज्य मिळतेच सुखाकरिता. हा देखील ड्रामा अनादि बनलेला आहे. नवीन दुनियेमध्ये सुख आणि शांती आहे. तिथे कोणती वादळे इत्यादी नसतात. बेहदच्या शांतीमध्ये सर्व शांत होऊन जातात. इथे आहे अशांती तर सर्व अशांत आहेत. सतयुगामध्ये सर्व शांत असतात. वंडरफुल गोष्टी आहेत ना. हा अनादि पूर्व नियोजित खेळ आहे. या आहेत बेहदच्या गोष्टी. ती हदची बॅरिस्टरी, इंजीनियरिंग इत्यादी शिकतात. आता तुमच्या बुद्धीमध्ये बेहदचे नॉलेज आहे. एकदाच बाबा येऊन बेहदच्या ड्रामाचे रहस्य समजावून सांगतात. पूर्वी तर हे नाव देखील ऐकले नव्हते की बेहदचा ड्रामा कसा चालतो. आता समजता सतयुग-त्रेता जरूर ते होऊन गेले आहे, त्यामध्ये यांचे (लक्ष्मी-नारायणाचे) राज्य होते. त्रेतामध्ये राम-राज्य होते, मागाहून मग अजून इतर धर्म आले आहेत. इस्लामी, बौद्धी, ख्रिश्चन... सर्व धर्मांविषयी संपूर्ण माहिती आहे. हे सर्व गेल्या २५०० वर्षांमध्ये आले आहेत. त्यामध्ये १२५० वर्षे कलियुग आहे. सर्व हिशोब आहे ना. असे तर नाही, सृष्टीचे आयुर्मानच २५०० वर्षे आहे. नाही. अच्छा, मग अजून कोण होते, विचार केला जातो. यांच्या आधी बरोबर देवी-देवता... ते देखील होते तर मनुष्यच परंतु दैवी गुणवाले होते. २५०० वर्षांमध्ये सूर्यवंशी-चंद्रवंशी. बाकी अर्ध्या मध्ये ते (इतर धर्माचे) सर्व होते. यापेक्षा जास्तीचा तर काही हिशोब निघू शकत नाही. पूर्ण, पाऊण, अर्धा, एक चतुर्थांश. चार भाग आहेत. नियमानुसार समान भाग करणार ना. अर्ध्या मध्ये तर हे (देवी-देवता) आहेत. म्हणतात देखील - सतयुगामध्ये सूर्यवंशी राज्य, त्रेतामध्ये चंद्रवंशी रामराज्य - हे तुम्ही सिद्ध करून सांगता. तर जरूर सर्वात जास्त आयुर्मान त्यांचे असेल, जे सर्वप्रथम सतयुगामध्ये येतात. कल्पच मुळी ५ हजार वर्षांचे आहे. ते लोक ८४ लाख योनी म्हणतात आणि कल्पाची आयु देखील लाखो वर्षे म्हणतात. कोणी मानणार सुद्धा नाही. एवढी मोठी दुनिया असू देखील शकत नाही. तर बाबा बसून समजावून सांगत आहेत - ते सर्व आहे अज्ञान आणि हे आहे ज्ञान. ज्ञान कुठून आले - हे देखील कोणालाच माहित नाही आहे. ज्ञानाचा सागर तर एक बाबाच आहेत, तेच ज्ञान देतात मुखाद्वारे. म्हणतात गो-मुख. या गो-मातेद्वारे (ब्रह्मा द्वारे) तुम्हा सर्वांना ॲडॉप्ट करतात. या थोड्याशा गोष्टी समजावून सांगणे तर खूप सोपे आहे. एक दिवस सांगून मग सोडून द्याल तर बुद्धी मग दुसऱ्या-दुसऱ्या गोष्टींमध्ये गुंतून जाईल. शाळेमध्ये एक दिवस शिकतात की नियमित शिक्षण घेतले जाते! ज्ञान काही एका दिवसामध्ये समजू शकत नाही. बेहदचे बाबा आपल्याला शिकवत आहेत तर जरूर बेहदचे शिक्षण असेल. बेहदचे राज्य देतात. भारतामध्ये बेहदचे राज्य होते ना. हे लक्ष्मी-नारायण बेहदचे राज्य करत होते. या गोष्टी कोणाच्या स्वप्नामध्ये देखील नाही आहेत, ज्यामुळे विचारतील की, यांनी कसे राज्य घेतले? त्यांच्यामध्ये प्युरीटी (पवित्रता) जास्त होती, योगी आहेत ना म्हणून आयुर्मान देखील जास्त असते. आम्हीच योगी होतो. मग ८४ जन्म घेऊन भोगी देखील जरूर बनायचे आहे. मनुष्य जाणत नाहीत की हे देखील जरूर पुनर्जन्मा मध्ये आले असतील. यांना भगवान-भगवती म्हटले जात नाही. यांच्या आधी तर कोणीच नाहीये

ज्याने ८४ जन्म घेतले असतील. सर्वप्रथम जे सतयुगामध्ये राज्य करतात तेच ८४ जन्म घेतात मग नंबरवार खाली येतात (पतन होते). मी आत्मा सो देवता बनणार मग हम सो क्षत्रिय... डिग्री (कला) कमी होईल. गायले देखील जाते पूज्य सो पुजारी. सतोप्रधानापासून मग तमोप्रधान बनतात. असे पुनर्जन्म घेत-घेत रसातळाला जातील. हे किती सोपे आहे. परंतु माया अशी आहे जी सर्व गोष्टींचा विसर पाडते. हे सर्व पॉईंट्स एकत्र करून पुस्तक इत्यादी बनवावे, परंतु ते तर काही राहणार नाही. हे टेम्परारी आहे. बाबांनी काही गीता ऐकवली नव्हती. बाबा तर जसे आता समजावून सांगत आहेत, असेच आधी देखील समजावून सांगितले होते. वेद-शास्त्र इत्यादी ही सर्व नंतर बनतात. हा सर्व होल लॉट (वेद-शास्त्रे-पुराणे इत्यादी) जी आहेत, तर जेव्हा विनाश होईल तेव्हा हे सर्व जळून जाईल. सतयुग-त्रेतामध्ये कोणता धर्मग्रंथ असत नाही नंतर भक्ती मार्गामध्ये बनतात. किती गोष्टी बनतात. रावणाला देखील बनवतात परंतु समजून न घेता. काहीही सांगू शकत नाहीत. बाबा म्हणतात - हा रावण दरवर्षी बनवतात आणि जाळतात, तर जरूर हा मोठा शत्रू आहे. परंतु शत्रू कसा आहे, हे कोणीही जाणत नाहीत. ते (दुनियावाले) समजतात सीतेला चोरून घेऊन गेला म्हणून कदाचित शत्रू आहे. रामाच्या सीतेला चोरून घेऊन जात असेल तर मोठा डाकू झाला ना! मग ही चोरी कधी केली! त्रेतामध्ये म्हणा किंवा त्रेताच्या शेवटी. या गोष्टींवर देखील विचार केला जातो. अशी कधी चोरीला गेली पाहिजे! कोणत्या रामाची सीता चोरीला गेली? राम-सीतेचे देखील राज्य चालले का? एकच राम-सीता चालत आले आहेत का? ही तर शास्त्रांमध्ये जशी एक कहाणी लिहिलेली आहे. विचार केला जातो - कोणती सीता? १२ राम-सीता (१२ गाद्या) असतात ना. तर कोणत्या सीतेला चोरले? जरूर शेवटची असेल. हे जे म्हणतात - रामाची सीता चोरली गेली. आता रामाच्या राज्यामध्ये सर्वकाळ एकाचेच तर राज्य नसेल. जरूर घराणी असतील. तर कोणत्या नंबरची सीता चोरीला गेली? या सर्व खूप समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. तुम्ही मुले अतिशय शांतीने कोणालाही हे सर्व रहस्य समजावून सांगू शकता.

बाबा समजावून सांगतात की, भक्ति मार्गामध्ये मनुष्य भटकून-भटकून किती दुःखी झाले आहेत. जेव्हा अति दुःखी होतात तेव्हा आक्रोश करतात - 'बाबा, या दुःखातून सोडवा'. रावण काही कोणती वस्तू तर नाही आहे ना. जर आहे तर मग आपल्या राजाला दरवर्षी मारतो कशासाठी! आणि मग रावणाची जरूर पत्नी देखील असेल. मंदोदरी दाखवतात. मंदोदरीचा पुतळा बनवून जाळला, असे कधीच पाहिलेले नाही. तर बाबा बसून समजावून सांगतात - ही आहेच 'झूठी माया, झूठी काया...' आता तुम्ही खोट्या मनुष्यापासून सच्चे देवता बनण्यासाठी बसले आहात. फरक तर झाला ना! तिथे तर नेहमी सत्य बोलाल. तो आहे सचखंड. हा आहे झूठखंड. त्यामुळे खोटेच बोलत राहतात. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) ज्ञान सागर बाबा जे रोज बेहदचे शिक्षण देतात, त्यावर विचार सागर मंथन करायचे आहे. जे शिकले आहात ते इतरांना देखील जरूर शिकवायचे आहे.
2. २) हा बेहदचा ड्रामा कसा चालत आहे, हा अनादि पूर्व नियोजित वंडरफुल ड्रामा आहे, या रहस्याला चांगल्या रीतीने समजून घेऊन मग इतरांना समजावून सांगायचे आहे.

वरदान:- पवित्रतेच्या श्रेष्ठ धारणे द्वारा एका धर्माचे संस्कारवाले समर्थ सम्राट भव

तुमच्या स्वराज्याचा धर्म अर्थात धारणा आहे "पवित्रता". एक धर्म अर्थात एक धारणा. स्वप्न अथवा संकल्प मात्र देखील अपवित्रता अर्थात दुसरा धर्म असू नये कारण जिथे पवित्रता आहे तिथे अपवित्रता अर्थात व्यर्थ किंवा विकल्पाचे नामोनिशाण असणार नाही. असे संपूर्ण पवित्रतेचे संस्कार भरणारेच 'समर्थ सम्राट' आहेत. आत्ताच्या श्रेष्ठ संस्कारांच्या आधारावर भविष्य संसार बनतो. आत्ताचे संस्कार भविष्य संसाराचे फाउंडेशन आहे.

बोधवाक्य:- विजयी रत्न तेच बनतात ज्यांचे सच्चे प्रेम एका परमात्म्यावर आहे.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - तुम्ही बाबांकडे आले आहात आपले सौभाग्य बनविण्यासाठी, परम सौभाग्य त्या मुलांचे आहे - ज्यांचे ईश्वर सर्व काही स्वीकार करतात"

प्रश्नः- मुलांच्या कोणत्या एका चुकीमुळे माया खूप बलवान बनते?

उत्तरः- मुले भोजनाच्या वेळी बाबांना विसरून जातात, बाबांना खाऊ न घातल्यामुळे भोजन माया खाऊन टाकते, ज्यामुळे ती बलवान बनते, मग मुलांनाच हैराण करते. ही छोटीशी चूक मायेसमोर मुलांना पराभूत करते म्हणून बाबांची आज्ञा आहे - मुलांनो, आठवणीमध्ये खा. पक्का प्रण करा - 'तुम्हीं से खाऊं...' जेव्हा आठवण कराल तेव्हा ते संतुष्ट होतील.

गीतः- आज नहीं तो कल बिखरेंगे यह बादल...

ओम् शांती. मुले समजतात की आता आपले दुर्दैवाचे दिवस बदलून आता कायमसाठी सौभाग्याचे दिवस येत आहेत. नंबरवार पुरुषार्थानुसार भाग्य बदलतच राहते. शाळेमध्ये देखील नशीब बदलत जाते ना अर्थात प्रगती करत पुढे जातात. तुम्ही चांगल्या रीतीने जाणता - आता ही रात्र संपणार आहे, आता नशीब बदलत आहे. ज्ञान वर्षा होत राहते. हुशार मुले समजतात - खरोखर आपण दुर्दैवी पासून सौभाग्यशाली बनत आहोत अर्थात स्वर्गाचे मालक बनत आहोत. नंबरवार पुरुषार्थानुसार आपण आपले दुर्भाग्य सौभाग्यामध्ये बदलत आहोत. आता रात्री नंतर दिवस होत आहे. हे तुम्हा मुलांच्या व्यतिरिक्त कोणालाच माहिती नाहीये. बाबा गुप्त आहेत तर त्यांच्या गोष्टी देखील गुप्त आहेत. भले मनुष्यांनी बसून सहज राजयोग सहज ज्ञानाच्या गोष्टी शास्त्रांमध्ये लिहिल्या आहेत परंतु ज्यांनी लिहिले आहे ते तर मरून गेले. बाकी जे काही वाचतात ते काहीच समजू शकत नाहीत कारण अज्ञानी आहेत. किती अंतर आहे. तुम्ही देखील नंबरवार पुरुषार्थानुसार समजता. सर्वजण नेहमीच एकसमान पुरुषार्थ करत नाहीत. दुर्भाग्य कशाला म्हटले जाते, सौभाग्य कशाला म्हटले जाते - हे केवळ तुम्ही ब्राह्मणच जाणता. बाकीचे तर सर्व घोर अंधारामध्ये आहेत. त्यांना समजावून सांगून जागे करायचे आहे. सौभाग्यशाली म्हटले जाते सूर्यवंशींना, तेच १६ कला संपूर्ण आहेत. जे बाबा स्वर्ग रचणारे आहेत त्या बाबांद्वारे आपण स्वर्गाकरिता सौभाग्य बनवत आहोत. इंग्रजी जाणणाऱ्यांना देखील तुम्ही समजावून सांगू शकता की, 'आम्ही हेवनली गॉडफादर द्वारे हेवनचे सौभाग्य बनवत आहोत. हेवनमध्ये (स्वर्गामध्ये) आहे सुख, हेलमध्ये (नरकामध्ये) आहे दुःख. गोल्डन एज अर्थात सतयुग - सुख, आयरन एज अर्थात कलियुग - दुःख'. एकदम सोपी गोष्ट आहे. आपण सर्व पुरुषार्थ करत आहोत. इंग्रज, ख्रिश्चन इत्यादी भरपूर येतील. तुम्ही बोला, 'आम्ही आता फक्त एकाच हेवनली गॉड फादरची आठवण करतो कारण मृत्यू समोर उभा आहे'. बाबा म्हणतात - तुम्हाला माझ्याजवळ यायचे आहे. जसे तीर्थ स्थानांवर जातात ना. बौद्धांचे आपले तीर्थस्थान आहे, ख्रिश्चनांचे आपले आहे. प्रत्येकाचे रीती-रिवाज आपापले आहेत. आपली आहे बुद्धी योगाची गोष्ट. जिथून पार्ट बजावण्यासाठी आलो आहोत, तिथे परत जायचे आहे. ते आहेत हेवन स्थापन करणारे गॉड फादर. त्यांनी आम्हाला सांगितले आहे, आम्ही देखील तुम्हाला खरा रस्ता सांगतो. पिता गॉड फादरची आठवण करा तर अंत मती सो गती होईल. जेव्हा कोणी आजारी पडतात तर त्यांना सर्वजण जाऊन सावध करतात की, 'राम-राम' म्हणा. बंगालमध्ये जेव्हा कोणी मरणासन्न होतो तर त्याला गंगेवर घेऊन जातात आणि म्हणतात - 'हरी बोल, हरी बोल...' म्हणजे मग हरीकडे निघून जाशील. परंतु असे कोणी जात नाही. सतयुगामध्ये तर असे म्हणणार नाहीत की 'राम-राम' म्हणा किंवा 'हरी' बोला. द्वापर पासून मग हा भक्तिमार्ग सुरू होतो. असे नाही, सतयुगामध्ये काही भगवंताची अथवा गुरूची आठवण केली जाते. तिथे तर केवळ आपल्या आत्म्याची आठवण केली जाते, मी आत्मा एक शरीर सोडून दुसरे घेणार. आपली बादशाही आठवते. समजतात - मी आपल्या राज्यामध्ये जाऊन जन्म घेणार. आता हा पक्का निश्चय आहे, बादशाही तर मिळणारच आहे ना. बाकी कोणाची आठवण करणार अथवा दान-पुण्य करणार? तिथे कोणी गरीब असतही नाही ज्याला आपण दान-पुण्य करावे. भक्तीमार्गाचे रीती-रिवाज वेगळे, ज्ञान मार्गाचे रीती-रिवाज वेगळे आहेत. आता बाबांना सर्व काही देऊन २१ जन्मांचा वारसा घेतला आहे. बस्स, मग दान-पुण्य करण्याची गरजच नाही. ईश्वर पित्याला आपण सर्व काही देतो. ईश्वरच स्वीकार करतात. स्वीकार केले नाहीं तर

मग देणार कसे? स्वीकार नाही केले तर ते देखील दुर्भाग्य. स्वीकार करावे लागते म्हणजे त्यांचा मोह नष्ट होतो. हे रहस्य देखील तुम्ही मुलेच जाणता. जर गरजच नाही तर मग स्वीकार तरी का करतील? इथे तर काही गोळा करायचे नाहीये. इथून तर मोह नष्ट करावा लागतो.

बाबांनी समजावून सांगितले आहे - बाहेर कुठे जाता तर स्वतःला खूप हलके समजा. आपण बाबांची मुले आहोत, आपण आत्मा रॉकेट पेक्षाही वेगवान आहोत. असे देही-अभिमानी होऊन पायी चालाल तरी देखील कधी थकणार नाही. देहाचे भान येणार नाही. जणूकाही हे पाय चालतच नाहीत, आपण उडत जात आहोत. देही-अभिमानी बनून तुम्ही कुठेही जा. पूर्वी तर मनुष्य तीर्थस्थान इत्यादी ठिकाणी पायी चालत जात असत. त्यावेळी मनुष्यांची बुद्धी तमोप्रधान नव्हती. खूप श्रद्धेने जात असत, थकून जात नव्हते. बाबांची आठवण केल्याने मदत तर मिळेलच ना. भले ती दगडाची मूर्ती आहे परंतु बाबा त्यावेळी अल्पकाळासाठी मनोकामना पूर्ण करतात. त्यावेळी रजोप्रधान आठवण होती त्यामुळे देखील ताकद मिळत होती, थकायला होत नसे. आता तर सधन व्यक्ती लगेचच थकून जातात. गरीब लोक अनेक तीर्थयात्रांना जातात. श्रीमंत लोक मोठ्या थाटामाटात घोड्यावर बसून जातील. ते गरीब तर पायी चालत जातील. भावनेचे भाडे जितके गरिबांना मिळते तितके श्रीमंतांना मिळत नाही. यावेळी देखील तुम्ही जाणता - बाबा गरीब निवाज आहेत मग गोंधळून का जाता? विसरून का जाता? बाबा म्हणतात तुम्हाला कोणतेच कष्ट घ्यायचे नाही आहेत. फक्त एका साजनची आठवण करायची आहे. तुम्ही सर्व सजणी आहात तर साजनची आठवण करावी लागेल. त्या साजनला भोग लावल्याशिवाय खायला लाज नाही वाटत? ते (बाबा) साजन देखील आहेत, पिता देखील आहेत. म्हणतात तुम्ही मला खाऊ घालणार नाही! तुम्ही तर मला खाऊ घातले पाहिजे ना! पहा, बाबा युक्त्या सांगतात. तुम्ही पिता किंवा साजन मानता ना. जो खाऊ घालतो त्याला तर पहिले खाऊ घातले पाहिजे. बाबा म्हणतात मला भोग लावून, माझ्या आठवणीमध्ये खा. यामध्ये खूप मेहनत आहे. बाबा वारंवार समजावून सांगतात, बाबांची जरूर आठवण करायची आहे. बाबा (ब्रह्मा बाबा) स्वतः देखील वारंवार पुरुषार्थ करत राहतात. तुम्हा कुमारींसाठी तर खूपच सोपे आहे. तुम्ही शिडी चढलेल्या नाही आहात. कन्येची तर साजन सोबत सगाई होतेच. तर अशा साजनची आठवण करत भोजन खाल्ले पाहिजे. त्यांची आपण आठवण करतो आणि ते आपल्याकडे येतात. आठवण कराल तर भासना घेतील. तर अशा प्रकारे बाबांसोबत गोष्टी केल्या पाहिजेत. तुमची ही प्रॅक्टिस होईल रात्रीचे जागल्याने. अभ्यास असेल तर मग दिवसभरामध्ये देखील आठवण राहील. भोजन करत असताना देखील आठवण केली पाहिजे. साजन सोबत तुमची सगाई झाली आहे. 'तुम्ही से खाऊं...' हा पक्का प्रण करायचा आहे. जेव्हा आठवण कराल तेव्हाच तर ते खातील ना. त्यांना तर भासनाच मिळणार आहे कारण त्यांना काही आपले शरीर तर नाहीये. कुमारींसाठी तर खूपच सोपे आहे, यांना जास्त सवलती आहेत. शिवबाबा आमचा सलोना साजन किती गोड आहे. अर्धा कल्प आम्ही तुमची आठवण केली आहे, आता तुम्ही येऊन भेटले आहात! आम्ही जे खातो, तुम्ही देखील खा. असे नाही, एकदा आठवण केली, बस झाले, मग तुम्ही स्वतः खात रहाल. त्यांना खाऊ घालणे विसरून जाल. त्यांना विसरलात तर त्यांना मिळणार नाही. पदार्थ तर खूप खाता, खिचडी खाल, आंबे खाल, मिठाई खाल... असे थोडेच चालेल की, फक्त सुरुवातीला आठवण केली आणि खलास; मग बाकीचे पदार्थ ते कसे खातील. साजनने खाल्ले नाहीत तर मध्येच माया खाऊन टाकेल, त्यांना खाऊ देणार नाही. मी पाहतो (शिवबाबा बघतात) माया खाऊन टाकते त्यामुळे तीच बलवान बनते आणि तुम्हाला पराभूत करत राहते. बाबा सर्व युक्त्या सांगतात. बाबांची आठवण कराल तर बाबा अथवा साजन खूप संतुष्ट होईल. म्हणता - 'बाबा, तुम्हीं से बैठूँ, तुम्हीं से खाऊं'. आम्ही तुमची आठवण करून खातो. ज्ञानाद्वारे जाणतो तुम्ही तर भासनाच घ्याल. हे (ब्रह्मा तन) तर लोनवर घेतलेले शरीर आहे. आठवण केल्याने ते येतात. सर्व काही तुमच्या आठवणीवर अवलंबून आहे. यालाच योग म्हटले जाते. योगामध्ये मेहनत आहे. संन्यासी-उदासी कधी असे म्हणणार नाहीत. तुम्हाला जर पुरुषार्थ करायचा असेल तर बाबांच्या श्रीमतावर लक्ष द्या. पुरेपूर पुरुषार्थ करा. बाबा (ब्रह्मा बाबा) आपला अनुभव सांगतात - म्हणतात, 'जसे कर्म मी करतो, तुम्ही देखील करा'. तेच कर्म मी तुम्हाला शिकवतो. बाबांना तर कर्म करायचे नाहीये. सतयुगामध्ये कधी केलेल्या कर्मांचा पश्चाताप करत नाहीत. बाबा खूप सोप्या गोष्टी सांगतात. 'तुम्हीं से बैठूँ, सुनूँ, तुम्हीं से खाऊं...' हे तुमचेच गायन आहे. साजनच्या रूपामध्ये किंवा पित्याच्या रूपामध्ये आठवण करा. गायले आहे ना - विचार सागर मंथन करून ज्ञानाचे पॉईंट्स काढतात. या प्रॅक्टिसने विकर्म देखील विनाश होतील, निरोगी सुद्धा व्हाल. जे पुरुषार्थ करतील त्यांचा फायदा होईल, जे करणार नाहीत त्यांचे नुकसान होईल. सारी दुनिया काही स्वर्गाची

मालक बनत नाही. हा देखील हिशोब आहे.

बाबा खूप चांगल्या रीतीने समजावून सांगतात. गाणे तर ऐकले, खरोखर आपण यात्रेवर जात आहोत. यात्रेवर भोजन इत्यादी तर खावेच लागते, सजनी साजन सोबत, मुले बाबांसोबत खातील. इथे देखील असेच आहे. साजनवर तुमचे जितके प्रेम असेल तितका आनंदाचा पारा चढेल. निश्चयबुद्धि विजयन्ती होत जाल. योग अर्थात दौडी (धाव घेणे). ही बुद्धी योगाची धाव आहे. आपण स्टुडंट आहोत, टीचर आपल्याला धावायला शिकवतात. बाबा म्हणतात असे समजू नका की, दिवसाचे फक्त कर्मच करायचे आहे. कासवा प्रमाणे कर्म करून मग आठवणीमध्ये बसा. भ्रामरी संपूर्ण दिवस भुं-भुं करते. मग कोणी उडतात, कोणी मरतात, तो तर एक दृष्टांत आहे. इथे तुम्ही भुं-भुं करून आप समान बनवता. त्यांच्यामधून कोणाचे तर खूप प्रेम असते. कोणी सडून जातात, कोणी अर्धवट राहून जातात, भागन्ती होतात आणि मग जाऊन किडे बनतात. तर हे भुं-भुं करणे खूप सोपे आहे. 'मनुष्य से देवता किये करत न लागी वार...' आता आपण योग लावत आहोत, देवता बनण्याचा पुरुषार्थ करत आहोत. हेच ज्ञान गीतेमध्ये होते. ते (बाबा) मनुष्या पासून देवता बनवून गेले होते. सतयुगामध्ये तर सर्व देवता होते. जरूर त्यांना संगमयुगावरच येऊन देवता बनविले असेल. तिथे काही देवता बनण्याचा योग शिकवणार नाहीत. सतयुग-त्रेतामध्ये देवी-देवता धर्म होता आणि कलियुग अंताला आहे आसुरी धर्म. या गोष्टी फक्त गीतेमध्येच लिहिलेल्या आहेत. मनुष्याला देवता बनविण्यामध्ये वेळ लागत नाही कारण एम ऑब्जेक्ट सांगतात. तिथे (सतयुगामध्ये) संपूर्ण दुनियेमध्ये एकच धर्म असेल. दुनिया तर सर्वच असणार ना. असे नाही चीन, युरोप नसेल, सर्व देश असतील परंतु तिथे मनुष्य नसतील. केवळ देवता धर्मावालेच असतील, बाकी कोणत्याही धर्माचे नसतात. आता आहे कलियुग. आपण भगवंतादवारे मनुष्यापासून देवता बनत आहोत. बाबा म्हणतात तुम्ही २१ जन्म नेहमी सुखी बनाल. यामध्ये त्रासाची काही गोष्टच नाही. भक्तीमार्गामध्ये भगवंताकडे जाण्यासाठी किती मेहनत केली आहे. म्हणतात - पार निर्वाण गेला. असे कधी म्हणणार नाहीत की, भगवंताकडे गेला. म्हणतील - स्वर्गात गेला. एक गेल्याने काही स्वर्ग तर बनणार नाही. सर्वांना जायचे आहे. गीतेमध्ये लिहिलेले आहे - भगवान काळांचेही काळ आहेत. मच्छरांप्रमाणे सर्वांना परत घेऊन जातात. बुद्धी देखील म्हणते - चक्र रिपीट होणार आहे. तर जरूर सर्वप्रथम सतयुगी देवी-देवता धर्म रिपीट होईल. त्यानंतर मग इतर धर्म रिपीट होतील. बाबा किती सोपे करून सांगतात - मनमनाभव. बस्स. ५ हजार वर्षापूर्वी देखील गीतेच्या भगवंताने म्हटले होते - 'लाडक्या मुलांनो'. हे जर श्रीकृष्ण म्हणेल तर बाकीच्या धर्माचे कोणी ऐकू शकणार नाहीत. भगवान म्हणतील तर सर्वांना वाटेल - गॉडफादर हेवन स्थापन करतात ज्यामध्ये आपण जाऊन मग चक्रवर्ती राजा बनणार. यामध्ये खर्च इत्यादीचा काही प्रश्नच नाही फक्त सृष्टीच्या आदि-मध्य-अंताला जाणायचे आहे.

तुम्हा मुलांना विचार सागर मंथन करायचे आहे. कर्म करत असताना रात्रं-दिवस असा पुरुषार्थ करत रहा. विचार सागर मंथन करत नसाल किंवा बाबांची आठवण करत नसाल, फक्त कर्मच करत रहाल तर मग रात्रीचे देखील तेच विचार चालू राहतील. घर बनवणाऱ्याला घराचाच विचार चालत राहील. भले विचार सागर मंथन करण्याची जबाबदारी यांच्यावर (ब्रह्मा बाबांवर) आहे परंतु बाबा म्हणतात - कलश लक्ष्मीला दिला आहे तर तुम्ही लक्ष्मी बनता ना. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) श्रीमताला लक्षात घेऊन पुरुषार्थ करायचा आहे. बाबांनी जी कर्म करून शिकविली आहेत, तीच करायची आहेत. विचार सागर मंथन करून ज्ञानाचे पॉईंट्स काढायचे आहेत.
2. २) आपणच आपल्याशी प्रण करायचा आहे की, आम्ही बाबांच्या आठवणी मध्येच भोजन खाणार. 'तुम्हीं से बैठूँ, तुम्हीं से खाऊं...' हा वायदा पक्का निभावायचा आहे.

वरदान:- कर्म आणि संबंध दोन्हीमध्ये स्वार्थ भावापासून मुक्त राहणारे बाप समान कर्मातीत भव

तुम्हा मुलांची सेवा आहे सर्वांना मुक्त करण्याची. तर इतरांना मुक्त करत असताना स्वतःला बंधनामध्ये बांधू नका. जेव्हा हदच्या 'माझे-माझे' पासून मुक्त व्हाल तेव्हाच अव्यक्त स्थितीचा

अनुभव करू शकाल. जी मुले 'लौकिक आणि अलौकिक', 'कर्म आणि संबंध' दोन्हीमध्ये स्वार्थ भावापासून मुक्त आहेत तेच बाप समान कर्मातीत स्थितीचा अनुभव करू शकतात. तर चेक करा कर्माच्या बंधना पासून कितपत न्यारे बनलो आहोत? व्यर्थ स्वभाव-संस्काराच्या अधीन होण्यापासून मुक्त.

बोधवाक्यः- जे सरळ चित्त आणि सहज स्वभावावाले आहेत तेच सहजयोगी, भोलेनाथचे प्रिय आहेत.

||| ओम शांती |||

18.12.2024 प्रभात:मुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - सर्व शक्तिमान बाबांसोबत बुद्धियोग लावल्याने शक्ती मिळेल, आठवणीनेच आत्मा रुपी बॅटरी चार्ज होते, आत्मा पवित्र सतोप्रधान बनते"

प्रश्न:- संगमयुगावर तुम्ही मुले कोणता पुरुषार्थ करता ज्याचे प्रारब्ध (फळ स्वरुप) देवता पद मिळते?

उत्तर:- संगमयुगावर आपण शीतल बनण्याचा पुरुषार्थ करतो. शीतल अर्थात पवित्र बनल्याने आपण देवता बनतो. जोपर्यंत शीतल बनत नाही तोपर्यंत देवता देखील बनू शकत नाही. संगमावर शीतल देवी बनून सर्वांवर ज्ञानाचे थंडगार जल शिंपडून सर्वांना शांत करायचे आहे. सर्वांमधील आग (दुःखाची आग) विझवायची आहे. स्वत: देखील शीतल बनायचे आहे आणि इतरांना देखील शीतल बनवायचे आहे.

ओम् शांती. मुलांनी सर्वप्रथम एकच गोष्ट समजून घ्यायची आहे की, आपण सर्व भाऊ-भाऊ आहोत आणि शिवबाबा सर्वांचे पिता आहेत. त्यांना सर्वशक्तिमान म्हटले जाते. तुमच्यामध्ये सर्व शक्ती होत्या. तुम्ही संपूर्ण विश्वावर राज्य करत होता. भारतामध्ये या देवी-देवतांचे राज्य होते, तुम्हीच पवित्र देवी-देवता होता. तुमच्या कुळामध्ये किंवा घराण्यामध्ये सर्व निर्विकारी होते. कोण निर्विकारी होते? आत्मे. आता पुन्हा तुम्ही निर्विकारी बनत आहात. सर्वशक्तिमान बाबांच्या आठवणीद्वारे शक्ती भरत आहात. बाबांनी समजावून सांगितले आहे आत्माच ८४ चा पार्ट बजावते. आत्म्यामध्येच सतोप्रधानतेची ताकद होती, ती मग दिवसेंदिवस कमी होत जाते. सतोप्रधाना पासून तमोप्रधान तर बनायचेच आहे. जशी बॅटरीची ताकद कमी होत जाते तशी मोटार बंद पडते. बॅटरी डिस्चार्ज होते. आत्म्याची बॅटरी संपूर्ण डिस्चार्ज होत नाही, थोडीफार ताकद राहते. जसे कोणाचा मृत्यू होतो तेव्हा दिवा लावतात आणि ज्योत विझू नये म्हणून त्यामध्ये घृत टाकतच राहतात. आता तुम्ही मुले समजता तुमच्या आत्म्यामध्ये पुरेपूर शक्ती होती, आता नाही आहे. आता पुन्हा तुम्ही सर्व शक्तीमान बाबांसोबत आपला बुद्धीयोग लावता, स्वतःमध्ये शक्ती भरता कारण शक्ती कमी झाली आहे. पूर्णपणे शक्ती संपून गेली तर मग शरीरच राहणार नाही. आत्मा बाबांची आठवण करता-करता एकदम पवित्र होऊन जाते. सतयुगामध्ये तुमची बॅटरी संपूर्ण चार्ज असते. नंतर मग हळूहळू कला अर्थात बॅटरी कमी होत जाते. कलियुगाच्या शेवटी आत्म्याची ताकद अगदीच थोडीशी उरते. जणू ताकदीचे दिवाळेच निघते. बाबांची आठवण केल्याने आत्मा मग पुन्हा संपन्न होते. तर आता बाबा समजावून सांगत आहेत एकाचीच आठवण करायची आहे. सर्वोच्च आहेत ईश्वर. बाकी सर्व आहे रचना. रचनेला रचनेकडून हदचा वारसा मिळतो. क्रियेटर तर एक बेहदचे बाबाच आहेत. बाकी सर्व आहेत हदचे. बेहदच्या बाबांची आठवण केल्याने बेहदचा वारसा मिळतो. तर मुलांनी मनोमन समजले पाहिजे की बाबा आमच्यासाठी स्वर्ग नवी दुनिया स्थापन करत आहेत. ड्रामा प्लॅन अनुसार स्वर्गाची स्थापना होत आहे, ज्यामध्ये तुम्ही मुलेच येऊन राज्य करता. मी तर सदैव पवित्र आहे. मी कधी गर्भातून जन्म घेत नाही, ना देवी-देवतांप्रमाणे जन्म घेत. फक्त तुम्हा मुलांना स्वर्गाची बादशाही देण्यासाठी जेव्हा हे (ब्रह्माबाबा) वयाच्या साठीला वानप्रस्थ अवस्थेमध्ये असतात तेव्हा यांच्या तनामध्ये मी प्रवेश करतो. हेच मग नंबरवन तमोप्रधाना पासून नंबरवन सतोप्रधान बनतात. उच्च ते उच्च आहेत भगवंत. नंतर मग आहेत सूक्ष्मवतन वासी ब्रह्मा, विष्णू, शंकर. हे ब्रह्मा, विष्णू, शंकर कुठून आले? हा फक्त साक्षात्कार होतो. सूक्ष्म वतन मध्यभागी आहे ना. जिथे स्थूल शरीर नाही आहे. सूक्ष्म शरीर फक्त दिव्य दृष्टीनेच दिसू शकते. ब्रह्मा तर आहेत सफेद वस्त्रधारी. विष्णू आहेत हिरे-माणकांनी सजलेले. आणि मग शंकराच्या गळ्यामध्ये सर्प इत्यादी दाखवतात. असे शंकर इत्यादी कोणी असू शकत नाही. असे दाखवतात की, अमरनाथवर शंकराने पार्वतीला अमर कथा ऐकवली. परंतु आता सूक्ष्म वतनमध्ये तर मनुष्य सृष्टीच नाही आहे तर तिथे कथा कशी ऐकवतील? बाकी सूक्ष्मवतनचा साक्षात्कार मात्र होतो. जे संपूर्ण पवित्र होतात त्यांचा साक्षात्कार होतो. हेच मग सतयुगामध्ये जाऊन स्वर्गाचे मालक बनतात. तर बुद्धीमध्ये आले पाहिजे की, यांनी मग हे राज्य-भाग्य कसे मिळवले? युद्ध इत्यादी तर काही होत नाही. देवता हिंसा कसे करतील? आता तुम्ही बाबांची आठवण करून राजाई प्राप्त करता, कोणी मानो अथवा न मानो. गीतेमध्ये देखील आहे - देहा सहित देहाच्या सर्व धर्मांना विसरून मामेकम् (मज एकाची) आठवण करा. बाबांना

तर देहच नाहीये, की ज्यामध्ये मोह असेल. बाबा म्हणतात - काही काळासाठी या शरीराचे (ब्रह्मा तनाचे) लोन घेतो. नाहीतर मी ज्ञान कसे देऊ? मी या मनुष्य सृष्टी रुपी झाडाचे चैतन्य बीजरूप आहे. या झाडाचे नॉलेज माझ्याकडेच आहे. या सृष्टीचे आयुर्मान किती आहे? कशी उत्पत्ती, पालना, विनाश होतो? मनुष्यांना काहीच माहिती नाही आहे. ते शिकतात हदचे शिक्षण. बाबा तर बेहदचे शिक्षण शिकवून मुलांना विश्वाचा मालक बनवतात.

ईश्वर काही कधी देहधारी मनुष्याला म्हटले जात नाही. यांना (ब्रह्मा-विष्णू-शंकराला) देखील आपले सूक्ष्म देह आहेत म्हणून यांना देखील भगवान म्हणता येणार नाही. हे शरीर तर या दादाच्या (ब्रह्माच्या) आत्म्याचे तख्त आहे. 'अकालतख्त' आहे ना. आता हे अकाल मूर्त बाबांचे तख्त आहे. अमृतसरमध्ये देखील अकाल तख्त आहे. मोठ-मोठ्या ज्या आसामी आहेत, त्या अकाल तख्तावर जाऊन बसतात. आता बाबा समजावून सांगत आहेत - ही सर्व आत्म्यांची अकाल तख्त आहेत. आत्म्यामध्येच चांगले अथवा वाईट संस्कार असतात, तेव्हाच तर म्हणतात हे कर्मांचे फळ आहे. सर्व आत्म्यांचे पिता एकच आहेत. बाबा काही शास्त्र इत्यादी वाचून समजावत नाहीत. या गोष्टी तर शास्त्रांमध्ये सुद्धा कुठेच नाहीत, म्हणून तर लोक चिडतात, म्हणतात - हे लोक शास्त्रांना मानत नाहीत. साधु-संत इत्यादी गंगेमध्ये जाऊन स्नान करतात तर काय ते पावन झाले का? असे परत तर कोणी जाऊ शकत नाही. सगळे सर्वात शेवटी जातील. जसे टोळांची झुंड किंवा मधमाशांची झुंड जाते. मधमाशांमध्ये देखील राणीमाशी असते, सगळे तिच्या मागोमाग जातात, बाबा देखील जातील तेव्हा त्यांच्या मागे सर्व आत्मे जातील. मुलवतनमध्ये देखील जशी सर्व आत्म्यांची झुंड (कळप) आहे. इथे मग आहे सर्व मनुष्यांची झुंड. तर ही झुंड देखील एक दिवस पळत जाणार आहे. बाबा येऊन सर्व आत्म्यांना घेऊन जातात. 'शिवची वरात' गायली गेली आहे. मुलगे म्हणा किंवा मुली म्हणा, बाबा येऊन मुलांना आठवणीची यात्रा शिकवतात. पवित्र बनल्याशिवाय आत्मा परत घरी जाऊ शकत नाही. जेव्हा पवित्र बनेल तेव्हा अगोदर शांतीधाममध्ये जाईल आणि मग तिथून हळू-हळू खाली येत राहतात, वृद्धी होत राहते. राजधानी बनणार आहे ना. सर्व एकत्र येत नाहीत. झाड हळूहळू वृद्धिंगत होत जाते ना. अगदी सुरुवातीला आदि सनातन देवी-देवता धर्म आहे जो बाबा स्थापन करतात. ब्राह्मण देखील सर्वात अगोदर तेच बनतील ज्यांना देवता बनायचे आहे. प्रजापिता ब्रह्मा तर आहेत ना. प्रजेमध्ये देखील भाऊ-बहीणी असतात. ब्रह्माकुमार-कुमारी तर इथे पुष्कळ बनतात. तर नक्कीच निश्चय बुद्धी असतील म्हणूनच तर इतके भरपूर मार्क्स मिळतात. तुमच्यामध्ये जे पक्के आहेत ते तिथे (स्वर्गामध्ये) पहिले येतात, कच्चे असणारे शेवटीच येतील. मूल वतनमध्ये सर्व आत्मे राहतात नंतर मग जसे खाली येतात तस-तशी वृद्धी होत जाते. शरीराशिवाय आत्मा पार्ट कशी बजावणार? ही पार्टधारींची दुनिया आहे जी चारही युगांमध्ये फिरत राहते. सतयुगामध्ये आम्हीच देवता होतो मग क्षत्रिय, वैश्य, शूद्र बनतो. आता हे आहे पुरुषोत्तम संगम युग. हे युग आत्ताच तयार होते जेव्हा बाबा येतात. हे बेहदचे ज्ञान बेहदचे बाबाच देतात. शिवबाबांना स्वतःच्या शरीराचे काही नाव नाही आहे. हे शरीर तर या दादाचे (ब्रह्मा बाबांचे) आहे. बाबांनी थोड्या वेळाकरिता हे लोन घेतले आहे. बाबा म्हणतात - 'मला तुमच्यासोबत बोलण्याकरिता मुख तर पाहिजे ना. जर मुख नसेल तर बाबा मुलांशी बोलू देखील शकणार नाहीत. मग बेहदचे ज्ञान देखील याच मुखाने ऐकवतो, म्हणूनच याला गोमुख सुद्धा म्हणतात'. डोंगरातून पाणी तर कुठूनही येऊ शकते. मग इथे गोमुख बनवले आहे, त्यातून पाणी येते. त्याला मग गंगाजल समजून पितात. आणि त्या पाण्याला किती महत्व देतात. या दुनियेमध्ये सर्व काही खोटेच आहे. सत्य तर एक बाबाच ऐकवतात. परंतु ते खोटे मनुष्य या बाबांच्या ज्ञानाला खोटे समजतात. भारतामध्ये जेव्हा सतयुग होते तेव्हा याला सचखंड म्हटले जात होते. मग भारतच एकदम जुना होतो तेव्हा प्रत्येक गोष्ट, प्रत्येक वस्तू खोटी होऊन जाते. किती फरक पडतो. बाबा म्हणतात तुम्ही माझी किती निंदा करता. सर्वव्यापी म्हणून किती अपमान केला आहे. शिवबाबांना बोलवतातच की, 'या जुन्या दुनियेमधून घेऊन चला'. बाबा म्हणतात - माझी सर्व मुले काम-चितेवर चढून गरीब बनली आहेत. बाबा मुलांना म्हणतात - 'तुम्ही तर स्वर्गाचे मालक होता. आठवते आहे का?' मुलांनाच समजावून सांगतात, साऱ्या दुनियेला तर समजावून सांगणार नाहीत. मुलेच बाबांना समजू शकतात. दुनियेला ही गोष्ट कशी कळणार!

सर्वात मोठा काटा आहे काम विकाराचा. नावच आहे पतित दुनिया. सतयुग आहे १०० टक्के पवित्र दुनिया. मनुष्यच, पवित्र देवतांसमोर जाऊन नमस्कार करतात. भले असे पुष्कळ भक्त आहेत जे शाकाहारी आहेत, परंतु असे नाही की विकारामध्ये जात नाहीत. असे तर पुष्कळ बालब्रह्मचारी सुद्धा असतात. बालपणापासूनच कधीही

घाणेरडे अभक्ष खाणे इत्यादी खात नाहीत. संन्यासी देखील म्हणतात निर्विकारी बना. घरादाराचा संन्यास करतात मग पुढच्या जन्मामध्ये देखील एखाद्या गृहस्थीच्या घरामध्ये जन्म घेऊन मग पुन्हा घरदार सोडून जंगलामध्ये निघून जातात. परंतु पतितापासून पावन बनू शकतात का? नाही. पतित-पावन बाबांच्या श्रीमता शिवाय कोणीही पतितापासून पावन बनू शकत नाही. भक्ती आहे उतरत्या कलेचा मार्ग तर मग पावन कसे बनतील बरे? जर पावन बनत असतील तर मग घरी जावे, स्वर्गामध्ये यावे. सतयुगी देवी-देवता कधी घरदार सोडतात का? त्यांचा (दुनियावाल्यांचा) आहे हदचा संन्यास, तुमचा आहे बेहदचा संन्यास. संपूर्ण दुनिया, मित्र-नातेवाईक इत्यादी सर्वांपासून संन्यास. तुमच्यासाठीच आता स्वर्गाची स्थापना होत आहे. तुमची बुद्धी स्वर्गाच्या दिशेने आहे. मनुष्य तर नरकामध्येच अडकून पडले आहेत. तुम्ही मुले मात्र एका बाबांच्या आठवणीमध्ये टिकून राहिले आहात.

तुम्हाला शीतल देवी बनविण्याकरिता ज्ञान चितेवर बसविले जाते. शीतल शब्दाच्या विरुद्ध आहे उष्ण. तुमचे नावच आहे शीत-लादेवी. एकच तर असणार नाही. जरूर पुष्कळ असणार, ज्यांनी भारताला शीतल बनवले आहे. या समयी सर्व काम-चितेवर जळत आहेत. इथे तुमचे नाव शीतलादेवी आहे. तुम्ही शीतल करणाऱ्या, थंडगार शिडकावा करणाऱ्या देवी आहात. ज्ञान अमृत शिंपडण्याकरिता जाता ना. हा आहे ज्ञानाचा शिडकावा, जो आत्म्यावर केला जातो. हे आहेत ज्ञानाचे शिंतोडे, जे आत्म्यावर टाकले जातात. आत्मा पवित्र बनल्यानेच शीतल बनते. यावेळी सारी दुनिया काम चितेवर चढून काळी झाली आहे. आता कलश तुम्हा मुलांना मिळत आहे. कलशाद्वारे तुम्ही स्वतः देखील शीतल बनता आणि इतरांना सुद्धा बनवता. हे (ब्रह्मा बाबा) सुद्धा शीतल बनले आहेत ना. दोघेही एकत्र आहेत. घरदार सोडण्याची तर गोष्टच नाही, परंतु गोशाळा बनली असेल तर जरूर कोणी घरदार सोडले असेल. कशासाठी? ज्ञान चितेवर बसून शीतल बनण्यासाठी. जेव्हा तुम्ही इथे शीतल बनाल तेव्हाच तुम्ही देवता बनू शकाल. आता तुम्हा मुलांचा बुद्धीयोग जुन्या घराकडे जाता कामा नये. बाबांमध्ये बुद्धी गुंतून रहावी कारण तुम्हा सर्वांना घरी बाबांकडे (परमधाममध्ये) जायचे आहे. बाबा म्हणतात - गोड मुलांनो, मी गाईड बनून आलो आहे तुम्हाला घेऊन जाण्यासाठी. ही शिव शक्ती पांडव सेना आहे. तुम्ही आहात शिवबाबांकडून शक्ती घेणारे, ते आहेत सर्वशक्तीमान. मनुष्य तर समजतात - परमेश्वर मेलेल्याला जिवंत करू शकतात. परंतु बाबा म्हणतात - 'लाडक्या मुलांनो, या ड्रामामध्ये प्रत्येकाला अनादि पार्ट मिळालेला आहे. मी देखील क्रियेटर, डायरेक्टर, मुख्य ॲक्टर आहे. ड्रामातील पार्टला मी अजिबात बदलू शकत नाही'. मनुष्य समजतात पानंनपान सुद्धा परमेश्वराच्या आदेशानेच हलते परंतु परमात्मा स्वतः म्हणतात की, मी देखील ड्रामाच्या अधीन आहे, याच्या बंधनामध्ये बांधलेला आहे. असे नाही की माझ्या आदेशाने पाने हलतील. सर्वव्यापीच्या ज्ञानाने भारतवासीयांना एकदम गरीब बनवले आहे. बाबांच्या ज्ञानाद्वारे भारत पुन्हा सिरताज (मुकुटधारी) बनतो. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) सूर्यवंशीमध्ये सर्वात पहिले येण्याकरिता निश्चयबुद्धी बनून फुल मार्क्स घ्यायचे आहेत. पक्का ब्राह्मण बनायचे आहे. बेहदचे नॉलेज लक्षात ठेवायचे आहे.
2. २) ज्ञान-चितेवर बसून शीतल अर्थात पवित्र बनायचे आहे. ज्ञान आणि योगाद्वारे काम विकाराची आग नष्ट करायची आहे. बुद्धियोग कायम एका बाबांमध्येच गुंतून रहावा.

वरदान:- ब्राह्मण जीवनामध्ये श्रेष्ठ स्थितीरुपी मेडल प्राप्त करणारे बेगमपूरचे बादशहा भव

तुम्ही सर्व आपली स्वस्थिती चांगल्यात चांगली बनविण्यासाठीच ब्राह्मण बनले आहात. ब्राह्मण जीवनामध्ये श्रेष्ठ स्थिती हीच तुमची प्रॉपर्टी आहे. हेच ब्राह्मण जीवनाचे मेडल आहे. जे कोणी हे मेडल प्राप्त करतात ते सदैव अचल अडोल एकरस स्थितीमध्ये राहून, सदा निश्चिंत, बेगमपूरचे बादशहा बनतात. ते सर्व इच्छांपासून मुक्त, इच्छा मात्रम् अविद्या स्वरूप असतात.

बोधवाक्य:- अतूट निश्चयाने आणि अभिमानाने म्हणा "मेरा बाबा" म्हणजे माया जवळपास सुद्धा फिरकणार नाही.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - हे पुरुषोत्तम संगम युग ट्रान्सफर होण्याचे युग आहे, आता तुम्हाला कनिष्ठ पासून उत्तम पुरुष बनायचे आहे"

प्रश्न:- बाबांसोबतच कोणत्या मुलांचीही महिमा गायली जाते?

उत्तर:- जे टीचर बनून अनेकांचे कल्याण करण्याच्या निमित्त बनतात, त्यांची देखील महिमा बाबांसोबत गायली जाते. करन-करावनहार बाबा मुलांकडून अनेकांचे कल्याण करवून घेतात तर मुलांची देखील महिमा होते. म्हणतात - बाबा, अमक्याने माझ्यावर दया केली, ज्यामुळे मी कशापासून काय बनलो! टीचर बनल्याशिवाय आशीर्वाद मिळू शकत नाहीत.

ओम् शांती. रूहानी बाबा रूहानी मुलांना विचारत आहेत. समजावून देखील सांगतात आणि मग विचारतात देखील. आता बाबांना मुलांनी ओळखले आहे. भले कोणी सर्वव्यापी देखील म्हणतात परंतु तत्पूर्वी बाबांना ओळखायला तर हवे ना - बाबा कोण आहेत? ओळखून मग बोलले पाहिजे, बाबांचे निवासस्थान कोठे आहे? बाबांना जाणतच नाहीत तर त्यांच्या निवासस्थानाविषयी कसे माहित होईल. म्हणतात - ते तर नावा-रूपा पासून न्यारे आहेत, म्हणजे जणू ते नाही आहेत. तर जी गोष्ट नाही आहे त्याच्या राहण्याच्या ठिकाणाचा तरी कसा काय विचार केला जाईल? हे आता तुम्ही मुले जाणता. बाबांनी सर्वप्रथम तर आपली ओळख दिली आहे, नंतर मग राहण्याच्या स्थानाविषयी समजावून सांगितले जाते. बाबा म्हणतात - 'मी तुम्हाला या रथाद्वारे ओळख देण्याकरिता आलो आहे. मी तुम्हा सर्वांचा पिता आहे, ज्यांना 'परमपिता' म्हटले जाते'. आत्म्याला देखील कोणी जाणत नाही. बाबांचे नाव, रूप, देश, काळ नाही आहे तर मुलांचे मग कोठून येईल? पिताच नावा-रुपा पासून न्यारा आहे तर मुले मग कुठून आली? मुले आहेत तर जरूर पिता देखील आहे. तर हे सिद्ध होते तो नावा-रूपा पासून न्यारा नाही आहे. मुलांचे देखील नाव-रूप आहे. भले कितीही सूक्ष्म असो. आकाश सूक्ष्म आहे तरीही नाव तर आहे ना आकाश. जसे हे पोलार सूक्ष्म आहे, तसे बाबा देखील अति सूक्ष्म आहेत. मुले वर्णन करतात 'वंडरफुल तारा' आहे, जे यांच्यामध्ये प्रवेश करतात, ज्याला आत्मा म्हणतात. बाबा तर राहतातच परमधाममध्ये, ते राहण्याचे स्थान आहे. नजर वर जाते ना. बोटाने वर इशारा करून आठवण करतात. तर जरूर ज्याची आठवण करतात, कोणती वस्तू असेल. परमपिता परमात्मा म्हणतात तर खरे ना. तरीही नावा-रूपा पासून न्यारा म्हणणे - याला अज्ञान म्हटले जाते. बाबांना जाणणे, याला ज्ञान म्हटले जाते. हे देखील तुम्ही समजता - आपण अगोदर अज्ञानी होतो. बाबांना सुद्धा ओळखत नव्हतो, स्वतःला देखील जाणत नव्हतो. आता समजता आम्ही आत्मा आहोत, ना की शरीर. आत्म्याला अविनाशी म्हटले जाते तर जरूर कोणती गोष्ट आहे ना. अविनाशी असे काही कोणते नाव नाही. अविनाशी अर्थात ज्याचा विनाश होऊ शकत नाही. तर जरूर कोणती वस्तू आहे. मुलांना चांगल्या रीतीने समजावून सांगितले गेले आहे, गोड-गोड मुलांनो, ज्यांना मुलांनो-मुलांनो म्हणतात ते आत्मे अविनाशी आहेत. हे आत्म्यांचे पिता परमपिता परमात्मा बसून समजावून सांगत आहेत. हा खेळ एकदाच होतो जेव्हा बाबा येऊन मुलांना आपला परिचय देतात. मी देखील पार्टधारी आहे. कसा पार्ट बजावतो, हे देखील तुमच्या बुद्धीमध्ये आहे. जुन्या अर्थात पतित आत्म्याला नवीन पावन बनवतात तर मग तुमचे शरीर देखील तिथे गुल-गुल (फूला समान सुंदर) असते. हे तर लक्षात आहे ना.

आता तुम्ही बाबा-बाबा म्हणता, हा पार्ट चालू आहे ना. आत्मा म्हणते - 'बाबा आले आहेत - आम्हा मुलांना शांतीधाम घरी घेऊन जाण्यासाठी'. शांतीधामच्या नंतर आहेच मुळी सुखधाम. शांतिधामच्या नंतर दुःख धाम असू शकत नाही. नव्या दुनियेमध्ये सुखच म्हटले जाते. या देवी-देवता जर चैतन्य असतील आणि यांना कोणी विचारले की तुम्ही कुठले राहणारे आहात, तर म्हणतील आम्ही स्वर्गाचे रहिवासी आहोत. आता हे जड मूर्ती तर सांगू शकत नाही. तुम्ही तर सांगू शकता ना, आम्ही खरे तर स्वर्गामध्ये राहणारे देवी-देवता होतो मग ८४ चे चक्र फिरून आता संगमावर आलो आहोत. हे ट्रान्सफर होण्याचे पुरुषोत्तम संगमयुग आहे. मुले जाणतात - आपण आता उत्तम पुरुष (श्रेष्ठ आत्मा) बनतो. आम्ही दर ५ हजार वर्षांनंतर सतोप्रधान बनतो. सतोप्रधान देखील नंबरवार म्हणणार. तर हा सारा पार्ट आत्म्याला मिळालेला आहे. असे म्हणणार नाही की मनुष्याला पार्ट मिळाला

आहे. मज आत्म्याला पार्ट मिळालेला आहे. मी आत्मा ८४ जन्म घेते. मी आत्मा वारसदार आहे, वारसदार कायम पुरुष असतात, स्त्रिया नाहीत. तर आता तुम्हा मुलांना हे पक्के समजायचे आहे की आपण सर्व आत्मे पुरुष आहोत. सर्वांना बेहदच्या पित्याकडून वारसा मिळतो. हदच्या लौकिक पित्याकडून फक्त मुलांना वारसा मिळतो, मुलीला नाही. असे देखील नाही की, आत्मा नेहमीच फीमेल बनते. बाबा समजावून सांगतात, तुम्ही आत्मे कधी पुरुषाचे तर कधी स्त्रीचे शरीर घेता. यावेळी तुम्ही सर्व मेल (पुरुष) आहात. सर्व आत्म्यांना एका बाबांकडून वारसा मिळतो. सर्व मुलेच मुले आहेत. सर्वांचा पिता एक आहे. बाबा देखील म्हणतात - 'माझ्या मुलांनो, तुम्ही सर्व आत्मे पुरुष आहात. माझी रूहानी मुले आहात'. मग पार्ट बजावण्यासाठी मेल-फिमेल दोघेही पाहिजेत. तेव्हाच तर मनुष्य सृष्टीची वृद्धी होईल. या गोष्टी तुमच्या शिवाय इतर कोणीही जाणत नाहीत. भले म्हणतात खरे की, 'आपण सर्व बांधव आहोत', परंतु समजत नाहीत.

आता तुम्ही म्हणता - 'बाबा, तुमच्याकडून आम्ही अनेकदा वारसा घेतला आहे'. आत्म्याला हे पक्के होते. आत्मा बाबांची आठवण जरूर करते - 'ओ बाबा, दया करा. बाबा आता तुम्ही या, आम्ही सर्व तुमची संतान बनू. देहासहित देहाचे सर्व संबंध सोडून आम्ही आत्मा तुमचीच आठवण करू. बाबांनी समजावून सांगितले आहे - स्वतःला आत्मा समजून मज पित्याची आठवण करा. बाबांकडून आपण वारसा कसा प्राप्त करतो, दर ५ हजार वर्षानंतर आपण हे देवता कसे बनतो, हे देखील जाणून घेतले पाहिजे ना. स्वर्गाचा वारसा कोणाकडून मिळतो, हे आता तुम्हाला समजले आहे. बाबा काही स्वर्गवासी नाही आहेत, मुलांना बनवतात. स्वतः तर नरकामध्येच येतात, तुम्ही बाबांना बोलवता देखील नरकामध्ये, जेव्हा तुम्ही तमोप्रधान बनता. ही तमोप्रधान दुनिया आहे ना. सतोप्रधान दुनिया होती, ५ हजार वर्षांपूर्वी यांचे राज्य होते. या गोष्टींना, या शिक्षणाला आता तुम्हीच जाणता. हे आहे मनुष्यापासून देवता बनण्याचे शिक्षण. 'मनुष्य से देवता किये करत न लागी वार...' संतान बनला आणि वारसदार झाला; बाबा म्हणतात - तुम्ही सर्व आत्मे माझी संतान आहात. तुम्हाला वारसा देतो. तुम्ही भाऊ-भाऊ आहात, राहण्याचे स्थान मूलवतन अथवा निर्वाणधाम आहे, ज्याला निराकारी दुनिया देखील म्हणतात. सर्व आत्मे तिथे राहतात. या सूर्य-चंद्राच्याही पार पलीकडे ते तुमचे स्वीट सायलेन्स घर आहे परंतु तिथे बसून तर रहायचे नाहीये. बसून राहून काय करणार. ती तर जशी जड अवस्था झाली. आत्मा जेव्हा पार्ट बजावेल तेव्हाच चैतन्य म्हटली जाईल. आहे चैतन्य परंतु पार्ट बजावला नाही तर मग जड झाली ना. तुम्ही इथे उभे रहाल आणि हातपाय हलवणारच नाहीत तर जणू जड झालात ना. तिथे तर नॅचरल शांती असते, आत्मे जसे कि जड आहेत. काहीही पार्ट बजावत नाहीत. सौंदर्य तर पार्टमध्येच आहे ना. शांतीधाम मध्ये कसले सौंदर्य असणार? आत्मे सुख-दुःखाच्या जाणीवे पासून अलिप्त असतात. काही पार्टच बजावत नाहीत तर तिथे राहून काय फायदा? सर्वप्रथम सुखाचा पार्ट बजावायचा आहे. प्रत्येकाला आधीपासूनच पार्ट मिळालेला आहे. कोणी म्हणतात - आम्हाला तर मोक्ष हवा. बुडबुडा पाण्यामध्ये विलीन झाला बस्स, आत्मा जशी काही नाहीच आहे. काहीच पार्ट बजावत नसेल जणूकाही जड म्हणणार. चैतन्य असतानाही जड होऊन पडून राहिल तर काय फायदा? पार्ट तर सर्वांना बजावायचाच आहे. मुख्य पार्ट हिरो-हिरॉईनचा म्हटला जातो. तुम्हा मुलांना हिरो-हिरॉईनचे टायटल (उपाधी) मिळते. आत्मा इथे पार्ट बजावते. आधी सुखामध्ये राज्य करते नंतर मग रावणाच्या दुःखाच्या राज्यामध्ये जाते. आता बाबा म्हणतात - तुम्ही मुलांनी सर्वांना हा निरोप द्या. टीचर बनून इतरांना समजावून सांगा. जे टीचर बनत नाहीत त्यांच्या पदाचा दर्जा कमी होईल. टीचर बनल्याशिवाय कोणाला आशीर्वाद तरी कसा मिळेल? कोणाला पैसे द्याल तर त्यांना आनंद होईल ना. आतून समजतात बी. के. आमच्यावर खूप दया करतात, जे आम्हाला कोणापासून काय बनवतात! तसे तर महिमा एका बाबांचीच करतात - 'वाह बाबा, तुम्ही या मुलांद्वारे आमचे किती कल्याण करता'! कोणाच्या तरी माध्यमातून कल्याण तर होते ना. बाबा करन-करावनहार आहेत, तुमच्या द्वारे करून घेतात. तुमचे कल्याण होते. तर तुम्ही मग इतरांचे कलम लावता (इतरांना ज्ञान देता). जे जशी जितकी सेवा करतात, तितके उच्च पद मिळवतात. राजा बनायचे आहे तर प्रजा देखील बनवायची आहे. मग जे चांगले नंबर घेतात ते देखील राजा बनतात. माळा बनते ना. स्वतःला विचारले पाहिजे की, 'मी माळेतील कितवा नंबर बनेन?' ९ रत्न मुख्य आहेत ना. मधोमध आहे हिरा बनविणारा. हिऱ्याला मध्ये ठेवतात. माळेमध्ये वर फुल देखील आहे ना. शेवटी तुम्हाला माहित होईल - मुख्य मणी कोण बनतात, जे डिनायस्टीमध्ये (घराण्यामध्ये) येतील. नंतर शेवटी तुम्हाला सर्व साक्षात्कार होईल जरूर. बघाल - कसे हे सर्व सजा भोगतात. सुरुवातीला तुम्ही दिव्य दृष्टीने सूक्ष्म वतनमध्ये पाहत होता. हे देखील गुप्त आहे. आत्मा सजा कुठे भोगते - हा देखील ड्रामामध्ये पार्ट आहे. गर्भ जेलमध्ये सजा मिळते. जेलमध्ये धर्मराजाला बघतात आणि म्हणतात बाहेर काढा. आजार इत्यादी उद्भवतात,

तो देखील कर्माचा हिशोब आहे ना. या सर्व समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. बाबा तर जरूर बरोबर तेच ऐकवतील ना. आता तुम्ही राइटियस (नीतिमान) बनता. नीतिमान त्यांना म्हटले जाते जे बाबांकडून खूप शक्ती घेतात.

तुम्ही विश्वाचे मालक बनता ना. किती ताकद असते. दंगे-मारामारी इत्यादींचा काही प्रश्नच नाही. ताकद कमी आहे तर किती दंगे-मारामाऱ्या होतात. तुम्हा मुलांना ताकद मिळते - अर्ध्या कल्पासाठी. तरी देखील नंबरवार पुरुषार्थानुसार. सर्वच एकसमान ताकद मिळवू शकत नाहीत, आणि एकसमान पदही मिळवू शकत नाहीत. हे देखील आधीपासूनच नोंदलेले आहे. ड्रामामध्ये अनादि नोंदलेले आहे. कोणी मागाहून येतात, एक-दोन जन्म घेतले आणि शरीर सोडले. जसे दिवाळीला कीटक असतात, ते रात्री जन्म घेतात आणि सकाळी मरून जातात. ते तर अगणित असतात. मनुष्यांची तरी देखील मोजदाद तर होते. सर्वप्रथम जे आत्मे येतात ते किती दीर्घायुषी असतात! तुम्हा मुलांना आनंद झाला पाहिजे की, आपण दीर्घायुषी बनणार. तुम्ही पूर्ण पार्ट बजावता. तुम्ही कसे पूर्ण पार्ट बजावता ते बाबा तुम्हालाच समजावून सांगतात. केलेल्या अभ्यासानुसार वरून पार्ट बजावण्यासाठी येता. तुमचे हे शिक्षण आहेच मुळी नवीन दुनियेसाठी. बाबा म्हणतात - अनेकदा तुम्हाला शिकवतो. हे शिक्षण अविनाशी बनते. अर्धा कल्प तुम्ही प्रारब्ध प्राप्त करता. त्या विनाशी शिक्षणाद्वारे सुख देखील अल्पकाळासाठी मिळते. आता जर कोणी बॅरिस्टर बनत असेल तर मग कल्पानंतर पुन्हा बॅरिस्टर बनेल. हे देखील तुम्ही जाणता - जो काही सर्वांचा पार्ट आहे, तोच पार्ट कल्प-कल्प बजावला जात राहील. देवता असो अथवा शूद्र असो, प्रत्येकाचा पार्ट तोच बजावला जातो जो कल्प-कल्प बजावला जातो. त्यामध्ये काहीही बदल होऊ शकत नाही. प्रत्येकजण आपला पार्ट बजावत राहतात. हा सारा पूर्वनियोजित खेळ आहे. विचारतात - 'पुरुषार्थ मोठा कि प्रारब्ध मोठे?' आता बिना पुरुषार्थाचे प्रारब्ध तर मिळत नाही. पुरुषार्थाने प्रारब्ध मिळते ड्रामा अनुसार. तर सर्व ओझे ड्रामावर येते. पुरुषार्थ कोणी करतात, कोणी नाही करत. येतात देखील तरीही पुरुषार्थ करत नाहीत तर मग प्रारब्ध सुद्धा मिळत नाही. संपूर्ण दुनियेमध्ये जी काही ॲक्ट चालते (कृती केली जाते), सर्व पूर्वनियोजित ड्रामा आहे. आत्म्यामध्ये आदि पासून अंतापर्यंत सर्व पार्ट अगोदरपासूनच नोंदलेला आहे. जसे तुमच्या आत्म्यामध्ये ८४ चा पार्ट आहे, हिरा देखील बनते तर कवडी समान सुद्धा बनते. या सर्व गोष्टी तुम्ही आता ऐकता. शाळेमध्ये जेव्हा कोणी नापास होतो तर म्हणतात, हा बुद्धीहीन आहे. धारणा होत नाही, याला म्हटले जाते व्हरायटी झाड, व्हरायटी फीचर्स. हे व्हरायटी झाडाचे नॉलेज बाबाच समजावून सांगतात. कल्पवृक्षावर देखील समजावून सांगतात. वडाच्या झाडाचे उदाहरण देखील याच्यावरच आहे. त्याच्या शाखा खूप पसरतात.

मुले समजतात - आपली आत्मा अविनाशी आहे, शरीर तर विनाश होईल. आत्माच धारणा करते, आत्मा ८४ जन्म घेते, शरीरे तर बदलत जातात. आत्मा तीच आहे, आत्माच विभिन्न शरीरे घेऊन पार्ट बजावते. ही नवीन गोष्ट आहे ना. तुम्हा मुलांना देखील आता ही समज मिळाली आहे. कल्पा पूर्वी देखील असे समजले होते. बाबा येतात देखील भारतामध्ये. तुम्ही सर्वांना संदेश देत राहता, असा कोणीही राहणार नाही ज्याला संदेश मिळालेला नाही. सर्वांना संदेश ऐकण्याचा अधिकार आहे. मग बाबांकडून वारसा देखील घेतील. काहीतरी ऐकतील ना, तरीही बाबांची मुले आहेत ना. बाबा समजावून सांगत आहेत - मी तुम्हा आत्म्यांचा पिता आहे. माझ्याद्वारे या रचनेच्या आदि-मध्य-अंताला जाणल्याने तुम्ही हे पद मिळवता. बाकी सर्व मुक्तीमध्ये निघून जातात. बाबा तर सर्वांची सद्गती करतात. गातात - 'अहो बाबा, तेरी लीला अपरंपार...' काय लीला? कोणती लीला? या जुन्या दुनियेला बदलण्याची लीला आहे. माहित असले पाहिजे ना. मनुष्यच जाणतील ना. बाबा तुम्हा मुलांनाच येऊन सर्व गोष्टी समजावून सांगतात. बाबा नॉलेजफुल आहेत. तुम्हाला देखील नॉलेजफुल बनवतात. नंबरवार तुम्ही बनता. स्कॉलरशिप घेणारे नॉलेजफुल म्हटले जातील. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) सदैव याच स्मृतीमध्ये रहायचे आहे की, मी आत्मा पुरुष आहे, मला बाबांकडून पूर्ण वारसा घ्यायचा आहे. मनुष्यापासून देवता बनण्याचा अभ्यास शिकायचा आहे आणि शिकवायचा आहे.
2. २) साऱ्या दुनियेमध्ये जी काही ॲक्ट चालते, हा सर्व पूर्वनियोजित ड्रामा आहे, यामध्ये पुरुषार्थ आणि प्रारब्ध दोन्ही नोंदलेले आहे. पुरुषार्थ विना प्रारब्ध मिळू शकत नाही, या गोष्टीला व्यवस्थित समजून

घ्यायचे आहे.

वरदान:- कोणतीही सेवा सच्च्या मनाने अथवा प्रेमाने करणारे सच्चे रूहानी सेवाधारी भव

सेवा कोणतीही असो परंतु ती खऱ्या मनाने, प्रेमाने केली तर त्याचे १०० मार्क्स मिळतात. सेवेमध्ये चिडचिडेपणा असू नये, सेवा करायची म्हणून केली जाऊ नये. तुमची सेवा आहेच मुळी दुःखातून सोडविणे, सर्वांना सुख देणे, आत्म्यांना योग्य आणि योगी बनविणे, अपकारिंवर उपकार करणे, वेळेवर प्रत्येकाला साथ किंवा सहयोग देणे, अशी सेवा करणारेच खरे रूहानी सेवाधारी आहेत.

बोधवाक्य:- पवित्रताच ब्राह्मण जीवनाची नवीनता आहे, हेच ज्ञानाचे फाउंडेशन आहे.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - आठवणीमध्ये राहण्याची प्रॅक्टिस करा तर सदैव हर्षितमुख, पुलकित रहाल, बाबांची मदत मिळत राहील, कधीही कोमेजणार नाही"

प्रश्नः- तुम्हा मुलांना हे गॉडली स्टुडंट लाईफ (ईश्वरीय विद्यार्थी जीवन) कोणत्या नशेमध्ये व्यतीत करायचे आहे?

उत्तरः- नेहमी नशा रहावा की आम्ही या शिक्षणाने प्रिन्स-प्रिन्सेस बनणार. जीवन हसत-खेळत, ज्ञानाचा डान्स करत व्यतीत करायचे आहे. सदैव वारसदार बनून फूल बनण्याचा पुरुषार्थ करत रहा. हे आहे प्रिन्स-प्रिन्सेस बनण्याचे कॉलेज. इथे शिकायचे देखील आहे तर शिकवायचे देखील आहे, प्रजा सुद्धा बनवायची आहे तेव्हाच राजा बनू शकाल. बाबा तर शिकलेलेच आहेत, त्यांना शिकण्याची आवश्यकता नाही.

गीतः- बचपन के दिन भुला न देना...

ओम् शांती. हे गाणे आहे खास मुलांसाठी. भले गाणे आहे फिल्मी परंतु काही गाणी आहेतच तुमच्यासाठी. जी सपूत (लायक) मुले आहेत त्यांनी गाणे ऐकताना त्याचा अर्थ आपल्या मनामध्ये आणावा लागतो. बाबा समजावून सांगतात - माझ्या लाडक्या मुलांनो, कारण तुम्ही संतान बनले आहात. जेव्हा संतान बनाल तेव्हाच तर बाबांच्या वारशाची देखील आठवण राहील. जर संतानच बनला नाहीत तर आठवण करावी लागेल. मुलांना लक्षात राहते आपण भविष्यामध्ये बाबांचा वारसा घेणार. हा आहेच राजयोग, प्रजायोग नाही. आपण भविष्यामध्ये प्रिन्स-प्रिन्सेस बनणार. आपण त्यांची मुले आहोत बाकी जे कोणी मित्र-नातेवाईक इत्यादी आहेत त्या सर्वांना विसरावे लागते. केवळ एका व्यतिरिक्त दुसऱ्या कोणाचीही आठवण येऊ नये. देह सुद्धा आठवता कामा नये. देह-अभिमानाला नाहीसे करून देही-अभिमानी बनायचे आहे. देह-अभिमानामध्ये आल्यानेच अनेक प्रकारचे संकल्प-विकल्प उलटे खालीच कोसळवून घालतात. आठवण करण्याची प्रॅक्टिस करत रहाल तर सदैव हर्षितमुख, उमललेल्या फूला प्रमाणे रहाल. आठवण करायला विसरल्यामुळे फूल कोमेजून जाते. हिम्मते बच्चे मददे बाप. संतानच बनला नाहीत तर बाबा मदत कोणत्या गोष्टीची करणार? कारण त्यांचा मग माय-बाप आहे रावण माया, तर मग त्यांच्याकडून मदत मिळेल कोसळण्याची (पतन होण्याची). तर हे सारे गाणे तुम्हा मुलांवर बनलेले आहे - 'बचपन के दिन भुला न देना...' बाबांची आठवण करायची आहे, आठवण केली नाहीत तर जे आज हसले ते उद्या मग रडत राहतील. आठवण केल्याने सदैव हर्षितमुख रहाल. तुम्ही मुले जाणता - एकच गीता शास्त्र असे आहे, ज्यामध्ये काही-काही शब्द बरोबर आहेत. लिहिलेले आहे की, युद्धाच्या मैदानामध्ये मराल तर स्वर्गामध्ये जाल. परंतु यामध्ये हिंसक युद्धाची तर गोष्टच नाही. तुम्हा मुलांना बाबांकडून शक्ती घेऊन मायेवर विजय प्राप्त करायचा आहे. तर जरूर बाबांची आठवण करावी लागेल तेव्हाच तुम्ही स्वर्गाचे मालक बनाल. त्यांनी मग स्थूल शस्त्रे इत्यादी दाखवली आहेत. ज्ञान कटारी, ज्ञान बाण हे शब्द ऐकले आहेत त्यामुळे स्थूल रूपामध्ये शस्त्रे दिली आहेत. वास्तविक या आहेत ज्ञानाच्या गोष्टी. बाकी इतक्या भुजा इत्यादी काही कोणाच्या असत नाहीत. तर हे आहे युद्धाचे मैदान. योगामध्ये राहून शक्ती घेऊन विकारांवर विजय प्राप्त करायचा आहे. बाबांची आठवण केल्याने वारशाची आठवण येईल. वारसदारच वारसा घेतात. वारसदार बनत नाही तर मग प्रजा बनतात. हा आहेच राजयोग, प्रजा योग नाही. हे स्पष्टीकरण बाबांव्यतिरिक्त इतर कोणीही देऊ शकत नाही.

बाबा म्हणतात - 'मला या साधारण तनाचा आधार घेऊन यावे लागते. प्रकृतीचा आधार घेतल्याशिवाय तुम्हा मुलांना राजयोग कसा शिकवणार? आत्मा शरीराला सोडून देते तेव्हा मग काही संभाषण करू शकत नाही. मग जेव्हा शरीर धारण करेल, मूल थोडेसे मोठे होईल तेव्हा बाहेर पडेल आणि मग बुद्धी खुलेल (काम करू लागेल). लहान मुले असतातच पवित्र, त्यांच्यामध्ये विकार असत नाहीत. संन्यासी लोक शिडी चढून मग खाली उतरतात. स्वतःच्या जीवनाला समजू शकतात. मुले तर असतातच पवित्र, म्हणूनच मुले आणि महात्मा एकसमान गायले जातात. तर तुम्ही मुले जाणता हे शरीर सोडून आपण प्रिन्स-प्रिन्सेस बनणार. आधी देखील आपण बनलो होतो,

आता परत बनत आहेत. अशा प्रकारचे विचार विद्यार्थ्यांमध्ये असतात. हे देखील त्यांच्याच बुद्धीमध्ये येईल जी मुले बनतील आणि मग प्रामाणिक, आज्ञाधारक बनून श्रीमतावर चालत राहतील. नाहीतर श्रेष्ठ पद प्राप्त करू शकणार नाही. टीचर तर शिकलेलेच आहेत. असे नाही की ते शिकतात आणि नंतर मग शिकवतात. नाही, टीचर तर शिकलेलेच आहेत. त्यांना नॉलेजफुल म्हटले जाते. सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे नॉलेज इतर कोणीही जाणत नाहीत. सर्वात आधी तर निश्चय पाहिजे की, ते पिता आहेत. जर कोणाच्या नशिबात नसेल तर मग आतमध्ये संघर्ष चालत राहील. समजू सुद्धा शकणार नाही. बाबांनी समजावून सांगितले आहे जेव्हा तुम्ही बाबांच्या गोदीमध्ये याल तेव्हा मग हा विकारांचा आजार अजूनच जोरात बाहेर पडेल. वैद्य लोक देखील म्हणतात - रोग उफाळून येईल. बाबा देखील म्हणतात तुम्ही मुले बनता तेव्हा मग देह-अभिमानाचा आणि काम-क्रोध इत्यादीचा आजार वाढेल. नाहीतर परीक्षा कशी होईल? कुठेही गोंधळून जाल तर विचारत रहा. जेव्हा तुम्ही रुस्तम (पैलवान) बनता तेव्हा माया खूप त्रास देते. तुम्ही बॉक्सिंग मध्ये आहात. संतान बनला नाहीत तर बॉक्सिंगचा प्रश्नच नाही. ते तर आपल्याच संकल्प-विकल्पांमध्ये गटांगळ्या खात राहतात, आणि कोणती मदतही मिळत नाही. बाबा समजावून सांगतात - मम्मा-बाबा म्हणता तर मग बाबांची संतान बनावे लागेल, म्हणजे मग ते मनामध्ये पक्के होऊन जाते की हे आपले रुहानी पिता आहेत. बाकी हे युद्धाचे मैदान आहे, यामध्ये घाबरायचे नाही की, माहित नाही या वादळामध्ये आपण टिकू शकू कि नाही? याला कमजोर म्हटले जाते. यामध्ये वाघ बनावे लागते. पुरुषार्थासाठी चांगले मत घेतले पाहिजे. बाबांना विचारले पाहिजे. बरीच मुले आपली अवस्था लिहून पाठवतात. बाबांनाच सर्टिफिकेट द्यायचे आहे. यांच्यापासून (ब्रह्मा बाबांपासून) भले लपवा परंतु शिवबाबांपासून लपू शकत नाही. खूप जण आहेत जे लपवतात परंतु बाबांपासून काहीही लपू शकत नाही. चांगल्याचे फळ चांगले, वाईटाचे फळ वाईट असते. सतयुग-त्रेतामध्ये तर सर्वकाही चांगलेच चांगले असते. चांगले-वाईट, पाप-पुण्य इथे होते. तिथे (सतयुगामध्ये) दान-पुण्य देखील केले जात नाही. आहेच प्रारब्ध. इथे आपण पूर्णतः सरेंडर होतो तर बाबा २१ जन्मांसाठी रिटर्नमध्ये देतात. फॉलो फादर करायचे आहे. जर उलटे काम कराल तर नाव देखील बाबांचेच बदनाम कराल म्हणून दंड देखील द्यावा लागतो. सर्वांना रूप-बसंत देखील बनायचे आहे. आम्हा आत्म्यांना बाबांनी शिकवले आहे तर आपल्याला मग दुसऱ्यांना शिकवायचे देखील आहे. खऱ्या ब्राह्मणांना खरी गीता ऐकवायची आहे. आणखी कोणत्या शास्त्रांची गोष्ट नाही. मुख्य आहे गीता. बाकी आहे तिची मुले-बाळे. त्याने कोणाचे कल्याण होत नाही. मला कुणीही येऊन भेटत नाही. मीच येऊन पुन्हा सहज ज्ञान, सहज योग शिकवतो. सर्व शास्त्रमई शिरोमणी गीता आहे, त्या खऱ्या गीते द्वारा वारसा मिळतो. श्रीकृष्णाला देखील गीते द्वारा वारसा मिळाला, गीतेचा देखील पिता जे रचयिता आहेत, ते बसून वारसा देतात. बाकी गीता धर्मग्रंथाद्वारे काही वारसा मिळत नाही. रचयिता आहेत एक, बाकी आहे त्यांची रचना. पहिल्या नंबरचा धर्मग्रंथ आहे गीता तर त्या नंतर जे धर्मग्रंथ बनतात त्यांच्या द्वारे देखील वारसा मिळू शकणार नाही. वारसा मिळतोच सन्मुख. मुक्तीचा वारसा तर सर्वांनाच मिळणार आहे, सर्वांना परत जायचे आहे. बाकी स्वर्गाचा वारसा मिळतो शिक्षणाने. मग जो जितका शिकेल. बाबा सन्मुख शिकवत आहेत. जोपर्यंत निश्चय नाही की कोण शिकवत आहेत तर मग समजणार तरी काय? प्राप्ती काय करू शकतील? तरीही बाबांकडून ऐकत राहतात तर त्या ज्ञानाचा विनाश होत नाही. जितके सुख मिळेल मग दुसऱ्यांना देखील सुख द्याल. प्रजा बनवाल तर मग स्वतः राजा बनाल.

आपले आहे स्टुडंट लाईफ. हसत-खेळत, ज्ञानाचा डान्स करत आपण जाऊन प्रिन्स बनणार. स्टुडंट्स जाणतात - आपल्याला प्रिन्स बनायचे आहे तर आनंदाचा पारा चढेल. हे तर प्रिन्स-प्रिन्सेसचे कॉलेज आहे. तिथे (सतयुगामध्ये) प्रिंस-प्रिन्सेसचे वेगळे कॉलेज असते. विमानामध्ये बसून जातात. तिथली विमाने देखील फुल प्रूफ असतात, कधीही तुटू शकत नाहीत. कधीही कोणत्याही प्रकारचा ॲक्सीडेंट होणारच नाही. या सर्व समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. एक तर बाबांसोबत पूर्ण बुद्धियोग ठेवावा लागेल, दुसरे, बाबांना सर्व समाचार द्यावा लागेल की कोण-कोण काट्यांपासून कळ्या बनले आहेत? बाबांसोबत पूर्ण कनेक्शन ठेवावे लागेल, ज्यामुळे मग टीचर देखील डायरेक्शन देत राहतील. कोण वारसदार बनवून फूल बनवण्याचा पुरुषार्थ करत आहे? काट्यांपासून कळी तर बनली पाहिजे मग फूल तेव्हा बनेल जेव्हा संतान बनेल. नाहीतर कळी ती कळीच राहणार अर्थात प्रजेमध्ये येणार. आता जो जसा पुरुषार्थ करेल, तसे पद प्राप्त करेल. असे नाही, एकाने धाव घेतली तर आपण त्याचे शेपूट पकडू. भारतवासी असे समजतात. परंतु शेपूट पकडण्याची गोष्टच नाही, जो करेल तो मिळवेल. जो पुरुषार्थ करेल, २१ पिढी त्याचे प्रारब्ध बनेल. वृद्ध तर जरूर होणार. परंतु अकाली मृत्यू होत नाही. किती मोठे पद आहे. बाबा समजून जातात की यांचे भाग्य उघडले आहे, वारसदार बनला आहे. आता पुरुषार्थी आहे मग रिपोर्ट

देखील देतात, बाबा, अशी-अशी विघ्न येतात, असे होते. प्रत्येकाने पोतामेल द्यायचा असतो. इतकी मेहनत आणखी कोणत्या सत्संगामध्ये असत नाही. बाबा तर छोट्या-छोट्या मुलींना देखील संदेशी बनवतात. युद्धामध्ये मेसेज घेऊन जाणारे देखील पाहिजेत ना. लढाईचे हे मैदान आहे. इथे तुम्ही सन्मुख ऐकता तर खूप चांगले वाटते, मन खुश होते. बाहेर गेलात आणि बगळ्यांची संगत मिळाली तर खुशी उडून जाते. तिथे (बाहेरच्या दुनियेमध्ये) मायेची धूळ आहे ना त्यामुळे मजबूत बनावे लागेल.

बाबा किती प्रेमाने शिकवतात, किती सुविधा देतात. असे देखील बरेच आहेत जे चांगले आहे-चांगले आहे असे म्हणून मग नाहीसे होतात, कोणी विरळाच उभा राहू शकतो. इथे तर ज्ञानाचा नशा पाहिजे. दारूचा देखील नशा असतो ना. दिवाळे निघालेले असेल आणि दारू पिलेला असेल, आणि जोरात नशा चढला तर समजेल मी तर महाराजाच आहे. इथे तुम्हा मुलांना रोज ज्ञान अमृताचा प्याला मिळतो. धारणा करण्यासाठी दररोज असे काही पॉईंट्स मिळत राहतात ज्यामुळे बुद्धीचे कुलूपच उघडत जाते त्यामुळे कसेही करून मुरली तर वाचायचीच आहे. जसा रोज गीतापाठ करतात ना. इथे देखील रोज बाबांकडून शिकावे लागेल. बाबांना विचारले पाहिजे - माझी उन्नती होत नाही, काय कारण आहे? येऊन समजून घेतले पाहिजे. येतील देखील तेच ज्यांना पूर्ण निश्चय आहे की ते आपले पिता आहेत. असे नाही की, निश्चय बुद्धी होण्यासाठी पुरुषार्थ करत आहे. निश्चय तर एकच असतो, त्यामध्ये परसेंटेज (कमी-जास्त) असे काही असत नाही. बाबा एकच आहेत, त्यांच्याकडून वारसा मिळतो. इथे हजारोंनी शिकतात तरी देखील म्हणतील निश्चय कसा करू? त्यांना तर दुर्दैवी म्हटले जाते. सौभाग्यशाली तो जो बाबांना ओळखेल आणि मानेल. एखाद्या राजाने म्हटले - येऊन माझा दत्तक मुलगा बन, तर त्यांच्याकडे दत्तक जाताच क्षणी निश्चय होतो ना. असे म्हणणार नाहीत की, विश्वास कसा ठेवावा? हा आहेच राजयोग. बाबा तर स्वर्गाचे रचयिता आहेत तर स्वर्गाचे मालक बनवतात. निश्चय होत नसेल तर तुमच्या भाग्यामध्ये नाही आहे, दुसरा कोणी काय करू शकतो? मानत नसेल तर मग पुरुषार्थ तरी कसा करू शकेल? तो लंगडतच चालेल. बेहदच्या बाबांकडून भारतवासीयांना कल्प-कल्प स्वर्गाचा वारसा मिळतो. देवता असतातच स्वर्गामध्ये. कलियुगामध्ये काही राजाई नाही आहे. प्रजेचे प्रजेवर राज्य आहे. पतित दुनिया आहे तर मग त्याला पावन दुनिया बाबा बनवणार नाहीत तर मग कोण बनवणार? भाग्यामध्ये नसेल तर मग समजत नाहीत. ही तर समजण्यासाठी एकदम सोपी गोष्ट आहे. लक्ष्मी-नारायणाने या राजाईचे प्रारब्ध केव्हा मिळवले? जरूर आधीच्या जन्मातील कर्म आहेत तेव्हाच प्रारब्ध मिळवले आहे. लक्ष्मी-नारायण स्वर्गाचे मालक होते, आता नरकामध्ये आहेत, तर असे श्रेष्ठ कर्म अथवा राजयोग बाबांशिवाय इतर कोणीही शिकवू शकत नाही. आता सर्वांचा अंतिम जन्म आहे. बाबा राजयोग शिकवत आहेत. द्वापरमध्ये थोडेच राजयोग शिकवतील. द्वापर नंतर थोडेच सतयुग येणार. इथे तर खूप चांगल्या प्रकारे समजून घेतात आणि जातात. तर बाहेर गेल्यावरच रिकामे होतात जसे काही डब्बीमध्ये दगड राहतो, रत्न निघून जातात. ज्ञान ऐकत-ऐकत मग विकारामध्ये गेला तर खल्लास. बुद्धीद्वारे ज्ञान रत्नांची सफाई होते. असे देखील खूप लिहितात - बाबा, मेहनत करता-करता शेवटी आज घसरलो (पतित झालो). घसरले जणू आपल्याला आणि कुळाला कलंक लावला, भाग्याला गमावून बसला. घरामध्ये देखील मुले जर असे कोणते वाईट कर्म करतात तेव्हा असे म्हणतात - असा मुलगा मेलेला बरा. तर हे बेहदचे बाबा म्हणतात कुलकलंकीत बनू नका. जर विकारांचे दान देऊन मग परत घेतलेत तर पद भ्रष्ट होईल. पुरुषार्थ करायचा आहे, विजय प्राप्त करायचा आहे. मायेचा वार लागला तरी पुन्हा उभे राहा. पुन्हा-पुन्हा मार खात राहिलात तर मग हार खाऊन बेशुद्ध पडाल. बाप समजावून तर खूप सांगतात परंतु कोणी टिकावे तरी. माया खूप शक्तिशाली आहे. पवित्रतेचा प्रण केला, आणि तरीही कोसळतात (विकारामध्ये जातात) तर खूप जोराने मार लागतो. बेडा (जीवनाची नाव) पार होतोच मुळी पवित्रतेमुळे. पवित्रता होती तर भारताचा तारा चमकत होता. आता तर घोर अंधार आहे. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) या युद्धाच्या मैदानामध्ये मायेला घाबरायचे नाही. बाबांकडून पुरुषार्थाकरिता चांगले मत घ्यायचे आहे. प्रामाणिक, आज्ञाधारक बनून श्रीमतावर चालत रहायचे आहे.
2. २) रूहानी नशेमध्ये राहण्यासाठी ज्ञान अमृताचा प्याला रोज प्यायचा आहे. मुरली दररोज वाचायची आहे. भाग्यवान बनण्याकरिता बाबांविषयी कधीही शंका येता कामा नये.

वरदान:- ब्रह्मा बाप समान जीवनमुक्त स्थितीचा अनुभव करणारे कर्माच्या बंधनांपासून मुक्त भव

ब्रह्मा बाबा कर्म करत असताना देखील कर्माच्या बंधनांमध्ये अडकले नाहीत. नाती निभावत असताना देखील नात्यांच्या बंधनामध्ये बांधले गेले नाहीत. ते धन आणि साधनांच्या बंधनामधून देखील मुक्त राहिले, जबाबदाऱ्या सांभाळत असताना देखील जीवनमुक्त स्थितीचा अनुभव केला. असे फॉलो फादर करा. कोणत्याही मागील हिशोबाच्या बंधनामध्ये बांधून घ्यायचे नाही. संस्कार, स्वभाव, प्रभाव आणि दबावाच्या बंधनामध्ये देखील यायचे नाही तेव्हा म्हणणार कर्मबंधन मुक्त, जीवन मुक्त.

बोधवाक्य:- तमोगुणी वायुमंडळामध्ये स्वतःला सेफ ठेवायचे असेल तर साक्षी होऊन खेळ बघण्याचा अभ्यास करा.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - खरी कमाई करण्याचा पुरुषार्थ पहिले स्वतः करा आणि मग आपल्या मित्र-नातेवाईकांना देखील करवा, चॅरिटी बिगिन्स ॲट होम"

प्रश्न:- सुख किंवा चैन (शांती) प्राप्त करण्याची विधी काय आहे?

उत्तर:- पवित्रता. जिथे पवित्रता आहे तिथे सुख-चैन आहे. बाबा पवित्र दुनिया सतयुगाची स्थापना करतात. तिथे विकार नसतात. जे देवतांचे पुजारी आहेत ते कधी असा प्रश्न करू शकत नाहीत की विकारा शिवाय दुनिया कशी चालेल? आता तुम्हाला शांतीच्या दुनियेमध्ये यायचे आहे म्हणून या पतित दुनियेला विसरायचे आहे. शांतीधाम आणि सुखधामची आठवण करायची आहे.

ओम् शांती. ओम् शांतीचा अर्थ तर मुलांना समजावून सांगितलेला आहे. शिवबाबा देखील 'ओम् शांती' म्हणू शकतात तर शाळीग्राम मुले देखील म्हणू शकतात. आत्मा म्हणते, 'ओम् शांती'. सन ऑफ सायलेन्स फादर. शांतीसाठी जंगल इत्यादी ठिकाणी जाऊन काही उपाय केला जात नाही. आत्मा तर आहेच सायलेन्स (शांत). मग उपाय तो कशासाठी करायचा? हे बाबा बसून समजावून सांगतात. त्या बाबांनाच म्हणतात की, तिथे घेऊन चला जिथे सुख चैन मिळेल. चैन (शांती) अथवा सुख सर्व मनुष्यांना हवेसे वाटते. परंतु सुख आणि शांतीच्या अगोदर पाहिजे पवित्रता. पवित्र असणाऱ्याला पावन, अपवित्र असणाऱ्याला पतित म्हटले जाते. पतित दुनियावाले बोलावत राहतात की, येऊन आम्हाला पावन दुनियेमध्ये घेऊन चला. ते आहेतच पतित दुनियेमधून मुक्त करून पावन दुनियेमध्ये घेऊन जाणारे. सतयुगामध्ये आहे पवित्रता, कलियुगामध्ये आहे अपवित्रता. ते आहे व्हाईसलेस वर्ल्ड (निर्विकारी दुनिया), हे आहे विशश वर्ल्ड (विकारी दुनिया). हे तर मुले जाणतात - दुनियेची वृद्धी तर होत राहते. सतयुग व्हाईसलेस वर्ल्ड आहे तर जरूर थोडे मनुष्य असतील. ते थोडे कोण असतील? खरोखर सतयुगामध्ये देवी-देवतांचेच राज्य आहे, त्यालाच चैनची (शांतीची) दुनिया किंवा सुखधाम म्हटले जाते. हे आहे दुःखधाम. दुःखधामला बदलून सुखधाम बनविणारे एक परमपिता परमात्माच आहेत. सुखाचा वारसा जरूर बाबाच देतील. आता ते बाबा सांगत आहेत - दुःखधामाला विसरा, शांतीधाम आणि सुखधामाची आठवण करा यालाच मनमनाभव म्हटले जाते. बाबा येऊन मुलांना सुखधामाचा साक्षात्कार घडवतात. दुःखधामचा विनाश करवून शांतीधाममध्ये घेऊन जातात. या चक्राला समजून घ्यायचे आहे. ८४ जन्म घ्यावे लागतात. जे पहिले सुखधाममध्ये येतात, त्यांचे आहेत ८४ जन्म, फक्त एवढ्या गोष्टी लक्षात ठेवल्याने देखील मुले सुखधामचे मालक बनू शकतात.

बाबा म्हणतात - 'मुलांनो, शांतीधामची आठवण करा आणि मग वारशाची अर्थात सुखधामची आठवण करा. सर्वप्रथम तुम्ही शांतीधाममध्ये जाता तर स्वतःला शांतीधाम, ब्रह्मांडाचा मालक समजा. चालता-फिरता स्वतःला तिथले वासी समजाल तर ही दुनिया विसरत जाईल. सतयुग आहे सुखधाम परंतु सर्वच काही सतयुगामध्ये येऊ शकत नाहीत. या गोष्टी समजतीलही तेच जे देवतांचे पुजारी आहेत. ही आहे सच्ची कमाई, जे सच्चे बाबा शिकवतात. बाकी सर्व आहे खोटी कमाई. अविनाशी ज्ञान रत्नांची कमाई खरी कमाई म्हटली जाते, बाकी विनाशी धन-दौलत ती सर्व आहे खोटी कमाई. द्वापर पासून ती खोटी कमाई करत आले आहात. या अविनाशी खऱ्या कमाईचे प्रारब्ध सतयुगापासून सुरू होऊन त्रेतामध्ये पूर्ण होते अर्थात अर्धाकल्प भोगता. त्या नंतर मग खोटी कमाई सुरू होते, ज्याद्वारे अल्पकाळ क्षणभंगुर सुख मिळते. ही अविनाशी ज्ञान रत्ने, ज्ञान सागरच देतात. खरी कमाई खरे बाबाच करवून देतात. भारत सचखंड होता, भारतच आता झूठ खंड बनला आहे. इतर खंडांना सच-खंड, झुठ-खंड म्हटले जात नाही. सच-खंड बनविणारे खरे बादशहा तेच आहेत. खरे आहेत एक गॉड फादर, बाकी आहेत खोटे पिता. सतयुगामध्ये देखील खरे पिता मिळतात कारण तिथे खोटे, पाप असतच नाही. ही आहेच पाप आत्म्यांची दुनिया, ती आहे पुण्य आत्म्यांची दुनिया. तर आता या खऱ्या कमाईसाठी किती पुरुषार्थ करायला हवा. ज्यांनी कल्पापूर्वी कमाई केली आहे, तेच करतील. पहिले स्वतः खरी कमाई करून मग माहेरच्यांकडून आणि

सासरच्यांकडून हीच खरी कमाई करवून घ्यायची आहे. चॅरिटी बिगिन्स ॲट होम.

सर्वव्यापीचे ज्ञान असणारे भक्ति करू शकत नाहीत. जेव्हा सगळेच भगवंताचे रूप आहेत तर मग भक्ती कोणाची करता? तर या दलदली मधून काढण्यासाठी मेहनत करावी लागते. संन्याशी लोक चॅरिटी बिगिन्स ॲट होम काय करतील? पहिले तर ते आपल्या घरादाराचा समाचार ऐकवतच नाहीत. तुम्ही विचारा, का ऐकवत नाही? माहित तर असायला पाहिजे ना. सांगायला काय हरकत आहे, अमक्या घरचे होतो मग संन्यास धारण केला! तुम्हाला कोणी विचारले तर तुम्ही लगेच सांगू शकता. संन्याशांचे फॉलोअर्स तर खूप आहेत. ते मग बसून जर म्हणतील की, भगवान एक आहेत तर सर्व त्यांना विचारतील तुम्हाला हे ज्ञान कोणी सांगितले? म्हणतील बी. के. नी, मग तर त्यांचा सारा धंदाच खलास होईल. अशी कोण आपली इज्जत घालवेल? मग तर कोणी जेवण सुद्धा देणार नाहीत; म्हणूनच संन्याशांसाठी तर खूप अवघड आहे. पहिले तर आपल्या मित्र-नातेवाईकांना ज्ञान देऊन खरी कमाई करवून घ्यावी लागेल ज्यामुळे ते २१ जन्म सुख प्राप्त करतील. गोष्ट आहे तर खूप सोपी. परंतु ड्रामामध्ये इतकी शास्त्रे, मंदिरे इत्यादी बनविण्याची देखील नोंद आहे.

पतित दुनियेमध्ये राहणारे म्हणतात - 'आता पावन दुनियेमध्ये घेऊन चला'. सतयुगाला ५ हजार वर्षे झाली. त्यांनी तर कलियुगाचा कालावधी लाखो वर्षे म्हटलेला आहे तर मग मनुष्य कसे समजतील की सुखधाम कुठे आहे? कधी होणार? ते तर म्हणतात महाप्रलय होतो तेव्हा मग सतयुग येते. सर्वात पहिले श्रीकृष्ण सागरामध्ये पिंपळाच्या पानावर अंगठा चोखत येतो. आता कुठली गोष्ट कुठे घेऊन गेले आहेत! आता बाबा म्हणतात - ब्रह्माद्वारे मी सर्व वेद-शास्त्रांचे सार ऐकवतो म्हणून विष्णूच्या नाभी-कमळात ब्रह्माला दाखवतात आणि मग हातामध्ये शास्त्र दिली आहेत. आता ब्रह्मा तर जरूर इथे असेल. सूक्ष्म वतनमध्ये तर काही शास्त्र असणार नाहीत ना. ब्रह्मा इथे असायला पाहिजे. विष्णू, लक्ष्मी-नारायणाची रूपे देखील इथेच तर असतात. ब्रह्मा सो विष्णू बनतो मग विष्णू सो ब्रह्मा बनतो. आता ब्रह्मा पासून विष्णू निघतो कि विष्णूपासून ब्रह्मा निघतो? या सर्व समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. परंतु या गोष्टींना समजतील तेच जे चांगल्या प्रकारे अभ्यास करतील. बाबा म्हणतात - 'जोपर्यंत तुमचे शरीर सुटेल तोपर्यंत समजून घेतच रहाल. तुम्ही एकदम १०० टक्के अज्ञानी, गरीब बनले आहात. तुम्हीच हुशार देवी-देवता होता, आता पुन्हा तुम्ही देवी-देवता बनत आहात. मनुष्य तर बनवू शकणार नाही. तुम्ही सो देवता होता मग ८४ जन्म घेत-घेत एकदम कला हीन झाले आहात. तुम्ही सुखधाममध्ये खूप चैनमध्ये (शांतीमध्ये) होता, आता बेचैन आहात. तुम्ही ८४ जन्मांचा हिशोब सांगू शकता. इस्लामी, बौद्धी, शिख, ईसाई, मठ-पंथ हे सर्व किती जन्म घेतील? हा हिशोब काढणे तर सोपे आहे. स्वर्गाचे मालक तर भारतवासीच बनतील. कलम लागते ना. हे आहे स्पष्टीकरण. स्वतः समजतील तर मग सर्वात अगोदर आपल्या आई-वडिलांना, बहिण-भावांना ज्ञान द्यावे लागेल. गृहस्थ व्यवहारामध्ये रहात असताना कमलपुष्प समान रहायचे आहे मग चॅरिटी बिगिन्स ॲट होम. आपल्या माहेरी, सासरी नॉलेज ऐकवावे लागेल. धंद्यामध्ये देखील पहिले आपल्या भावांनाच भागीदार बनवतात. इथे देखील असेच आहे. गायन देखील आहे - 'कन्या ती जी माहेरचा आणि सासरचा उद्धार करेल'. अपवित्र उद्धार करू शकत नाही. तर कोणती कन्या? या ब्रह्माची कन्या, ब्रह्माकुमारी आहे ना. इथे अधर कन्या, कुमारी कन्येचे मंदिर देखील बांधलेले आहे ना. इथे तुमची यादगार (स्मारके) बनलेली आहेत. आपण पुन्हा आलो आहोत भारताला स्वर्ग बनविण्यासाठी. हे दिलवाडा मंदिर एकदम अचूक आहे, वरती स्वर्ग दाखविला आहे. स्वर्ग आहे तर इथेच. राजयोगाची तपस्या देखील इथेच होते. ज्यांचे मंदिर आहे त्यांनी तर हे जाणून घेतली पाहिजे ना! आता आतमध्ये जगतपिता, जगत अंबा, आदि देव, आदि देवी बसले आहेत. अच्छा, आदि देव कोणाचा मुलगा आहे? शिवबाबांचा. अधर कुमारी, कुमारी कन्या सर्व राजयोगामध्ये बसलेले आहेत. बाबा म्हणतात - 'मनमनाभव'; तर तुम्ही वैकुंठाचे मालक बनाल. मुक्ती, जीवनमुक्ती धामची आठवण करा. तुमचा हा संन्यास आहे, जैन लोकांचा संन्यास किती अवघड आहे. केशवपन करण्याचा रिवाज किती कडक आहे. इथे तर आहेच सहज राजयोग. हा आहे देखील प्रवृत्ती मार्गाचा. हे ड्रामामध्ये नोंदलेले आहे. कोणी जैन मुनीने बसून आपला नवीन धर्म स्थापन केला परंतु त्याला आदि सनातन देवी-देवता धर्म तर म्हणणार नाही ना. तो तर आता प्राय:लोप झाला आहे. कोणी जैन धर्म सुरु केला आणि चालत राहिला. हे देखील ड्रामामध्ये आहे. आदि देवाला पिता आणि जगत अंबेला माता म्हणणार. हे तर सर्वजण जाणतात की, आदि देव ब्रह्मा आहेत. आदम-बीबी, ॲडम-ईव्ह देखील म्हणतात. ख्रिश्चन लोकांना थोडेच माहित आहे की ॲडम-ईव्ह आता तपस्या करत आहेत. मनुष्य सृष्टीच्या वंशावळीचे हे मुख्य आहेत. हे रहस्य देखील बाबा बसून समजावून सांगतात. शिवाची किंवा

लक्ष्मी-नारायणाची इतकी मंदिरे बांधली आहेत तर त्यांची बायोग्राफी (जीवन चरित्र) जाणून घेतले पाहिजे ना! हे देखील ज्ञान सागर बाबाच बसून समजावून सांगतात. परमपिता परमात्म्यालाच नॉलेजफुल, ज्ञानाचा सागर, आनंदाचा सागर म्हटले जाते. ही परमात्म्याची महिमा कोणीही साधु-संत इत्यादी जाणत नाहीत. ते तर म्हणतात - 'परमात्मा सर्वव्यापी आहे मग महिमा कोणाची करतील? परमात्म्याला न जाणल्या कारणानेच मग स्वतःला शिवोहम् म्हणतात. नाही तर परमात्म्याची महिमा किती मोठी आहे. ते तर मनुष्य सृष्टीचे बीजरूप आहेत. मुसलमान लोक देखील म्हणतात - आम्हाला खुदाने निर्माण केले, तर आपण रचना झालो. रचना, रचनेला वारसा देऊ शकत नाही. क्रिएशनला क्रियेटर कडून वारसा मिळतो, या गोष्टीला कोणीही समजू शकत नाहीत. ते बीजरूप सत् आहेत, चैतन्य आहेत, सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे त्यांना ज्ञान आहे. बीजा व्यतिरिक्त आदि-मध्य-अंताचे ज्ञान कोणत्याही मनुष्यमात्राला असू शकत नाही. बीज चैतन्य आहे तर जरूर नॉलेज त्यांच्यामध्येच असेल. तेच येऊन तुम्हाला संपूर्ण सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे नॉलेज देतात. असा देखील बोर्ड लावला पाहिजे की, या चक्राला जाणल्याने तुम्ही सतयुगाचे चक्रवर्ती राजा अथवा स्वर्गाचे राजा बनाल. किती सोपी गोष्ट आहे. बाबा म्हणतात - जोपर्यंत जगायचे आहे, माझी आठवण करायची आहे. मी स्वतः तुम्हाला हा वशीकरण मंत्र देतो. आता तुम्हाला आठवण करायची आहे बाबांची. आठवण केल्यानेच विकर्म विनाश होतील. हे स्वदर्शन चक्र फिरत राहीले तर मायेचे डोके कापले जाईल. मी तुमच्या आत्म्याला पवित्र बनवून घेऊन जाणार मग तुम्ही सतोप्रधान शरीर घ्याल. तिथे विकार असत नाहीत. म्हणतात - विकारा शिवाय सृष्टी कशी चालेल? बोला, तुम्ही कदाचित देवतांचे पुजारी नाही आहात. लक्ष्मी-नारायणाची तर महिमा गातात - संपूर्ण निर्विकारी. जगदंबा, जगतपिता निर्विकारी आहेत, राजयोगाची तपस्या करून पतिता पासून पावन, स्वर्गाचे मालक बनले आहेत. तपस्या करतातच मुळी पुण्य आत्मा बनण्यासाठी. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) या जुन्या दुनियेला बुद्धीने विसरण्यासाठी चालता-फिरता स्वतःला शांतीधामचा वासी समजायचे आहे. शांतीधाम आणि सुखधामची आठवण करून खरी कमाई करायची आहे आणि इतरांकडून देखील करून घ्यायची आहे.
2. २) राजयोगाची तपस्या करून स्वतःला पुण्य आत्मा बनवायचे आहे. मायेचे डोके कापण्यासाठी नेहमी स्वदर्शन चक्र फिरत रहावे.

वरदान:- संपन्नते द्वारे नेहमी संतुष्टतेचा अनुभव करणारे संपत्तीवान भव

स्वराज्याची संपत्ती आहे ज्ञान, गुण आणि शक्ती. जे या सर्व संपत्तीने संपन्न स्वराज्य अधिकारी आहेत ते नेहमी संतुष्ट आहेत. त्यांच्याकडे अप्राप्तीचे नामो-निशाणही नसते. हदच्या इच्छांची अविद्या - यालाच म्हटले जाते संपत्तीवान. ते नेहमी दाता असतील, मागणारे नाहीत. ते अखंड सुख-शांतीमय स्वराज्याचे अधिकारी असतात. कोणत्याही प्रकारची परिस्थिती त्यांच्या अखंड शांतीला खंडित करू शकत नाही.

बोधवाक्य:- ज्ञान नेत्राद्वारे तिन्ही काळांना आणि तिन्ही लोकांना जाणणारे मास्टर नॉलेजफुल आहेत.

||| ओम शांती |||

"सदैव आपल्या स्वमानामध्ये रहा, सन्मान द्या, सर्वांचे सहयोगी बना आणि समर्थ बनवा"

आज भाग्यविधाता बापदादा चोहो बाजूच्या प्रत्येक मुलाच्या मस्तकावर भाग्याच्या तीन रेषा पहात आहेत. एक परमात्म पालनेची भाग्यशाली रेषा, दुसरी सत्य शिक्षकाकडून मिळालेल्या श्रेष्ठ शिकवणीची भाग्यशाली रेषा, तिसरी श्रीमताची चमकणारी रेषा. चोहो बाजूच्या मुलांच्या मस्तकामध्ये तिन्ही रेषा खूप छान चमकत आहेत. तुम्ही देखील सर्व आपल्या तिन्ही भाग्याच्या रेषा बघत आहात ना. जेव्हा भाग्य विधाता तुम्हा मुलांचे पिता आहेत तर तुमच्याशिवाय श्रेष्ठ भाग्य आणखी कुणाचे असू शकते! बापदादा बघत आहेत विश्वामध्ये करोडो आत्मे आहेत परंतु त्या करोडोंमधून ६ लाख परिवार... किती थोडे आहेत! कोटींमध्ये कोणी झालात ना! तसे प्रत्येक मानव जीवनामध्ये या तीन गोष्टी पालना (संगोपन), शिक्षण, आणि श्रेष्ठ मत, तिन्ही जरुरी आहेत. परंतु ही परमात्म पालना आणि देव आत्म्यांचे किंवा मानव आत्म्यांचे मत, पालना, शिक्षण यामध्ये रात्रं-दिवसाचा फरक आहे. तर इतके श्रेष्ठ भाग्य जे संकल्पामध्ये सुद्धा नव्हते परंतु आता प्रत्येकाचे मन गाते - 'पा लिया'. मिळाले की मिळायचे आहे? काय म्हणाल? मिळाले ना! बाबा देखील अशा मुलांच्या भाग्याला पाहून हर्षित होत आहेत. मुले म्हणतात - 'वाह बाबा वाह!' आणि बाबा म्हणतात - 'वाह मुलांनो वाह!' बस्स, याच भाग्याला फक्त स्मृतीमध्येच ठेवायचे नाहीये परंतु सदैव स्मृति स्वरूप रहायचे आहे. बरीच मुले विचार खूप चांगले करतात परंतु 'विचार स्वरूप' बनायचे नाही, 'स्मृती स्वरूप' बनायचे आहे. स्मृती स्वरूप सो समर्थ स्वरूप आहे. विचार स्वरूप हे काही समर्थ स्वरूप नाहीये.

बापदादा मुलांच्या भिन्न-भिन्न लीला पाहून हसत असतात. काही-काही 'विचार स्वरूप' असतात, सदैव 'स्मृती स्वरूप' राहत नाहीत. कधी विचार स्वरूप, कधी स्मृती स्वरूप. जे स्मृती स्वरूप राहतात ते निरंतर नॅचरल स्वरूप असतात. जे विचार स्वरूप राहतात त्यांना मेहनत करावी लागते. हे संगमयुग मेहनत करण्याचे युग नाहीये, सर्व प्राप्तींच्या अनुभवांचे युग आहे. ६३ जन्म मेहनत केलीत आता मेहनतीचे फळ प्राप्त करण्याचे युग अर्थात वेळ आहे.

बापदादा बघत होते की, देह-भानाच्या स्मृतीमध्ये राहण्यासाठी कोणती मेहनत केलीत - 'मी अमका आहे, मी तमका आहे...' अशी मेहनत केलीत का? नॅचरली झाले ना! बॉडी कॉन्शसचे नेचर बनले ना ! नेचर (स्वभाव) इतके पक्के झाले जे आता देखील कधी-कधी बऱ्याच मुलांना आत्म-अभिमानी बनण्याच्या वेळी देहभान आपल्याकडे आकर्षित करते. विचार करतात - 'मी आत्मा आहे, मी आत्मा आहे', परंतु देहभानाची स्मृती इतकी नॅचरल झाली आहे ज्यामुळे इच्छा नसतानाही, विचारही न करता वारंवार देहभानामध्ये येता. बापदादा म्हणतात - आता मरजीवा जन्मामध्ये आत्म-अभिमान अर्थात देही-अभिमानी स्थिती देखील अशीच स्वाभाविक आणि नैसर्गिक असावी. मेहनत करावी लागू नये - 'मी आत्मा आहे, मी आत्मा आहे'. जसे कोणतेही बाळ जन्माला येते आणि जेव्हा त्याला थोडी समज येते तर त्याला परिचय दिला जातो तू कोण आहेस, कोणाचा आहेस; असेच जेव्हा ब्राह्मण जन्म घेतलात तेव्हा तुम्हा ब्राह्मण मुलांना जन्मताच कोणता परिचय मिळाला? 'तुम्ही कोण आहात?' आत्म्याचा धडा पक्का करवून घेतला गेला ना! तर हा पहिला परिचय नॅचरल नेचर (नैसर्गिक स्वभाव) बनावा. स्वभाव नैसर्गिक आणि कायमचा राहतो, आठवण करावी लागत नाही. अशी प्रत्येक ब्राह्मण मुलाची आता वेळेनुसार देही-अभिमानी स्टेज नॅचरल व्हावी. बऱ्याच मुलांची आहे, विचार करावा लागत नाही, स्मृती स्वरूप आहेत. आता निरंतर आणि नॅचरल स्मृती स्वरूप बनायचेच आहे. लास्ट शेवटचा पेपर सर्व ब्राह्मणांचा हाच छोटासा आहे - "नष्टोमोहा स्मृती स्वरूप".

तर या वर्षामध्ये काय करणार? अनेक मुले विचारतात - या वर्षामध्ये कोणते विशेष लक्ष्य ठेवायचे आहे? तर बापदादा म्हणतात - सदा देही-अभिमानी, स्मृती स्वरूप भव. जीवनमुक्ती तर प्राप्त होणारच आहे परंतु जीवनमुक्त होण्यापूर्वी मेहनत मुक्त बना. ही स्थिती समयाला समीप आणेल आणि विश्वातील तुमच्या सर्व भाऊ-बहिणींना दुःख-अशांती मधून मुक्त करेल. तुमची ही स्थिती आत्म्यांकरिता मुक्तिधामचा दरवाजा उघडेल.

तर आपल्या भाऊ-बहिणींची दया येत नाही! चोहो बाजूला आत्मे किती आक्रोश करत आहेत तर तुमची मुक्ती सर्वांना मुक्ती देईल. हे चेक करा - नॅचरल स्मृती सो समर्थ स्वरूप कितपत बनले आहात? समर्थ स्वरूप बनणेच व्यर्थला सहज समाप्त करेल. वारंवार मेहनत करावी लागणार नाही.

आता या वर्षी बापदादा मुलांवरील प्रेमापोटी कोणत्याही मुलाला कोणत्याही समस्येमध्ये मेहनत करताना पाहू इच्छित नाहीत. समस्या समाप्त आणि समाधान समर्थ स्वरूप. काय असे होऊ शकते का? बोला दादी, होऊ शकते? टीचर्स बोला, होऊ शकते? पांडव, होऊ शकते? नंतर कारणे सांगू नका, 'असे होते ना, असे झाले ना! असे झाले नसते तर नसते झाले!' बापदादांनी खूप मजेशीर खेळ पाहिले आहेत. काहीही होऊ दे, हिमालयापेक्षाही मोठे, शंभर पट मोठे समस्येचे स्वरूप असेल, मग तनाद्वारे असेल, किंवा मनाद्वारे असेल, किंवा व्यक्तींद्वारे असेल, किंवा प्रकृती द्वारे समस्या, परंतु पर-स्थिती तुमच्या स्व-स्थिती समोर काहीच नाही आहे आणि स्व-स्थितीचे साधन आहे - स्वमान. नॅचरल रूपामध्ये स्वमान असावा. आठवावा लागू नये, वारंवार मेहनत करावी लागू नये की, नाही-नाही, 'मी स्वदर्शन चक्रधारी आहे', 'मी नुरे रत्न आहे', 'मी दिलतख्तनशीन आहे...' आहेच. दुसरे कोणी होणार आहेत का! कल्पापूर्वी कोण बनले होते? दुसरे कोणी बनले होते की तुम्हीच बनला होता? तुम्हीच होता, तुम्हीच आहात, प्रत्येक कल्पात तुम्हीच बनणार. हे निश्चित आहे. बापदादा सर्व चेहरे पाहत आहेत हे तेच कल्पापूर्वीचे आहेत. या कल्पातील आहात कि कित्येक कल्पातील आहात? अनेक कल्पातील आहात ना! आहात? हात वर करा जे कित्येक कल्पातील आहेत? मग तर निश्चित आहे ना, तुम्हाला तर पास चे सर्टिफिकेट मिळाले आहे ना कि घ्यायचे आहे? मिळाले आहे ना? मिळाले आहे कि घ्यायचे आहे? कल्पापूर्वी मिळाले आहे, आता का नाही मिळणार. तर असेच स्मृती स्वरूप बना की, सर्टिफिकेट मिळालेले आहे. भले मग पास विद ऑनरचे असो, किंवा उत्तीर्ण चे असो, हा फरक तर असणारच, परंतु आम्हीच आहोत. पक्के आहे ना! कि ट्रेन मधून जाता-जाता विसरून जाल, प्लेनमध्ये गेल्यावर उडून जाईल? नाही.

जसे पहा यावर्षी संकल्प दृढ केला की, शिवरात्री चोहो बाजूला उमंग-उत्साहाने साजरी करायची आहे. तर साजरी केलीत ना! दृढ संकल्पाने जो विचार केला तो पूर्ण झाला ना! तर ही कोणत्या गोष्टीची कमाल आहे? 'एकता' आणि 'दृढता'. विचार केला होता ६७ प्रोग्राम करण्याचा परंतु बापदादांनी पाहिले की कित्येक मुलांनी त्याहीपेक्षा जास्त प्रोग्राम केले आहेत. ही आहे 'समर्थ स्वरूपा'ची निशाणी, उमंग-उत्साहाचे प्रत्यक्ष प्रमाण. सहजच चोहो बाजूला प्रोग्राम केलेत ना! असेच सर्वांनी मिळून एकमेकांची हिंमत वाढवून हा संकल्प करा - 'आता समयाला समीप आणायचेच आहे. आत्म्यांना मुक्ती द्यायची आहे'. परंतु हे तेव्हा होईल जेव्हा तुम्ही तुमच्या विचाराला स्मृती स्वरूपामध्ये आणाल.

बापदादांनी ऐकले की, फॉरेनवाल्यांचे देखील विशेष स्नेहसंमेलन किंवा मिटिंग आहे आणि भारतवाल्यांची सुद्धा मिटिंग आहे तर मिटिंगमध्ये फक्त सेवेचे प्लॅन बनवायचे नाहीत, बनवा परंतु बॅलन्सवाले प्लॅन बनवा. असे एकमेकांचे सहयोगी बना ज्यामुळे सर्व मास्टर सर्वशक्तिमान बनून पुढे उडत जातील. दाता बनून सहयोग द्या. गोष्टी पाहू नका, सहयोगी बना. स्वमानामध्ये रहा आणि सन्मान देऊन सहयोगी बना कारण कोणत्याही आत्म्याला जर तुम्ही मनापासून सन्मान देता, तर हे खूप-खूप मोठे पुण्य आहे कारण कमजोर आत्म्याला उमंग-उत्साहामध्ये आणले तर किती मोठे पुण्य आहे! आधीच पडलेल्याला अजून खाली पाडू नका, जवळ घ्यायचे आहे म्हणजे बाह्यरूपात जवळ घ्यायचे नाहीये, जवळ घ्यायचे अर्थात बाप समान बनविणे. सहयोग देणे.

तर विचारलेत ना की यावर्षी काय-काय करायचे आहे? बस्स, सन्मान देणे आणि स्वमानामध्ये राहणे. समर्थ बनून समर्थ बनविणे. व्यर्थ गोष्टींमध्ये जायचे नाही. कमजोर आत्मा जी आहेच कमजोर, तिच्या कमजोरीला बघत रहाल तर मग सहयोगी कसे बनाल! सहयोग द्या तर आशीर्वाद मिळतील. सर्वात सोपा पुरुषार्थ आहे, आणखी काहीच करू शकत नसाल तर सर्वात सोपा पुरुषार्थ आहे - आशीर्वाद द्या, आशीर्वाद घ्या. सन्मान द्या आणि महिमा योग्य बना. सन्मान देणारेच सर्वांद्वारे माननीय बनतात. आणि जितके आता माननीय बनाल, तितकेच राज्य अधिकारी आणि पूज्य आत्मा बनाल. देत जा घ्यायचे नाही, 'घ्या' आणि 'द्या' हे तर बिझनेसवाल्यांचे काम आहे. तुम्ही तर दात्याची मुले आहात. बाकी बापदादा चोहो बाजूच्या मुलांची सेवा पाहून खुश आहेत, सर्वांनी चांगली सेवा केली आहे. परंतु आता पुढे जायचे आहे ना! वाणी द्वारे सर्वांनी चांगली सेवा केली, साधनांद्वारे सुद्धा सेवेचा रिझल्ट चांगला मिळवला. अनेक आत्म्यांची तक्रार देखील समाप्त केली.

त्याचसोबत तीव्रगतीचा वेग पाहून बापदादांची हीच इच्छा आहे की, फक्त थोड्याशाच आत्म्यांची सेवा करायची नाही परंतु विश्वातील सर्व आत्म्यांचे मुक्तिदाता निमित्त तुम्ही आहात कारण बाबांचे साथीदार आहात, तर समयाच्या गतीनुसार आता एकाच वेळी तिन्ही सेवा एकत्र करायच्या आहेत:- एक - वाणी, दुसरी - स्वतःची शक्तिशाली स्थिती आणि तिसरी - श्रेष्ठ रुहानी व्हायब्रेशन्स (आत्मिक प्रकंपने); जिथे कुठे सेवा कराल तिथे असे रुहानी व्हायब्रेशन पसरवा जेणेकरून व्हायब्रेशनच्या प्रभावाने आपोआपच आकर्षित होत राहतील. पहा, आता लास्ट जन्मामध्ये देखील तुम्हा सर्वांची जड चित्रे (मुर्त्या) कशी सेवा करत आहेत? कि वाणीने बोलतात? व्हायब्रेशन असे असते ज्यामुळे भक्तांना त्यांच्या भावनेचे फळ सहजच मिळते. असे शक्तिशाली व्हायब्रेशन असावे, व्हायब्रेशनमध्ये सर्व शक्तींची किरणे पसरावीत, वायुमंडळ बदलून जावे. व्हायब्रेशन ही अशी गोष्ट आहे जी मनावर छाप पाडते. तुम्हा सर्वांना अनुभव आहे की, एखाद्या आत्म्याप्रती जर काही चांगले अथवा वाईट व्हायब्रेशन तुमच्या मनामध्ये घर करून राहते तर ते किती काळ राहते? खूप काळापर्यंत राहते ना! काढून टाकावे म्हटले तरी निघत नाही, कोणाविषयी वाईट व्हायब्रेशन डोक्यात बसले तर ते इतक्या सहजासहजी डोक्यातून जाते का? तर तुमचे सर्व शक्तींच्या किरणांचे व्हायब्रेशन, छाप पाडण्याचे काम करेल. एकवेळ वाणी विसरली जाऊ शकते, परंतु व्हायब्रेशनची छाप सहजासहजी जात नाही. अनुभव आहे ना! आहे ना अनुभव?

या गुजरातने, बॉम्बेने जो उमंग-उत्साह दाखवला, त्याला देखील बापदादा पद्म-पदम पटीने मुबारक देत आहेत. कशाकरिता? विशेषता कोणती होती? का मुबारक देत आहेत? प्रोग्राम तर मोठ-मोठे करत राहता परंतु खास मुबारक का देत आहेत? कारण दोन्ही बाजूची विशेषता होती - एकता आणि दृढतेची. जिथे एकता आणि दृढता आहे तिथे एका वर्षाऐवजी एक महिना वर्षा समान आहे. ऐकले, गुजरात आणि बॉम्बेने. अच्छा.

आता सेकंदामध्ये ज्ञान सूर्य स्थितीमध्ये स्थित होऊन चोहो बाजूच्या भयभीत, हवालदिल असणाऱ्या आत्म्यांवर, सर्व शक्तींची किरणे पसरवा. खूप घाबरलेले आहेत. शक्ती द्या. व्हायब्रेशन पसरवा. अच्छा. (बापदादांनी ड्रिल करवून घेतली)

चोहो बाजूच्या मुलांच्या भिन्न-भिन्न प्रेमपूर्वक आठवणी आणि समाचारची पत्रे आणि ई-मेल बाबांपाशी पोहोचले. प्रत्येकजण म्हणतो - 'माझी सुद्धा आठवण द्या, माझी सुद्धा आठवण द्या'. बापदादा म्हणतात - सर्व लाडक्या मुलांची आठवण बापदादांपाशी पोहोचली आहे. दूर असून देखील बाप-दादांचे दिलतख्तनशीन आहेत. तर तुम्हा सर्वांना ज्यांनीपण म्हटले आहे ना - 'आठवण द्या, आठवण द्या'. तर बाबांपाशी पोहोचली. हेच मुलांचे प्रेम आणि बाबांचे प्रेम मुलांना उडवत आहे. अच्छा.

चोहो बाजूच्या अति श्रेष्ठ भाग्यवान, कोटीमध्ये कोणी विशेष आत्म्यांना सदैव स्वमानामध्ये राहणाऱ्या, सन्मान देणाऱ्या, सेवाभावी मुलांना, सदैव स्मृती स्वरूप सो समर्थ स्वरूप आत्म्यांना, सदैव अचल अडोल स्थितीच्या आसनावर स्थित सर्वशक्ति स्वरूप मुलांना बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि नमस्ते.

दादींसोबत संवाद:- बापदादा तुमच्यावर विशेष खुश आहेत. का खुश आहेत? विशेष या गोष्टीवर खुश आहेत की, जसे ब्रह्मा बाबा सर्वांना ऑर्डर करत होते - 'हे करायचे आहे, आता करायचे आहे', तसे तुम्ही देखील ब्रह्मा बाबांना फॉलो केले. (दादी म्हणाल्या - तुम्ही देखील माझ्या सोबत आहात) ते तर आहेच, निमित्त तर तू बनली आहेस ना. आणि असा दृढ संकल्प केला ज्यामुळे चोहो बाजूला सफलता मिळत आहे, त्यामुळे तुमच्यामध्ये खूप गुप्त रुहानी ताकद भरलेली आहे. तब्येत ठीक आहे, रुहानी शक्ती इतकी भरलेली आहे त्यापुढे तब्येत काहीच नाही. आश्चर्य आहे ना!

दादींचे भेटणे पाहून सर्वांच्या मनात येते आम्ही सुद्धा दादी असतो तर भेटलो असतो ना. तुम्ही सुद्धा दादी बनणार. आता बापदादांनी मनामध्ये प्लॅन बनवला आहे, अजून दिलेला नाहीये. तर जी सेवेचे, ब्रह्मा बाबांच्या साकार समयी सेवेमध्ये आदि रत्न निघाली आहेत, त्यांचे संघटन पक्के करायचे आहे. (कधी करणार) जेव्हा तुम्ही कराल. ही ड्युटी तुमची (दादी जानकीची) आहे. तुमच्या मनाचा संकल्प देखील आहे ना? कारण जसे तुम्हा दादींचे एकता आणि दृढतेचे संघटन पक्के आहे, तसे आदि सेवेच्या रत्नांचे संघटन पक्के व्हावे, याची खूप-खूप आवश्यकता आहे कारण सेवा तर वाढणारच आहे. तर संघटनची शक्ती जे पाहिजे ते करू शकते. संघटनच्या

निशाणीचे यादगार (प्रतीक) आहे - पाच पांडव. पाच आहेत परंतु ती संघटनेची निशाणी आहे. अच्छा - आता जे साकार ब्रह्मा बाबा असताना सेवेसाठी सेंटरवर राहिले आहेत, सेवेला लागले आहेत, त्यांनी उभे रहा. भाऊ सुद्धा आहेत, पांडवांशिवाय गती थोडीच आहे. इथे तर थोडे आहेत परंतु अजूनही आहेत. संघटनला एकत्र करण्याची जबाबदारी यांची (दादी जानकीची) आहे, ही (दादी) तर बॅकबोन आहे. खूप चांगली-चांगली रत्ने आहेत. अच्छा. सर्व ठीक आहेत. काहीही करत असाल परंतु तुमच्या संघटनची महानता आहे. किल्ला मजबूत आहे. अच्छा.

वरदान:- स्वमानाच्या सीटवर सेट होऊन प्रत्येक परिस्थितीला पार करणारे सदैव विजयी भव

सदैव आपल्या या स्वमानाच्या सीटवर स्थित रहा की, 'मी विजयी रत्न आहे', 'मास्टर सर्वशक्तिमान आहे' - तर जशी सीट असते तशी लक्षणे येतात. कोणतीही परिस्थिती समोर आली की सेकंदामध्ये आपल्या या सीटवर सेट व्हा. सीटवर असणाऱ्याचीच ऑर्डर मानली जाते. सीटवर रहा तर विजयी बनाल. संगमयुग आहेच सदैव विजयी बनण्याचे युग, हे युगाला वरदान आहे, तर वरदानी बनून विजयी बना.

सुविचार:- सर्व आसक्तींवर विजय प्राप्त करणारी शिवशक्ती पांडव सेना आहे.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - तुम्ही बाबांकडे येता रिफ्रेश होण्यासाठी, बाबांना भेटल्यावर भक्तिमार्गाची सर्व थकावट दूर होते"

प्रश्न:- तुम्हा मुलांना बाबा कोणत्या विधीने रिफ्रेश करतात?

उत्तर:- १. बाबा ज्ञान ऐकवून-ऐकवून तुम्हाला रिफ्रेश करतात. २. आठवणीने देखील तुम्ही मुले रिफ्रेश होता. वास्तविक सतयुग आहे खरी विश्राम पुरी. तिथे कोणतीही वस्तू अप्राप्त नाही, जिला प्राप्त करण्यासाठी परिश्रम करावे लागतील. ३. शिवबाबांच्या कुशीत येताच तुम्हा मुलांना विश्रांती मिळते. सर्व थकवा निघून जातो.

ओम् शांती. बाबा बसून समजावून सांगतात, सोबतच हे दादा (ब्रह्मा बाबा) देखील समजतात कारण बाबा या दादांद्वारे बसून समजावून सांगतात. जसे तुम्ही समजता, तसे हे दादा देखील समजतात. दादाला (ब्रह्माला) भगवान म्हटले जात नाही, हे आहे भगवानुवाच. बाबा काय समजावून सांगतात? देही-अभिमानी भव कारण स्वतःला आत्मा समजल्याशिवाय परमपिता परमात्म्याची आठवण करू शकणार नाही. यावेळी तर सर्व आत्मे पतित आहेत. पतित असणाऱ्यालाच मनुष्य म्हटले जाते, पावन असणाऱ्याला देवता म्हटले जाते. या समजून घेण्यासाठी आणि समजावून सांगण्यासाठी अतिशय सोप्या गोष्टी आहेत. मनुष्यच बोलावतात - 'हे पतितांना पावन बनविणारे या'. देवी-देवता असे कधीही म्हणणार नाहीत. पतित-पावन बाबा पतितांच्या बोलावण्यावरूनच येतात. आत्म्यांना पावन बनवून मग नवीन पावन दुनिया देखील स्थापन करतात. आत्माच बाबांना बोलावते. शरीर तर काही हाक मारणार नाही. पारलौकिक पिता जे सदा पावन आहेत, त्यांचीच सर्वजण आठवण करतात. ही आहे जुनी दुनिया. बाबा नवीन पावन दुनिया बनवतात. बरेचजण तर असेही आहेत जे म्हणतात - आम्हाला तर इथेच अपार सुख आहे, पुष्कळ धन-दौलत आहे. ते समजतात आपल्यासाठी तर हाच स्वर्ग आहे. ते तुमच्या गोष्टी कसे मान्य करतील? कलियुगी दुनियेला स्वर्ग समजणे - हा देखील मूर्खपणा आहे. किती जडजडीभूत (कष्टदायी) अवस्था झाली आहे. तरीही मनुष्य म्हणतात, आम्ही तर स्वर्गामध्ये बसलो आहोत. मुले समजावून सांगत नसतील तर बाबा म्हणतीलच ना - तू काय पत्थर-बुद्धी आहेस काय? इतरांना समजावून सांगू शकत नाहीस? जेव्हा स्वतः पारस-बुद्धी बनाल तेव्हाच तर दुसऱ्यांना सुद्धा बनवाल. पुरुषार्थ चांगला केला पाहिजे, यामध्ये लाज वाटण्याचा प्रश्नच नाही. परंतु मनुष्यांच्या बुद्धीमध्ये अर्ध्या कल्पाची जी उलटी मते भरलेली आहेत ती इतक्या लवकर कोणी विसरत नाहीत. जोपर्यंत बाबांना यथार्थ रीतीने ओळखत नाहीत तोपर्यंत ती ताकद येऊ शकत नाही. बाबा म्हणतात - या वेद-शास्त्र इत्यादींनी मनुष्य काही सुधारत नाहीत. दिवसेंदिवस अजूनच बिघडत आले आहेत. सतोप्रधानापासून तमोप्रधानच बनले आहेत. हे कोणाच्याही बुद्धीमध्ये नाही आहे की, आम्हीच सतोप्रधान देवी-देवता होतो, कसे खाली घसरलो आहोत (पतन झाले आहे). हे जरा सुद्धा कोणाला माहित नाही आहे आणि मग ८४ जन्मांच्या ऐवजी ८४ लाख जन्म म्हटले आहे तर मग माहित तरी कसे होईल. बाबांशिवाय ज्ञानाचा प्रकाश देणारा कोणीच नाहीये. सर्वजण एकामागोमाग एक दारोदार भटकत राहतात. खाली उतरत-उतरत धारातीर्थी पडले आहेत, सर्व ताकद संपलेली आहे. बुद्धीमध्ये देखील ताकद राहिलेली नाही जे बाबांना यथार्थ जाणू शकतील. बाबाच येऊन सर्वांच्या बुद्धीचे कुलूप उघडतात; तर मग किती रिफ्रेश होतात. बाबांकडे मुले रिफ्रेश होण्यासाठी येतात. घरामध्ये विश्रांती मिळते ना. बाबांच्या भेटण्याने भक्तीमार्गातील सर्व थकवा दूर होतो. सतयुगाला देखील 'विश्रामपुरी' म्हटले जाते. तिथे तुम्हाला किती विश्रांती मिळते. कोणती अप्राप्त वस्तू नाही ज्याच्यासाठी परिश्रम करावे लागतील. इथे बाबा देखील रिफ्रेश करतात तर दादा देखील करतात. शिवबाबांच्या गोदीमध्ये आल्यावर किती विश्रांती मिळते. विश्रांती अर्थात शांतता. मनुष्य देखील थकतात तेव्हा मग विश्रांती घेतात. कोणी कुठे, कोणी कुठे विश्रांतीसाठी जातात ना. परंतु त्या विश्रांतीमध्ये रिफ्रेशमेंट नसते. इथे तर बाबा तुम्हाला किती ज्ञान ऐकवून रिफ्रेश करतात. बाबांच्या आठवणीनेच किती रिफ्रेश होतात आणि तमोप्रधानापासून सतोप्रधान देखील बनत जाता. सतोप्रधान बनण्यासाठी इथे बाबांकडे येता. बाबा म्हणतात - 'गोड-गोड मुलांनो, बाबांची आठवण करा'. बाबांनी समजावून सांगितले आहे की, साऱ्या सृष्टीचे चक्र कसे फिरते, सर्व आत्म्यांना विश्रांती कशी आणि कुठे मिळते. तुम्हा मुलांचे कर्तव्य आहे - सर्वांना बाबांचा संदेश देणे. बाबा म्हणतात - 'माझी

आठवण करा तर या वारशाचे तुम्ही मालक बनाल'. बाबा या संगमयुगावर नवीन स्वर्गाची दुनिया रचतात. जिथे तुम्ही जाऊन मालक बनता. मग द्वापरमध्ये माया रावणाद्वारे तुम्हाला श्राप मिळतो त्यामुळे मग पवित्रता, सुख, शांती, धन इत्यादी सर्व काही नष्ट होते. कसे हळूहळू संपते ते देखील बाबांनी समजावून सांगितले आहे. दुःख धाममध्ये काही थोडीच विश्रांती असते. सुख धाममध्ये विश्रांतीच विश्रांती आहे. मनुष्यांना भक्ती किती थकवते. जन्म-जन्मांतर भक्ती करून किती थकून जातात. कसे एकदम गरीब बनले आहात, हे सारे रहस्य बाबा बसून समजावून सांगतात. नवे-नवे येतात तर त्यांना किती समजावून सांगावे लागते. प्रत्येक गोष्टीवर मनुष्य किती विचार करतात. समजतात कुठे जादू होऊ नये. अरे, तुम्हीच म्हणता भगवान जादूगार आहेत. तर बाबा म्हणतात - 'होय, खरोखर मी जादूगार आहे. परंतु ती जादू नाही, ज्याने मनुष्य मेंढी-बकरी बनेल. हे बुद्धीने समजले जाते, हे तर जसे काही मेंढी आहेत. गायन देखील आहे - 'सुरमण्डल के साज़ से...' यावेळी तर जसे सारे मनुष्य शेळ्या-मेंढ्या आहेत. या साऱ्या गोष्टी इथल्याच आहेत. या वेळचेच गायन आहे. कल्पाच्या अंताला देखील मनुष्य समजू शकत नाहीत. चंडिकेचा किती मोठा मेळावा भरतो. ती कोण होती? म्हणतात ती एक देवी होती. असे नाव तर तिथे कोणते असतच नाही. सतयुगामध्ये किती चांगली सुंदर नावे असतात. सतयुगी संप्रदायाला श्रेष्ठाचारी म्हटले जाते. कलियुगी संप्रदायाला तर किती वाईट नावे देतात. आत्ताच्या मनुष्यांना श्रेष्ठ म्हणणार नाही. देवतांना श्रेष्ठ म्हटले जाते. गायन देखील आहे - 'मनुष्य से देवता किये, करत न लागी वार' . मनुष्यापासून देवता, देवता पासून मनुष्य कसे बनतात, हे रहस्य बाबांनी तुम्हाला समजावून सांगितले आहे. त्यांना डीटी वर्ल्ड (देवताई दुनिया), यांना ह्यूमन वर्ल्ड (मानवी दुनिया) म्हटले जाते. दिवसाला प्रकाश, रात्रीला अंधार म्हटले जाते. ज्ञान आहे - प्रकाश, भक्ती आहे - अंध:कार. 'अज्ञान निद्रा' म्हटले जाते ना. तुम्ही देखील समजता की, पूर्वी आम्ही काहीही जाणत नव्हतो तर नेती-नेती म्हणत होतो अर्थात आम्ही जाणत नाही. आता तुम्ही समजता - आम्ही सुद्धा तर आधी नास्तिक होतो. बेहदच्या बाबांनाच जाणत नव्हतो. ते आहेत खरे अविनाशी बाबा. त्यांना सर्व आत्म्यांचे पिता म्हटले जाते. तुम्ही मुले जाणता - आता आम्ही त्या बेहदच्या बाबांचे बनलो आहोत. बाबा मुलांना गुप्त ज्ञान देतात. हे ज्ञान मनुष्यांकडे कुठे मिळू शकणार नाही. आत्मा देखील गुप्त आहे, गुप्त ज्ञान आत्मा धारण करते. आत्माच मुखाद्वारे ज्ञान ऐकवते. आत्माच गुप्त पित्याची गुप्त आठवण करते.

बाबा म्हणतात - 'मुलांनो, देह-अभिमानी बनू नका'. देह-अभिमानाने आत्म्याची ताकद नष्ट होते. आत्म-अभिमानी बनल्याने आत्म्यामध्ये ताकद जमा होते. बाबा म्हणतात - ड्रामाच्या रहस्याला चांगल्या रीतीने समजून घेऊन त्याप्रमाणे चालायचे आहे. या अविनाशी ड्रामाच्या रहस्याला जे चांगल्या रीतीने जाणतात, ते कायम हर्षित राहतात. यावेळी मनुष्य वर (ग्रहांवर) जाण्यासाठी किती प्रयत्न करतात, समजतात वरती दुनिया आहे. शास्त्रांमधून ऐकले आहे वरती दुनिया आहे तर तिथे जाऊन पहावे. तिथे दुनिया स्थापन करण्याचा प्रयत्न करतात. दुनिया तर खूप वसवली आहे ना. भारतामध्ये फक्त एकच आदि सनातन देवी-देवता धर्म होता इतर कोणताही खंड इत्यादी नव्हता. नंतर मग वसाहत किती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तुम्ही विचार करा भारतामध्ये किती छोट्याशा भूखंडावर देवता होते. यमुनेच्या काठावरच परिस्थान होते, जिथे हे लक्ष्मी-नारायण राज्य करत होते. किती सुंदर शोभिवंत, सतोप्रधान दुनिया होती. नॅच्युरल ब्युटी होती. सर्व चमत्कार आत्म्यामध्येच असतो. मुलांना दाखवले होते श्रीकृष्णाचा जन्म कसा होतो. संपूर्ण खोली प्रकाशाने जशी उजळून निघते. तर बाबा बसून मुलांना समजावून सांगत आहेत - आता तुम्ही परिस्थानमध्ये जाण्याकरिता पुरुषार्थ करत आहात. बाकी असे नाही - तलावामध्ये डुबकी मारल्याने पऱ्या बनाल. ही सारी खोटी नावे ठेवली आहेत. लाखो वर्षे म्हटल्याने अगदीच सर्व काही विसरून गेले आहेत. आता तुम्ही अभूल (निर्दोष) बनत आहात नंबरवार पुरुषार्थानुसार. विचार केला जातो - इतकी छोटीशी आत्मा किती मोठा पार्ट शरीराद्वारे बजावते, आणि मग शरीरातून आत्मा जेव्हा निघून जाते तर शरीराचे बघा काय हाल होतात. आत्माच पार्ट बजावते. किती मोठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे. साऱ्या दुनियेतील ॲक्टर्स (आत्मे) आपल्या ॲक्टनुसारच पार्ट बजावतात. काहीही फरक पडू शकत नाही. हुबेहूब सर्व ॲक्ट (कृती) पुन्हा रिपीट होत आहे. यामध्ये संशय घेऊ शकत नाही. प्रत्येकाच्या बुद्धीमध्ये फरक पडू शकतो कारण आत्मा तर मन-बुद्धी सहित आहे ना. मुलांना ठाऊक आहे की, आपल्याला स्कॉलरशिप घ्यायची आहे तर मनातल्या मनात आनंद होतो. इथे (हिस्ट्री हॉलमध्ये) देखील आतमध्ये येताच एम ऑब्जेक्ट समोर पाहिल्यावर आनंद तर जरूर होईल. आता तुम्ही जाणता आपण हे (देवी-देवता) बनण्यासाठी इथे शिकत आहोत. अशी कोणती शाळा नाही जिथे दुसऱ्या जन्माचे एम ऑब्जेक्ट पाहू शकतो. तुम्ही पाहता की आम्ही लक्ष्मी-नारायणासारखे बनत आहोत. आता आपण संगमयुगावर आहोत जे

भविष्यामध्ये यांच्यासारखे लक्ष्मी-नारायण बनण्याचे शिक्षण शिकत आहोत. किती गुप्त शिक्षण आहे. एम ऑब्जेक्टला पाहून किती आनंद झाला पाहिजे. आनंदाचा पारावार नाही. शाळा किंवा पाठशाळा असावी तर अशी. आहे किती गुप्त, परंतु जबरदस्त पाठशाला आहे. जितके मोठे शिक्षण तितक्या सुविधा असतात. परंतु इथे तुम्ही जमिनीवर बसून शिकता. आत्म्याला शिकायचे असते, मग हवे तर जमिनीवर बसा, नाहीतर तख्तावर, परंतु आनंदाने उड्या मारत रहा की, हे शिक्षण घेऊन पास झाल्यानंतर जाऊन हे बनणार. आता तुम्हा मुलांना बाबांनी येऊन आपला परिचय दिला आहे की, मी यांच्यामध्ये (ब्रह्मा बाबांमध्ये) कसा प्रवेश करून तुम्हाला शिकवतो. बाबा काही देवतांना तर शिकवणार नाहीत. देवतांना हे ज्ञान कुठे आहे. मनुष्य तर गोंधळतात काय देवतांमध्ये ज्ञान नाही आहे! देवताच या ज्ञानाद्वारे देवता बनतात. देवता बनल्यानंतर मग ज्ञानाची काय गरज आहे. लौकिक शिक्षणाने बॅरिस्टर बनला, कमाई करू लागला मग नंतर परत बॅरिस्टरी शिकतील का? अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) अविनाशी ड्रामाच्या रहस्याला यथार्थरित्या समजून घेऊन हर्षित रहायचे आहे. या ड्रामामध्ये प्रत्येक ॲक्टरचा पार्ट आपला-आपला आहे, जो हुबेहूब बजावत आहेत.
2. २) एम ऑब्जेक्टला समोर ठेवून आनंदाने उड्या मारायच्या आहेत. बुद्धीमध्ये असावे आम्ही या शिक्षणाने असे लक्ष्मी-नारायण बनणार.

वरदान:- आठवण आणि सेवेच्या शक्तिशाली आधाराद्वारे तीव्रगतीने पुढे जाणारे मायाजीत भव

ब्राह्मण जीवनाचा आधार आठवण आणि सेवा आहे, हे दोन्ही आधार कायम शक्तिशाली असतील तर तीव्र गतीने पुढे जात रहाल. जर सेवा खूप आहे, आठवण कमजोर आहे किंवा आठवण खूप चांगली आहे, सेवा कमजोर आहे तरी देखील तीव्रगती होऊ शकत नाही. आठवण आणि सेवा दोघांमध्ये तीव्रगती पाहिजे. आठवण आणि नि:स्वार्थ सेवा दोन्ही सोबत असेल तेव्हाच मायाजीत बनणे सोपे आहे. प्रत्येक कर्मामध्ये, कर्माची समाप्ती होण्यापूर्वीच नेहमी विजयी झाल्याचे दिसून येईल.

बोधवाक्य:- या संसाराला अलौकिक खेळ आणि परिस्थितींना अलौकिक खेळणी समजा.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - अपार खुशीमध्ये आणि नशेमध्ये राहण्यासाठी देह-अभिमानाचा रोग सोडून देऊन प्रीत बुद्धी बना, स्वतःचे वर्तन सुधारा"

प्रश्न:- कोणत्या मुलांना ज्ञानाचा उलटा नशा चढू शकत नाही?

उत्तर:- जे बाबांना यथार्थरित्या जाणून आठवण करतात, अंतःकरणापासून बाबांची महिमा करतात, ज्यांचे पूर्णत: अभ्यासावर लक्ष आहे त्यांना ज्ञानाचा उलटा नशा चढू शकत नाही. जे बाबांना साधारण समजतात ते बाबांची आठवण करू शकत नाहीत. आठवण करत असाल तर बाबांना आपला समाचार देखील जरूर द्याल. मुले जेव्हा आपला समाचार देत नाहीत तेव्हा बाबांना विचार येतो की, मुलगा कुठे मूर्च्छित तर झाला नाही ना?

ओम् शांती. बाबा बसून मुलांना समजावून सांगतात - 'मुलांनो, जेव्हा कोणी नवीन येतात तर त्यांना पहिले हद आणि बेहद, दोन पित्यांचा परिचय द्या. बेहदचे बाबा म्हणजे बेहदच्या आत्म्यांचे पिता. तो हदचा पिता तर प्रत्येक जीव आत्म्याचा वेगवेगळा आहे. हे नॉलेज देखील सर्वजण एकसारखे धारण करू शकत नाहीत. कोणी एक टक्का, कोणी ९५ टक्के धारण करतात. ही तर समजून घेण्याची गोष्ट आहे; सूर्यवंशी, चंद्रवंशी घराणे असेल ना. यथा राजा, राणी तथा प्रजा. प्रजेमध्ये सर्व प्रकारचे मनुष्य असतात. प्रजा अर्थात प्रजा. बाबा समजावून सांगत आहेत हे शिक्षण आहे, प्रत्येक जण आपल्या बुद्धीच्या कुवतीनुसारच शिकतात. प्रत्येकाला आपापला पार्ट मिळालेला आहे. ज्यांनी कल्पापूर्वी जितका अभ्यास धारण केला आहे, तितकाच आता देखील करतात. शिक्षण कधी लपून राहू शकत नाही. शिक्षणानुसार पद देखील मिळते. बाबांनी समजावून सांगितले आहे, पुढे चालून परीक्षा होईल. परीक्षेशिवाय ट्रान्सफर होऊ शकत नाहीत. तर मागाहून सर्व काही समजून येईल. परंतु आता देखील समजू शकता की, आपण कोणत्या पदासाठी लायक आहोत? भले लाजेपोटी सर्वजण हात वर करतात परंतु समजू शकतात की, असे आपण कसे बनू शकणार! आणि तरी देखील हात वर करतात. हे देखील अज्ञानच म्हणणार. बाबांना तर ताबडतोब समजते की, यांच्यापेक्षा तर जास्त अक्कल लौकिक स्टुडंटला असते. ते समजतात की, आपण स्कॉलरशिप घेण्यालायक नाही आहोत, पास होणार नाही. ते समजतात, टीचर जे शिकवतात त्यामध्ये आपण किती मार्क घेणार? असे थोडेच म्हणतील की, आम्ही पास विथ ऑनर होणार. इथे तर बऱ्याच मुलांमध्ये एवढी देखील अक्कल नाही आहे, देह-अभिमान खूप आहे. भले आले आहेत हे (देवता) बनण्यासाठी परंतु असे वर्तन देखील पाहिजे. बाबा म्हणतात - विनाशकाले विपरीत बुद्धी कारण नियमानुसार बाबांवर प्रेम नाही आहे.

बाबा, तुम्हा मुलांना 'विनाशकाले विपरीत बुद्धी'चा यथार्थ अर्थ काय आहे ते समजावून सांगतात. मुलेच नीटसे समजू शकत नाहीत तर मग ते कसे काय समजणार? बाबांची आठवण करणे - ही तर झाली गुप्त गोष्ट. शिक्षण काही गुप्त नाही आहे ना. शिक्षणामध्ये नंबरवार असतात. एकसमान थोडेच शिकतील. बाबा समजतात अजून तर छोटे आहेत. अशा बेहदच्या बाबांची तीन-तीन, चार-चार महिने आठवण देखील करत नाहीत. समजणार तरी कसे की, हे आठवण करतात कि नाही? बाबांना पत्र सुद्धा लिहीत नाहीत की, 'बाबा, मी कसा-कसा चालत आहे, काय-काय सेवा करत आहे?' बाबांना मुलांची किती काळजी असते की, कुठे मुलगा मूर्च्छित तर झाला नाही ना, कुठे मुलगा मेला तर नाही ना? काहीजण तर बाबांना किती चांगला-चांगला सेवेचा समाचार लिहितात. बाबांना देखील समजते, मुलगा जिवंत आहे. सेवा करणारी मुले कधी लपू शकत नाहीत. बाबा तर प्रत्येक मुलाचे मन ओळखतात की, कोणता मुलगा कसा आहे? देह-अभिमानाचा रोग फार गंभीर आहे. बाबा मुरलीमध्ये समजावून सांगतात, काहींना तर ज्ञानाचा उलटा नशा चढतो, अहंकार येतो मग आठवण देखील करत नाहीत, पत्र सुद्धा लिहीत नाहीत. मग बाबा तरी कशी आठवण करणार? आठवणीला आठवण जुळून येते. आता तुम्ही मुले बाबांना यथार्थ रित्या जाणून आठवण करता, मनापासून महिमा करता. बरीच मुले बाबांना साधारण समजतात त्यामुळे आठवण करत नाहीत. बाबा कोणता थाट थोडाच दाखवणार. भगवानुवाच - 'मी तुम्हाला विश्वाची राजाई देण्यासाठी राजयोग शिकवतो. तुम्ही असे थोडेच समजता की, आपण विश्वाची बादशाही घेण्यासाठी बेहदच्या

बाबांकडून शिकत आहोत'. हा जर नशा असेल तर अपार खुशीचा पारा कायम चढलेला राहील. गीता वाचणारे भले म्हणतात - 'श्रीकृष्ण भगवानुवाच, मी राजयोग शिकवतो, बस्स'. त्यांना राजाई प्राप्त करण्याचा आनंद थोडाच असेल. गीता वाचून पूर्ण केली आणि गेले आपापल्या काम-धंद्याला. तुमच्या बुद्धीमध्ये तर आता आहे की, आम्हाला बेहदचे बाबा शिकवत आहेत. त्यांच्या (दुनियावाल्यांच्या) बुद्धीमध्ये असे येणार नाही. तर कोणीही आले तर सर्वप्रथम त्यांना दोन पित्यांचा परिचय द्यायचा आहे. बोला - भारत स्वर्ग होता, आता नरक आहे. हे कलियुग आहे, याला स्वर्ग थोडेच म्हणणार. असे तर म्हणणार नाही ना की सतयुगामध्ये देखील आहोत आणि कलियुगामध्ये देखील आहोत. कुणाला दुःख झाले तर म्हणतील नरकामध्ये आहोत, कोणी सुखात असेल तर म्हणतील स्वर्गामध्ये आहोत. असे खूप म्हणतात - दुःखी मनुष्य नरकामध्ये आहेत, आम्ही तर खूप सुखामध्ये बसलो आहोत, गाडी-बंगले इत्यादी सर्व आहे, तर समजतात आपण तर स्वर्गामध्येच आहोत. गोल्डन एज, आयरन एज एकच गोष्ट आहे.

तर सर्वप्रथम दोन पित्यांची गोष्ट बुद्धीमध्ये पक्की करायची आहे. बाबा स्वतःच आपला परिचय देतात. ते सर्वव्यापी कसे असू शकतील? लौकिक पित्याला सर्वव्यापी म्हणणार काय? आता तुम्ही चित्रामध्ये दाखवता आत्मा आणि परमात्म्याचे रूप एकच आहे, त्यामध्ये फरक नाही आहे. आत्मा आणि परमात्मा काही लहान-मोठे नाहीत. सर्व आत्मे आहेत, ते (बाबा) देखील आत्मा आहेत. ते सदैव परमधाममध्ये राहतात म्हणून त्यांना परम-आत्मा म्हटले जाते. फक्त तुम्ही आत्मे जसे येता तसा मी काही येत नाही. मी अंतामध्ये या तनामध्ये येऊन प्रवेश करतो. बाहेरचा कोणी या गोष्टी समजू शकणार नाही. गोष्ट खूप सोपी आहे. फरक फक्त इतका आहे की बाबांच्या ऐवजी वैकुंठवासी श्रीकृष्णाचे नाव घातले आहे. श्रीकृष्णाने वैकुंठामधून नरकामध्ये येऊन राजयोग शिकवला काय? श्रीकृष्ण कसे म्हणू शकतो की, 'देहा सहित... मामेकम् (मज एकाची) आठवण करा'. देहधारीच्या आठवणीने पापे कशी नष्ट होतील? श्रीकृष्ण तर एक छोटा मुलगा आहे आणि कुठे मी साधारण मनुष्याच्या वृद्ध तनामध्ये येतो. किती फरक झाला आहे. या एकाच चुकीमुळे सर्व मनुष्य पतित, कंगाल बनले आहेत. ना मी सर्वव्यापी आहे, ना श्रीकृष्ण सर्वव्यापी आहे. प्रत्येक शरीरामध्ये आत्मा सर्वव्यापी आहे. मला तर स्वतःचे शरीर देखील नाही आहे. प्रत्येक आत्म्याला आपले-आपले शरीर आहे. प्रत्येक शरीराला वेगवेगळे नाव दिले जाते. ना मला शरीर आहे, ना माझ्या शरीराला कोणते नाव आहे. मी तर वृद्ध शरीर घेतो मग याचे नाव बदलून 'ब्रह्मा' ठेवले आहे. माझे नाव काही ब्रह्मा नाहीये. मला 'सदा शिव'च म्हणतात. मीच सर्वांचा सद्गती दाता आहे. आत्म्याला काही सर्वांचा सद्गती दाता म्हणणार नाही. परमात्म्याची कधी दुर्गती होते का? आत्म्याचीच दुर्गती आणि आत्म्याचीच सद्गती होते. या सर्व गोष्टी विचार सागर मंथन करण्याच्या आहेत. नाहीतर मग इतरांना कसे समजावून सांगाल. परंतु माया अशी कठोर आहे जी मुलांच्या बुद्धीला पुढे जाऊ देत नाही. दिवसभर झरमुई-झगमुई मध्येच (व्यर्थ गोष्टीं मध्येच) वेळ वाया घालवतात. बाबांपासून दूर करण्यासाठी माया किती जोर लावते. मग काही मुले तर मोडून पडतात (हार खातात). बाबांची आठवण न केल्यामुळे अवस्था अचल-अडोल बनू शकत नाही. बाबा घडोघडी सरळ करतात (सावरतात) माया खाली पाडते. बाबा म्हणतात कधी हार खायची नाही. कल्प-कल्प असे होतेच, काही नवीन गोष्ट नाहीये. अखेरीस मायाजीत बनालच. रावण राज्य नष्ट तर होणार आहे. मग आपण नवीन दुनियेमध्ये राज्य करणार. कल्प-कल्प मायाजीत बनलो आहोत. अगणित वेळा नवीन दुनियेमध्ये राज्य केले आहे. बाबा म्हणतात - 'बुद्धीला नेहमी बिझी ठेवा म्हणजे कायम सेफ रहाल'. यालाच स्वदर्शन चक्रधारी म्हटले जाते. बाकी यामध्ये हिंसा इत्यादीचा काही प्रश्नच नाही. ब्राह्मणच स्वदर्शन चक्रधारी आहेत. देवतांना स्वदर्शन चक्रधारी म्हणणार नाही. पतित दुनियेचे रीती-रिवाज आणि देवी-देवतांचे रीती-रिवाज यामध्ये खूप अंतर आहे. मृत्यूलोकमध्ये असणारेच पतित-पावन बाबांना बोलावतात - 'आम्हा पतितांना येऊन पावन बनवा. पावन दुनियेमध्ये घेऊन चला'. तुमच्या बुद्धीमध्ये आहे आज पासून ५००० वर्षांपूर्वी नवीन पावन दुनिया होती, जिला 'सतयुग' म्हटले जाते. 'त्रेता'ला नवीन दुनिया म्हणणार नाही. बाबांनी समजावून सांगितले आहे - ते (सतयुग) आहे फर्स्ट क्लास, हे (त्रेता) आहे सेकंड क्लास. प्रत्येक गोष्ट चांगल्या रीतीने धारण केली पाहिजे ज्यामुळे कोणी येऊन ऐकेल तर आश्चर्य वाटेल. काही-काहींना आश्चर्य देखील वाटते, परंतु फुरसत नसते जेणेकरून पुरुषार्थ करतील. मग ऐकतात - पवित्र जरूर बनायचे आहे. हा काम विकारच मनुष्याला पतित बनवतो, त्याला जिंकल्याने तुम्ही जगतजीत बनाल. परंतु काम विकार जसा काही त्यांचा ठेवा आहे, म्हणून हा शब्द बोलत नाहीत, फक्त म्हणतात - मनाला वश करा. परंतु मन अमन (शांत) तेव्हाच होईल जेव्हा शरीरामध्ये नसेल. बाकी मन अमन तर कधी होतही नाही. देह मिळतो कर्म करण्यासाठी तर मग कर्मातीत अवस्थेमध्ये कसे राहणार?

कर्मातीत अवस्था म्हटले जाते शवाला, जिवंतपणीच शव अथवा शरीरापासून डिटॅच. बाबा तुम्हाला शरीरापासून न्यारे बनण्याचे शिक्षण देतात. शरीरापासून आत्मा वेगळी आहे. आत्मा परमधाममध्ये राहणारी आहे. आत्मा शरीरामध्ये येते तेव्हा त्याला मानव म्हटले जाते. शरीर मिळतेच कर्म करण्याकरिता. एक शरीर सोडून मग दुसरे शरीर कर्म करण्यासाठी घ्यायचे आहे. शांती तर तेव्हा असेल जेव्हा शरीरामध्ये नसणार. मूलवतनमध्ये कर्म असत नाही. सूक्ष्मवतनची तर गोष्टच नाही. सृष्टीचे चक्र इथेच फिरते. बाबांना आणि सृष्टी चक्राला जाणणे, यालाच नॉलेज म्हटले जाते. सूक्ष्मवतनमध्ये ना सफेद वस्त्रधारी आहेत, ना कोणी सजलेले आहेत, ना नाग-वन्यप्राण्यांची कातडी परिधान करणारे शंकर इत्यादी आहेत. बाकी ब्रह्मा आणि विष्णूचे रहस्य बाबा समजावून सांगत असत. ब्रह्मा इथे आहेत. विष्णूची दोन रूपे देखील इथेच आहेत. हा केवळ साक्षात्काराचा पार्ट ड्रामामध्ये आहे, जो दिव्य दृष्टीद्वारे पाहिला जातो. क्रिमिनल (विकारी) डोळ्यांनी पवित्र चीज दिसू शकत नाही. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) नेहमी आपणच आपल्याला सुरक्षित ठेवण्यासाठी बुद्धीला विचार सागर मंथनामध्ये बिझी ठेवायचे आहे. स्वदर्शन चक्रधारी बनून रहायचे आहे. झरमुई-झगमुईमध्ये (व्यर्थ गोष्टींमध्ये) आपला वेळ वाया घालवायचा नाही.
2. २) शरीरापासून डिटॅच राहण्याचा अभ्यास बाबा जो शिकवतात, तो शिकायचा आहे. मायेच्या फोर्स पासून वाचण्याकरिता आपली अवस्था अचल-अडोल बनवायची आहे.

वरदान:- ब्रह्मा बाप समान 'लक्ष्य'ला (ध्येयाला) 'लक्षणा'मध्ये आणणारे प्रत्यक्ष उदाहरण बनून सर्वांचे सहयोगी भव

जसे ब्रह्मा बाबांनी स्वतःला निमित्त उदाहरणमूर्त बनविले, कायम हे लक्ष्य लक्षणामध्ये आणले - जो ओटे सो अर्जुन, याद्वारेच नंबर वन बनले. तर असे फॉलो फादर करा. कर्मा द्वारे नेहमी स्वतः जीवनामध्ये गुणमूर्त बनून, प्रत्यक्ष उदाहरण बनून इतरांना सहज गुण धारण करण्याचा सहयोग द्या - याला म्हटले जाते गुणदान. दानाचा अर्थच आहे सहयोग देणे. कुठलीही आत्मा आता ऐकण्या ऐवजी प्रत्यक्ष प्रमाण बघू इच्छिते आहे. तर आधी स्वतःला गुणमूर्त बनवा.

बोधवाक्य:- सर्वांमधील निराशेचा अंधार दूर करणारेच ज्ञान-दीपक आहेत.

||| ओम शांती |||

25.12.2024 प्रभात:मुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - पावलोपावली श्रीमतानुसार चालणे हाच सर्वात उत्तम चार्ट आहे, ज्या मुलांना श्रीमता बद्दल आदर आहे ते जरूर मुरली वाचतील"

प्रश्न:- तुम्हा ईश्वरीय मुलांना कोणीही असा कोणता प्रश्न विचारू शकत नाही?

उत्तर:- तुम्हा मुलांना कोणीही हा प्रश्न विचारू शकत नाही की, 'तुम्ही संतुष्ट आणि आनंदी आहात का?' कारण तुम्ही म्हणता - 'आम्ही सदैव संतुष्ट आहोत. परवाह थी पार ब्रह्म में रहने वाले बाप की, वह मिल गया बाकी किस बात की परवाह करनी'; जरी तुम्ही आजारी असाल तरी देखील म्हणाल - आम्ही राजी-खुशी (संतुष्ट आणि आनंदी) आहोत. ईश्वराच्या मुलांना कोणत्याही गोष्टीची काळजी नाही. बाबा जेव्हा पाहतात याच्यावर मायेचा वार झाला आहे तेव्हा विचारतात - 'बाळा, संतुष्ट आणि आनंदी आहेस?'

ओम् शांती. बाबा समजावून सांगतात की, मुलांच्या बुद्धीमध्ये हे जरूर असणार की बाबा पिता देखील आहेत, टीचर आणि सद्गुरु सुद्धा आहेत, याच आठवणीमध्ये जरूर असणार. ही अशी आठवण करणे कधी कोणी शिकवू शकत नाही. कल्प-कल्प बाबाच येऊन शिकवतात. ते ज्ञानाचा सागर पतित-पावन आहेत. हे आता यावेळीच सांगितले जाते जेव्हा ज्ञानाचा तिसरा नेत्र दिव्य-बुद्धी मिळाली आहे. मुले भले समजत तर असतील परंतु बाबांनाच विसरून जातात मग टीचर-गुरुची तरी कशी आठवण येणार. माया खूपच बलवान आहे जी बाबांच्या तिन्ही रूपांना विसरायला लावते. म्हणतात - आम्ही हरलो. असे तर पावला-पावला मध्ये पद्म आहेत परंतु हार खाल्ल्याने पद्म कसे होतील? देवतांनाच पद्माचे चिन्ह देतात. हे ईश्वरीय शिक्षण आहे. असे शिक्षण मनुष्याचे कधी असू शकत नाही. भले देवतांची महिमा केली जाते तरी देखील सर्वोच्च एक बाबाच आहेत. बाकी त्यांचा (दुनिया वाल्यांचा) मोठेपणा तो कसला. आज गधाई, उद्या राजाई. आता तुम्ही पुरुषार्थ करून हे (देवता) बनत आहात. तुम्ही जाणता या पुरुषार्थामध्ये पुष्कळजण नापास होतात. ज्ञान तर खूप सोपे आहे तरी देखील फार थोडे पास होतात. कशामुळे? माया घडोघडी विसरायला लावते. बाबा म्हणतात - आपला चार्ट ठेवा परंतु लिहू शकत नाहीत. किती म्हणून बसून लिहिणार. आणि लिहिले जरी तरी देखील स्थिती कधी अप, कधी डाऊन. सर्वोत्तम चार्ट त्यांचा असतो जे प्रत्येक पाऊल श्रीमतानुसार टाकतात. बाबा तर समजतील या बिचाऱ्यांना लाज वाटत असेल. नाहीतर श्रीमताला अंमलात आणले पाहिजे ना. फार मुश्किलीने १-२ टक्के लिहितात. श्रीमता विषयी इतका आदर नाही आहे. मुरली मिळते तरीसुद्धा वाचत नाहीत. त्यांना मनातून नक्कीच असे वाटत असेल की, बाबा सांगतात तर खरे आहेत, आम्ही मुरलीच वाचत नाही तर दुसऱ्यांना काय शिकवणार.

बाबा म्हणतात - 'माझी आठवण करा आणि स्वर्गाचे मालक बना, यामध्ये बाबा देखील आले आणि शिकविणारे सुद्धा आले. सद्गती दाता सुद्धा आले. अगदी थोड्या शब्दांत संपूर्ण ज्ञान येते. इथे तुम्ही येताच मुळी याला रिवाईज करण्यासाठी (ज्ञानाची उजळणी करण्यासाठी). भले बाबा देखील हेच समजावून सांगतात कारण तुम्ही स्वतः म्हणता आम्ही विसरून जातो म्हणूनच तुम्ही इथे रिवाईज करण्यासाठी येता. काहीजण भले करतातही परंतु तरी देखील त्याची उजळणी काही होत नाही. नशिबातच नसेल तर पुरुषार्थ तरी काय करणार? पुरुषार्थ करवून घेणारे तर एक बाबाच आहेत, यामध्ये कोणतेही जास्तीचे मार्गदर्शन सुद्धा मिळू शकत नाही. त्या शिक्षणामध्ये (लौकिक शिक्षणामध्ये) जास्तीचे शिकवण्यासाठी शिक्षक बोलावतात. हे (बाबा) तर नशीब बनविण्यासाठी सर्वांना एकसमान शिकवतात. प्रत्येकाला वेगवेगळे कुठपर्यंत शिकवतील - कितीतरी भरपूर मुले आहेत! त्या शिक्षणामध्ये कोणी मोठ्या व्यक्तीची मुले असतात आणि खास सांगितले जाते तर त्यांना जास्तीचे शिकवतात सुद्धा. टीचर जाणतात की हा डल आहे (कच्चा आहे), म्हणून जास्ती कोचिंग देऊन स्कॉलरशिप लायक बनवतात. हे टीचर (बाबा) असे करत नाहीत. हे तर सर्वांना एकसमान शिकवतात. एक्स्ट्रा पुरुषार्थ अर्थात टीचर थोडीशी कृपा करतात. भले असे तर पैसे सुद्धा घेतात, खास वेळ देऊन शिकवतात, ज्यामुळे मुले जास्त शिकून हुशार बनतात. हे बाबा तर सर्वांना एकच महामंत्र देतात - मनमनाभव. बस्स. बाबाच एक पतित-पावन

आहेत, त्यांच्या आठवणीनेच आपण पावन बनणार. ते तुम्हा मुलांच्या हातात आहे, जितकी आठवण कराल तितके पावन बनाल. सर्व काही प्रत्येकाच्या पुरुषार्थावर अवलंबून आहे. ते (दुनियावाले) तर तीर्थ स्थानांवर यात्रा करण्यासाठी जातात. एकमेकांना पाहून सुद्धा जातात. तुम्हा मुलांनी देखील बऱ्याच यात्रा केल्या आहेत, मग काय झाले. तरीसुद्धा खालीच घसरत आले आहात (पतनच झाले आहे). यात्रा कशासाठी आहेत, याने काय मिळणार आहे! काहीही माहीत नव्हते. आता तुमची आहे आठवणीची यात्रा. एकच शब्द आहे - मनमनाभव. ही तुमची यात्रा अनादि आहे. ते (दुनियावाले) सुद्धा म्हणतात - आम्ही या यात्रा अनादि काळापासून करत आलो आहोत. आता तुम्ही ज्ञानासहीत म्हणता की, आम्ही कल्प-कल्प या यात्रा करतो. ही यात्रा स्वतः बाबा येऊन शिकवतात. त्या यात्रांमध्ये किती कष्ट घेतात. किती गोंगाट आवाज असतो. ही आपली यात्रा आहे डेड सायलेन्सची. एका बाबांचीच आठवण करायची आहे, याद्वारेच पावन बनायचे आहे. तुम्हाला बाबांनी ही खरीखुरी रुहानी यात्रा शिकविली आहे. त्या यात्रा तर तुम्ही जन्म-जन्मांतर करतच राहिलात, तरी देखील गातात - 'चारों तरफ लगाये फेरे...' भगवंतापासून तर दूरच राहिले. यात्रेवरून आल्यावर पुन्हा विकारामध्ये जातात तर फायदाच काय. आता तुम्ही मुले जाणता हे आहे पुरुषोत्तम संगमयुग, जेव्हा की बाबा आलेले आहेत. एक दिवस सर्व जाणतील की बाबा आले आहेत. परमेश्वर शेवटी भेटणार कसे? हे तर कोणीही जाणत नाहीत. कोणी तर समजतात कुत्र्या-मांजरामध्ये भेटेल. या सर्वांमध्ये परमेश्वर भेटणार काय? किती खोटेपणा आहे. खोटेच खाणे, खोटेच पिणे, खोटीच रात्र घालवणे म्हणूनच हा आहेच मुळी झूठ खंड. सचखंड स्वर्गाला म्हटले जाते. भारतच स्वर्ग होता. स्वर्गामध्ये सर्व भारतवासी होते, आज तेच भारतवासी नरकामध्ये आहेत. हे तर तुम्ही गोड-गोड मुलेच जाणता की, आपण बाबांकडून श्रीमत घेऊन भारताला पुन्हा स्वर्ग बनवत आहोत. त्यावेळी भारतामध्ये दुसरे कोणीही नसतात. संपूर्ण विश्व पवित्र बनते. आता तर किती अनेकानेक धर्म आहेत. बाबा संपूर्ण झाडाचे नॉलेज ऐकवतात. तुम्हाला पुन्हा आठवण करून देत आहेत. तुम्ही सो देवता होता मग वैश्य, शूद्र बनलात. आता तुम्ही ब्राह्मण बनले आहात. असे शब्द कधी कोणी संन्यासी, उदासी, विद्वान द्वारा ऐकले आहेत का? हा 'हम सो' चा अर्थ बाबा किती सोपा करुन सांगतात. 'हम सो' अर्थात 'मी आत्मा', मी आत्मा असे-असे चक्र फिरतो. ते (संन्यासी) तर म्हणतात - 'हम आत्मा सो परमात्मा, परमात्मा सो हम आत्मा'. असा एकही नाही ज्याला 'हम सो' चा अर्थ माहित आहे. बाबा म्हणतात - हा जो 'हम सो' चा मंत्र आहे हा कायम बुद्धीमध्ये ठेवला पाहिजे. नाहीतर चक्रवर्ती राजा कसे बनणार.(?) ते (दुनियावाले) तर ८४ चा अर्थ सुद्धा समजत नाहीत. भारता विषयीच 'उत्थान आणि पतन' गायले गेले आहे. सतोप्रधान, सतो, रजो, तमो. सूर्यवंशी, चंद्रवंशी...

आता तुम्हा मुलांना सर्वकाही माहित झाले आहे. एका बीजरूप बाबांनाच ज्ञानाचा सागर म्हटले जाते. ते या सृष्टी चक्रामध्ये येत नाहीत. असे नाही की, आम्ही आत्मा सो परमात्मा बनतो. नाही, बाबा 'आप समान नॉलेजफुल' बनवतात. 'आप समान गॉड' बनवत नाहीत, या गोष्टींना चांगल्या रीतीने समजून घेतले पाहिजे तेव्हाच बुद्धीमध्ये चक्र फिरू शकेल. तुम्ही बुद्धीने समजू शकता की आपण कसे ८४ च्या चक्रामध्ये येतो. यामध्ये काळ, वर्ण, वंशावळी या सर्व गोष्टी येतात. या नॉलेजद्वारेच उच्च ते उच्च बनतात. नॉलेज असेल तर इतरांनाही देतील. त्या शाळांमध्ये जेव्हा परीक्षा होते तर पेपर सोडवून घेतात. पेपर विलायत वरून येतात. जे विलायतमध्ये शिकत असतील, त्यांच्यातही कोणी मोठा एज्युकेशन मिनिस्टर असेल तर ते पेपर तपासत असतील. इथे तुमचे पेपर कोण तपासणार? तुम्ही स्वतःच कराल. स्वतः जे हवे ते बना. अभ्यास करून जे पद बाबांकडून हवे आहे ते घ्या. जितकी बाबांची आठवण कराल, इतरांची सेवा कराल, तितकेच फळ मिळेल. त्यांना सेवा करण्याची काळजी राहील की राजधानी स्थापन होत आहे तर प्रजा देखील पाहिजे ना. तिथे वजीर (मंत्री) इत्यादीची गरजच नसते. इथे तर जेव्हा अक्कल कमी होते तेव्हा मंत्र्याची गरज भासते. इथे बाबांकडे देखील सल्ला घेण्यासाठी येतात - 'बाबा, पैसे आहेत काय करू? धंदा कसा करू?' बाबा म्हणतात - हे दुनियेतील धंदे इत्यादीची गोष्ट इथे आणू नका. हो, कोणी निराश झाला तर थोडा-फार धीर देण्यासाठी सांगतात. परंतु हा काही माझा धंदा नाही आहे. माझा धंदा आहे तुम्हाला पतिता पासून पावन बनवून विश्वाचा मालिक बनविण्याचा. तुम्हाला सतत बाबांकडून श्रीमत घेत राहायचे आहे. आता तर सर्वांचे आहे आसुरी मत. तिथे तर सुखधाम आहे. तिथे कधी असे विचारणार नाहीत की, 'राजी-खुशी (संतुष्ट आणि आनंदी) आहात? तब्येत ठीक आहे?' हे असे इथेच विचारले जाते. तिथे हे शब्दच असत नाहीत. दुःखधामातील कोणतेही शब्दच तिथे नसतात. परंतु बाबा जाणतात मुलांमध्ये मायेची प्रवेशता होत असल्या कारणाने बाबा विचारू शकतात की, 'बाकी व्यवस्थित आहात, संतुष्ट आणि आनंदी आहात?' मनुष्य इथल्या शब्दांना तर समजू शकणार नाहीत. कोणी व्यक्तीने विचारले तर तुम्ही म्हणू शकता की, 'आम्ही

ईश्वराची मुले आहोत, आमचा कसला कुशल समाचार विचारता? काळजी होती पार ब्रह्ममध्ये राहणाऱ्या पित्याची, आता तो मिळाला, आता कसली काळजी'. हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. आपण कोणाची मुले आहोत - हे ज्ञान देखील बुद्धीमध्ये आहे. जेव्हा आपण पावन बनू आणि मग युद्ध सुरू होईल. तुम्हाला विचारतील जरूर. तुम्ही म्हणाल आम्ही तर सदैव आनंदात आहोत. आजारी जरी असाल तरी देखील आनंदी आहात. बाबांच्या आठवणीमध्ये असाल तर स्वर्गापेक्षाही इथे जास्त आनंदी आहात. जेव्हा की स्वर्गाची बादशाही देणारा पिता मिळाला आहे. आम्हाला किती लायक बनवतात, मग आम्हाला कसली काळजी आहे! ईश्वराच्या मुलांना कोणत्या गोष्टीची काळजी. त्या देवतांना देखील काळजी नसते. देवतांच्या वर आहे ईश्वर. तर ईश्वराच्या मुलांना काय कसली काळजी असू शकते. बाबा आम्हाला शिकवत आहेत. बाबा आमचे टीचर, सद्गुरु आहेत. बाबा आमच्यावर मुकुट ठेवतात. याला इंग्लिश मध्ये म्हणतात - 'क्राऊन प्रिन्स (मुकुटधारी राजकुमार)'. पित्याचा मुकुट मुलगा धारण करेल. तुम्ही समजू शकता सतयुगामध्ये सुखच सुख आहे. प्रॅक्टिकलमध्ये ते सुख तेव्हा मिळेवाल जेव्हा तिथे जाल. ते तर तुम्हीच जाणू शकता. सतयुगामध्ये काय असेल, हे शरीर सोडून आपण कुठे जाणार. आता तुम्हाला प्रॅक्टिकलमध्ये बाबा शिकवत आहेत. तुम्ही जाणता खरोखर आपण स्वर्गामध्ये जात आहोत. ते लोक जे म्हणतात अमका स्वर्गामध्ये गेला परंतु त्यांना माहितच नाहीये की, स्वर्ग आणि नरक कशाला म्हटले जाते. कल्पाचा कालावधीच लाखो वर्षे लिहिला आहे. जन्म-जन्मांतर हे ज्ञान ऐकता-ऐकता खालीच घसरत आलात (पतन झाले). आता तुमच्या बुद्धीमध्ये आहे की, आपण कुठून कुठे येऊन पडलो आहोत. सतयुगापासून खालीच घसरत आलो आहोत. आता आम्ही या पुरुषोत्तम संगमयुगावर पोहोचलो आहोत. कल्प-कल्प बाबा येतात शिकवण्याकरिता. तुम्ही बाबांजवळ राहता ना. हेच आमचे खरेखरे सद्गुरु आहेत, जे मुक्ती-जीवनमुक्तीचा रस्ता सांगतात. जसे हे बाबा (ब्रह्मा बाबा) देखील शिकतात, तसे यांना पाहून तुम्ही मुले देखील शिकता. पावलोपावली सावधानी बाळगायची असते. मनसा-वाचा-कर्मणा अतिशय शुद्ध रहायचे आहे. आतमध्ये कोणतीही घाण (विकार) असता कामा नये. बाबांना घडोघडी मुले विसरून जातात. बाबांना विसरल्याने बाबांची शिकवण देखील विसरून जातात. आपण स्टुडंट आहोत, हे देखील विसरून जातात. आहे खूप सोपे. बाबांच्या आठवणी मध्येच चमत्कार आहे. असा चमत्कार इतर कोणताही पिता शिकवू शकणार नाही. या चमत्कारानेच तमोप्रधानापासून सतोप्रधान बनतात.

तुम्ही मुले जाणता शिवबाबांनी ब्रह्माद्वारे आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना केली आहे, जो धर्म सतयुग आणि त्रेता, अर्धा कल्प चालतो. मग दुसऱ्या धर्माचे नंतर वृद्धिला प्राप्त होतात. जसे क्राईस्ट आला, सुरुवातीला तर खूप थोडे होते. जेव्हा पुष्कळ होतात तेव्हाच राज्य करू शकतात. ख्रिश्चन धर्म अजून पर्यंत आहे. वाढ तर होत राहते. ते जाणतात की क्राईस्ट द्वारा आम्ही ख्रिश्चन बनलो आहोत. आज पासून दोन हजार वर्षांपूर्वी क्राईस्ट आला होता. आता त्यांची वृद्धी होत आहे. ख्रिश्चन म्हणतील आम्ही क्राईस्टचे आहोत. सुरुवातीला एक क्राईस्ट आला, मग त्यांचा धर्म स्थापन होतो, वृद्धी होत जाते. एकाचे दोन, दोनाचे चार... मग अशी वृद्धी होत जाते. आता पहा ख्रिश्चनांचे झाड केवढे झाले आहे. फाउंडेशन आहे देवी-देवता घराण्याचे, म्हणूनच ब्रह्माला ग्रेट-ग्रेट ग्रँड फादर म्हटले जाते. परंतु भारतवासी हे विसरून गेले आहेत की, आपण परमपिता परमात्मा शिव यांची डायरेक्ट संतान आहोत.

ख्रिश्चन देखील समजतात आदि देव होऊन गेले आहेत, ज्यांची ही मनुष्य वंशावळी आहे. बाकी ते मानणार तर आपल्या क्राईस्टलाच; क्राईस्टला, बुद्धाला फादर समजतात. वंशावळ आहे ना. जसे क्राईस्टचे यादगार (स्मृती रुप) ख्रिश्चन देशामध्ये आहे. तसे तुम्ही मुलांनी इथे तपस्या केली आहे म्हणून तुमचे देखील यादगार (स्मृती रुप) इथे आबूमध्ये आहे. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) डेड सायलेन्सची खरीखुरी रुहानी यात्रा करायची आहे. 'हम सो' चा मंत्र नेहमी लक्षात ठेवायचा आहे, तेव्हाच चक्रवर्ती राजा बनाल.
2. २) मनसा-वाचा-कर्मणा अतिशय शुद्ध रहायचे आहे. आतमध्ये कोणतीही घाण नसावी (विकार नसावा).

पावलोपावली सावध रहायचे आहे. श्रीमताचा आदर ठेवायचा आहे.

वरदानः- निर्मानतेचा (नम्रतेचा) गुण धारण करून सर्वांना सुख देणारे सुख देवा, सुख स्वरूप भव

तुम्हा महान आत्म्यांची निशाणी आहे - निर्मानता (विनम्रता). जितके निर्मान बनाल तितका सर्वांद्वारे मान प्राप्त होईल. जे निर्मान आहेत ते सर्वांना सुख देतील. जिथे पण जातील, जे काही करतील ते सुखदायीच असेल. तर जे कोणी संबंध-संपर्कामध्ये येतील ते सुखाची अनुभूती करतील; म्हणून तुम्हा ब्राह्मण आत्म्यांचे गायन आहे - सुखाच्या सागराची मुले सुख स्वरूप, सुख-देवा. तर सर्वांना सुख देत रहा आणि सुख घेत चला. कोणी तुम्हाला दुःख देईल तर घेऊ नका.

बोधवाक्यः- सर्वात मोठे ज्ञानी ते आहेत जे आत्म-अभिमानी राहतात.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - तुम्ही आता शिक्षण शिकत आहात, हे शिक्षण आहे पतिता पासून पावन बनण्याचे, तुम्हाला हे शिकायचे आहे आणि शिकवायचे आहे"

प्रश्न:- दुनियेमध्ये असे कोणते ज्ञान असताना देखील अज्ञान अंध:कार आहे?

उत्तर:- मायेचे ज्ञान, ज्याद्वारे विनाश होतो. चंद्रापर्यंत जातात, हे ज्ञान खूप आहे परंतु नवीन दुनिया आणि जुनी दुनिया याविषयीचे ज्ञान कोणाकडेच नाही आहे. सर्व अज्ञान अंध:कारामध्ये आहेत, सर्वजण ज्ञान नेत्राने आंधळे आहेत. तुम्हाला आता ज्ञानाचा तिसरा नेत्र मिळतो. तुम्ही नॉलेजफुल मुले जाणता की, त्यांच्या डोक्यामध्ये विनाशाचे विचार आहेत, तुमच्या बुद्धीमध्ये स्थापनेचे विचार आहेत.

ओम् शांती. बाबा या शरीराद्वारे समजावून सांगतात, याला जीव म्हटले जाते, यांच्यामध्ये (ब्रह्मा बाबांमध्ये) आत्मा देखील आहे आणि मी देखील यांच्यामध्ये येऊन बसतो, सर्वात आधी तर हे पक्के केले पाहिजे. यांना दादा म्हटले जाते. हा निश्चय मुलांना खूप पक्का झाला पाहिजे. या निश्चयामध्येच ज्ञानाचे मंथन करत रहायचे आहे. बरोबर बाबांनी ज्यांच्यामध्ये प्रवेश केला आहे, ते बाबा स्वतः म्हणतात - 'मी यांच्या अनेक जन्मांच्या अंतामध्ये येतो'. मुलांना समजावून सांगितले गेले आहे, हे आहे सर्व शास्त्र शिरोमणी गीतेचे ज्ञान. श्रीमत अर्थात श्रेष्ठ मत. श्रेष्ठ ते श्रेष्ठ मत आहे एका भगवंताचे. ज्यांच्या श्रेष्ठ मताद्वारेच तुम्ही देवता बनता. बाबा स्वतः म्हणतात - 'मी येतोच तेव्हा जेव्हा तुम्ही भ्रष्ट मताने पतित बनता'. मनुष्या पासून देवता बनण्याचा अर्थ देखील समजून घ्यायचा आहे. विकारी मनुष्या पासून निर्विकारी देवता बनविण्यासाठी बाबा येतात. सतयुगामध्ये मनुष्यच असतात परंतु दैवी गुणवाले. आता कलियुगामध्ये आहेत सर्व आसुरी गुणवाले. आहे सर्व मनुष्य सृष्टीच. परंतु ही आहे ईश्वरीय बुद्धी आणि ती आहे आसुरी बुद्धी. इथे आहे ज्ञान, तिथे आहे भक्ती. ज्ञान आणि भक्ती वेग-वेगळे आहे. भक्तीसाठीची पुस्तके किती ढीगभर आहेत. ज्ञानाचे पुस्तक एकच आहे. एका ज्ञान सागराचे पुस्तक एकच असायला हवे. जो कोणता धर्म स्थापन करतात, त्यांचे पुस्तक देखील एकच असते, ज्याला रिलीजस बुक (धर्मग्रंथ) म्हटले जाते.

सर्वात पहिले रिलीजस बुक (धर्मग्रंथ) आहे - गीता. सर्वात पहिला आदि सनातन देवी-देवता धर्म आहे ना की हिंदू धर्म. मनुष्य समजतात गीते द्वारे हिंदू धर्म स्थापन झाला. गीतेचे ज्ञान श्रीकृष्णाने दिले. केव्हा दिले? परंपरेने. कोणत्या शास्त्रामध्ये शिव भगवानुवाच तर नाहीच आहे. तुम्ही आता समजता या गीता ज्ञाना द्वारेच मनुष्या पासून देवता बनले आहेत, जे ज्ञान आता आपल्याला बाबा देत आहेत. यालाच भारताचा प्राचीन राजयोग म्हटले जाते. ज्या गीतेमध्येच काम विकाराला महाशत्रू असल्याचे लिहिलेले आहे. या शत्रूनेच तुम्हाला पराभूत केलेले आहे. बाबा यावरच विजय प्राप्त करवून जगतजीत विश्वाचे मालक बनवतात. बेहदचे बाबा बसून यांच्या द्वारे तुम्हाला शिकवतात. ते (शिवबाबा) आहेत सर्व आत्म्यांचे पिता. हे (ब्रह्मा बाबा) आहेत सर्व मनुष्य आत्म्यांचे बेहदचे पिता. नावच आहे प्रजापिता ब्रह्मा. तुम्ही कोणालाही विचारू शकता की, 'ब्रह्माच्या पित्याचे नाव काय आहे', तर गोंधळात पडतील. ब्रह्मा, विष्णू, शंकर या तिघांचा कोणी तरी पिता असेल ना. ब्रह्मा, विष्णू, शंकर हे सूक्ष्म वतनमध्ये देवता आहेत. त्यांच्या वरती आहेत शिव. मुले जाणतात - शिवबाबांची मुले जे आत्मे आहेत त्यांनी शरीर धारण केले आहे; ते बाबा तर सदैव निराकार परमपिता परमात्मा आहेत. आत्माच शरीराद्वारे म्हणते - परमपिता. किती सोपी गोष्ट आहे! याला म्हटले जाते - अल्फ आणि बे (बाबा आणि बादशाही) चे शिक्षण. कोण शिकवतात? गीतेचे ज्ञान कोणी ऐकवले? श्रीकृष्णाला काही भगवान म्हटले जात नाही. तो तर देहधारी आहे. मुकुटधारी आहे. शिव तर आहेत निराकार. त्यांच्यावर तर काही कोणता मुकुट इत्यादी नाहीये. तेच ज्ञानाचा सागर आहेत. बाबाच बीज रूप चैतन्य आहेत. तुम्ही देखील चैतन्य आहात. सर्व झाडांच्या आदि-मध्य-अंताला तुम्ही जाणता. भले तुम्ही माळी नाही आहात परंतु समजू शकता की बीज कसे टाकतात, त्यातून झाड कसे रुजून येते. ते आहे जड, हे आहे चैतन्य. आत्म्याला चैतन्य म्हटले जाते. तुमच्या

आत्म्यामध्येच ज्ञान आहे, बाकी कोणत्याही आत्म्यामध्ये ज्ञान असू शकत नाही. तर बाबा चैतन्य मनुष्य सृष्टीचे बीज रूप आहेत. हे चैतन्य क्रिएशन आहे (ही सजीव सृष्टी आहे).

ती सर्व आहेत जड बीज (स्थूल बियाणी). असे नाही की जड बिजामध्ये कोणते ज्ञान आहे. हे तर आहेत चैतन्य बीज रूप, त्यांच्यामध्ये संपूर्ण सृष्टीचे ज्ञान आहे. झाडाची उत्पत्ती, पालना, विनाशाचे संपूर्ण ज्ञान त्यांच्यामध्ये आहे. मग नवीन झाड कसे उत्पन्न होते, ते आहे गुप्त. तुम्हाला ज्ञान देखील गुप्त मिळते. बाबा देखील गुप्तपणे आले आहेत. तुम्ही जाणता हे कलम लागत आहे. आता तर सर्व पतित बनले आहेत. अच्छा, बीजा पासून सर्वात पहिले पान निघाले, तो कोण होता? सतयुगाचे पहिले पान तर श्रीकृष्णालाच म्हटले जाईल. लक्ष्मी-नारायणाला म्हणता येणार नाही. नवीन पान छोटे असते. नंतर मोठे होते. तर या बीजाची किती महिमा आहे. हे तर चैतन्य आहेत ना. भले इतर देखील निघतात, हळू-हळू त्यांची महिमा कमी होत जाते. आता तुम्ही देवता बनता. आपल्याला दैवी गुण धारण करायचे आहेत ही आहे मुख्य गोष्ट. यांच्यासारखे (लक्ष्मी-नारायणासारखे) बनायचे आहे. चित्र देखील आहेत. ही चित्रे नसती तर ज्ञान बुद्धीमध्ये कसे आले असते. ही चित्रे खूप उपयोगाला येतात. भक्ति मार्गामध्ये या चित्रांची पूजा होते आणि ज्ञान मार्गामध्ये तुम्हाला यांच्याद्वारे ज्ञान मिळते की, यांच्या सारखे बनायचे आहे. भक्तिमार्गामध्ये काही असे समजणार नाहीत की, आपल्याला असे बनायचे आहे. भक्तिमार्गामध्ये मंदिरे इत्यादी किती बनवतात, सर्वात जास्त मंदिरे कोणाची असतील? जरूर शिवबाबांचीच असतील. मग त्यांच्या नंतर क्रिएशनची (रचनेची) असतील. पहिली रचना हे लक्ष्मी-नारायण आहेत, तर शिवबाबांच्या नंतर यांची पूजा जास्त होईल. माता ज्या ज्ञान देतात त्यांची पूजा नाही. त्या तर शिकतात. तुमची पूजा आता होत नाही कारण तुम्ही आता शिकत आहात. जेव्हा तुम्ही शिकून, नंतर अज्ञानी बनाल तेव्हा मग पूजा होईल. आता तुम्ही देवी-देवता बनता. सतयुगामध्ये बाबा थोडेच शिकवायला जातील. तिथे असे शिक्षण थोडेच असेल. हे शिक्षण पतितांना पावन बनविण्याचे आहे. तुम्ही जाणता - जे आपल्याला असे बनवितात त्यांची पूजा होईल नंतर मग आपली देखील पूजा नंबरवार होईल. मग अधोगती होत-होत ५ तत्वांची देखील पूजा करू लागतात. ५ तत्त्वांची पूजा म्हणजे पतित शरीराची पूजा. हे बुद्धीमध्ये ज्ञान आहे की या लक्ष्मी-नारायणाचे संपूर्ण सृष्टीवर राज्य होते. या देवी-देवतांनी राज्य कसे आणि कधी प्राप्त केले? हे कोणालाच माहित नाही आहे. लाखो वर्षे म्हणतात. लाखो वर्षांची गोष्ट तर कोणाच्या बुद्धीमध्ये राहू शकत नाही म्हणून म्हणतात - हे परंपरेने चालत आले आहे. आता तुम्ही जाणता देवी-देवता धर्माचे इतर धर्मामध्ये कन्व्हर्ट झाले आहेत, जे भारतामध्ये आहेत ते स्वतःला हिंदू म्हणतात कारण पतित असल्या कारणाने देवी-देवता म्हणणे शोभत नाही. परंतु लोकांना ज्ञान कुठे आहे. देवी-देवतांपेक्षाही मोठी उपाधी स्वतःसाठी लावून घेतात. पावन देवी-देवतांची पूजा करतात, माथा टेकवतात, परंतु स्वतःला पतित थोडेच समजतात.

भारतामध्ये खास कुमारींना किती नमस्कार करतात. कुमारांना इतका करत नाहीत. मेल पेक्षा फीमेलला जास्त नमस्कार करतात कारण यावेळी ज्ञान अमृत पहिले या मातांना मिळते. बाबा यांच्यामध्ये प्रवेश करतात. तुम्ही हे देखील समजता की हे (ब्रह्मा बाबा) ज्ञानाची मोठी नदी आहेत. ज्ञान नदी देखील आहेत आणि पुरुष देखील आहेत. ब्रह्म पुत्रा नदी सर्वात मोठी आहे, जी कलकत्त्याच्या बाजूने सागराला जाऊन मिळते. मेळावा देखील तिथेच भरतो परंतु त्यांना हे माहीतच नाहीये की हा आत्म्यांचा आणि परमात्म्याचा मेळावा आहे. ती तर पाण्याची नदी आहे, जिचे नाव 'ब्रह्म पुत्रा' ठेवले आहे. ते तर ब्रह्मला ईश्वर म्हणतात म्हणून ब्रह्म पुत्राला पावन समजतात. वास्तविक पतित-पावन काही गंगेला म्हटले जात नाही. इथे सागर आणि ब्रह्मा नदीचा संगम आहे. बाबा म्हणतात - हा (ब्रह्मा) फिमेल तर नाही आहे, ज्याच्याद्वारे दत्तक घेतले जाते, या अति गुह्य अशा समजून घेण्याच्या गोष्टी आहेत ज्या नंतर प्राय:लोप होणार आहेत. त्याच्या नंतर मग मनुष्य या आधारावर शास्त्र इत्यादी बनवतात. अगोदर हाताने लिहिलेली शास्त्रे होती, नंतर मग जाडजूड मोठी पुस्तके छापली गेली. संस्कृतमध्ये श्लोक इत्यादी नव्हतेच मुळी. ही तर एकदम सोपी गोष्ट आहे. मी यांच्याद्वारे राजयोग शिकवतो मग ही दुनियाच नष्ट होईल. शास्त्रे इत्यादी काहीच राहणार नाहीत. मग पुन्हा भक्तीमार्गामध्ये ही शास्त्रे इत्यादी बनतील. मनुष्य समजतात ही शास्त्रे इत्यादी परंपरेने चालत आली आहेत, याला म्हटले जाते अज्ञान अंध:कार. आता तुम्हा मुलांना बाबा शिकवतात ज्याने तुम्ही प्रकाशामध्ये आले आहात. सतयुगामध्ये आहे पवित्र प्रवृत्ती मार्ग. कलियुगामध्ये आहेत अपवित्र प्रवृत्ती मार्गवाले. हा देखील ड्रामा आहे. नंतर आहे निवृत्ती मार्ग, ज्याला संन्यास धर्म म्हणतात, जंगलामध्ये जाऊन राहतात. तो आहे हदचा संन्यास. राहतात तर या जुन्या दुनियेमध्ये.

आता तुम्ही जाता नवीन दुनियेमध्ये. तुम्हाला तर बाबांकडून ज्ञानाचा तिसरा नेत्र मिळाला आहे तर तुम्ही किती नॉलेजफुल बनता. यापेक्षा जास्ती नॉलेज असतही नाही. ते तर आहे मायेचे नॉलेज, ज्याद्वारे विनाश होतो. ते लोक चंद्रावर जाऊन शोध घेतात. तुमच्यासाठी काही नवीन गोष्ट नाहीये. हा सर्व मायेचा भपका आहे. खूप दिखावा करतात. अति खोलात शिरतात की काही चमत्कार करून दाखवूया. अति चमत्कार केल्याने मग नुकसान होते. त्यांच्या डोक्यामध्ये विनाशाचेच विचार येतात. काय-काय बनवत राहतात. बनविणारे जाणतात की, यामुळेच विनाश होईल. चाचण्या देखील करत राहतात. म्हणतात देखील दोन बोके भांडले आणि लोणी तिसऱ्याने खाल्ले. कथा तर छोटीशी आहे परंतु खेळ किती मोठा आहे. नाव यांचेच प्रसिद्ध आहे. यांच्या द्वारे विनाशाची नोंद आहे. कोणीतरी निमित्त तर बनतात ना. ख्रिश्चन लोक समजतात पॅराडाईज होता परंतु आम्ही नव्हतो; इस्लामी, बौद्धी देखील नव्हते तरीही ख्रिश्चन लोकांची समज चांगली आहे. भारतवासी म्हणतात देवी-देवता धर्म लाखो वर्षांपूर्वी होता तर बुद्धू झाले ना. बाबा भारतामध्येच येतात, जे पराकोटीचे अज्ञानी आहेत त्यांनाच महान ते महान ज्ञानी बनवतात. परंतु तरीही आठवण राहील तेव्हा ना.

बाबा तुम्हा मुलांना किती सोपे करून समजावून सांगतात, माझी आठवण करा तर तुम्ही सोन्याचे पात्र बनाल त्याने धारणा देखील चांगली होईल. आठवणीच्या यात्रेनेच पापे नष्ट होतील. मुरली ऐकत नाहीत तर ज्ञान रफूचक्कर होते (गायब होते). बाबा तर दयाळू असल्याने सावरण्याचीच युक्ती सांगतात. शेवटपर्यंत सुद्धा शिकवतच राहतील. अच्छा, आज भोग आहे, भोग लावून लगेच परत यायचे आहे. बाकी वैकुंठामध्ये जाऊन देवी-देवता इत्यादींचा साक्षात्कार करणे हे सर्व व्यर्थ आहे. यासाठी खूप महीन बुद्धी पाहिजे. बाबा या रथा द्वारे म्हणतात - 'माझी आठवण करा, मीच पतित-पावन तुमचा पिता आहे'. तुम्हीं से खाऊं... तुम्हीं से बैठूँ... हे इथल्या साठी आहे. वरती (परमधाम मध्ये) कसे असेल. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. २) आठवणीच्या यात्रेद्वारे बुद्धीला सोन्याचे पात्र बनवायचे आहे. बुद्धीमध्ये ज्ञान कायम टिकून रहावे यासाठी मुरली जरूर वाचायची आहे किंवा ऐकायची आहे.

वरदान:- आपल्या पोझिशनच्या स्मृतीद्वारे मायेवर विजय प्राप्त करणारे निरंतर योगी भव ज्याप्रमाणे स्थूल पोझिशनवाले आपल्या पोझिशनला कधी विसरत नाहीत. तशी तुमची पोझिशन आहे - मास्टर सर्वशक्तिमान, याला नेहमी स्मृतीमध्ये ठेवा आणि रोज अमृतवेलेला या स्मृतीला इमर्ज करा तर निरंतर योगी बनाल आणि संपूर्ण दिवस त्याचा सहयोग मिळत राहील. मग मास्टर सर्वशक्तीमानच्या समोर माया येऊ शकत नाही, जेव्हा तुम्ही तुमच्या स्मृतीच्या उच्च स्टेजवर रहाल तर माया मुंगीला जिंकणे सोपे होईल.

बोधवाक्य:- आत्मारुपी पुरुषाला श्रेष्ठ बनविणारेच खरे पुरुषार्थी आहेत.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - माया खूप बलवान आहे, तिच्यापासून सावध रहा, कधी हा विचार यायला नको की, आम्ही ब्रह्माला मानत नाही, आमचे तर डायरेक्ट शिवबाबांशी कनेक्शन आहे"

प्रश्न:- कोणत्या मुलांना सर्वांचे प्रेम आपोआप मिळते?

उत्तर:- जे प्रत्येक गोष्ट पहिल्यांदा स्वतः प्रॅक्टिकलमध्ये करतात आणि नंतर दुसऱ्यांना सांगतात - त्यांच्यावर आपोआपच सर्वांचे प्रेम बसते. ज्ञानाला स्वतःमध्ये धारण करून मग अनेकांची सेवा करायची आहे, तेव्हा सर्वांचे प्रेम मिळेल. जर स्वतः करत नसतील आणि फक्त दुसऱ्यांना सांगत राहतील तर त्यांचे कोण मानेल? ते तर जसे काही पंडित झाले.

ओम् शांती. मुलांना बाबा विचारत आहेत, आत्म्यांना परमात्मा विचारत आहेत - हे तर जाणता की, आपण परमपिता परमात्म्याच्या समोर बसलो आहोत. बाबांना स्वतःचा रथ नाही आहे, हा तर निश्चय आहे ना? या भृकुटीच्या मध्ये बाबांचे निवासस्थान आहे. बाबांनी स्वतः सांगितले आहे - मी यांच्या (ब्रह्मा बाबांच्या) भृकुटीमध्ये बसतो. यांचे शरीर लोनवर घेतो. आत्मा भृकुटीच्या मध्ये बसते तर बाबा देखील इथेच येऊन बसतात. ब्रह्मा देखील आहेत तर शिवबाबा देखील आहेत. जर हे ब्रह्माबाबा नसते तर शिवबाबा देखील नसते. जर कोणी म्हणेल की, आम्ही तर शिवबाबांचीच आठवण करतो, ब्रह्मा बाबांची नाही, परंतु शिवबाबा बोलणार कसे? वरती (परमधाममध्ये) तर कायम शिवबाबांची आठवण करत आलात. आता तुम्हा मुलांना माहिती आहे आपण बाबांजवळ बसलो आहोत. असे तर समजणार नाही की शिवबाबा वरती (परमधाममध्ये) आहेत. जसे भक्तिमार्गामध्ये म्हणत होता शिवबाबा वरती आहेत, त्यांची प्रतिमा इथे पुजली जाते. या गोष्टी नीट समजून घ्यायच्या आहेत. जाणता की बाबा ज्ञानाचे सागर, नॉलेजफुल आहेत तर नॉलेज कुठून ऐकवतात? ब्रह्माच्या तनाद्वारे ऐकवतात. अनेकजण म्हणतात, आम्ही ब्रह्माला मानत नाही; परंतु शिवबाबा म्हणतात - 'मी या मुखाद्वारेच तुम्हाला सांगतो, माझी आठवण करा'. ही समजून घेण्याची गोष्ट आहे ना. ब्रह्मा बाबा तर स्वतः म्हणतात की, शिवबाबांची आठवण करा, हे कुठे म्हणतात माझी आठवण करा? यांच्याद्वारे शिवबाबा म्हणतात - 'माझी आठवण करा'. हा मंत्र मी यांच्या मुखाद्वारे देतो. ब्रह्मा बाबा नसते तर मी मंत्र कसा दिला असता? ब्रह्मा बाबा नसते तर तुम्ही शिवबाबांना कसे भेटला असता? माझ्याजवळ कसे बसला असता? चांगल्या-चांगल्या महारथींना देखील अशा प्रकारचे विचार येतात ज्यामुळे माया माझ्यापासून तुम्हाला दूर करते. म्हणतात - आम्ही ब्रह्माला मानत नाही तर त्यांची काय गति होईल? माया किती खूप बलवान आहे जी एकदम तोंडच फिरवून टाकते. आता तुमचे मुख शिवबाबांनी समोर फिरवले आहे. तुम्ही सन्मुख बसले आहात. मग जे असे समजतात की, ब्रह्माबाबा तर काहीच नाहीत, तर मग त्यांची काय गति होईल? दुर्गतीला प्राप्त करतात. मनुष्य तर बोलावतात - 'ओ गॉड फादर!' मग गॉडफादर ऐकतात काय? म्हणतात - ओ लिबरेटर या. तिथूनच लिबरेट करतील काय? कल्प-कल्पाच्या पुरुषोत्तम संगमयुगावरच बाबा येतात. ज्यांच्यामध्ये येतात त्यांनाच उडवले तर काय म्हणणार? मायेमध्ये इतकी ताकद आहे जी एक नंबरचा वर्थ नॉट ए पेनी (कवडी तुल्य) बनवते. असे देखील काही-काही सेंटर्सवर आहेत, म्हणूनच तर बाबा म्हणतात सावध रहा. भले बाबांनी ऐकवलेल्या ज्ञानाला दुसऱ्यांना ऐकवत देखील राहतात परंतु जसे पंडिता प्रमाणे. जसे बाबा पंडिताची कहाणी ऐकवतात... या वेळी तुम्ही बाबांच्या आठवणीमुळे विषय सागराला पार करून क्षीरसागरामध्ये जाता ना! भक्तिमार्गामध्ये खूप कथा बनवल्या आहेत. पंडित दुसऱ्यांना सांगत असे - राम नामाचा जप केल्याने पार व्हाल, परंतु स्वतःकडे मात्र एकदम शून्य जमेचे खाते होते. स्वतः विकारामध्ये जात रहायचे आणि दुसऱ्यांना म्हणायचे निर्विकारी बना. त्यांचा कसला प्रभाव पडणार? इथे देखील कुठे-कुठे ऐकवणाऱ्यांपेक्षा ऐकणारे वेगाने पुढे निघून जातात. जे खूप जणांची सेवा करतात ते जरूर सर्वांना प्रिय वाटतात. पंडित खोटा निघाला तर त्याच्यावर कोण प्रेम करेल? मग प्रेम त्यांच्यावर होईल जे प्रॅक्टिकलमध्ये आठवण करतात. चांगल्या-चांगल्या महारथींना देखील माया गिळून टाकते.

बाबा समजावून सांगत आहेत - अजून तरी कर्मातीत अवस्था बनलेली नाही आहे, जोपर्यंत युद्धाची तयारी होत

नाही. एका बाजूला युद्धाची तयारी होईल, दुसऱ्या बाजूला कर्मातीत अवस्था होईल. पूर्ण कनेक्शन आहे मग युद्ध समाप्त होईल आणि मग ट्रान्सफर होतील. सर्वात पहिली रुद्र माळा बनते. या गोष्टी इतर कोणीही जाणत नाहीत. तुम्ही समजता या दुनियेला बदलायचे आहे. ते समजतात दुनियेला अजुन ४० हजार वर्षे बाकी आहेत. तुम्ही समजता विनाश तर समोर उभा आहे. तुम्ही आहात अल्पसंख्य, ते आहेत बहुसंख्य. तर तुमचे कोण मानेल? जेव्हा तुमची वृद्धि होईल तेव्हा तुमच्या योगबलाने पुष्कळ खेचून येतील, जितकी तुमच्यामधून गंज निघत जाईल, तितके बळ भरत जाईल. असे नाही की, बाबा जानी-जाननहार आहेत. नाही, सर्वांच्या अवस्थेला जाणतात. बाबा मुलांच्या अवस्थेला जाणणार नाहीत का? सर्व काही माहित असते. अजून तरी कर्मातीत अवस्था होऊ शकत नाही. मोठ्या-मोठ्या चुका होण्याची देखील संभावना आहे, महारथींकडून सुद्धा होतात. बोलणे-चालणे, आचरण इत्यादी सर्व प्रसिद्ध होते. आता तर दैवी आचरण बनवायचे आहे. देवता, सर्वगुण संपन्न आहेत ना. आता तुम्हाला असे बनायचे आहे. परंतु माया कोणालाच सोडत नाही. छुईमुई (नाजूक) बनवते. ५ शिड्या आहेत ना. देह-अभिमान आल्यामुळे वरून एकदम खाली पडतात. पडला आणि मेला. आजकाल स्वतःला मारण्यासाठी काय-काय उपाय करतात! २० व्या मजल्यावरून उडी मारून एका फटक्यात मरून जातात. असे देखील व्हायला नको की हॉस्पिटलमध्ये पडून राहून, दुःख भोगत रहावे. मग कोणी स्वतःला पेटवून देतात, कोणी वाचवले तर किती दुःख भोगतात. जळून गेलो तर आत्मा पळून जाईल म्हणून जीवघात करतात. समजतात जीवघात केला तर दुःखातून सुटका होईल. जोश आला की मग बस्स. अनेकजण तर हॉस्पिटलमध्ये किती दुःख भोगतात. डॉक्टर समजतात की हे दुःखापासून सुटू शकत नाहीत, यापेक्षा तर गोळी द्यावी म्हणजे हे मरून जातील, ते बरे. परंतु ते समजतात अशी गोळी देणे महापाप आहे. आत्मा स्वतः म्हणते की या पीडा भोगण्यापेक्षा शरीर सोडणे चांगले आहे. आता शरीराला सोडवणार कोण? ही आहे अपार दुःखांची दुनिया. तिथे आहे अपार सुख.

तुम्ही मुले समजता - आपण आता रिटर्न जात आहोत, दुःखधामामधून सुखधामला जात आहोत तर त्यांची आठवण करायची आहे. बाबा देखील संगमयुगावर येतात जेव्हा की दुनियेला बदलायचे असते. बाबा म्हणतात - 'मी आलो आहे तुम्हा मुलांना सर्व दुःखांपासून सोडवून नवीन पावन दुनियेमध्ये घेऊन जाण्यासाठी'. पावन दुनियेमध्ये फार थोडे असतात. इथे तर पुष्कळ आहेत, पतित बनले आहेत म्हणून बोलावतात - 'हे पतित-पावन...' असे थोडेच समजतात की, आम्ही महाकाळाला बोलावत आहोत की आम्हाला या घाणेरड्या (विकारी) दुनियेमधून घरी घेऊन चला. जरूर बाबा येतील, सर्वजण मरतील तेव्हाच तर पीस (शांती) होईल ना. शांती-शांती करत राहतात. शांती तर शांतीधाममध्ये असणार. परंतु या दुनियेमध्ये शांती कशी असेल? जोपर्यंत इतकी प्रचंड लोकसंख्या आहे. सतयुगामध्ये तर सुख-शांती होती. आता तर कलियुगामध्ये अनेक धर्म आहेत. ते जेव्हा नष्ट होतील, एका धर्माची स्थापना होईल, तेव्हाच तर सुख-शांती होईल. हाहा:कारा नंतर मग जयजयकार होतो. पुढे जाऊन बघा मृत्यूचा बाजार किती तापलेला असेल ते! कसे मरतात! बॉम्बमुळे देखील आग लागते. पुढे जाऊन बघतील तेव्हा पुष्कळजण म्हणतील की खरोखर विनाश तर नक्कीच होणार आहे.

तुम्ही मुले जाणता की या सृष्टीचे चक्र कसे फिरते? विनाश तर होणारच आहे. एका धर्माची स्थापना बाबा करवून घेतात, राजयोग सुद्धा शिकवतात. बाकीचे अनेक धर्म सर्व नष्ट होतील. गीतेमध्ये काही दाखवलेले नाही आहे. मग गीता वाचून रिझल्ट काय मिळाला? दाखवतात की, प्रलय झाला. भले दुनिया जलमय होते परंतु सारी दुनिया काही जलमय होत नाही. भारत तर अविनाशी पवित्र खंड आहे. त्यामध्ये देखील आबू सर्वात पवित्र तीर्थ स्थान आहे, जिथे बाबा येऊन सर्वांची सद्गति करतात. दिलवाडा मंदिर किती सुंदर यादगार आहे. किती अर्थासहित आहे. परंतु ज्यांनी बनवले आहे, ते हे जाणत नाहीत. तरी सुद्धा चांगले हुशार तर होते ना. द्वापारमध्ये जरूर खूप हुशार असणार. कलियुगामध्ये तर आहेत सर्व तमोप्रधान. सर्व मंदिरांपेक्षा हे उंच आहे, जिथे तुम्ही बसला आहात. तुम्ही जाणता आपण चैतन्य आहोत, ते आमचेच जड यादगार आहे. बाकी काही वेळ ही मंदिरे इत्यादी अजूनही बनत रहातील. नंतर मग कोसळून जाण्याची वेळ येईल. सर्व मंदिरे इत्यादी मोडून-तुटून जातील. होलसेल (सामूहिक) मृत्यू होतील. महाभारी महाभारत लढाई गायली गेली आहे ना, ज्यामध्ये सर्व नष्ट होऊन जातात. हे देखील तुम्ही समजता - बाबा संगमावरच येतात. बाबांना रथ तर पाहिजे ना. आत्मा जेव्हा शरीरामध्ये येते तेव्हाच चुरपूर (हालचाल) होते. आत्मा शरीरातून निघून जाते तेव्हा शरीर जड होते. तर बाबा समजावून सांगतात आता तुम्ही घरी जाता. तुम्हाला लक्ष्मी-नारायणासारखे बनायचे आहे. तर असे गुण देखील पाहिजेत ना. तुम्ही मुले या खेळाला देखील जाणता ना. हा खेळ किती वंडरफुल बनलेला आहे. या खेळाचे रहस्य बाबा बसून समजावून

सांगतात. बाबा नॉलेजफुल, बीजरूप आहेत ना. बाबाच येऊन साऱ्या वृक्षाची नॉलेज देतात - यामध्ये काय-काय होते, तुम्ही यामध्ये किती पार्ट बजावला? अर्धा कल्प आहे दैवी राज्य, अर्धाकल्प आहे आसुरी राज्य. जी चांगली-चांगली मुले आहेत त्यांच्या बुद्धीमध्ये सर्व नॉलेज राहते. बाबा आप समान टीचर बनवतात. टीचर देखील नंबरवार तर असतात. काहीजण तर टीचर होऊन मग बिघडून जातात. खूपजणांना शिकवून स्वतः नाहीसे होतात. छोट्या-छोट्या मुलांमध्ये भिन्न-भिन्न संस्कार असतात. बाबा समजावून सांगत आहेत - इथे देखील जे ज्ञान व्यवस्थितपणे घेत नाहीत, वर्तन सुधारत नाहीत ते अनेकांना दुःख देण्यासाठी निमित्त बनतात. हे देखील शास्त्रांमध्ये दाखवले आहे - असुर लपून बसत होते नंतर बाहेर जाऊन ट्रेटर बनून किती त्रास देत होते. हे तर सर्व होतच राहते. उच्च ते उच्च बाबा जे स्वर्गाची स्थापना करतात तर किती विघ्न रूप बनतात.

बाबा समजावून सांगत आहेत - तुम्ही मुले सुख-शांतीचे टॉवर आहात. तुम्ही खूप रॉयल आहात. तुमच्यापेक्षा रॉयल यावेळी कोणी असत नाही. बेहदच्या बाबाची मुले आहात तर किती गॉड होऊन राहिले पाहिजे. कोणाला दुःख द्यायचे नाही, नाहीतर शेवटी त्याची आठवण येईल. मग सजा भोगावी लागेल. बाबा म्हणतात आता तर घरी जायचे आहे. सूक्ष्मवतनमध्ये मुलांना ब्रह्माचा साक्षात्कार होतो त्यामुळे तुम्ही देखील असे सूक्ष्मवतनवासी बना. मुव्हीची (फरिश्ता स्वरूपाची) प्रॅक्टिस करायची आहे. अतिशय कमी बोलायचे आहे, गोड बोलायचे आहे. असा पुरुषार्थ करत-करत तुम्ही शांतीचे टॉवर बनाल. तुम्हाला शिकवणारे बाबा आहेत. मग तुम्ही इतरांना शिकवायचे आहे. भक्तिमार्ग आहे टॉकी मार्ग (आवाजाचा मार्ग). आता तुम्हाला सायलेन्स (शांत स्वरूप) बनायचे आहे . अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. २) स्वतःची दैवी चलन बनवायची आहे. छुईमुई (नाजूक) बनायचे नाही. युद्धापूर्वी कर्मातीत अवस्थेला पोहोचायचे आहे. निर्विकारी बनून निर्विकारी बनविण्याची सेवा करायची आहे.

वरदान:- पवित्र प्रेमाच्या पालनेद्वारे सर्वांना स्नेहाच्या धाग्यामध्ये बांधणारे मास्टर स्नेहाचे सागर भव जेव्हा स्नेहाचे सागर आणि स्नेह संपन्न नद्यांचे मिलन होते (संगम होतो) तेव्हा नदी सुद्धा बाप समान मास्टर स्नेहाचा सागर बनते. म्हणून विश्वातील आत्मे स्नेहाच्या अनुभवाने आपोआप समीप येतात. पवित्र प्रेम किंवा ईश्वरीय परिवाराची पालना, चुंबकाप्रमाणे आपोआपच प्रत्येकाला जवळ आणते. हा ईश्वरीय स्नेह सर्वांना सहयोगी बनवून पुढे जाण्याच्या धाग्यामध्ये बांधून टाकतो.

बोधवाक्य:- संकल्प, बोल, वेळ, गुण आणि शक्तींचे खजिने जमा करा म्हणजे यांचा सहयोग मिळत राहील.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - बाबा आले आहेत तुम्हाला सर्व खजिन्यांनी मालामाल करण्यासाठी, तुम्ही फक्त ईश्वरीय मतानुसार चाला, चांगल्या प्रकारे पुरुषार्थ करून वारसा घ्या, मायेकडून हार पत्करू नका"

प्रश्न:- ईश्वरीय मत, दैवी मत आणि मनुष्य मत यांच्यामध्ये मुख्य फरक कोणता आहे?

उत्तर:- ईश्वरीय मतामुळे तुम्ही मुले पुन्हा आपल्या घरी परत जाता आणि मग नवीन दुनियेमध्ये उच्च पद प्राप्त करता. दैवी मतामुळे तुम्ही सदा सुखी राहता कारण ते देखील बाबांकडून या वेळेला मिळालेले मत आहे, परंतु तरीसुद्धा उतरता तर खालीच आहात. मनुष्य मत दुःखी बनवते. ईश्वरीय मतानुसार चालण्यासाठी सर्वप्रथम शिकविणाऱ्या बाबांवर पूर्णत: निश्चय (विश्वास) पाहिजे.

ओम् शांती. बाबांनी अर्थ तर समजावून सांगितला आहे, मी शांत स्वरूप आहे. जेव्हा ओम् शांती म्हटले जाते तेव्हा आत्म्याला आपले घर आठवते. मी आत्मा शांत स्वरूप आहे. मग जेव्हा ऑर्गन्स मिळतात (शरीर मिळते) तेव्हा टॉकी बनते. आधी शरीर छोटे असते, मग मोठे होते. आता परमपिता परमात्मा तर आहेत निराकार. त्यांना देखील बोलण्यासाठी रथ (शरीर) पाहिजे. जसे तुम्ही आत्मे परमधाममध्ये राहणारे आहात, इथे येऊन टॉकी (बोलके) बनता. बाबा देखील म्हणतात - 'मी तुम्हाला नॉलेज देण्यासाठी टॉकी बनलो आहे'. बाबा स्वतःचा आणि रचनेच्या आदि-मध्य-अंताचा परिचय देतात. हे आहे रुहानी (आत्मिक) शिक्षण, ते असते भौतिक शिक्षण. ते स्वतःला शरीर समजतात. असे कोणी म्हणणार नाही की, 'मी आत्मा कानांद्वारे ऐकत आहे'. आता तुम्ही मुले जाणता - बाबा पतित-पावन आहेत, तेच येऊन समजावून सांगतात की, मी कसा येतो. तुमच्यासारखा मी गर्भात येत नाही. मी यांच्यामध्ये (ब्रह्मा मध्ये) प्रवेश करतो. त्यामुळे काही प्रश्नच येत नाही. हा रथ आहे. यांना माता देखील म्हटले जाते. सर्वात मोठी नदी ब्रह्म पुत्रा आहे. तर ही आहे सर्वात मोठी नदी. पाण्याची काही गोष्टच नाही. ही आहे महानदी अर्थात सर्वात मोठी ज्ञान नदी. तर बाबा आत्म्यांना समजावून सांगत आहेत - 'मी तुमचा पिता आहे. जसे तुम्ही बोलता तसाच मी सुद्धा बोलतो. माझा पार्ट तर सर्वात शेवटी आहे'. जेव्हा तुम्ही अगदीच पतित बनता तेव्हा तुम्हाला पावन बनविण्यासाठी यावे लागते. या लक्ष्मी-नारायणाला असे बनवणारा कोण आहे? ईश्वरा व्यतिरिक्त इतर कोणासाठीही असे म्हणू शकत नाही. बेहदचे बाबाच स्वर्गाचा मालक बनवत असतील ना. बाबाच ज्ञानाचा सागर आहेत. तेच म्हणतात - 'मी या मनुष्य सृष्टीचे चैतन्य बीज आहे. मी आदि-मध्य-अंताला जाणतो. मी सत् आहे, मी चैतन्य बीजरूप आहे, या सृष्टी रूपी झाडाचे ज्ञान माझ्यामध्ये आहे'. याला सृष्टीचक्र किंवा ड्रामा म्हटले जाते. हे फिरतच राहते. तो हदचा ड्रामा (चित्रपट) दोन तास चालतो. याचे रील (फिल्म) ५ हजार वर्षांचे आहे. जो-जो वेळ निघून जातो, तो वेळ ५ हजार वर्षांमधून कमी होत जातो. तुम्ही जाणता प्रथम आम्ही देवी-देवता होतो, नंतर मग हळूहळू आम्ही क्षत्रिय कुळामध्ये आलो. हे सर्व रहस्य बुद्धीमध्ये आहे ना. तर याचे चिंतन करत राहिले पाहिजे. आम्ही अगदी सुरवातीला पार्ट बजावण्याकरिता आलो तेव्हा आम्ही सो देवी-देवता होतो. १२५० वर्षे राज्य केले. वेळ तर निघून जातो ना. लाखो वर्षांची तर काही गोष्टच नाही. लाखो वर्षांचे तर कोणी चिंतन करू देखील शकणार नाही.

तुम्ही मुले समजता - आपण हे देवी-देवता होतो, मग पार्ट बजावत, वर्षामागून वर्ष जाता-जाता आता किती वर्षे निघून गेली आहेत. हळूहळू सुख कमी-कमी होत जाते. प्रत्येक गोष्ट सतोप्रधान, सतो, रजो, तमो होते. जुनी नक्की होते. ही मग आहे बेहदची गोष्ट. या सर्व गोष्टी चांगल्या प्रकारे बुद्धीमध्ये धारण करून मग इतरांना समजावून सांगायच्या आहेत. सर्वच काही एकसारखे नसतात. नक्कीच वेगवेगळ्या पद्धतीने समजावून सांगत असतील. चक्रा विषयी समजावून सांगणे सर्वात सोपे आहे. ड्रामा आणि झाड ही दोन्ही मुख्य चित्रे आहेत. 'कल्पवृक्ष' नाव आहे ना. कल्पाचे आयुर्मान किती वर्षांचे आहे हे कोणीही जाणत नाहीत. मनुष्यांची अनेक मते आहेत. कोणी काय म्हणतील, कोणी काय म्हणतील. आता तुम्हाला मनुष्यांची अनेक मते देखील समजली आहेत आणि एक ईश्वरीय मत देखील समजले आहे. किती फरक आहे. ईश्वरीय मताद्वारे तुम्हाला पुन्हा नवीन दुनियेमध्ये जावे लागते, बाकी कोणाच्याही मताद्वारे, दैवी मताद्वारे अथवा मनुष्य मताद्वारे परत जाऊ शकत

नाही. दैवी मतामुळे तुम्ही उतरतच जाता कारण कला कमी होत जातात. आसुरी मतामुळे देखील उतरता. परंतु दैवी मतामध्ये सुख आहे, आसुरी मतामध्ये दुःख आहे. दैवी मत देखील या वेळी बाबांनी दिलेले आहे म्हणून तुम्ही सुखी राहता. बेहदचे बाबा किती दुरून येतात. मनुष्य पैसा कमावण्यासाठी बाहेर जातात. जेव्हा खूप पैसे गोळा होतात तेव्हा मग येतात. बाबा देखील म्हणतात मी तुम्हा मुलांसाठी भरपूर खजिना घेऊन येतो कारण मी जाणतो तुम्हाला भरपूर धन-संपत्ती दिली होती, ती सर्व तुम्ही गमावली आहे. तुमच्याशीच बोलतो, ज्यांनी प्रत्यक्षात गमावले आहे. ५ हजार वर्षांपूर्वीची गोष्ट तुम्हाला आठवते ना. म्हणतात - 'हो बाबा, ५ हजार वर्षांपूर्वी तुम्हाला भेटलो होतो, तुम्ही वारसा दिला होता'. आता तुम्हाला स्मृती आली आहे की, खरोखर बेहदच्या बाबांकडून वारसा घेतला होता. बाबा, तुमच्याकडून नवीन दुनियेच्या राज्याचा वारसा घेतला होता. अच्छा, मग पुरुषार्थ करा. असे म्हणू नका - 'बाबा, मायेच्या भुताने आम्हाला हरवले'. देह-अभिमाना नंतरच तुम्ही मायेकडून हार खाता. लोभ केला, लाच खाल्ली. लाचारीची गोष्ट वेगळी आहे. बाबा जाणतात लोभाशिवाय पोटपूजा होणार नाही, हरकत नाही. भलेही खा, परंतु कुठे तरी अडकून मरू नका, मग तुम्हालाच दुःख होईल. पैसा मिळाला की खूष होऊन खाल, कधी पोलिसांनी पकडले तर जेलमध्ये जावे लागेल. असे काम करू नका, नाही तर त्याला जबाबदार मी राहणार नाही. पाप करतात तर जेलमध्ये जातात. तिथे (नवीन दुनियेमध्ये) तर जेल वगैरे असत नाही. तर ड्रामा प्लॅन अनुसार कल्पापूर्वी जो वारसा तुम्हाला २१ जन्मांसाठी मिळाला आहे, तसाच पुन्हा घ्याल. संपूर्ण राजधानी बनत आहे. गरीब प्रजा, श्रीमंत प्रजा. परंतु तिथे दुःख असत नाही. याची बाबा खात्री देतात. सर्व एकसारखे तर बनू शकत नाहीत. सूर्यवंशी-चंद्रवंशी राज्यामध्ये सर्व पाहिजेत ना. मुले जाणतात बाबा कशी आपल्याला विश्वाची बादशाही देतात. मग आम्ही उतरतो (पतन होते). स्मृतीमध्ये आले ना. शाळेत अभ्यास आठवणीमध्ये राहतो ना. इथे देखील बाबा आठवण करून देतात. हे रूहानी शिक्षण जगभरात दुसरे कोणीही शिकवू शकत नाही. गीतेमध्ये देखील लिहिलेले आहे - मनमनाभव. याला महामंत्र वशीकरण मंत्र म्हणतात अर्थात मायेवर विजय प्राप्त करण्याचा मंत्र. 'माया जीते जगत-जीत'. माया ५ विकारांना म्हटले जाते. रावणाचे चित्र अगदी स्पष्ट आहे - ५ विकार स्त्रीमध्ये, ५ विकार पुरूषांमध्ये. यांच्यामुळे गाढव अर्थात तट्टू बनतात म्हणूनच डोक्यावर गाढवाचे शीर दाखवतात. आता तुम्ही समजता ज्ञाना अभावी आपण देखील असेच होतो. बाबा बसून किती मनोरंजक पद्धतीने शिकवतात. ते आहेत सुप्रीम टीचर. त्यांच्याकडून आम्ही जे शिकतो ते मग इतरांना ऐकवतो. सर्वात आधी तर शिकणाऱ्याविषयी विश्वास निर्माण केला पाहिजे. बोला - 'बाबांनी आम्हाला हे समजावून सांगितले आहे, आता माना अथवा नका मानू'. हे बेहदचे बाबा तर आहेत ना. श्रीमतच श्रेष्ठ बनवते, तर श्रेष्ठ नवी दुनिया देखील जरूर पाहिजे ना.

आता तुम्ही समजता आम्ही कचऱ्याच्या (विकारी) दुनियेमध्ये बसलो आहोत. दुसरे कोणीही समजू शकणार नाही. तिथे आम्ही बहिश्त स्वर्गात कायम सुखी असतो. इथे नरकामध्ये किती दुःखी आहोत. याला नरक म्हणा किंवा विषय वैतरणी नदी म्हणा, जुनी दुनिया घाणेरडी (विकारी) आहे. आता तुम्हाला जाणीव होते - कुठे सतयुग स्वर्ग, कुठे कलियुग नरक! स्वर्गाला म्हटले जाते जगातले आश्चर्य. त्रेताला देखील असे म्हणणार नाही. इथे या घाणेरड्या दुनियेमध्ये राहण्यात लोकांना किती आनंद होतो. विष्ठेतल्या किड्यांना भुंगा भूँ-भूँ करून स्वतः सारखे बनवतो. तुम्ही देखील कचऱ्यामध्ये पडलेले होता. मी येऊन भूँ-भूँ करून तुम्हाला किड्याचे अर्थात शूद्राचे ब्राह्मण बनवले आहे. आता तुम्ही डबल मुकुटधारी बनत आहात तर किती आनंद झाला पाहिजे. पुरुषार्थ देखील पूर्णपणे केला पाहिजे. बेहदचे बाबा स्पष्टीकरण तर किती सोप्या पद्धतीने देतात. मनातून वाटते देखील की बाबा खरे-खरे सांगत आहेत. या वेळी सर्वजण मायेच्या दलदलीमध्ये अडकले आहेत. बाहेर दिखाऊपणा किती आहे? बाबा समजावून सांगत आहेत - मी येऊन तुम्हाला या दलदलीतून वाचवतो, स्वर्गामध्ये घेऊन जातो. स्वर्गाचे नाव ऐकलेले आहे. आता काही स्वर्ग तर नाहीये, फक्त हे चित्र आहे. हे (ब्रह्मा बाबा) स्वर्गाचे मालक किती धनाढ्य होते. भक्तीमार्गामध्ये भले रोज मंदिरात जात होते, परंतु हे ज्ञान काहीच नव्हते. आता तुम्ही समजता भारतामध्ये हा आदि सनातन देवी-देवता धर्म होता. यांचे राज्य केव्हा होते, हे कोणालाच माहीत नाही आहे. मग देवी-देवता धर्मा ऐवजी आता हिंदू-हिंदू म्हणत राहतात. सुरुवातीला हिंदू महासभेचा अध्यक्ष आला होता. म्हणाला, आम्ही विकारी असुर आहोत, स्वतःला देवता कसे म्हणणार? मी (ब्रह्मा बाबांनी) सांगितले - ठीक आहे, याल तर तुम्हाला समजावून सांगतो देवी-देवता धर्माची स्थापना पुन्हा होत आहे. आम्ही तुम्हाला स्वर्गाचे मालक बनवू. बसून शिका. म्हणाला, दादाजी वेळच कुठे आहे? वेळ नसेल तर देवता कसे बनाल! हे शिक्षण आहे ना. बिचाऱ्याच्या नशीबात नव्हते. मरून गेला. असे देखील म्हणणार नाही की तो काही प्रजेमध्ये येईल. नाही, असाच

आला होता, ऐकून होता की इथे पवित्रतेचे ज्ञान मिळते. परंतु सतयुगामध्ये तर येऊ शकणार नाही. तरीही पुन्हा हिंदू धर्मामध्येच येईल.

तुम्ही मुले समजता माया अतिशय बलवान आहे. काही ना काही चूक करायला लावत राहते. कधी कोणते उलटे-सुलटे पाप झाले तर बाबांना खऱ्या मनाने सांगायचे आहे. रावणाच्या दुनियेमध्ये पापे तर होतच राहतात. म्हणतात - आम्ही जन्मोजन्मीचे पापी आहोत. हे कोण म्हटले? आत्मा म्हणते - बाबांसमोर की देवतांच्या समोर? आता तुम्हाला जाणवते की खरोखर आम्ही जन्म-जन्मांतरीचे पापी होतो. रावणराज्यामध्ये पापे जरूर केली आहेत. अनेक जन्मांच्या पापांचे वर्णन तर करू शकत नाही. या जन्मातील सांगू शकतो. ते सांगितल्याने देखील ओझे हलके होईल. डॉक्टरांना रोगाबद्दल सांगायला पाहिजे - अमक्याला मारले, चोरी केली..., असे सांगताना लाज वाटत नाही परंतु विकाराबद्दल सांगताना लाज वाटते. डॉक्टरांसमोर लाज वाटली तर रोग बरा कसा होणार? मग मन आतल्याआत खात राहील, बाबांची आठवण करू शकणार नाही. खरे सांगाल तर आठवण करू शकाल. बाबा म्हणतात - मी डॉक्टर तुमच्यावर किती उपचार करतो. तुमची काया सदैव कांचन राहील. डॉक्टरला सांगितल्याने ओझे हलके होते. कोणी-कोणी आपणहून लिहितात - बाबा मी जन्मोजन्मी पापे केली आहेत. पापात्म्यांच्या दुनियेमध्ये पापात्माच बनले आहेत. आता बाबा म्हणतात मुलांनो, तुम्ही पापात्म्यांबरोबर देवाण-घेवाण करायची नाही. खरे सद्गुरु, अकालमूर्त बाबा आहेत, जे कधीही पुनर्जन्मामध्ये येत नाहीत. त्यांनी अकाल-तख्त नाव ठेवले आहे, परंतु अर्थ समजत नाहीत. बाबांनी समजावून सांगितले आहे आत्म्याचे हे तख्त आहे. शोभते देखील इथेच, तिलक देखील इथे (भृकुटीमध्ये) लावतात ना... खरे तर तिलक अगदी छोट्या बिंदू सारखे लावत होते. आता तुम्हाला आपणच आपल्याला तिलक द्यायचा आहे. बाबांची आठवण करत रहा. जे खूप सेवा करतील ते मोठे महाराजा बनतील. नव्या दुनियेमध्ये जुन्या दुनियेतील शिक्षण थोडेच शिकायचे आहे? तर इतक्या श्रेष्ठ शिक्षणाकडे मग खूप लक्ष द्यायला पाहिजे. इथे बसतात तरीही काहींचा बुद्धीयोग चांगला असतो, कोणाचा कुठे-कुठे निघून जातो. कोणी १० मिनिटे लिहितात, कोणी १५ मिनिटे लिहितात. ज्याचा चार्ट चांगला असेल त्याला नशा चढेल - बाबा, इतका वेळ मी तुमच्या आठवणीमध्ये राहिलो. १५ मिनिटांपेक्षा जास्त तर कोणी लिहू शकत नाही. बुद्धी इकडे-तिकडे पळते. जर सगळे एकरस झाले तर मग कर्मातीत अवस्था होईल. बाबा किती गोड-गोड सुंदर गोष्टी ऐकवतात. असे तर कोणत्याही गुरूने शिकवले नाही. गुरूकडून फक्त एकटाच थोडेच शिकेल? गुरूकडून तर हजारो शिकतील ना. सद्गुरु कडून तुम्ही कितीजण शिकता. हा आहे मायेला वश करण्याचा मंत्र. माया ५ विकारांना म्हटले जाते. धनाला संपत्ती म्हटले जाते. लक्ष्मी-नारायणासाठी म्हणणार - यांच्याकडे खूप संपत्ती आहे. लक्ष्मी-नारायणाला कधी माता-पिता म्हणणार नाही. आदि देव, आदि देवीला जगत पिता, जगत अंबा म्हणतात, यांना नाही. हे स्वर्गाचे मालक आहेत. अविनाशी ज्ञान धन घेऊन आपण इतके धनवान बनलो आहोत. अंबेकडे अनेक इच्छा मनात ठेऊन जातात. लक्ष्मीकडे फक्त धनाकरिता जातात आणखी कोणती इच्छा नसते. तर मोठी कोण आहे? हे कोणालाही माहित नाहीये की, अंबेकडून काय मिळते? लक्ष्मीकडून काय मिळते? लक्ष्मीकडून फक्त धन मागतात. अंबेकडे सर्व काही मिळते. अंबेचे नाव जास्त आहे कारण मातांना दुःख देखील खूप सहन करावे लागले आहे. त्यामुळे मातांचे नाव जास्त मोठे आहे. अच्छा, तरीसुद्धा बाबा म्हणतात - बाबांची आठवण करा तर पावन बनाल. चक्राची आठवण करा, दैवी गुण धारण करा. खूप जणांना आप समान बनवा. गॉड फादरचे तुम्ही स्टुडंट आहात. कल्पापूर्वी देखील बनला होतात, आता देखील तेच एम ऑब्जेक्ट आहे. ही आहे नरापासून नारायण बनण्याची सत्य कथा. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) स्वतःचा आजार डॉक्टरांपासून कधीही लपवायचा नाही. मायेच्या भुतांपासून स्वतःला वाचवायचे आहे. स्वतःला राजतिलक देण्यासाठी सेवा जरूर करायची आहे.
2. २) स्वतःला अविनाशी ज्ञानधनाने धनवान बनवायचे आहे. आता पापात्म्यांबरोबर देवाण-घेवाण करायची नाहीये. संपूर्ण लक्ष अभ्यासाकडे द्यायचे आहे.

वरदान:- या कल्याणकारी युगामध्ये सर्वांचे कल्याण करणारे प्रकृतीजीत मायाजीत भव

संगमयुगाला कल्याणकारी युग म्हटले जाते, या युगामध्ये सदैव हा स्वमान लक्षात रहावा की, मी कल्याणकारी आत्मा आहे, माझे कर्तव्य आहे आधी स्वतःचे कल्याण करणे, मग सर्वांचे कल्याण करणे. मनुष्य आत्म्यांचेच नाही, तर आम्ही प्रकृतीचे देखील कल्याण करणारे आहोत म्हणून प्रकृतीजीत मायाजीत संबोधले जातो. जेव्हा आत्मा पुरुष प्रकृतीजीत बनते, तेव्हा प्रकृती देखील सुखदायी बनते. प्रकृती अथवा मायेच्या गोंधळामध्ये येऊ शकत नाही. त्यांच्यावर अकल्याणाच्या वातावरणाचा प्रभाव पडू शकत नाही.

बोधवाक्यः- एकमेकांच्या विचारांना सन्मान द्या तर माननीय आत्मा बनाल.

||| ओम शांती |||

या नवीन वर्षामध्ये सर्व खजिने सफल करून सफलतामूर्त बनण्याची विशेषता दाखवा

आज नवयुगाचे रचता, नव जीवन दाता बापदादा नवीन वर्ष साजरे करण्यासाठी आले आहेत. तुम्ही देखील सर्व नवीन वर्ष साजरे करण्यासाठी आले आहात का नवयुग साजरे करण्यासाठी आले आहात? नवीन वर्ष तर सर्वजण साजरे करतात परंतु तुम्ही सर्व नवजीवन, नवयुग आणि नवीन वर्ष तिन्ही साजरे करत आहात. बापदादा देखील त्रिमूर्ती मुबारक देत आहेत. नवीन वर्षाची एकमेकांना मुबारक देतात आणि त्यासोबत काही ना काही भेट सुद्धा देतात. गिफ्ट देता ना! परंतु बापदादांनी तुम्हा सर्वांना कोणती गिफ्ट दिली आहे? गोल्डन दुनियेची गिफ्ट दिली आहे. सर्वांना गोल्डन दुनियेची गिफ्ट मिळाली आहे ना! ज्या गोल्डन दुनियेमध्ये, नवयुगामध्ये सर्व प्रकारच्या प्राप्ती आहेत. आठवते आहे आपले राज्य? कोणत्याही अप्राप्तीचे नामोनिशाण सुद्धा नाही. अशी गिफ्ट बापदादांशिवाय इतर कोणीही देऊ शकत नाही. साऱ्या विश्वामध्ये जर कोणी मोठ्यात मोठी भेटवस्तू जरी दिली तरी देखील काय देतील? मोठ्यात मोठा ताज किंवा तख्त देतील. जेव्हा स्थापना झाली होती, (स्थापनावाले पुढे-समोर बसले आहेत) तेव्हा सुरुवातीलाच ब्रह्मा बाबा मुलांना विचारत होते की, जर तुम्हाला आजकालची कोणतीही राणी ताज आणि तख्त देईल तर तुम्ही जाल? लक्षात आहे ना! तर मुले म्हणत होती - या ताज आणि तख्ताचे काय करणार, जर बाबा मिळाले तर त्यासमोर हे काय आहे! तर या गोल्डन वर्ल्डच्या गिफ्ट समोर कोणतीही गिफ्ट मोठी असू शकत नाही. बरीच मुले विचारतात तिथे कोणकोणत्या गोष्टी प्राप्त असणार? तर बापदादा म्हणतात - प्राप्तीची लिस्ट तर लांबलचक आहे परंतु सार रूपामध्ये काय म्हणतील! अप्राप्त अशी कोणती वस्तू नाही, ज्या जीवनामध्ये पाहिजेत त्या सर्व गोष्टी प्राप्त होणार. तर अशा गोल्डन गिफ्टचे अधिकारी आत्मे आहात. अधिकारी आहात ना! डबल विदेशी अधिकारी आहेत? (हात हलवत आहेत) सगळे राजा बनणार? तर इतके तख्त तयार करावे लागतील. बापदादा म्हणत आहेत तो तख्त तर तख्त आहे, सर्व प्राप्ती आहेत परंतु या संगमयुगाचे स्वराज्य काही त्याच्यापेक्षा कमी नाहीये. आता देखील राजा आहात ना! प्रजा आहात का रॉयल फॅमिली आहात? काय आहात? एक बाबाच आहेत जे अभिमानाने म्हणतात की माझा एक-एक मुलगा राजा बच्चा आहे. राजा आहात ना! राजयोगी आहात कि प्रजा योगी आहात? यावेळी सर्व दिलतख्तनशीन, स्वराज्य अधिकारी राजा मुले आहात, इतका रुहानी (आत्मिक) नशा राहतो ना? कारण यावेळच्या स्वराज्यावरूनच भविष्य राज्य प्राप्त होते. हे संगमयुग खूप-खूप-खूप अमूल्य श्रेष्ठ आहे. संगमयुगाला बापदादा आणि सर्व मुले जाणतात, आनंदाने संगमयुगाला कोणते नाव देतात? मौजमजेचे युग. का? इथे संगमा सारखा आनंद साऱ्या कल्पामध्ये नाही. कारण? परमात्म मिलनाचा आनंद साऱ्या कल्पामध्ये आता मिळतो. संगमयुगाचा प्रत्येक दिवस काय आहे? आनंदच आनंद आहे. आनंद आहे ना? आनंद आहे, गोंधळून तर जात नाही ना! प्रत्येक दिवस उत्सव आहे कारण उत्साह आहे. उमंग आहे, उत्साह आहे की आपल्या सर्व भाऊ-बहिणींना परमात्मा पित्याचे बनवूया. सेवेचा उमंग-उत्साह असतो ना! असे करूया, तसे करूया, हे करूया... प्लॅन बनवता ना! कारण जेव्हा कोणतीही मोठी प्राप्ती होते तेव्हा दुसऱ्याला सांगितल्याशिवाय राहू शकत नाहीत. या संगमयुगाची प्राप्ती गोल्डन वर्ल्डमध्ये सुद्धा होईल. आताच्या पुरुषार्थाचे प्रारब्ध भविष्य गोल्डन वर्ल्ड आहे. तर संगमयुग आवडते का सतयुग आवडते? काय चांगले वाटते? संगम छान आहे ना? फक्त मधून-मधून माया येते. कधी थोडे-थोडे गोंधळून जातात. बरीच मुले सहज योगाला अवघड योग बनवतात, तसा नाही आहे परंतु बनवतात. वास्तविक आहे खूप सोपा, कठीण वाटतो का? ज्यांना अवघड वाटतो त्यांनी हात वर करा. नेहमीच नाही, कधी-कधी अवघड वाटतो? कि सोपा आहे? जे अवघड योगी आहेत त्यांनी हात वर करा. मातांनो अवघड योगी आहात कि सहज योगी आहात? कोणी अवघड योगी आहेत? (कोणीही हात वर करत नाहीत) भर सभेमध्ये हात कसा वर करणार!

सर्व मुले अभिमानाने म्हणतात - 'माझे बाबा'. माझे बाबा आहेत कि दादींचे बाबा आहेत? माझे बाबा आहेत ना! प्रत्येक जण म्हणेल - 'पहिले माझे'. असे आहे ना? हे सगळे सिंधी लोक बसले आहेत ना! माझे बाबा आहेत कि दादी जानकीचे बाबा आहेत? दादी प्रकाशमणीचे आहेत? कोणाचे आहेत? माझे आहेत? संपूर्ण दिवस काय आठवणीत राहते? 'माझे' ना! बाबा म्हणतात - खूप सोपी युक्ती आहे जितक्या वेळा 'माझे-माझे' म्हणता, संपूर्ण दिवसामध्ये किती वेळा 'माझे' हा शब्द बोलता? जर मोजाल तर खूप वेळा 'माझे' हा शब्द बोलता. जेव्हा 'माझे'

हा शब्द बोलता तर बस, माझे कोण? माझे बाबा. काही अवघड आहे? कधी-कधी विसरून तर जाता? बापदादा काही नवीन शब्द देत नाहीत, जे नेहमी कार्यामध्ये वापरता 'मी' आणि 'माझे', तर 'मी कोण' आणि 'माझे कोण'! बरीच मुले पुरुषार्थ अवघड का करून ठेवतात? केवळ विचार करतात बिंदू समोर यावा, बिंदू बिंदू बिंदू... आणि बिंदू निसटून जातो. बिंदू तर आहे परंतु कोणता बिंदू? मी कोण आहे, ते आपले स्वमान स्मृतीमध्ये आणा तेव्हा आनंददायी पुरुषार्थ होईल; फक्त ज्योती बिंदू म्हणता ना त्यामुळे अवघड वाटू लागतो. सोपा पुरुषार्थ, आनंदाचा पुरुषार्थ करा.

या नवीन वर्षामध्ये पुरुषार्थ देखील श्रेष्ठ असावा परंतु श्रेष्ठ असण्या सोबत अगोदर सोपा असावा. सोपा देखील असावा आणि श्रेष्ठ देखील असावा असे होऊ शकते? दोन्ही एकत्र होऊ शकते? डबल फॉरेनर्स बोला, होऊ शकते? तर बापदादा बघतील. बापदादा तर चेक करत राहतात ना! तर अवघड योगी कोण-कोण बनतात! सहज योगी याचा अर्थ असा नाही की, निष्काळजीवाला पुरुषार्थ असावा. श्रेष्ठ देखील असावा आणि सोपा देखील असावा. तर पांडव सहज योगी आहात? सहजयोगी जे आहेत त्यांनी हात वर करा. पहा टी.व्ही. मध्ये येत आहे. मुबारक असो. तर या वर्षी कोणासमोर कोणतीही अडचण येणार नाही कारण सहज योगी आहात. निष्काळजी बनू नका.

वेळेनुसार या नवीन वर्षामध्ये सर्वांना विशेष हे लक्ष्य ठेवायचे आहे की, जे कोणते खजिने प्राप्त आहेत - वेळ आहे, संकल्प आहे, गुण आहेत, ज्ञान आहे, शक्ती आहे... सर्वात मोठा खजिना संकल्प आहे - श्रेष्ठ संकल्प, शुध्द संकल्प. या सर्व खजिन्यांना दररोज सफल करायचे आहे. भरपूर वाटा. दात्याची मुले मास्टर दाता बना. भरपूर वाटा. कशासाठी? सफल करणे अर्थात सफलतेला प्राप्त करणे. तर यावर्षीची हिच विशेषता नेहमी कायम ठेवा. सफल करायचे आहे आणि सफलता आहेच आहे. तुम्ही सर्व म्हणता देखील ना की सफलता आमचा जन्मसिद्ध अधिकार आहे. आहे अधिकार? तर सफल करा आणि सफलता प्राप्त करा. कोणतेही कार्य करा, कोणता ना कोणता खजिना सफल करत जा आणि सफलतेचा अनुभव करत चला. विचार करा - सफलतेचा अधिकार तुम्हा ब्राह्मण आत्म्यांशिवाय इतर कोणाचा अधिकार असू शकतो! का? कारण बाबांनी तुम्हाला 'सफलता भव'चे वरदान दिले आहे. बापदादा नेहमी म्हणतात की, प्रत्येक ब्राह्मण आत्मा सफलतेचा तारा आहे, सफलता स्वरूप आहे. सफलतेचे तारे आहात ना का मेहनत करणारे तारे आहात? बापदादा सर्व मुलांना सफलतेचा तारा, याच स्वरूपामध्ये पाहतात. आठवते का ब्रह्मा बाबांनी सुरुवातीला किती वेळामध्ये सर्व काही सफल केले? शेवट पर्यंत आपला वेळ सफल केला, जरी कर्मातीत देखील बनले तरीही किती पत्रे लिहिली! समय सफल केला ना! शेवटच्या दिवशी सुद्धा मुखाद्वारे महावाक्यांचे उच्चारण केले. शेवटच्या दिवसापर्यंत सर्व काही सफल केले म्हणून सफलतेला प्राप्त झाले. तर फॉलो फादर. वास्तविक संगमयुगाचा एक-एक संकल्प, एक-एक सेकंद सफल करणे म्हणजेच सफलता मूर्त बनणे आहे. सगळे निश्चयाने म्हणतात ना की, ब्रह्मा बाबांवर तर आमचे खूप प्रेम आहे. तर प्रेमाची निशाणी आहे जे बाबांना प्रिय होते ते मुलांना प्रिय असावे. समय, संकल्प आणि सर्व खजिने सफल व्हावेत. व्यर्थ जाऊ नयेत. प्रेमाची निशाणी - फॉलो फादर. ब्रह्मा बाबांनी विशेषता कोणती दाखवली? जो विचार केला ते सेकंदामध्ये केले. केवळ विचार नाही केला, केवळ प्लॅन बनवले नाहीत, तर प्रॅक्टिकलमध्ये करुन दाखवले. तर असे आहे? फॉलो करणारे आहात ना? चांगले आहे.

आज खुपच आले आहेत - नवीन वर्ष साजरे करण्यासाठी. चांगले आहे. जरी हॉल छोटा झाला तरी मन तर मोठे आहे. पाहा मन मोठे आहे तर सामावून घेतले गेले आहे ना? (आज सभेमध्ये १८-१९ हजार भाऊ-बहिणी बसले आहेत) सर्व बाहेर बसलेले देखील ऐकत आहेत ना? बाहेर बसलेले ऐकत आहेत, ते काही दिसणार नाहीत. बापदादांनी ऐकले की फॉरेनमध्ये सर्वात जास्त ऑस्ट्रेलियावाले रात्री १२ वाजता बसतात आणि ४ वाजता अमृतवेला करून उठतात. तर बापदादांनी आज ऑस्ट्रेलियाची आठवण केली. ऐकत आहात. इथे (हॉलमधील) ऑस्ट्रेलियावाल्यांनी हात वर करा. त्रिमूर्ती मुबारक पहिल्यांदा ऑस्ट्रेलियाला नंतर सर्वांना.

या वर्षीचे लक्ष्य तर सांगितले - सफल करा, सफलता आहेच आहे. हे सर्वांनी पक्के केले? सफल करायचे आहे. व्यर्थ नाही. संगमयुग समर्थ युग आहे, सफलतेचे युग आहे, व्यर्थचे नाही. व्यर्थचे ६३ जन्म आता संपले. आता हे छोटेसे युग सफल करण्याचे युग आहे. जर समय सफल कराल तर भविष्यामध्ये देखील अर्ध्या कल्पातील पूर्ण काळ राज्य अधिकारी बनाल. जर कधी-कधी सफल कराल तर राज्य अधिकारी सुद्धा कधी-कधी बनाल. समय सफल करण्याचे प्रारब्ध हे आहे. श्वास सफल करत असाल तर २१ जन्म स्वस्थ रहाल. चालता-चालता हार्ट फेल होणार

नाही. कोणाचे हृदय बंद पडते, कोणाच्या नलिका ब्लॉक होतात, ते होणार नाही.

ज्ञानाच्या खजिन्याला देखील सफल करा तर ज्ञानाचा अर्थ आहे समज (बुद्धिवान), तिथे इतके बुद्धिवान बनाल की कोणत्याही मंत्र्यांची गरज भासणार नाही. आजकाल तर पहा शपथ घेताच सर्वात आधी मंत्रिमंडळ बनवतात. तिथे साथीदार असणार परंतु मंत्री नसणार. रॉयल फॅमिली प्रत्येक दरबारामध्ये बसणारे ताजधारी असणार. रॉयल फॅमिली काही कमी नसणार, भले तख्तावर जरी बसले नसतील तरी देखील मर्तबा (दर्जा) एकसमान असणार; त्यामुळे असा विचार करू नका की, तख्तनशीन खूप थोडे बनणार, परंतु तुम्ही लोक देखील राज दरबारामध्ये राज्य अधिकाऱ्याच्या रूपामध्ये असणार. तुमच्या मस्तकावर देखील ताज असणार आणि तुमचा पूर्ण अधिकार असणार. तर काय बनणार? नंबरवन कि नंबरवार, काय बनणार? नंबरवार बनणार कि नंबरवन बनणार? तर काय करावे लागेल, माहित आहे? हिम्मत दाखवलीत, हे खूप चांगले आहे. परंतु वन नंबर बनण्यासाठी अगोदर विन करावे लागेल. करत आहात ना! करणार, असे म्हणू नका, करत आहोत. बाकीचे सुद्धा ऐकत आहेत. आज ऐकले की, जुन्या सिंध मधील ब्रह्मा बाबांचे मित्र-परिवार भरपूर आले आहेत. हात वर करा. छोटी मुले उठा, परिवाराच्या परिवार आले आहेत. छान. काही कमाल (चमत्कार) करून दाखवाल ना! काय दाखवणार? (मेसेज देऊ) ते तर करतच आहात. अच्छा ३८ आले आहेत, तर काय कमाल करणार? चला जास्त काही म्हणत नाही, छोटीशी गोष्ट सांगत आहे, करण्यासाठी तयार आहात? मुले देखील कमाल करणार ना? (३८ लाख बनवणार) पद्म गुणा मुबारक असो. तुम्ही तर मोठी गोष्ट सांगितलीत परंतु बापदादा छोटीशी गोष्ट सांगत आहेत ती म्हणजे - प्रत्येकाने, एकाला घेऊन या. आणायचे आहे? एकाने, एकाला आणा. छोटी मुले आहेत तर मुलांना आणा. माता आहेत तर भाऊ किंवा बहिणीला आणा, परंतु प्रत्येकाने एकाला आणायचे आहे. हा ग्रुप बघून घ्या, तुम्ही यांना गाईड करा, पुढच्या वर्षी घेऊनच या, डबल ग्रुप घेऊन या. बापदादा हेच इच्छितात की, जिथून सुरुवात झाली, तिथेच प्रत्यक्षता होणार आहे. दया येते ना! ब्रह्मा बाबांचे देशवासी आहात तर देशवासीयांवर प्रेम असते.

तुमच्या जवळ खजिने भरपूर आहेत, गुणांचा खजिना किती मोठा आहे, शक्तींचा खजिना किती मोठा आहे. तर गुण दान, शक्तींचे दान करणारे मास्टर दाता बना. जे कोणी येईल मग ते नातेसंबंधामध्ये येतील, किंवा संपर्कामध्ये येतील परंतु त्यांना कोणत्या ना कोणत्या गुणाची किंवा शक्तीची गिफ्ट द्या. कोणीही रिकाम्या हाताने जाऊ नये. आणखी काही नाही तर निदान बाबांच्या संदेशाचे गोड बोल, ते गोड बोल सुद्धा गिफ्ट म्हणून द्या. दुनियावाले तर कोणताही उत्सव असतो ना तेव्हा एकमेकांचे तोंड गोड करतात. परंतु बापदादा म्हणतात तोंड गोड तर करायचेच आहे परंतु तुमचा गोड चेहेरा देखील दाखवायचा आहे. फक्त तोंड गोड नाही, चेहरा देखील गोड. इतकी मधुरता जमा आहे ना! जी वाटाल तरीही भरपूर रहाल आणि या खजिन्याला जितके वाटाल तितका वाढेल, कमी होणार नाही. तर यावर्षी नोट करा, जी कोणती आत्मा आली तिला मी काही दिले का? जर ऐकणारा नसेल तर गोड शक्तिशाली दृष्टी द्या. परंतु द्यायचे जरूर आहे. रिकामी जाऊ नये. हे तर सोपे आहे ना! का कठीण आहे?

अच्छा - एक सेकंदाची मनाची ड्रिल लक्षात आहे? प्रत्येकजण संपूर्ण दिवसभरामध्ये किती वेळा ही ड्रिल करता? हे नोट करा. ही मनाची ड्रिल जितक्या वेळा कराल तितकेच सहज योगी, सरल योगी बनाल. एका बाजूला मनसा सेवा दुसऱ्या बाजूला मनसा एक्सरसाईज. 'आता-आता निराकारी, आता-आता फरिश्ता'. ब्रह्मा बाबा तुम्हा फरिश्त्यांचे आवाहन करत आहेत. फरिश्ता बनून ब्रह्मा बाबांसोबत आपल्या घरी निराकार रूपामध्ये जायचे आणि मग देवता बनायचे. अच्छा.

चोहो बाजूने खूप-खूप प्रेमपूर्वक आठवण मग कार्डाच्या रूपामध्ये, किंवा पत्राच्या रूपामध्ये बापदादांपाशी पोहोचली आहे. बापदादा जाणतात की प्रत्येकजण हेच समजतात, 'माझी आठवण बाबांना द्या', परंतु मिळाली. प्रेमपूर्वक आठवण देणारी खूप लाडकी मुले बापदादांसमोर आहेत म्हणून बापदादा म्हणतात की प्रत्येक मुलाने आपल्या-आपल्या नावाने मुबारक आणि अंतःकरणापासूनचे आशीर्वाद स्वीकार करा.

तुम्हा सर्वांनाही नव जीवन, नवयुग आणि नवीन वर्षाची खूप-खूप पद्म-पद्म-पद्म-पदमगुणा मुबारक आणि अंतःकरणपूर्वक आशीर्वाद आहेत, प्रेमपूर्वक आठवण आणि नमस्ते.

बापदादांनी सर्व मुलांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या:-

चोहो बाजूच्या अति गोड, खुप लाडक्या मुलांना पद्म-पद्मगुणा नवीन वर्षाची मुबारक असो. हा जो क्षण निघून गेला, तो आहे निरोप आणि शुभेच्छांचा क्षण. एका बाजूला निरोप द्यायचा आहे, ज्या गोष्टीची संपन्न बनण्यामध्ये स्वतःमध्ये कमतरता अनुभव करता, त्याला निरोप, कायमसाठी निरोप द्या आणि पुढे झेप घेण्यासाठी शुभेच्छा. अभिनंदन असो, अभिनंदन असो, अभिनंदन असो. अच्छा - ओम् शांती.

वरदान:- स्मृतीला अनुभवाच्या स्थितीमध्ये स्थित करणारे नंबरवन विशेष आत्मा भव

सर्व ब्राह्मण आत्म्यांमध्ये संकल्प असतो की, आपण विशेष आत्मा नंबरवन बनावे परंतु संकल्प आणि कर्म यामधील अंतराला समाप्त करण्यासाठी स्मृतीला अनुभवामध्ये आणायचे आहे. जसे ऐकलेले, समजलेले लक्षात राहते तसे स्वतःला त्या अनुभवाच्या स्थितीमध्ये आणायचे आहे यासाठी स्वतःच्या आणि वेळेच्या महत्वाला जाणून मन आणि बुद्धीला कोणत्याही अनुभवाच्या सीटवर सेट करा तर नंबरवन विशेष आत्मा बनाल.

सुविचार:- वाईट गोष्टींची स्पर्धा सोडून चांगल्या गोष्टींसाठी स्पर्धा करा.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो- आत्मा रुपी बॅटरीला ज्ञान आणि योगाने भरपूर करून सतोप्रधान बनवायचे आहे, पाण्याच्या स्नानाने नाही"

प्रश्न:- यावेळी सर्व मनुष्य आत्म्यांना भटकवणारा कोण आहे? तो कशासाठी भटकवतो?

उत्तर:- सर्वांना भटकवणारा रावण आहे कारण तो स्वतः देखील भटकत असतो. त्याला स्वतःचे कोणते घर नाही आहे. रावणाला कोणी बाबा म्हणणार नाही. बाबा तर घरून परमधामवरून येतात आपल्या मुलांना ठिकाणा (आश्रय स्थान) देण्यासाठी. आता तुम्हाला घराची माहिती झाली आहे म्हणून तुम्ही भटकत नाही. तुम्ही म्हणता सर्वात पहिले आम्ही बाबांपासून दुरावलो आता परत सर्वात पहिले घरी जाणार.

ओम् शांती. गोड-गोड मुले इथे बसून समजतात, यांच्यामध्ये (ब्रह्मा बाबांमध्ये) जे शिवबाबा आलेले आहेत, ते कसेही करून आम्हाला सोबत घरी घेऊन जाणार. ते आत्म्यांचे घर आहे ना. तर मुलांना जरूर आनंद होत असणार, बेहदचे बाबा येऊन आम्हाला गुल-गुल (फूल) बनवतात. ते काही कोणते कपडे इत्यादी आपल्याला घालत नाहीत. याला म्हटले जाते योगबल, आठवणीचे बळ. जितका टिचरचा मर्तबा (दर्जा) आहे तितका अजूनच मुलांना देखील मर्तबा (दर्जा) मिळवून देतात. शिक्षणाने स्टुडंट्स जाणतात की आपण असे बनणार. तुम्ही देखील समजता आपले बाबा शिक्षक देखील आहेत, सद्गुरु देखील आहेत. ही आहे नवीन गोष्ट. आपले बाबा शिक्षक आहेत, त्यांची आपण आठवण करतो. ते आम्हाला शिकवून असे बनवत आहेत. आमचे बेहदचे बाबा आलेले आहेत - आम्हाला परत घरी घेऊन जाण्यासाठी. रावणाचे काही कोणते घर नसते, घर रामाचे असते. शिवबाबा कुठे राहतात? तुम्ही लगेच सांगाल परमधाम मध्ये. रावणाला काही बाबा म्हणणार नाही. रावण कुठे राहतो? माहित नाही. असे म्हणणार नाही की रावण परमधाम मध्ये राहतो. नाही, त्याचा तर जसा काही ठिकाणाच नाही आहे. भटकत राहतो, तुम्हाला देखील भटकवतो. तुम्ही रावणाची आठवण करता का? नाही. किती तुम्हाला भटकवतो. शास्त्र वाचा, भक्ती करा, असे करा. बाबा म्हणतात - याला म्हटले जाते भक्ती मार्ग, रावण राज्य. गांधीजी देखील म्हणत होते राम-राज्य पाहिजे. या रथामध्ये आपले शिवबाबा आलेले आहेत. मोठे बाबा आहेत ना. ते आत्म्यांशी 'बाळांनो-बाळांनो' म्हणत गोष्टी करतात. आता तुमच्या बुद्धीमध्ये आहेत रूहानी बाबा आणि रूहानी बाबांच्या बुद्धीमध्ये आहात तुम्ही रूहानी मुले, कारण तुमचे कनेक्शन आहेच मूल वतन सोबत. 'आत्मायें परमात्मा अलग रहे बहुकाल...' तिथे तर आत्मे बाबांसोबत एकत्र राहतात. मग आपला-आपला पार्ट बजावण्याकरिता वेगळे होतात. 'बहुकाल' या खूप काळाचा हिशोब तर पाहिजे ना. तो बाबा बसून सांगतात. तुम्ही आता शिक्षण शिकत आहात. तुमच्यामध्ये देखील नंबरवार आहेत जे चांगल्या रीतीने शिकतात. तेच सर्वप्रथम माझ्यापासून वेगळे झाले आहेत. तेच मग माझी खूप आठवण करतील आणि मग पुन्हा सर्वात अगोदर येतील.

बाबा मुलांना बसून साऱ्या सृष्टीचे गूढ रहस्य समजावून सांगतात, जे इतर कोणीही जाणत नाहीत. गुह्य देखील म्हटले जाते, गुह्यतम् देखील म्हटले जाते. हे तुम्ही जाणता बाबा काही वर (परमधाम मध्ये) बसून समजावून सांगत नाहीत, इथे येऊन समजावून सांगतात - मी या कल्पवृक्षाचे बीज रूप आहे. या मनुष्य सृष्टी रुपी झाडाला कल्पवृक्ष म्हटले जाते. दुनियेतील मनुष्य तर अजिबात काहीच जाणत नाहीत. कुंभकर्णाच्या निद्रेमध्ये झोपलेले आहेत मग बाबा येऊन जागे करतात. आता तुम्हा मुलांना जागे केले आहे बाकी सारे झोपलेले आहेत. तुम्ही देखील कुंभकर्णाच्या आसुरी निद्रेमध्ये झोपला होता. बाबांनी येऊन जागे केले आहे, मुलांनो जागे व्हा. तुम्ही गाफील होऊन झोपून गेले आहात, याला म्हटले जाते अज्ञान निद्रा. ती निद्रा तर सर्वच घेतात. सतयुगामध्ये देखील घेतात. आता सर्व आहेत अज्ञानाच्या निद्रेमध्ये. बाबा येऊन ज्ञान देऊन सर्वांना जागे करतात. आता तुम्ही मुले जागे झाले आहात, जाणता बाबा आलेले आहेत, आपल्याला घेऊन जातील. आता तर ना हे शरीर कामाचे राहिले आहे, ना आत्मा. दोन्ही पतित बनले आहेत, एकदम भेसळ असलेले आहे. ९ कॅरेट म्हणावे अर्थात खूप थोडे सोने, खरे सोने २४ कॅरेटचे असते. आता बाबा तुम्हा मुलांना २४ कॅरेटमध्ये घेऊन जाऊ इच्छितात. तुमच्या आत्म्याला खरे-खरे गोल्डन एजेड बनवितात. भारताला सोन्याची चिडिया म्हणत होते. आता तर लोखंडाची, दगड-मातीची

चिडिया म्हणता येईल. आहे तर चैतन्य ना. या समजून घेण्याच्या गोष्टी आहेत. जसे आत्म्याला समजता तसेच बाबांना देखील समजू शकता. म्हणतात देखील - 'चमकता है सितारा'. अतिशय छोटासा तारा आहे. डॉक्टर इत्यादींनी पाहण्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत परंतु दिव्य दृष्टी शिवाय पाहू शकत नाही. अति सूक्ष्म आहे. कोणी म्हणतात डोळ्यातून आत्मा निघून गेली, कोणी म्हणतात मुखातून निघून गेली. आत्मा निघून जाते कुठे? दुसऱ्या शरीरामध्ये जाऊन प्रवेश करते. आता तुमची आत्मा वर शांतीधामला निघून जाईल. हे पक्के माहित आहे बाबा येऊन आपल्याला घरी घेऊन जातील. एकीकडे आहे कलियुग, दुसरीकडे आहे सतयुग. आता आम्ही संगमावर उभे आहोत. आश्चर्य आहे. इथे करोडोंनी मनुष्य आहेत आणि सतयुगामध्ये केवळ ९ लाख! बाकी सर्वांचे काय झाले? विनाश होतो. बाबा येतातच मुळी नवीन दुनियेची स्थापना करण्यासाठी. ब्रह्मा द्वारे स्थापना होते. मग दोन रूपामध्ये पालना देखील होते. असे काही नाही की चारभुजावाले कोणी मनुष्य असतील. तर मग ते सौंदर्यच राहणार नाही. मुलांना देखील समजावून सांगतात - चतुर्भुज हे श्री लक्ष्मी, श्री नारायणाचे कम्बाइंड रूप आहे. श्री अर्थात श्रेष्ठ. त्रेतामध्ये दोन कला कमी होतात. तर मुलांना हे जे नॉलेज आता मिळते याच्या स्मृती मध्ये रहायचे आहे. मुख्य आहेच दोन शब्द, बाबांची आठवण करा. इतर कोणालाही समजणार नाही. बाबाच पतित-पावन सर्वशक्तिमान आहेत. गातात देखील बाबा, तुम्ही आम्हाला सारे आकाश-धरती सर्व काही दिले. अशी कोणती वस्तू नाही जी दिली नसेल. संपूर्ण विश्वाचे राज्य दिले आहे.

तुम्ही जाणता हे लक्ष्मी-नारायण विश्वाचे मालक होते. मग ड्रामाचे चक्र फिरते. संपूर्ण निर्विकारी बनायचे आहे. नंबरवार पुरुषार्थानुसार. हे देखील जाणता विकारी पासून निर्विकारी, निर्विकारी पासून विकारी, हा ८४ जन्मांचा पार्ट अगणित वेळा बजावला आहे. त्याचे मोजमाप करू शकत नाही. जनगणना भले करतात. बाकी हे जे तुम्ही तमोप्रधाना पासून सतोप्रधान, सतोप्रधाना पासून तमोप्रधान बनता, याचा हिशोब काढू शकत नाहीत की किती वेळा बनले आहात. बाबा म्हणतात ५ हजार वर्षांचे हे चक्र आहे. हे योग्य आहे. लाखो वर्षांची गोष्ट तर लक्षात सुद्धा राहू शकणार नाही. आता तुमच्यामध्ये गुणांची धारणा होते. ज्ञानाचा तिसरा नेत्र मिळतो. या डोळ्यांनी तुम्ही जुन्या दुनियेला पाहता. तिसरा नेत्र जो मिळतो, त्याच्या द्वारे नवीन दुनियेला पहायचे आहे. ही दुनिया तर काही कामाची नाही. जुनी दुनिया आहे. नवीन आणि जुन्या दुनियेमध्ये फरक पहा किती आहे. तुम्ही जाणता आपणच नवीन दुनियेचे मालक होतो मग ८४ जन्म घेत-घेत हे बनलो आहोत. हे नीट लक्षात ठेवले पाहिजे आणि मग इतरांना देखील समजावून सांगायचे आहे - कसे आपण हे (लक्ष्मी-नारायण) बनतो? ब्रह्मा, सो विष्णु, मग विष्णु सो ब्रह्मा बनतात. ब्रह्मा आणि विष्णु मधील फरक पाहता ना. विष्णू कसा सुशोभित होऊन बसला आहे आणि हा ब्रह्मा कसा साधारण वेषात बसला आहे. तुम्ही जाणता हा ब्रह्मा, तो विष्णू बनणार आहे. हे कोणाला समजावून सांगणे देखील खूप सोपे आहे. ब्रह्मा, विष्णु, शंकराचा आपसामध्ये काय संबंध आहे? तुम्ही जाणता ही विष्णूची दोन रूपे लक्ष्मी-नारायण आहेत. हेच विष्णू देवता सो मग हे मनुष्य ब्रह्मा बनतात. तो विष्णू सतयुगातील आहे, ब्रह्मा इथले आहेत. बाबांनी समजावून सांगितले आहे ब्रह्मा पासून विष्णू सेकंदामध्ये बनतात, मग विष्णू पासून ब्रह्मा बनण्यामध्ये ५ हजार वर्षे लागतात. ततत्त्वम्. केवळ एक ब्रह्माच तर बनत नाहीत ना. या गोष्टी बाबाव्यतिरिक्त इतर कोणीही सांगू शकत नाही. इथे कोणत्या मानवी गुरुची गोष्ट नाहीये. यांचे देखील गुरू शिवबाबा, तुम्हा ब्राह्मणांचे देखील गुरु शिवबाबा आहेत. त्यांना सद्गुरु म्हटले जाते. तर मुलांनी शिवबाबांचीच आठवण करायची आहे. कोणालाही हे समजावून सांगणे तर खूप सोपे आहे - शिवबाबांची आठवण करा. शिवबाबा स्वर्ग नवीन दुनिया रचतात. उच्च ते उच्च भगवान शिव आहेत. ते आम्हा आत्म्यांचे पिता आहेत. तर भगवान मुलांना म्हणतात - 'मज पित्याची आठवण करा'. आठवण करणे किती सोपे आहे. बाळ जन्माला येते आणि लगेच त्याच्या मुखातून स्वतःच आई-आई निघते. आई-बाबांशिवाय दुसऱ्या कोणाकडेच जाणार नाही. आईचा मृत्यू होतो, तर ती मग वेगळी गोष्ट आहे. पहिले आई आणि बाबा त्यानंतर मग इतर मित्र-नातेवाईक इत्यादी असतात. त्यामध्ये देखील जोडी-जोडी असेल. काका-काकी दोघे आहेत ना. कुमारी असेल आणि मग मोठी होताच कोणी काकी म्हणेल, कोणी मामी म्हणेल.

आता तुम्हाला बाबा समजावून सांगतात तुम्ही सर्व भाऊ-भाऊ आहात. बस्स, बाकीची सर्व नाती कॅन्सल करतात. भाऊ-भाऊ समजाल तर एका बाबांची आठवण कराल. बाबा देखील म्हणतात - 'मुलांनो, मज एका पित्याची आठवण करा'. किती मोठे बेहदचे पिता आहेत. ते मोठे बाबा तुम्हाला बेहदचा वारसा देण्यासाठी आले आहेत. वारंवार सांगतात - मनमनाभव. स्वतःला आत्मा समजून बाबांची आठवण करा, ही गोष्ट विसरू नका.

देह-अभिमानामध्ये आल्यानेच विसरून जाता. सर्वात पहिले तर स्वतःला आत्मा समजायचे आहे - आपण आत्मे शाळिग्राम आहोत आणि एका बाबांचीच आठवण करायची आहे. बाबांनी सांगितले आहे - 'मी पतित-पावन आहे, माझी आठवण केल्याने तुमची बॅटरी जी रिकामी झाली आहे ती भरपूर होईल, तुम्ही सतोप्रधान बनाल'. पाण्याच्या गंगेमध्ये तर जन्म-जन्मांतर गटांगळ्या खाल्ल्या आहेत परंतु पावन बनू शकला नाहीत. पाणी पतित-पावन कसे असू शकते? ज्ञानानेच सद्गती होते. यावेळी आहेच पाप आत्म्यांची खोटी दुनिया. देवाण-घेवाण देखील पाप आत्म्यांशीच होते. मन्सा-वाचा-कर्मणा पाप-आत्माच बनतात. आता तुम्हा मुलांना समज मिळाली आहे. तुम्ही म्हणता - आम्ही असे लक्ष्मी-नारायण बनण्यासाठी पुरुषार्थ करतो. आता तुमची भक्ती करणे बंद झाले आहे. ज्ञानाने सद्गती होते. हे देवी-देवता सद्गतीमध्ये आहेत ना. बाबांनी समजावून सांगितले आहे - हे (ब्रह्मा बाबा) अनेक जन्मांच्या अंतामध्ये आहेत. बाबा किती सोपे करून सांगतात. तुम्ही मुले किती मेहनत करता. कल्प-कल्प करता. जुन्या दुनियेला बदलून नवीन दुनिया बनवायची आहे. म्हणतात ना भगवान जादूगार आहे, रत्नागर आहे, सौदागर आहे. जादूगार तर आहे ना. जुन्या दुनियेला हेल पासून बदलून हेवन (स्वर्ग) बनवतात. केवढी जादू आहे आता तुम्ही स्वर्गाचे रहिवासी बनत आहात. तुम्ही जाणता आता आपण हेलचे (नरकाचे) रहिवासी आहोत. हेल आणि हेवन वेगवेगळे आहे. ५ हजार वर्षांचे चक्र आहे. लाखो वर्षांची तर गोष्टच नाही. या गोष्टी विसरायच्या नाहीत. भगवानुवाच आहे ना - कोणीतरी आहे जरूर जे पुनर्जन्म रहीत आहे. श्रीकृष्णाला तर शरीर आहे. 'शिव'ला आपले शरीर नाहीये. त्यांना मुख तर जरूर पाहिजे. तुम्हाला ऐकविण्यासाठी येऊन शिकवतात. ड्रामा अनुसार संपूर्ण नॉलेजच त्यांच्या जवळ आहे. ते संपूर्ण कल्पामध्ये एकदाच येतात दुःखधामला सुखधाम बनविण्यासाठी. सुख-शांतीचा वारसा जरूर बाबांकडून मिळाला आहे तेव्हाच तर मनुष्यांना वाटते ना, बाबांची आठवण करतात.

बाबा, ज्ञान पहा किती सोप्या पद्धतीने देतात. इथे बसले असताना देखील बाबांची आठवण करा, बाजोलीची आठवण करा तरी देखील मनमनाभवच आहे. हे संपूर्ण ज्ञान देणारे बाबाच आहेत. तुम्ही म्हणाल आम्ही बेहदच्या बाबांकडे जातो. बाबा आम्हाला शांतिधाम-सुखधामला घेऊन जाण्याचा रस्ता सांगतात. इथे बसले असताना घराची (परमधामची) आठवण करायची आहे. स्वतःला आत्मा समजून बाबांची आठवण करायची आहे, घराची आठवण करायची आहे आणि नवीन दुनियेची आठवण करायची आहे. ही जुनी दुनिया तर नष्ट होणारच आहे. पुढे चालून तुम्ही वैकुंठाची देखील खूप आठवण कराल. वारंवार वैकुंठाला जात रहाल. सुरुवातीला मुली वारंवार आपसामध्ये बसून वैकुंठामध्ये निघून जात होत्या. हे पाहून मोठ्या घरचे आपल्या मुलांना पाठवून देत होते. नावच ठेवले होते - ओम निवास. पुष्कळ मुले आली मग हंगामा झाला. मुलांना शिकवत होते. सहजच ध्यानामध्ये जात होते. आता हा साक्षात्काराचा पार्ट बंद केला आहे. इथे देखील स्मशान बनवत होते. सर्वांना झोपवत होते, म्हणत होते आता शिवबाबांची आठवण करा, आणि ध्यानामध्ये जात होते. आता तुम्ही मुले देखील जादूगार आहात. कोणालाही दृष्टी द्याल तर ते लगेच ध्यानामध्ये जातील. ही जादू किती चांगली आहे. नौधा भक्तीमध्ये तर जेव्हा एकदम प्राण देण्यासाठी तयार होतात तेव्हा त्यांना साक्षात्कार होतो. इथे तर बाबा स्वतः आले आहेत, तुम्हा मुलांना शिकवून उच्च पद प्राप्त करून देतात. पुढे चालून तुम्ही मुले खूप साक्षात्कार करत रहाल. बाबांना आता देखील कोणी विचारेल तर सांगू शकतात की कोण गुलाबाचे फूल आहे, कोण चंपाचे फूल आहे, कोण तगरीचे आहे? अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) देहाची सर्व नाती कॅन्सल करून आत्मा भाऊ-भाऊ आहोत, हा निश्चय करायचा आहे आणि बाबांची आठवण करून पूर्ण वारशाचे अधिकारी बनायचे आहे.
2. २) आता पाप-आत्म्यांसोबत देवाण-घेवाण करायची नाही. अज्ञान निद्रेतून सर्वांना जागे करायचे आहे, शांतीधाम-सुखधामला जाण्याचा रस्ता सांगायचा आहे.

वरदान:- मन-बुद्धीच्या एकाग्रतेद्वारे सर्व सिद्धी प्राप्त करणारे सदा समर्थ आत्मा भव

सर्व सिद्धींना प्राप्त करण्यासाठी एकाग्रतेच्या शक्तीला वाढवा. ही एकाग्रतेची शक्ती सहजच

निर्विघ्न बनवते, मेहनत करण्याची आवश्यकता राहत नाही. 'एक बाप दुसरा न कोई' - याचा सहज अनुभव होतो, सहजच एकरस स्थिती बनते, सर्वांप्रती कल्याणाची वृत्ती, भावा-भावाची दृष्टी असते. परंतु एकाग्र होण्यासाठी इतके समर्थ बना जे मन-बुद्धी नेहमी तुमच्या ऑर्डर अनुसार चालेल. स्वप्नामध्ये देखील सेकंदाची देखील हलचल नसावी.

बोधवाक्य:- कमलपुष्प समान न्यारे रहा तर प्रभूच्या प्रेमाचे पात्र बनाल.

||| ओम शांती |||

"गोड मुलांनो - बाबा दररोज तुम्हाला जो अभ्यास शिकवतात, तो अभ्यास कधीही मिस करायचा नाही, या अभ्यासानेच मनातील शंका दूर होतात"

प्रश्न:- बाबांच्या हृदयाला जिंकण्याची युक्ती काय आहे?

उत्तर:- बाबांच्या हृदयाला जिंकायचे असेल तर जोपर्यंत संगमयुग आहे तोपर्यंत बाबांपासून काहीही लपवू नका. आपल्या कॅरेक्टरवर (चारित्र्यावर) पूर्णत: लक्ष ठेवा. जर कोणते पाप कर्म होते तर अविनाशी सर्जनला ऐकवा तर हलके व्हाल. बाबा जे शिक्षण देतात हीच त्यांची दया, कृपा किंवा आशीर्वाद आहेत. तर बाबांकडे दया अथवा कृपा मागण्या ऐवजी स्वतःवर कृपा करा. असा पुरुषार्थ करून बाबांच्या हृदयाला जिंका.

ओम् शांती. आता रूहानी मुले हे तर जाणतात की, नवीन दुनियेमध्ये सुख आहे, जुन्या दुनियेमध्ये दुःख आहे. दुःखामध्ये सर्व दुःखामध्ये येतात आणि सुखामध्ये सर्व सुखामध्ये येतात. सुखाच्या दुनियेमध्ये दुःखाचे नामोनिशाण नाही, आणि जिथे दुःख आहे तिथे सुखाचे नामोनिशाण नाही. जिथे पाप आहे तिथे पुण्याचे नामोनिशाण नाही, जिथे पुण्य आहे तिथे पापाचे नामोनिशाण नाही. ते कोणते स्थान आहे? एक आहे सतयुग, दुसरे आहे कलियुग. हे तर मुलांच्या बुद्धीमध्ये नक्कीच असेल. आता दुःखाचा काळ संपला आहे आणि सतयुगासाठी तयारी होत आहे. आपण आता या पतित घाणेरड्या दुनियेमधून त्या पलीकडे सतयुग अर्थात रामराज्यामध्ये जात आहोत. नवीन दुनियेमध्ये आहे सुख, जुन्या दुनियेमध्ये आहे दुःख. असे नाही, जो सुख देतो तोच दुःखही देतो. नाही, सुख बाबा देतात, दुःख माया रावण देतो. त्या शत्रूचा पुतळा दरवर्षी जाळतात. दुःख देणाऱ्याला नेहमी जाळले जाते. मुले जाणतात जेव्हा त्यांचे राज्य संपुष्टात येते तेव्हा मग कायमसाठी नष्ट होतो. ५ विकारच सर्वांना आदि-मध्य-अंत दुःख देत आले आहेत. तुम्ही इथे बसले आहात तरी देखील तुमच्या बुद्धीमध्ये हेच रहावे की आपल्याला बाबांकडे जायचे आहे. रावणाला काही तुम्ही पिता म्हणणार नाही. कधी ऐकले आहे - रावणाला परमपिता परमात्मा कोणी म्हणता? कधीच नाही. पुष्कळ लोक असे समजतात की, लंकेमध्ये रावण होता. बाबा म्हणतात - ही संपूर्ण दुनियाच लंका आहे. म्हणतात - वास्को-द-गामाने स्टीमर किंवा आगबोटीने जगाची परिक्रमा केली. ज्यावेळी त्याने भ्रमंती केली त्यावेळी एरोप्लेन इत्यादी नव्हते. ट्रेन देखील आगीवर चालत असे. विज वेगळी गोष्ट आहे. आता बाबा म्हणतात की, दुनिया तर एकच आहे. नव्या पासून जुनी, जुन्या पासून नवीन बनते. असे म्हणता येत नाही की स्थापना, पालना, विनाश. नाही, अगोदर स्थापना नंतर विनाश, त्यानंतर पालना, हे शब्द बरोबर आहेत. नंतर मग रावणाची पालना सुरू होते. ती खोटी विकारी पतित बनण्याची पालना आहे, ज्यामुळे सर्व दुःखी होतात. बाबा तर कधी कोणाला दुःख देत नाहीत. इथे तर तमोप्रधान बनल्याकारणाने बाबांना सर्वव्यापी म्हणतात. पहा, काय बनले आहेत! हे तर तुम्हा मुलांच्या चालता-फिरता बुद्धीमध्ये राहिले पाहिजे. आहे तर खूप सोपे. फक्त अल्फची (बाबांची) गोष्ट आहे. मुस्लिम लोक देखील म्हणतात - उठून अल्लाची आठवण करा. स्वतः देखील पहाटे उठतात. ते म्हणतात अल्लाह किंवा खुदाची आठवण करा. तुम्ही म्हणाल बाबांची आठवण करा. बाबा शब्द अतिशय गोड आहे. 'अल्लाह' म्हटल्याने वारसा आठवणार नाही. 'बाबा' म्हटल्याने वारसा आठवतो. मुस्लिम लोक 'पिता' म्हणत नाहीत. ते मग 'अल्लाह-मियां' म्हणतात. मियां-बीबी. हे सर्व शब्द भारतामध्ये आहेत. 'परमपिता परमात्मा' म्हटल्यानेच शिवलिंगाची आठवण येईल. युरोपवासी 'गॉड फादर' म्हणतात. भारतामध्ये तर दगड-धोंड्याला सुद्धा भगवान समजतात. शिवलिंग देखील दगडाचेच असते. समजतात या दगडामध्ये भगवान बसला आहे. भगवंताची आठवण करतील तर त्यांना दगडच समोर येतो. दगडाला भगवान समजून पूजा करतात. दगड कुठून येतो? डोंगरदऱ्यातील झऱ्यांमधून येणारे पाणी पडून-पडून गोल गुळगुळीत बनतो. मग कशी नैसर्गिक प्रतीके देखील बनतात. देवी-देवतांची मूर्ती अशी नसते. दगडाला तासून-तासून कान, तोंड, नाक, डोळे इत्यादी-इत्यादी किती सुंदर बनवतात. खर्च खूप करतात. शिवबाबांच्या मूर्तीवर खर्च इत्यादीचा काही प्रश्नच नाही. आता तुम्ही मुले समजता हम सो देवी-देवता चैतन्य मध्ये स्वतः बनत आहोत. चैतन्य मध्ये असाल तेव्हा पूजा इत्यादी होणार नाही. जेव्हा पत्थर-बुद्धि बनतात

तेव्हा दगडाची पूजा करतात. चैतन्य आहेत तेव्हा पूज्य आहेत मग पुजारी बनतात. तिथे ना कोणी पुजारी असतात, ना काही दगडाची मूर्ती असते. गरजच नाही. जे चैतन्य होते त्यांच्या प्रतिमा स्मारक म्हणून दगडांच्या मुर्त्या ठेवतात. आता या देवतांच्या कहाणी विषयी तुम्हाला माहीत झाले आहे की या देवतांची जीवन कहाणी काय होती? पुन्हा तीच रिपीट होते. पूर्वी हा ज्ञान चक्षु नव्हता तर जसे पत्थर बुद्धी होता. आता बाबांकडून जे ज्ञान मिळाले आहे, ज्ञान एकच आहे परंतु घेणारे नंबरवार आहेत.

तुमची रुद्रमाळा देखील या धारणेच्या अनुसारच बनते. एक आहे रुद्रमाळा, दुसरी आहे रुंडमाळा. एक आहे ब्रदर्सची (आत्म्यांची), दुसरी आहे ब्रदर्स आणि सिस्टरची (ब्रह्मा कुमार-कुमारींची). हे तर बुद्धीमध्ये येते आपण आत्मे अति सूक्ष्म बिंदू प्रमाणे आहोत. गायन देखील आहे - 'भ्रकुटी के बीच चमकता है अजब सितारा'. आता तुम्ही समजता आपण आत्मा चैतन्य आहोत. एक छोट्या ताऱ्याप्रमाणे आहोत. मग जेव्हा गर्भामध्ये येतो तेव्हा पहिले किती छोटा पिंड असतो. मग किती मोठा होतो. तीच आत्मा आपल्या शरीराद्वारे अविनाशी पार्ट बजावत राहते. मग सर्वजण या शरीराचीच आठवण करू लागतात. हे शरीरच चांगले-वाईट असल्या कारणाने सर्वांना आकर्षित करते. सतयुगामध्ये असे म्हणणार नाही की, आत्म-अभिमानी बना, स्वतःला आत्मा समजा. हे ज्ञान तुम्हाला आताच मिळते कारण तुम्ही जाणता आता आत्मा पतित बनली आहे. पतित असल्याकारणाने जे काम करते ते सर्व उलटेच होते. बाबा सुलट काम करवून घेतात, माया उलट काम करायला लावते. सर्वात उलटे काम आहे बाबांना सर्वव्यापी म्हणणे. आत्मा जो पार्ट बजावते तो अविनाशी आहे. त्याला जाळले जात नाही, त्याची तर पूजा होते. शरीराला जाळले जाते. आत्मा जेव्हा शरीर सोडते तेव्हा शरीराला जाळतात. आत्मा दुसऱ्या शरीरामध्ये प्रवेश करते. आत्म्याशिवाय शरीर दोन-चार दिवस सुद्धा ठेवू शकत नाही. अनेकजण तर मग शरीराला औषधे इत्यादी लावून ठेवतात देखील. परंतु फायदा काय? ख्रिश्चनांचा एक सेंट जेवीयर आहे, म्हणतात त्यांचे शरीर आजही जपून ठेवलेले आहे. त्यांचे देखील जसे मंदिर बनवले आहे. कोणाला दाखवत नाहीत फक्त त्यांचे पाय दाखवतात. म्हणतात - कोणी पायाला स्पर्श केला तर आजारी पडत नाही. पायाला स्पर्श केल्याने आजारा पासून मुक्त होतात तर समजतात त्यांची कृपा. बाबा म्हणतात - भावनेचे भाडे मिळते. निश्चयबुद्धी असल्याने थोडा फायदा होतो. बाकी असे असेल तर लोंढेच्या लोंढे तिथे जातील, जत्रा भरेल. बाबा देखील इथे आले आहेत तरी देखील इतकी गर्दी नसते. गर्दी होण्या इतकी जागा देखील नाहीये. जेव्हा गर्दी होण्याची वेळ येते तेव्हा विनाश होतो. हा देखील ड्रामा बनलेला आहे. याचा आदि अथवा अंत नाही आहे. हां, झाडाची (मनुष्य सृष्टीरुपी झाडाची) जड-जडीभूत अवस्था होते अर्थात तमोप्रधान बनते तेव्हा हे झाड चेंज होते. किती हे बेहदचे मोठे झाड आहे. पहिले ते येतील ज्यांना पहिल्या नंबरमध्ये जायचे आहे. नंबरवार येतील ना? सर्व सूर्यवंशी काही एकत्र तर येणार नाहीत. चंद्रवंशी देखील सर्व एकत्र येत नाहीत. नंबरवार माळे अनुसारच येतील. सर्व पार्टधारी एकत्र कसे येतील. खेळच बिघडून जाईल. हा खेळ अगदी अचूक बनलेला आहे, यामध्ये काहीही बदल होऊ शकत नाही.

गोड-गोड मुले जेव्हा इथे बसतात तर बुद्धीमध्ये हेच लक्षात राहिले पाहिजे. इतर सत्संगांमध्ये तर इतर अनेक गोष्टी बुद्धीमध्ये येतात. हे तर एकच शिक्षण आहे, ज्याद्वारे तुमची कमाई होते. ती शास्त्रे इत्यादी वाचल्याने कमाई होत नाही. हो, काही ना काही गुण चांगले असतात. ग्रंथ वाचण्यासाठी बसतात तर असे नाही सर्व निर्विकारी असतात. बाबा म्हणतात या दुनियेमध्ये सर्व भ्रष्टाचारातून जन्म घेतात. तुम्हा मुलांना बरेचजण विचारतात तिथे जन्म कसा होईल? बोला, तिथे तर ५ विकारच नाहीत, योगबलाने मुले जन्म घेतात. आधीच साक्षात्कार होतो की बाळ येणार आहे. तिथे विकाराची गोष्ट नाही. इथे तर मुलांना देखील माया खाली पाडते. काहीजण मग बाबांना येऊन सांगतात देखील. सांगितले नाही तर शंभर पटीने सजा होईल. बाबा तर सर्व मुलांना म्हणतात की, कोणतेही पाप कर्म झाले तर लगेच बाबांना सांगितले पाहिजे. बाबा अविनाशी वैद्य आहेत. सर्जनला सांगितल्याने तुम्ही हलके व्हाल. जोपर्यंत संगमयुग आहे तोपर्यंत बाबांपासून काहीही लपवायचे नाही. कोणी लपवतात तर बाबांचे मन जिंकू शकत नाहीत. सर्व काही पुरुषार्थावर अवलंबून आहे. शाळेमध्ये आलाच नाहीत तर कॅरॅक्टर (चारित्र्य) कसे सुधारेल? यावेळी सर्वांचे चारित्र्य खराब आहे. विकारच एक नंबरचे खराब चारित्र्य आहे; म्हणूनच बाबा म्हणतात - मुलांनो, काम विकार तुमचा महाशत्रू आहे. अगोदर देखील हे गीतेचे ज्ञान ऐकले होते तेव्हा या सर्व गोष्टी लक्षात येत नव्हत्या. आता बाबा डायरेक्ट गीता ऐकवतात. आता बाबांनी तुम्हा मुलांना दिव्य बुद्धी दिली आहे, तर भक्तीचे नाव ऐकताच हसू येते की, आपण काय-काय करत होतो! आता तर बाबा शिकवण देतात, यामध्ये दया, कृपा किंवा आशीर्वादाचा प्रश्नच येत नाही. स्वतःवरच दया, कृपा, आशीर्वाद करायचा आहे. बाबा तर प्रत्येक

मुलाला पुरुषार्थ करायला लावतात. काही मग पुरुषार्थ करून बाबांचे मन जिंकतात, काही मग पुरुषार्थ करता-करता मरून सुद्धा जातात. बाबा तर प्रत्येक मुलाला एकसमानच शिकवतात मग काही वेळेला अशा गूढ गोष्टी निघतात ज्यामुळे जुना संशयच नाहीसा होतो, मग पुन्हा सावरतात म्हणून बाबांची शिकवणी कधीही मिस करता कामा नये. मुख्य आहे बाबांची आठवण. दैवी गुण देखील धारण करायचे आहेत. कोणी काही वाईट बोलले तर ऐकून न ऐकल्यासारखे केले पाहिजे. 'हियर नो ईविल...' उच्च पद प्राप्त करायचे असेल तर मान-अपमान, सुख-दुःख, हार-जीत सर्वकाही जरूर सहन करायचे आहे. बाबा किती युक्त्या सांगतात. तरी देखील मुले बाबांचे सुद्धा ऐकून न ऐकल्या सारखे करतात तर ते काय पद प्राप्त करतील? बाबा म्हणतात जोपर्यंत अशरीरी बनत नाही तोपर्यंत मायेचा काही ना काही त्रास होतच राहणार. बाबांचे म्हणणे मानत नाहीत तर बाबांचा डिस रिगार्ड (अनादर) करतात. तरी देखील बाबा म्हणतात मुलांनो, नेहमी जिवंत रहा, जागे रहा; आणि बाबांची आठवण करून उच्च पद प्राप्त करा. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. २) बाबा जे सांगतात ते कधीही ऐकून न ऐकल्यासारखे करून बाबांचा डिस रिगार्ड करायचा नाही. मायेच्या वारा पासून वाचण्यासाठी अशरीरी होऊन राहण्याचा अभ्यास जरूर करायचा आहे.

वरदान:- बाप समान दयाळू बनून सर्वांना क्षमा करून स्नेह देणारे मास्टर दाता भव ज्याप्रमाणे बाबांना दयाळू, मर्सीफुल म्हणतात, तसेच तुम्ही मुले देखील मास्टर दयाळू आहात. जे दयाळू आहेत तेच कल्याण करू शकतात, अकल्याण करणाऱ्यांना देखील क्षमा करू शकतात. ते मास्टर स्नेहाचे सागर असतात, त्यांच्याकडे स्नेहाव्यतिरिक्त इतर काहीच नसते. वर्तमान समयी संपत्ती पेक्षा देखील जास्त स्नेहाची गरज आहे, म्हणून मास्टर दाता बनून सर्वांना स्नेह देत जा. कोणीही रिकाम्या हाताने जाऊ नये.

बोधवाक्य:- तीव्र पुरुषार्थी बनण्याची इच्छा असेल तर जिथे इच्छा असेल तिथे मार्ग सापडेल.

||| ओम शांती |||